# भम्पकराव बाताडे

# व

# इतर गोष्टी

लेखक :

**नी. र. वऱ्हाडपांडे**

**प्रकाशन :**

सुरम्य ३८,
हिन्दुस्तान कॉलनी,
अमरावती रोड,
नागपूर–४४० ०१०

दूरभाष : २२८०८

**लेखक :**

नी. र. वऱ्हाडपाण्डे

मूल्य ३० रुपये


प्रथमावृत्ती १९८६

**मुद्रक :**

सौ. मोहना मार्डीकर
भाग्यश्री एन्टरप्राईजेस,
२६२–C, लक्ष्मीनगर.

ज्यांनी माझे प्रकाशित/अप्रकाशित सर्व लिखाण वाचून मनःपूर्वक त्याचे कौतुक केले त्या श्री. पु. भा. भावे यांच्या स्मृतीस . . .

**नी. र. वऱ्हाडपाण्डे**



भावे बंगला
नेहरु पार्क पथ
धंतोली, नागपूर
२६-२-७५

श्री. वऱ्हाडपांडे यांसी
सप्रेम नमस्कार, वि. वि.

श्री. पां. ब. गाडगीळांनी मला तुमच्या १८५७ विषयींच्या व अन्य काही लेखांची कात्रणे दिली. तसेच "वाणी आणि वाङ्मय' हे पुस्तक दिले. मला तुमचे लेख फार फार आवडले. देशहिताच्या दृष्टीने तुमचे सर्व लिखाण ग्रंथरूपाने उपलब्ध झाले पाहिजे असे मला वाटते. या संबंधात काय जमते ते पाहू. तूर्त माझे मन:पूर्वक अभिनन्दन स्वीकारा. १ मार्चपर्यंत मी डोम्बिवलीस जात आहे. साधारणत: तिथेच मी असतो. माझा तेथील पत्ता पु. भा. भावे वाटवे बंगला, डोम्बिवली-पश्चिम जि. ठाणे हा आहे. अवश्य पत्र पाठवावे हेच पत्री सर्व वडिलास साष्टांग नमस्कार व लहानास आशीर्वाद, लोभ, सदिच्छा कळावे.

आपला
**पु. भा. भावे**

# लेखकाचे इतर ग्रन्थ

## मराठी

| नाव | मिळण्याचे ठिकाण |
|---|---|
| १) **सुखदु:खविवेक** | उपलब्ध नाही |
| २) **कूजन** (काव्यसंग्रह) | उपलब्ध नाही |
| ३) **विवेकवाद**<br>(तत्वज्ञानात्मक लेखांचा संग्रह) | **सुरम्य ३८**<br>हिन्दुस्तान कॉलनी,<br>अमरावती रोड,<br>नागपुर–४४००१०.<br>दूरभाष : २२८०८ |
| ४) **वाणी आणि वाङ्मय**<br>(भाषा व साहित्यविषयक लेखांचा संग्रह) | **स्वाती प्रकाशन**<br>विजयनगर कॉलनी,<br>पुणे – ३०. |

## इंग्रजी

| | |
|---|---|
| 1) Time Space & Motion | नागपुर विद्यापीठ,<br>रजिस्ट्रार |
| 2) Abilities & Education | उपलब्ध नाही |
| 3) Intelligence Test Scores of Candidates at the Services Selection Boards | Manager of Publications Govt. of India New Delhi. |

# थोडे प्रास्ताविक . . . .

या संग्रहातील साऱ्या गोष्टी गेल्या तीस वर्षाच्या काळात निरनिराळ्या मासिकातून प्रकाशित झाल्या आहेत. गोष्टी काल्पनिक व मौलिक असल्या तरी लेखक जे पाहतो व वाचतो त्याचा प्रभाव त्याच्या लेखनावर पडणे अपरिहार्य असते. असे असले तरी कोणत्याही वास्तविक व्यक्तीचे त्यात चित्रण, वा कोणत्याही दुसऱ्या लेखकाचे अनुकरण नाही. या व्यतिरिक्त गोष्टींचे मूल्यमापन रसिक करतीलच या आशेने ह्या गोष्टी सादर करीत आहे.

नो. र वऱ्हाडपाण्डे

# अनुक्रमाणिका


| | | |
|---|---|---|
| | भम्पकराव बाताडे | १ |
| १. | सुटका | २ |
| २. | भम्पकरावांचे व्याख्यान | १७ |
| ३. | अखिल भारतीय पुरोगामी परिषद | ३० |
| ४. | आन्तरराष्ट्रीय नवरेसंघ | ४७ |
| ५. | चवथे शील | ५८ |
| ६. | भम्पकरावांचे ब्रम्हचर्य | ६७ |
| ७. | भम्पकरावांचा कायदेभंग | ९१ |
| ८. | संशोधनखात्यात भम्पकराव | १०४ |
| ९. | माझा खोकला | १२४ |
| १०. | थोर पुरुष | १३६ |
| ११. | "खानोजीराव हडपे" | १५१ |
| १२. | बजबजपूरचा कारखाना | १७३ |
| १३. | सन दोन हजारमधील एक विद्वान् | १९१ |


# भम्पकराव बाताडे

आमचे मित्र त्रिम्बकराव दंताळे यांना त्यांच्या खऱ्या नावाने कोणीच ओळखीत नाही भम्पकराव बाताडे या नावानेच ते महशूर आहेत. याचे कारण पुढील गोष्टींत वर्णन केलेले त्यांचे पराक्रम व लीला वाचताच वाचकांच्या लक्षात येईल. भम्पकराव बाताडे ही त्यांची लोकमान्य पदवी त्यांच्या साऱ्या मित्र–मंडळीच्या इतकी तोंडी बसली आहे की ते समोर असताना त्यांना भम्पकराव म्हगून हाक न मारता त्रिम्बकराव म्हणून हाक मारणे, व दुसऱ्यांना त्यांची ओळख करून देताना हे आमचे मित्र भम्पकराव .. हे जिभेवर आलेले शब्द गिळून त्रिम्बकराव दंताळे हे शब्द उच्चारायला प्रयत्नच करावा लागतो. हा जीवघेणा प्रयत्न आता बस झाला म्हणून त्रिम्बकरावांच्या पुढील लीला वर्णिताना मी त्यांचा उल्लेख सरळ भम्पकराव म्हणूनच केला आहे. यावरून त्रिम्बकराव चिडून बेअब्रूची फिर्याद करण्याचा सम्भव आहे. पण अशी फिर्याद झाली तर या गोष्टी अधिकच प्रसिद्ध होतील म्हणून हे धैर्य करण्याचे मी ठरविले.

असो, तर आता त्रिम्बकरावांचे माहात्म्य गाण्यास सुरवात करतो :–

# सुटका

रविवारचा दिवस असल्यामुळे उठावेसे वाटेल तेव्हां उठावे अशा बेताने आरामांत मी पडलो असतांना "उठा हो आळसोपन्त" म्हणून गर्जना ऐकू आली. व सुबक व नयनमनोहर असे काचेचे झुम्बर एका खडयाने फुटून क्षणार्धांत मातीमोल व्हावे त्याप्रमाणे माझी सुखद झोप क्षणार्धांत मोडून मला पारखी झाली. चडफडतच मी बाहेर आलो. पाहतो तो आमचे भम्पकराव! वाटले या गृहस्थाच्या नरडीच्या घोट घ्यावा! पण वाटते तसे नेहमी केले जात नाही म्हणूनच हे जग चालले आहे. भम्पकरावांच्या नरडीचा घोट न घेता आपला रागच आंतल्या आंत गिळत मी स्वस्थ बसलो.

भम्पकराव हे स्वत:ला फार थोर पुरुष समजत असत. एवढया सकाळी उठून ते आपली थोरवी मला पटवायलाच आले होते, याबद्दल माझी खात्री होती. आल्याबरोबर मोठया कोचांत स्थानापन्न होऊन त्यांनी सुरवात केली.

"तुमच्यासारख्या लोकांनीच हा देश रसातळाला नेला आहे. तिकडे सूर्यनारायण आपल्या कामाला लागून इतका वेळ झाला तरी तुमचे धोरणे सुरुच! मी काल रात्री केव्हां झोपलो माहीत आहे ?"

माहीत नसले तरी माहीत करून घेतलेच पाहिजे एवढी ज्ञानपिपासा आम्हाला नव्हती. भम्पकरावांची टकळी बन्द करायला मी अपराधी स्वरांत उत्तरलो. "आज रविवारचा दिवस. म्हटलं जरा आराम करावा. तुमच्यासारखी काटक प्रकृति आमच्याजवळ नाही त्याला काय करावं ?"



"प्रकृतीचे कसले चोचले घेऊन बसलात. माझी प्रकृति एके काळी साऱ्या रोगांचं माहेरघर होती. माझ्या उजव्या हातांत कॅन्सर तर डाव्या हातांत अस्थिक्षय, गळयांत घटसर्प तर पायांत हत्तीपाय अशी स्थिति होती. पण पांच वर्ष योगसाधना करून रोगांना पिटाळून लावलं. निश्चयाचे बळ, तुका म्हणे तेची फळ."

"खरंच त्या हेलन केलरची महती तुमच्यापुढं काहीच नाही" मी म्हणालो. इतक्यांत आमच्या सौभाग्यवती चहा घेऊन आल्या. चहाचे तबक मी स्वत: "पाहुण्याला" चहा द्यावा म्हणून माझ्यापुढे ठेवले. पण भम्पकरावांनी पाहुणचाराची संधीच आम्हाला दिली नाहीं. पटकन् स्वत:च उठून त्यांनी कप उचलला व एक घुटका घेऊन ते म्हणाले, "काय वहिनी! फार थंड चहा आहे, जरा गरम करून आणावा लागेल. अन् थोडं दूधही अधिक घातल्यास चालेल."

सौ. भम्पकरावांचा कप परत घेऊन गेली. भम्पकरावांनी पुन: आपली गोलंदाजी सुरू केली.

"थण्ड चहा प्यायची संवय फार वाईट. हिरडया व पोट यांत रात्रभर जमलेले जन्तु गरम चहानं मरतात. थंड चहा म्हणजे तर अशा जन्तूंना अलभ्य लाभच. शरीराला रामराम ठोकू इच्छिणारे जन्तू देखील त्या चहाच्या लोभानं शरीरांत घुटमळत राहतील."

भम्पकरावांचे वक्तृत्व सुरू असतांना "साब! म्हणून दारावर कुणीतरी जोराने थाप मारली. त्यासरशी भम्पकराव एकदम गडबडीत उठले ते थेट न्हाणीघरांत गेले. दारांतून एक सरदार आंत आला व टॅक्सीच्या पैशासाठी आपण वाट पाहात आहोत म्हणून त्याने खुलासा केला. आपल्यापुढे काय वाढून ठेवले आहे याची मला पूर्वानुभवाने पुरेपूर कल्पना होती. भम्पकराव आमच्याकडे येत ते बहुधा व्ही पी. ने येत. म्हणजे ते घरी पोचल्यावर त्यांचा प्रवासखर्च आम्ही भरायचा असे. शिवाय साध्या व्ही. पी. सारखे "भम्पकराव" हे पार्सल परत करायचा पत्तेदाराला अधिकार नसे. वाटेल तितके पैसे देऊन ते सोडवलेच पाहिजे.

एवढे सर्व माहीत असून देखील आशा मोठी बलवत्तर! भम्पकरावांना आपण टॅक्सीभाडे द्यायला लावूं या आशेने मी न्हाणीघरांत डोकावून पाहलं. न्हाणीघरांत भम्पकरावांचा देह कुठे दिसेना. "तुमच्या साहेबांना आता शोधतो" असे टॅक्सीवाल्याला आश्वासन देऊन मी घरभर शोध केला. कपाटे व मोठया

पेट्या देखील पालथ्या घातल्या. पण भम्पकराव पूर्णपणे अदृश्य. शेवटी निरुपाय होऊन टॅक्सीवाल्याला भम्पकराव घरांतून गायब झाल्याचे सांगितले. पण त्याचा माझ्यावर विश्वास बसेना. उलट त्याला माझाच संशय येऊ लागला. भम्पकरावांच्या सोनेरी टोळीचा मी एक सभासद आहे अशी कल्पना त्याच्या मनांत बळावत असल्याचे स्पष्ट दिसत होते. तो म्हणाला, "हरकत नाही. ते तुमचेच मित्र आहेत ना. मग तुम्हीच द्या त्यांचे पैसे."

"भम्पकराव" छाप पार्सल सोडवण्याशिवाय गत्यन्तरच नव्हते. मी मुकाट्याने पैसे दिले तेव्हा टॅक्सीवाला चालता झाला. तो जाऊन १२/१५ मिनिटे झाली तोच भम्पकराव पुन: हजर झाले. जणू कांहीच घडले नाही अशा आविर्भावाने त्यांनी विचारले "तुमचा चहा झालेला दिसत नाही अजून".

मी रागानेच म्हटले, "अहो कसा होणार तुमच्या वाचून" इतक्यांत चिरंजीव, भम्पकरावांचा चहा घेऊन आले. गरम चहाचा कप समोर दिसताच भम्पकरावांचा चेहरा उजळला. आपली पर्स बाहेर काढत ते म्हणाले, "अरे, बाहेर तो टॅक्सीवाला उभा आहे, त्याचे हे पैसे देऊन ये बरं जरा". भम्पकरावांच्या पर्समध्ये पैसे नसणार याची खात्री असल्यामुळे मी कटवटपणे म्हणालो "दिले मी त्याचे पैसे केव्हाच" त्यावर "असं का ?" म्हणून भम्पकरावांनी आपली पर्स पुन: आंत कोंबली व शान्त चित्ताने चहा प्यायला सुरवात केली.

"इतका वेळ होता कुठं तुम्ही ? सर्व घर पालथं घातलं तुम्हाला शोधायला" शक्य तितक्या कठोर आवाजांत मी विचारलं

"एवढी कसली धान्दल उडाली माझ्या गैरहजेरीत ? तुमच्या मागचे ते श्रीधरपन्त आहेत त्यांच्याकडे एक चक्कर मारून आलो. फार दिवसांपासून बोलवताहेत. पण सवडच झाली नाही. म्हटलं चहा गरम होईपर्यंत वेळ आहे. थोडं जाऊन यावं".

भम्पकराव एवढावेळ श्रीधरपन्तांच्या बागेतल्या एखाद्या झाडाआड दडून बसले होते एकूण ! मी जास्त चौकशा करुन पेचात टाकू नये म्हणून त्यांनी चटकन् "आंत" पाहून बोलायला सुरवात केली.

"काय वहिनी ! काय चाललय्. या नं जरा."



वहिनीनं नुसतंच "ठीक आहे" म्हणून भम्पकरावांच्या आमंत्रणाची बोळवण केली. पण भम्पकराव कसले वस्ताद.! त्यांनी आपला मोर्चा पूर्णपणे वहिनीवरच वळवला होता.

"वहिनी, या वयांत हे कांही बरं नव्हे."

वहिनी थेरडी झाली आहे व तारुण्याचे शोक करते आहे असा भम्पकरावांचा कां भ्रम झाला मला कळेना, पण पुढे त्यांनीच खुलासा केला.

"अहो तुमचं वजन वाढत चाललंय्. पण कांही हरकत नाही. माझंही गेल्या वर्षी असंच होत होतं. जे वजन वाढत चाललं कांही विचारू नका. दीडशे झाले, अंगाचे पौण्ड तीनशेची मजल गाठू लागले. तेव्हा म्हटलं हे कांही योग्य नव्हे. देह ताब्यांत ठेवलाच पाहिजे. सुट्टी काढून महिनाभर साधना केली. आता माझं वजन माझ्या हुकमांत आलं. जेवढं म्हणाल तेवढं माझं वजन मी ठेवू शकतो."

भम्पकरावांना छेडण्याच्या उद्देशानं मी म्हणालो, "खरं म्हटलं तर हा शोध कांही नवीन नाही. रामायणांत या विद्येचा उल्लेख आहे. मारुतीनं समुद्रावरून उड्डाण केलं तेव्हा त्याचं शरीर पर्वतप्राय झालं. पुढे राक्षसिणीनं अडवलं तेव्हा मुंगीचं रूप धारण करून तो निसटला. अणिमा महिमा सिद्धि ती हीच."

"हे लागले चेष्टा करायला" भम्पकराव रागावून म्हणाले. "अणिमा महिमा वगैरे कांही नाही, साधा नियमबद्ध कार्यक्रम आहे. सकाळी . . .

भम्पकरावांचा सकाळपासून संध्याकाळपर्यन्तचा कार्यक्रम ऐकावा लागणार या भीतीनं मी त्यांना मधेच अडवलं.

"पण त्रिम्बकराव तुमच्या अंगावर थोडं मास अधिक असायला हवं. तुमच्या विद्येचा प्रयोग करून शरीर जरा भरू कां देत नाही ?"

"कोण म्हणतं माझ्या अंगावर मास कमी आहे ? बौद्धिक शक्ति पूर्णपणे कसास लावायला अशीच देहयष्टि पाहिजे."

भम्पकराव आपली बौद्धिक शक्ति गेल्या पांच वर्षांपासून एका अचाट ग्रंथावर खर्चत होते. हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर जगात क्रान्ति होणार आहे व या नव्या क्रान्तीचा प्रणेता म्हणून जगाच्या कारभाराची धुरा वाहण्याचे काम

आपल्यालाच स्वीकारावे लागणार आहे असे ते मोठ्या गंभीरपणे म्हणत. कधी-कधी पांच वर्षाच्या आंतच जगांत क्रान्ति घडवून आणायची काही जरूर नाही, "क्रान्ति can wait !" "असे ते शुद्ध राष्ट्रीय इंग्रजीत म्हणत. अशावेळी आपल्या क्रान्तिकारक ग्रंथाचे काम बाजूला ठेवून ते" "गणितशास्त्रांतील गोंधळ", "आइन्स्टाइनच्या चुका" वगैरे मामुली विषय हाती घेत. या विषयावरील आपले निबंध तयार करण्यासाठी गेल्या दोन वर्षापासून United Nations व रशियन academy of Sciences वगैरे संस्थांनी त्यांच्या मागे तगादा लावला होता. देहयष्टिशास्त्राचा आमच्या सौ. ला अप्रिय असलेला विषय सोडून या दुसऱ्या शास्त्रांबद्दल भम्पकरावांना कांही विचारावे असे मला वाटले. तितक्यांत नोकर एक भली मोठी ट्रंक व बिछाना घेऊन आंत आला व हे सामान कुठे ठेवायचं म्हणून विचारू लागला. मला बोधच होईना. कोण पाहुणे आले आहेत, सामान कुणाचं आहे वगैरे मी त्याला विचारू लागलो तोच भम्पकरावांनी खुलासा केला.

"माझंच सामान आहे. ही सुट्टी तुमच्याकडे काढायचा माझा विचार आहे".

"कोणती सुट्टी ? न् किती ?" भम्पकरावांच्या दुसऱ्या हल्ल्याने हतबुद्ध होऊन मी विचारलं.

"काढली आहे महिनाभर. एक विशेष साधना करायची आहे. त्यासाठी कडक ब्रह्मचर्य पाळायची जरुर असते." इति भम्पकराव.

"मग सोपा उपाय आहे. सौ. भम्पकरावांना माहेरी पाठवून द्या म्हणजे झालं."

"नाही, तेवढ्यानं भागायचं नाही. माहेरी पाठवली की ती प्रेमपत्र वगैरे सुरू होतात. नकोच ते ! मला अगदी कायावाचामनेकरून ब्रम्हचर्य पाळायचं आहे. एकाच शहरांत असलं म्हणजे पत्रबित्र लिहायच्या भानगडीत कोण पडतं".

"पत्र लिहिणार नाही, पण चोरून भेटीगाठी घ्याल" मी बदसूर काढला.

"छे ! छे ! तिचं तोंडदेखील पाहणार नाही." भम्पकराव जयद्रथवधाची प्रतिज्ञा करणाऱ्या अर्जुनाच्या आविर्भावानं म्हणाले.

तुम्ही फार थोर आहात असे भम्पकरावांची मनोदेवता त्यांना सांगे. पण



भम्पकरावांच्या गृहदेवतेला मात्र त्यांच्या मनोदेवतेचे हे मत मुळीच पटत नसे. या दोन देवतांमध्ये उभा दावा होता. एक पंतप्रधानपद तुम्हाला टाळूनही टाळता येणार नाही असे त्यांना बजावी तर दुसरी "ही कारकुनी टिकवली म्हणजे मिळवली" असा त्यावर उतारा येई. भम्पकरावांची नोकरी कधीच फार काळ टिकत नसे, कधी त्यांचे नोकरींशी जमत नसे तर कधी नोकरीचे त्यांच्याशी जमत नसे. एकूण त्यांना वारंवार घरी बसावे लागे व मग ते लोकांना आपण साधनेसाठी सुट्टी काढली आहे असे सांगत. त्यांच्या गृहदेवतेला एक लहानशी नोकरी होती व त्यांचा प्रपंच बहुधा याच नोकरीवर अवलम्बून होता. नोकरीत टिकून न राहण्याबद्दल सौ. भम्पकराव श्री. भम्पकरावांना अनेकदा फैलावर घेत. अशावेळी भम्पकराव ब्रम्हचर्याची प्रतिज्ञा करून घरातून बाहेर पडत. हा व्रताचा काळ ते हिमालयावर काढीत असा प्रवाद होता. (हा प्रवाद अर्थात त्यांनीच पसरवलेला होता.) पण भम्पकरावांचा हिमालय म्हणजे माझ्यासारख्याच एखाद्या मित्राचे घर हे तत्व आजच मला प्रत्यक्ष प्रमाणाने कळले.

माझ्यावर मोठा बाका प्रसंग गुदरला होता. यातून सुटायचे कसे? सुमेरसिंग, खरकसिंग तरवारी उगारून नारायणरावांवर धावले तेव्हा त्यांना कसे वाटले असेल? पण मित्रहो, ते संकट कांहीच नाही. पांचदहा मिनिटांत बिचाऱ्या नारायणरावांची सुटका झाली. पण मला तब्बल एक महिना भम्पकरावांना तोंड द्यावे लागणार होते.

माझ्या या चिंताक्रांत समाधीचा सौ. ने भंग केला. "अहो, हे काय केलं तुम्ही ?" माझ्याजवळ येऊन तिनं हलकेच विचारलं.

मी भानावर आलो. भम्पकराव प्रातर्विधी उरकायला निघून गेले होते. सौ.ला माझ्या कोणत्या कुकर्माबद्दल जबाब पाहिजे आहे कळेना.

"मी कुठे काय केलं ?"

"ह्या भम्पकरावांना म्हणे महिनाभर राहायला आग्रह केला !"

"शाब्बास. त्यांनीच सांगितलं वाटतं ! कसंही करून ही ब्याद टाळलीच पाहिजे. पण कशी ?"

आपले विधि आटपावे म्हणून आम्ही उठलो. मी आपले दाढीचे सामान शोधू लागलो. ते कुठे सापडेना. म्हणून गृहखात्याकडे पृच्छा केली. पृच्छेचे उत्तर

म्हणून प्रतिपृच्छा आली. "माझं कुंकू, लिपस्टिक् कुठं सांपडत नाही".

माझे दाढीचे सामान अर्थात् भम्पकरावांनी आपलेसे केले असावे. पण हिचं कुंकू व लिपस्टिक् कुठे जाणार ! मला काही कळेना.

इतक्यात भम्पकराव टॉवेल गुंडाळून न्हाणीघरातून बाहेर आले. त्यांच्या मस्तकावर क्रांति झालेली दिसत होती. तेथील वनश्रीच्या जागी वाळवंट दिसत होते. भम्पकरावांनी माझी कात्री व रेझर स्वत:च्या डोक्यावर चालवले एकूण ! काय करावं या माणसाला ?

"काय भम्पकराव न्हाव्याचा खर्च वाचवण्यात वेळ घालवत होता वाटतं" मी चिडून विचारलं.

"तुम्ही लोक हे असेच. तुम्हाला जगांत काही आदरणीय दिसत नाही. मी स्वत:चे केस कापले यांत तुम्हाला स्वावलंबनाचा आदर्श न दिसता चिक्कूपणा दिसतो."

"अहो पण चप्पी करायची फॅशन तुम्ही केव्हापासून उचलली ?"

"पुन: तेच. म्हणे फॅशन. म्हणजे फॅशन म्हणून का मी मुण्डन केलं? मघाशी सांगितलं न तुम्हाला की महिनाभर व्रतस्थ राहणार आहे. इकडे ब्रम्हचर्याचं व्रत बाळगायचं न इकडे केशभूषेत वेळ घालवायचा यांत काही अर्थ आहे?"

"मग आता भगवे कपडे घालणं तेवढंच राहलं आहे." मी निर्वाणीचा बाण फेकला. पण भम्पकरावांवर कशाचाच परिणाम होत नसे.

"हो आजपासून भगवेच कपडे घालणार आहे मी" त्यांनी आपला निश्चय जाहीर केला.

क्षणभर त्यांच्या निश्चयाचा पूर्ण अर्थ माझ्या ध्यानांत आला नाही. पण आपले दाढीचे सामान सोडवून आणण्यासाठी मी न्हाणीघरांत पाय ठेवला तोच पाण्याच्या बादलीत होळीचा लाल रंग भरलेला दिसला. आता माझ्या डोक्यांत प्रकाश पडला. आपले धोतर भगवे करण्यासाठी भम्पकरावांनी कुंकवाची पेटी पळवली होती. ती पेटी बादलीत ओतून आमच्या न्हाणीघराचा त्यांनी रंगारी-खाना केला होता. आता मात्र मला संताप आवरेना.



"हे काय त्रिम्बकराव ! कुंकवानं धोतर भगवं करून तुम्हीं संन्यासी होणार होय ? छान कल्पना आहे तुमची !"

"म्हणजे कुंकवाचा रंग धोतरावर टिकायचा नाही म्हणता ? तरीच मला शंका आली होती की प्रयोग कसा काय जमणार ? हरकत नाही. दुसरा उपाय करुन पाहू." म्हणून त्रिम्बकराव पटकन् न्हाणीघरात शिरले. त्यांनी बादलीतून आपले धोतर काढले. नीट पिळले व ओटयावर पसरले. आता हे राजेश्री काय करतात म्हणून धडधडत्या छातीने मी बघू लागलो. त्रिम्बकरावांनी आपल्या काखोटीतून चोरलेली लिप्स्टिक काढली व त्या धोतरावर घासायला सुरवात केली. हा अभिनव प्रयोग करीत असताना त्यांचे रसायनशास्त्रावर प्रवचन सुरु झाले.

"तरी मला शंका होतीच की कुंकू धोतरावर टिकायचं नाही. त्यामुळे विचार केला की लिप्स्टिक् या कामी अधिक उपयोगी पडेल. घाम, पाणी, चुंबन या सर्वांना पुरुन उरणारा पदार्थ हा. तेव्हा कुंकवापेक्षा जास्त चिवट असावा. तरी हा नुसता प्रयोग आहे. कुणी सांगावं जे ओठावर टिकतं ते धोतरावर टिकेलच कशावरून ! ....

भम्पकरावांचे सर्वच प्रवचन दिले तर अभिनव रसायनशास्त्रावरील एक ग्रंथच तयार होईल. या माणसावर रागवावे का त्याची कीव करावी हेच मला कळेना. दगडाखाली अडकलेला हात काढावा कसा या विवंचनेत मी पुन: बैठकीत जाऊन बसलो, तोच सौ. हळूच आली व कारस्थानी स्वरांत विचारु लागली.

"का हो, पोलिसाला बोलावून यांना वेडयाच्या इस्पितळांत पाठवता नाही का येणार ?"

मी म्हटलं "काही सांगता येत नाही." पोलिस म्हणेल, "हा वेडा कशावरून हे आधी सिद्ध करा."

"म्हणजे हे कुंकवाचं न लिपस्टिक्चं प्रकरण सांगूनसुद्धा त्याची खात्री पटणार नाही असं वाटतं तुम्हाला ?"

"कुणी सांगावं या प्रकरणावरून हा वेडा नसून महात्मा आहे असाच त्यांचा ग्रह व्हायचा एखादे वेळी !"

"मग काही सुचवा नं एखादी तोड..." असं ती म्हणते तोच भम्पकराव कमरेला टॉवेल व हातात धोतर अशा खाक्यात दारात येऊन उभे राहिले न् ओरडले.

"प्रयोग successful! व्रताला मुहूर्त चांगला लागला."

भम्पकरावांकडे तिरस्काराचा कटाक्ष टाकीत सौ. घरात निघून गेली. पण लिपस्टिक्मध्ये मुरलेला भम्पकरावांचा संन्यास अशा छप्पन्न कटाक्षांना पुरून उरणारा होता. ते तसेच धोतर वाळत टाकायला बाहेर गेले व आल्यावर तोच successful प्रयोग त्यांनी आपल्या सदऱ्यावर केला. त्यानंतर ते आंघोळीला बसले.

"वहिनी, जरा पाणी गरम करून आणता कां?" त्यांनी आंतूनच मनीषा कळवली.

"इंधन संपलंय् घरचं" सौ. ने कठोरपणे उत्तर दिलं.

आपण कांही ऐकलंच नाही अशा आविर्भावाने भम्पकरावांनी तान सोडली "ललना SS मना ...."

कलि, त्रेता, द्वापर वगैरेसारखी कांही युगे लोटल्यावर भम्पकरावांचे स्नान आटोपले. मग त्यांनी घाण केलेल्या न्हाणीघराला आधी आंघोळ घालून मग स्वत:ला आंघोळ घालण्याचा आमचा कार्यक्रम आटोपला. इतका सर्व वेळ एकच विचार मनांत घोळत होता. भम्पकरावांच्या तावडीतून सुटावे कसे? आग्र्याहून सुटून येणाऱ्या शिवाजी महाराजांची बुद्धि आपल्या ठायी नाही, नाहीतर काय बहार झाली असती असा स्वप्नाळु विचार मनाला चाटून गेला.

शुचिर्भूत होऊन बैठकीत आलो तो भम्पकराव नुसती चड्डी घालून आरामांत वर्तमानपत्र वाचत बसले होते. मी म्हटलं–

"त्रिम्बकराव, घालीन तर भगवं नाहीतर नागवं असं तुमचं व्रत आहे वाटतं?"

"हो. तसंच समजा. वस्तुत: मी म्हणतो, कपडे घालायचीच काय जरूर आहे? कपडे घालण्याची चाल बूर्झ्वा लोकांनी काढली आहे. कोणी गोणपाट



घालतो तर कोणी मखमल. यामुळेच मानवामानवांत भेद पाडता येतो. हे सर्व बंद करून समतेचं साम्राज्य प्रस्थापित केलं पाहिजे."

"अहो पण बूर्झ्वा लोकांनी ही शक्कल काढली नसती तर भगवं नेसून आपलं व्रत सांभाळायची सोय तुम्हाला तरी कशी उपलब्ध झाली असती?"

"तुमचं चुकतं ते इथंच" भम्पकराव संथपणे म्हणून थोडा वेळ घोटाळले. एकदम उत्तर सुचलं नाही की विचाराला वेळ घेण्यासाठी या गनिमी काव्याचा ते अनेक वेळा अवलंब करीत. थोडया वेळाने त्यांच्या रिकाम्या बंदुकीत बार भरला गेला व ते उत्तरले–

"मी म्हणतो तसा वस्त्रविहीन समाज निर्माण झाला म्हणजे अशी व्रतं करा-यचं कारणच उरणार नाही. वस्त्रविहीन समाजांत संघर्ष नसल्यामुळं कुणालाही ब्रह्मचर्य पाळायची जरूर उरत नाही!"

भम्पकरावांचे हे सूत्र भाष्याशिवाय समजण्यासारखे नाही. पण भम्पक-रावांची जी थोडी माहिती पूर्वी दिली आहे त्यावरून या सूत्रांतील गर्भितार्थ वाचक सहज ओळखतील. आपली बायको ही नोकरी असणाऱ्या वर्गात मोडते व आपण नोकरी नसणाऱ्या वर्गात मोडतो. म्हणून आपल्यात वर्गविग्रहाचा संघर्ष होतो या विचारसरणीचे पाणी वरील अगम्य सिद्धान्ताच्या पोटी मुरत होते.

आमची चर्चा आमच्या सहधर्मचारिणीला मुळीच खपत नसे. अर्थात् चर्चा झाल्यावर आपण मूर्खासारखा, वेळ व्यर्थ घालवला असे मलाही वाटे. पण भम्पक-राव बोलू लागले की त्यांना उत्तरे न देता स्वस्थ बसण्याइतका संयम मला कधीच साधला नाही. शेवटी तीच माझ्या मदतीला धावून आली.

"अहो आज जोडा आणायला जायचं होतं नं तुम्हाला? घेऊन या लवकर, नाहीतर पुन: पुढच्या रविवारपर्यंत तोच फाटका जोडा घालाल!"

"हो. जाऊन येतो आताच" म्हणून मी उठलो. तोच भम्पकरावही उठले. माझ्या पोटांत धस्स झाले.

"म्हणजे तुम्ही याच अवस्थेत माझ्याबरोबर येणार की काय?"

"नाही. मी आपल्या नवीन पोषाखांत येईन."

"नवीन म्हणजे त्या भगव्या?"

हूँ.

"पण तो अजून वाळतो आहे ना?"

"उं. त्यात काय आहे, बहुतेक वाळलाच आहे. उरलेला अंगावर वाळेल. बाहेर ऊन काही कमी नाही." असे म्हणून भम्पकराव क्षणार्धात भगव्या वेषात अवतीर्ण झाले व आमची वरात त्यांच्याबरोबर निघाली.

दुकानात पोचलो तो थोडा वेळ दुकानदाराला भम्पकराव हे माझे सोबती की रस्त्यावरचे भणंग हे कळेना. त्याने प्रश्नार्थक मुद्रा केली तेव्हा मी म्हटले—

"हे माझे गुरु आहेत!"

कोणत्या दुष्ट शक्तीनं हे शद्ब माझ्या तोंडून वदवले कुणास ठाऊक. दुकानदारानं त्यावर विश्वास ठेवला व भम्पकरावांना बसायला खुर्ची पुढे केली.

"माझ्या पायाचा जोडा पाहिजे." मी आपली मागणी सादर केली. पोऱ्या एकामागून एक मासले दाखवू लागला. थोडयाच वेळांत भम्पकराव शेजारी येऊन बसले, व पोऱ्याने त्यांच्याही पायाचे जोडे आणून दाखवायला सुरवात केली. भम्पकराव आपले आरामात पायात जोडे घालवून घेत, प्रत्येक मासल्याची सविस्तर गुणदोषचर्चा करू लागले.

मला एक जोडा पसंत पडला. तो केवढयाचा म्हणून मी बिचारलं. पोऱ्या म्हणाला २०० रुपये!!

"येथे पाहिजे जातीचे येरा गबाळाचे काम नव्हे." मला याच्या जास्तींत जास्त अर्ध्या किमतीचा जोडा दाखव मी पोऱ्याला सांगितले. त्यावर इतका वेळ पोऱ्याशी चर्चा करणारे भम्पकराव मला म्हणाले.

"चिक्कूपणा! आपली आर्थिक स्थिति खालावलेली आहे याचं मुख्य कारण म्हणजे आपल्या देशातली चिक्कूपणाची परम्परा. कारागिरानं आपलं



सारसर्वस्व खर्चून वस्तू तयार करावी अन् कारागिरीला उत्तेजन देण्याऐवजी तुमच्यासारख्यांनी महाग म्हणून त्या वस्तूकडे ढूंकूनही पाहूं नये. अशानं आपली मूल्यं सुधारणार कशी? आण रे तो जोडा इकडे!"

पोऱ्यानं तो जोडा भम्पकरावांपुढे ठेवला. तो त्यांना मोठा होत होता म्हणून दुसरा त्यांच्या जोगता हुडकून काढला.

इकडे मीही स्वस्त जोडयांची पाहणी सुरु केली. त्यांतला एक पसन्त करून बांधायला सांगितलं. इतक्यांत भम्पकराव माझ्या शेजारून उठून दुकानदाराशी "आन्तरराष्ट्रीय परिस्थिति व वेदान्ताचे महत्त्व" या विषयावर चर्चा करीत बसलेले दिसले. पोऱ्यानं जोडयाचा डबा दुकानदारासमोर ठेवला. दुकानदाराने त्याची नोंद केली. मीहि उठून तिथे गेलो.

"Credit Memo" दिला आहे. दुकानदार कागद फाडून मला देत म्हणाला. मला वाटल बरं झालं. पहिल्या तारखेपर्यंत तेवढेच ५०/१०० रुपये गाठीशी राहतील.

"माझा नौकर तुमच्या घराच्या बाजूलाच जाणार आहे. म्हणाल तर त्याच्याबरोबरोबरच जोडे पाठवून देतो." दुकानदाराला दुसरा औदार्याचा उमाळा आला.

"हे तर फारच उत्तम." मी सम्मति दिली. आम्ही भम्पकरावांबरोबर पुनः घरचो वाट चालू लागलों. भम्पकरावांचे चिक्कूपणावरचे प्रवचन सुरुच होते. माझ्यासारख्या "कंजूष", "कवडीचुम्बक" लोकांनी जगावर किती आपत्ति आणल्या आहेत याचे मानसशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र वगैरे शास्त्रांच्या आधारे त्यांचे विवेचन सुरू होते. त्यांच्या वाग्शरांचा मारा सहन करीत आम्ही कसेबसे घरी पोचलो.

"आणला जोडा?" सौ. ने प्रश्न केला.

"हो. पण दुकानदार वरींच पोचता करणार आहे." "Credit Memo" तिच्या हाती देत मी उत्तरलों.

"म्हणजे हे काय, दोनशे रुपयांचा जोडा घेतला तुम्ही?" तिने थक्क होऊन विचारले.

"दोनशे नव्हे, शम्भर" मी खुलासा केला.

"मग हे काय?" म्हणून तिने Credit Memo पुढें केला.

आतां माझ्या डोक्यांत प्रकाश पडला. तीनशे ही माझ्या जोडयाची किंमत नसून एकून दोन जोडयांची किंमत होती. भम्पकरावांनी तो दोनशे रुपयाचा जोडा स्वत.साठी घेतलां होता व माझ्याजवळ पैसे नसतील हे ताडून शिताफीने दुकानदाराला Credit Memo व घरपोंचची व्यवस्था करायला सांगिसले होते.

"मी आपले पैसे नेले नव्हते. तेव्हां क्रेडिट मेमो फाडवला. बिल द्यायच्या वेळी आठवण करा म्हणजे माझे मी देईन". भम्पकरावांनी खुलासा केला. "दुकानदार म्हणत होता तुम्ही विरक्त संन्यासी! तुमच्याकडून पैसे कसे घ्यायचे?" पण मी त्याला साफ सांगितलं. तुम्ही पैसे घेतलेच पाहिजेत. "शेवटी मोठ्या मिनतवारीनं कबूल झाला."

माशान गिळलेली शकुन्तलेची आंगठीदेखील परत मिळाली. पण भम्पकरावांनी गिळलेले पैसे परत मिळवणे ब्रह्मदेवाला देखील शक्य नव्हते.

"हरलो" म्हणून मी धाडकन् कोचावर अंग टाकून दिले. पण सौ. चा चेहरा थोडा उजळलेला दिसला. मला कांही बोध होईना ! थोडयाच वेळांत तिनं आंतून बोलावलं. "अहो, तुमच्या साहेबांचा चपराशी आला होता मघाशी. त्यांची चिठ्ठी ठेवली आहे तुमच्या उशाशी."

मी साहेबांची चिठ्ठी पाहयला आंत गेलो. "गृहिणी सचिव:" या कालिदासवचनाची मला यावेळी पुरेपूर प्रचीति आली. साहेबांची चिठ्ठी वगैरे कांही नव्हती. भम्पकराव फ्रण्टवर सामना कसा द्यावा याची कसलेल्या सेनापतीलाही लाजवणारी योजना तिने मला सांगितली.

जेवतांना तिने भम्पकरावांना आदरपूर्वक प्रश्न केला. भम्पकराव, आज संध्याकाळी आमच्या वनितासमाजांत "पंचवार्षिक योजना व स्त्रियांचें कार्यक्षेत्र' या विषयावर परिसंवाद आहे. तुम्ही त्यांत भाग घ्यावा अशी अनेक स्त्रियांनी इच्छा व्यक्तविली आहे. तुमची सम्मति आहे ना?"



भम्पकराव या विनंतीने अगदी बेहद् खूष झाले होते. पण तरी कसचं कसचं करीत ते म्हणाले "अहो संन्यासाच्या पहिल्या दिवशीच वनितासमाजांत जायचं म्हणजे जरा विचित्रच. नाही का?"

"अहो विचित्र कसलं त्यांत. सगळ्या आपल्या माताभगिनी आहेत. तुम्ही नाही म्हटलंत तर आमचा फार विरस होईल."

भम्पकराव राजी झाले. संध्याकाळी त्यांना न्यायला रीतसर समाजाच्या चिटणिसीणबाई आल्या. आम्ही कार्यक्रम सुरू व्हायच्या अर्धा तास आधी समाजाच्या हॉलमध्ये पोचलो. इतर वक्ते येऊ लागले होते. त्यांच्याशी भम्पकरावांची ओळख करून देण्याचा प्रसंग आला. तेव्हा सौ. म्हणाली.

"हे आमचे त्रि.... म्हणजे स्वामी अचाटानंद. सर्व शास्त्रांत पारगंत आहेत. कलकत्त्याला Physics चे प्रोफेसर होते. पुढे मद्रासला गणिताचे प्रोफेसर झाले. कांहो काळ कोलम्बोला तत्वज्ञानाचे Visiting Professor होते. (वाचक हो, माझी धर्मपत्नी खोटं बोलत होती असं समजू नका. ही माहिती खुद्द भम्पकरावांचीच आम्हाला पुरवली होती.) आता सर्व सोडून संन्यास घेतला आहे.

"अस्सं! मोठ्या आदराने सर्व मंडळी भम्पकरावांकडे पाहू लागली.

"कलकत्त्याला कोणत्या साली होता आपण?" एका चिकित्सकाने प्रश्न केला.

चिकित्सकाच्या वयाचा अंदाज घेत भम्पकराव बोलले, "तीस वर्षे झाली त्या गोष्टीला."

"त्या मानानं आपण फार तरुण दिसता" तो चिकित्सक बोलला.

"मी कायाकल्प विद्या साध्य केली आहे" भम्पकरावांचे उत्तर तयार होते.

"आपल्यासारख्यांनी परदेशी संचार करून भारतीय संस्कृतीची श्रेष्ठता पटवून दिली पाहिजे." समाजाच्या अध्यक्ष श्रीमती सरपटवार म्हणाल्या.

"या देहाला तोही संस्कार झाला आहे." भम्पकराव उतरले. लढाईची सहा वर्षे मी जर्मनीत होतो. तिथ ज्योतिष शास्त्रावर माझा डॉक्टरेटचा प्रबंध

लिहिला. त्याबद्दल मला जर्मन सरकारने आजीव शिष्यवृत्ति होती. पण आता तें सरकार नसल्यामुळे मला कांही मिळत नाही.

"आपण मूळचे नागपूरचेच कां?"

"नाही. आमचं घराणं मूळचं काशीचं. शिवाजी महाराजांना राज्याभिषेक करणारे गागाभट्ट हे आमचेच पूर्वज. त्यानंतर पेशवेकालांत आमच्या एका पूर्वजानं नांव कमावलं. त्याचं नांव रामशास्त्री. पुढं याच कुलांत परिभाषेन्दुशेखरकार नागेशभट्ट झाले. त्यांच्या विद्वत्तेचा बृहस्पतीला मोठा मत्सर वाटत असे म्हणून त्यानं त्यांना शाप दिला की तुझ्या कुलांत आठ पिढ्यानंतर विद्या राहणार नाही. या आठ पिढ्यातला मीच शेवटचा पुरुष आहे..."

भम्पकराव व श्रोते चांगले रंगात आलेले पाहून सौ.ने मला खूण केली व आम्ही दोघेही बाहेर पडलो. घाईघाईने घरी आलो. मुलाला सांगितल्याप्रमाणे त्याने भम्पकरावांचे सामान व्हरांड्यात आणून ठेवून घराला कुलुप ठोकले होते. तो आमचीच वाट पाहात बसला होता. आमचे प्रवासाचे सामानही बांधून तयार होते. आम्ही तिघेही ताबडतोब स्टेशनवर गेलो. स्टेशनवर घाईघाईने आमच्या साहेबास एक अर्ज लिहिला. 'श्वशुरांचे अचानक बोलावणें आल्यामुळे जावे लागत आहे. सात दिवसाची सुट्टी मंजूर करावी." श्वशुरांसही तार ठोकली की "आठवडाभर सुट्टी काढून येत आहोत. कांही विशेष नाही. चिंता नसावी." न जाणो गाडी सुरू व्हायच्या आधी भम्पकराव स्टेशनावर हजर व्हायचे ही धास्ती होतीच. पण सुदैवाने तसे कांही घडले नाही. आम्ही बसलो. गाडी सुरू झाली तेव्हा "सुटलो एकदांचे" असे शब्द आम्हा उभयतांच्या तोंडून एकदमच बाहेर पडले.

---

# २ : भम्पकरावांचे व्याख्यान

भम्पकराव रशियात गेले आहेत असा आमच्या मित्रमंडळीत प्रवाद होता. प्रवाद म्हणण्याचे कारण असे की भम्पकरावांनी "रशियात जातो" असे म्हटले की "रशिया" शब्दाचा अर्थ चारचौघांप्रमाणे करणे बरोबर ठरेलच असे गृहीत धरणे धोक्याचे असे. "रशियात जाऊन येतो" या भम्पकरावांच्या म्हणण्याचा अर्थ 'माजघरात जाऊन येतो' किंवा 'सासरी जाऊन येतो' असाही असण्याचा संभव होता. ते कसे का असेना गेल्या चार सहा महिन्यापासून ते गायब होते हे खरे व यामुळे मला फारच निश्चिन्त वाटत होते. भम्पकरावांचा आम्हाला सदोदित ज्ञानामृत पाजण्याचा ध्येयवादी अट्टहास, व त्याबद्दल या ना त्या रूपाने आमच्या कडून दक्षिणा वसूल करून आम्हाला पुण्य घडवण्याचा स्तुत्य प्रयत्न, या सर्वांपासून चार दिवस मुक्तता मिळाली होती. त्यामुळे घरचा जमाखर्च जरा समाधानकारक होता व सौ. च्या तोंडी "तुम्ही अगदीच कसे हो... हे !.... त्या भम्पकरावांपुढे अगदी नांगी टाकता." हे सुभाषित वास्तव्य करीनासे झाले होते.

पण पुण्याची पुंजी संपली म्हणजे स्वर्गातून हकालपट्टी होते व पुन: अप्सरेच्या एका चुंबनासाठी चार जन्म ब्रह्मचर्य, व अमृताच्या एका थेंबासाठी एखाद्या जन्मी उपासमारीने मरण, ही पत्करावी लागतात. तसेच आमचेही झाले. गांठचे पुण्य संपले व एके दिवशी ऑफिसात जायला निघालो असताना भम्पकराव दत्त म्हणून पुढे उभे राहचले !

माझ्या डोळ्यासमोर काजवे चमकले ! आता ऑफिसात जाणे कसे मूर्खपणाचे आहे, ऑफिसात जाण्याची प्रतिगामी चाल रशियात नाही, तेथे घरीच ऑफिसे असतात वगैरे भम्पकरावांचे वक्तृत्व निदान तासभर तरी ऐकावे लागणार. मग हळूच भम्पकरावांना भूक (पहिलीच) लागून तिची शान्ति करण्याच्या आमच्या कर्तव्याची आम्हाला जाणीवही नसल्याबद्दल आश्चर्य व्यक्त करण्यात येणार, मग भम्पकरावांना भोजन घालण्याचा प्रसंग पुन: आणल्याबद्दल सौ. च्या कपाळाला आठ्या पडणार, हे सर्व भीषण भविष्य मला दिसू लागले. पण ढग कितीही काळा असला तरी त्याला थोडीतरी रुपेरी कड असते असे म्हणतात, त्याप्रमाणे या सर्व प्रकारात माझ्या दृष्टीने. . एकच सुखदायक गोष्ट होती. ती "म्हणजे भम्पकरावांपेक्षा एखादी सवत घरी असलेली पुरवली" असे शद्व केव्हा केव्हा सौ. च्या तोंडी येत. आधुनिक सुशिक्षित स्त्रीच्या मनात सच्च्या आर्य स्त्रीला शोभणारी अशी उदार भावना निर्माण करण्याची करामत भम्पकरावा–व्यतिरिक्त इतर कोणताही लोकोत्तर पुरूष करू शकला नसता.

"असे मुखस्तंभासारखे काय पाहता ? ओळखलं नाही वाटतं ?" भम्पक–रावांनी हटकले.

"ओळणार कसा नाही ? पण मला ऑफिसला उशीर होईल. संध्याकाळी आरामाने या ना. मनसोक्त गप्पा होतील." मोठ्या आशेने मी सूचना केली.

छे ! छे ! एकदिवस ऑफिस बुडलं तर काय सरकार कोसळणार आहे ? तुम्ही म्हणजे शुद्ध खडक आहात वसंतराव. अहो जगात एवढी क्रान्ति सुरु आहे अन् तुम्हाला ऑफिस नाहीतर घर याशिवाय कांही सुचत नाही."

"सगळ्यांना सगळंच कसं करता येईल त्रिम्बकराव ! तुम्ही क्रान्ति करा, मी आपला ऑफिसचे काम करतो" पुढे सरकत मी म्हणालो.

"ह्यः ह्यः" भम्पकराव वेडावत म्हणाले. "क्रान्ति म्हणजे काय थालिपीठ आहे, तुम्ही करा मी खाईन असं म्हणायला ? क्रान्तीला सर्व जनतेचा हात लागावा लागतो."

"अहो पण आताच माझ्या घरात कोणती क्रान्ति करणार आहात तुम्ही?.. वगैरे बोलून भम्पकरावांच्या तावडीतून सुटण्याचा मी प्रयत्न करत होतो तेव्हा भम्पकराव खाली ओणवले होते. त्यांचे . . म्हणजे त्यांच्या खिशात असलेले दुसऱ्यांचे..पैसे जमिनीवर पडले की काय या शंकेने मी "काय पडलं ? वगैरे





विचारू लागलो ! किती मी भोळा ! भम्पकरावांचे काही एक खाली पडले नव्हते. मला ऑफिसमध्ये जाता येऊ नये म्हणून त्यांनी माझ्या सायकलमधली हवा काढून टाकली होती !

या भामट्याचे चांगले थोबाड रंगवावे असे क्षणभर मला वाटले. पण वन्ध्येच्या वात्सल्याप्रमाणे आमच्या अन्त:करणातला वीररस बहुधा निष्क्रिय व निष्फळच राहायचा. थोबाड रंगवण्याऐवजी "काय चालवलं आहे हे त्रिम्बकराव, तुमची अगदी कमाल झाली !" वगैरे बोलण्याच्या "शान्तिपूर्ण उपाया"पलीकडे आमची मजल गेली नाही. रागाने माझा तोल गेलेला पाहून स्थितप्रज्ञ भम्पकराव उपदेश करू लागले.

"काय हे वसन्तराव ! सायकलमधली हवा गेली म्हणजे काय तुमचे प्राण गेले ? गेलेली हवा पुन: भरता येईल. इतके वर्षांनी तुमचा मित्र अनुभवसम्पन्न होऊन परत आला न् तुम्हाला आपली ऑफिसचीच घाई ! चला, थोडं चहापाणी गप्पाटप्पा करू. ऑफिस रोजचंच आहे."

नोकर सायकलीत हवा भरून आणीपर्यंत मला थांबणे भागच होते. मी नाईलाजाने सायकल नोकराच्या हवाली करुन घरी शिरलो. "काय वहिनी !" असे गर्जत भम्पकरावांनी माझ्या आधीच प्रवेश केला होता.

"वहिनी" या संस्थेकडे भम्पकरावांचा स्वभावत:च जबरदस्त ओढा असे. "काय वहिनी !" हा मंत्र उच्चारीत, सैंपाकघर असो, माजघर असो, ते बेलाशक प्रवेश करीत. वहिनीने "हे बाहेर गेले आहेत." म्हणून सूचना केली तर "हरकत नाही. माझे विचार तुम्हाला जितके समजतात तितके त्यांना मुळीच समजत नाहीत" म्हणून आपल्या तत्वज्ञानाची टकळी ते तशीच चालू ठेवीत. "यांचा लेख आला आहे किर्लोस्करांत ! वाचून पाहा नं" म्हणून सूचना केली तर 'काय तुमचे वसंतराव लेख लिहितात कुणास ठाऊक. त्यांनी मार्क्स वाचला नाही. अजून आजीबाईसारखे रामायण काय वाचतात, त्यांचं मन सरंजामशाहीत अन् शरीर भांडवलशाहीत अशी अवस्था झाली आहे. काय त्यांचे लेख वाचून करायचं आहे." अशी सरळ एका आर्यस्त्रीसमोर तिच्या नवऱ्याची निंदा करून मोकळे ! एकदा तर "मला तुम्ही असे तडक माजघरांत अन् सैंपाकघरांत येता हे आवडत नाही, असं आमच्या सौ.नं. त्यांना स्वच्छ सांगितलं. तरी निर्विकारपणे ते म्हणाले, "साहजिक आहे. सरंजामशाही संस्कार सहजासहजी नाहीसे होत नाहीत." !

भम्पकरावांची मूर्ति दिवाणखान्यांत दिसताच सौ.ने धाडकन माजघरांचे दार लावून घेतले. त्यांचे बिचारे "काय वहिनी!" त्या दारावर आदळून रक्तबम्बाळ झाले असावे.

पण गैरसोयीच्या गोष्टी भम्पकरावांच्या कधी लक्षातच येत नसत. त्यांनी आपल्या बोलण्याचा मारा तसाच सुरू ठेवला. "निदान आमच्या स्त्रियांनी तरी रशियांत एकदा जाऊन आलंच पाहिजे. रशियांत स्त्रिया माजघरांत, पुरुष दिवाणखान्यांत अशी वर्गबद्धता मुळीच नाही. माजघरे, दिवाणखाने वगैरे सरंजामशाही समाजरचनेची प्रतीकं आहेत. रशियांतल्या घरांमध्ये असला प्रकार मुळीच नाही..."

"म्हणजे तिथल्या घरांत फक्त एकच खोली असते म्हणायची."

"तुम्हाला सगळीकडेच चेष्टा सुचते वसंतराव!" अगदी अवसानघात झाल्यासारखा चेहरा करून भम्पकराव ओरडले. तुमचं चुकतं ते इथंच. कांही नवीन समजून घेण्याचा प्रयत्न नाही. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा की...

आपल्या म्हणण्याचा अर्थ काय हे भम्पकरावांना तरी कुठे माहित असे! आपल्या बोलण्याचा अर्थ शोधून काढणे व तो समजावून सांगणे या दोन्ही क्रिया त्यांना अनेकदा एकदमच कराव्या लागत. ही कसरत आता पुन: नको म्हणून मी मधेच विचारले.

"आता पुढचा काय बेत आहे भम्पकराव?"

"पुढचा बेत म्हणजे एक फक्कड चहा, मग झकास जेवण, मग आरामांत झोप." हे सर्व तुमच्याच घरी होणार हे एखाद्या ठोम्ब्यालाही कळावे अशा स्वरांत भम्पकराव उतरले.

"तो बेत नाही विचारला मी. माझा प्रश्न तुमच्या पुढील व्यवसायासम्बन्धी होता."

"पुढील व्यवसाय म्हणजे जे जे आपणास ठावे, ते ते इतरास सांगावे, शहाणे करूनि सोडावे, सकळ जन..."

भम्पकरावांकी ज्ञानप्रसाराची योजना मुखातून बाहेर पडत असतांनाच नोकर सायकल घेऊन आला. "देव पावला" म्हणून मी उठलो. पण भम्पकराव उठण्याचे चिन्ह दिसेना. आता माझ्या गैरहजेरीत हे रावसाहेब इथेच ठाण मांडून





बसणार, आमच्या सौ. त्यांना आता तुम्ही टळल्यास बरे हे सुचविण्यासाठी झाडलेलाच दिवाणखाना पुन: झाडणार, गालिचे सतरंज्या झटकून सारे वातावरण धुळीचे धुंद करणार, मधेच सान्यांची जेवणं उरकली हे भम्पकरावांच्या मनावर बिम्बवण्यासाठी "अरे आता खरकटी भांडी किती वेळ पसरून ठेवायची!" म्हणून नोकराला कर्तव्याची जाणीव करून देणार, पण या सर्व ध्वनिकाव्याचा भम्पकरावांवर कांहीही परिणाम न होऊन ते स्थितप्रज्ञाप्रमाणे आपली ज्ञानप्रसाराची योजना वहिनीसारख्या "सुविद्य व समजुतदार" स्त्रीला समजावून सांगणार हे सारे अटळ भविष्य मला दिसू लागले. पण "आलीया भोगासी असावे सादर" अशी मनाची समजूत करून ऑफिसांत जाणें भागच होते. म्हणून आपली ऑफिसच्या कामाची बॅग शोधू लागलो तो ती कुठे दिसेना.

"काय भम्पकराव! मघाशी तुमच्याबरोबर आंत आलो तेव्हा बॅग होती का माझ्या हातात. ऑफिसचे कागदपत्र आहेत त्यात."

"तुमच्या हातात बॅग पाहिल्याचं कांही आठवत नाही बुवा मला!" भम्पकराव साळसूदपणें उतरले.

"म्हणजे सायकललाच राहली की काय! अरे खुशालसिंग बॅग होती का रे सायकलला? हवा भरायला गेलास तेव्हा दुकानांत राहली की काय? जरा पाहून ये बरं."

"बॅग तो सायकलपे नहीं थी साब" खुशालसिंगाने निश्चयात्मक उत्तर दिले. पण तेवढीच बाहेर जायची संधी मिळाली म्हणून "दुकानमें देखकर आता हूँ" म्हणून तो तत्परतेने बाहेर पडला.

"माझी बॅग लपवली की काय भम्पकराव?" सायकलमधली हवा काढणारा बॅग लपवायला कमी करणार नाही म्हणून मी विचारलं."

"मी कशाला लपवू तुमची सरकारी बॅग?" अपेक्षित उत्तर आले.

बॅगशिवाय ऑफिसांत जाऊन कांही उपयोग नव्हता म्हणून मी घरभर शोध केला. सैपाकांची भाण्डी, सौ. च्या साड्या वगैरे सर्वांची उलथापालथ केली. पण आडात नाही ते पोहऱ्यांत कुठून येणार? उलट सौ. मात्र माझ्या आदळआपटीने नाराज झाली. "अहो साड्यांत न् भाण्डयांत कधी ठेवली आहे का तुम्ही आपली पिशवी! त्या भम्पकरावांनीच लपवली आहे कुठेतरी, मी सांगते तुम्हाला..."

तिचे वाक्य पुरे व्हायच्या आधीच दिवाणखान्यांत धडाधड आवाज झाला. "आई ग ऽऽऽ" म्हणून भम्पकरावांच्या किंकाळ्यांनी घर दणाणून गेले. तातडीने जाऊन पाहतो तो स्टूल, खुर्ची व भम्पकराव हे एका रेषेत साष्टांग प्रणिपात करीत असलेले आढळले.

भम्पकरावांना उठण्याची फारशी इच्छा दिसली नाही. निजल्या निजल्याच ते आपले गुडघे कुरवाळत होते. मी डावा दण्ड धरून त्यांना उचलू लागलो तो त्यांनी आपला उजवा दण्ड सौ. च्या दिशेने वर केला. पण भम्पकरावांना उचलण्यासाठी आपण हातभार लावायची काही जरूर नाहीं असे सौ. चे मत पडल्यामुळे ती "उं:" करून आंत गेली. त्यामुळे भम्पकरावांची उठण्याची इच्छा मावळली. एकटयाला पेलण्याइतके आपण हलके नाही हे सिद्ध करण्यासाठी बाम्बूसारखे ताठ होऊन त्यांनी पुन: लोळण घेतली. तेव्हां त्यांना उचलण्याचा नाद मीही सोडून दिला. त्यानन्तर.

"कशासाठी धडपडत होता भम्पकराव ?" मी.

"आई ग ऽऽ." भम्पकराव.

"डॉक्टरला बोलावूं का ?". . . मी.

"बाप रे ऽऽऽ" . . . भम्पकराव.

"आयडीन लावून देऊ का ?" मी.

"हुहुहु . . ." भम्पकराव.

अशा तऱ्हेचा नाटयमय संवाद झाला. झाले एवढे मित्रकर्तव्य पुरे वाटून मला ऑफिसची व बॅगची पुनः आठवण झाली. बॅगची आठवण झाल्याबरोबर माझ्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. भम्पकराव खुर्चीवर स्टूल ठेवून कुठे चढत होते हे पाहतांच व्हेंटिलेटरमध्ये माझी बॅग ठेवलेली आढळली. माझी बॅग लपवण्यासाठी भम्पकरावांनी एवढा सिंहगड चढण्याचा पराक्रम केला होता. भम्पकरावांबद्दलची सर्व सहानुभूती नाहीशी होऊन मी सन्तापाने ओरडलो, "माझी बॅग लपवल्याबद्दल चांगली अद्दल घडली तुम्हाला त्रिम्बकराव !!"

"तुमच्या कृतघ्नपणाला कांही सीमा ! तुम्हीच आपल्या तारेत बॅग वर ठेवली. माझ्या दृष्टीस पडल्याबरोबर तुम्हाला काढून देत होतो. त्याबद्दल आभार मानायचे सोडून मीच लपवली म्हणून माझ्यावर आरोप करता !!"





"म्हणजे मीच ऑफिसला जायची घाई असतांना खुर्चीवर स्टूल ठेवून इतक्या वर बॅग ठेवली. न् हे सर्व झोपेत केलं. माझं काय डोकं बिकं फिरलं आहे की काय ? अरे खुशालसिंग, काढ रे तिथली बॅग."

खुशालसिंग येऊन बॅग हस्तगत करीपर्यन्त आणखी वेळ मोडला. ऑफिसला चांगला दोन तास उशीर झाला होता. आता भम्पकरावांच्या अधिक तोंडी लागण्यांत अर्थ नाही म्हणून मी पटकन सायकलवर टांग टाकली व ऑफिसचा रस्ता धरला. घरी परतेपर्यन्त भम्पकरावांनी काय उच्छाद मांडला असेल या कल्पनेने कामांत फारसे लक्ष लागेना.

पण भम्पकरावांच्या उच्छादाची कल्पना येण्यास घरी परतेपर्यन्त वाट पाहायची जरूर पडली नाही. आमचे सहकारी श्रीयुत चुटपुटे हसत हसत विचारू लागले.

"काय सेक्रेटरी महाराज ! अध्यक्षांची आपल्यावर मर्जी आहे ना ?"

"कोण सेक्रेटरी ? कोण अध्यक्ष ? . . . मी.

"अहो हे" म्हणून त्यांनी हॅंडबिल पुढे केले. ते वाचून मी थक्कच झालो. त्यांत खालील मजकूर होता.

**ज्ञान प्रसारक मण्डळ**

आज सन्ध्याकाळी ६ वाजता नुकताच रशियाचा प्रवास करून आलेले सर्वशास्त्रविशारद श्री. भम्पकराव यांचे "रशिया व आगामी क्रान्ति" या विषयावर व्याख्यान होईल. तरी सर्वांनी अगत्य येण्याचे करावे. **व्याख्याना नंतर अल्पोपहार होईल.**

स्थळ :– येथे अस्मादिकांच्या घराचा पत्ता

आपले

येथे आमच्या सौ. चे नाव — येथे अस्मादिकांचे नाव

अध्यक्ष — सेक्रेटरी

प्रकृति सृष्टि निर्माण करते पण ईश्वराकडे तिचे नामधारी जनकत्व राहते. त्याप्रमाणे भम्पकरावांनी आमच्याच घरांत "ज्ञानप्रसारक मण्डळ" उघडून आम्हाला आमच्या बायकोचेच सेक्रेटरी करून टाकले होते !

"चला, तुमच्याबरोबर मी येतो. व्याख्यान रंगलें नाही तरी तुमच्या घरचा अल्पाहार कांही रंगल्याशिवाय राहणार नाही." इति चुटपुटे.

चुटपुटचांचे शद्व सम्पतात न सम्पतात तोच आमच्या वैज्ञानिक संशोधन खात्यातले दोन चार संशोधक आमच्या खोलीत अवतीर्ण झाले व उपाहाराचे आमंत्रण दिल्याबद्दल आभार मानू लागले. उपाहाराच्या आधी व्याख्यान ऐकावे लागेल असे चुटपुटचांनी सांगताच कांही संशोधकांचा चेहरा उतरला. आपल्या संशोधनाचा पल्ला फक्त उपाहारापर्यंत पोचला होता. उपाहाराबरोबर व्याख्यानही असल्याचे आपल्या कानी आले नव्हते हे त्यांनी कबूल केले. संशोधनाने निष्पन्न झालेले हे नवीन तथ्य लक्षांत घेता आज अस्मादिकांच्या यां घरास भेट देणे इष्ट आहे या सिद्धांताचा फेरविचार होणे आवश्यक आहे असे मत त्यांच्या चेहऱ्यावर स्वच्छ वाचता आले असते.

दुसरे कांही संशोधक इतके संथ नव्हते. नवीन तथ्य उपलब्ध झाल्याबरोबर त्यांनी आपला फेरविचारही कायम केला व "आम्हाला यायला थोडा उशीर होईल, थोडा म्हणजे साधारणपणे व्याख्यान सम्पायच्या आंत आम्ही येऊ," असे त्यांनी जाहीर केले.

"माझ्या घरी व्याख्यानही नाही न् उपाहारही नाही" असे मी ओरडून सांगणार इतक्यात माझा चपराशी ऑफिसभर व्याख्यानाची हँडबिले वाटतांना दिसला. हँडबिलांत छापलेले खोटे असे मी आता कुणाकुणाला सांगणार ! "फुटता सागर सिकता-सेतूचे काय त्यापुढे चाले !"

ऑफिसची वेळ सम्पलीच होती. घरच्या आघाडीवर जाऊन कांही उपाय-योजना करता येईल या आशेने मी उठलो. घरी पोचेपर्यंत सहा वाजून गेले होते. आमच्या दिवाणखान्यांतल्या खुर्च्या भम्पकरावांनी अंगणांत आणून सोडल्या होत्या, व व्याख्यानासाठी एक टेबल व दोन खुर्च्या एका कोपऱ्यांत मांडून ठेवल्या होत्या. बाकी सर्व खोल्यांना कुलूप होते.

सौ. व चिरंजीव सिनेमा पाहायला गेली आहेत. दुपारचा खेळ पाहून झाल्यावर लगेच संध्याकाळचा खेळ पाहणार आहेत. नोकराला आजची सुट्टी दिली असून मला त्यांनी सिनेमा...म्हणजे दुसरा...सुटण्याच्या सुमारास परत सोबतीसाठी थिएटरवर बोलावले आहे वगैरे माहिती भम्पकरावांकडून कळली. पळापळीच्या धोरणाने भम्पकरावांची आमच्या घरावरील चढाई परतवून लावण्याची योजना त्यांत स्पष्ट दिसत होती. पण भम्पकरावांवर असल्या योजनांचा कधीच परिणाम होत नसे.





"अजून कुणी येत नाही..." श्रोत्यांकडे डोळे लावून बसलेले भम्पकराव उद्गारले. "आणखी थोडी जाहिरात केली पाहिजे" म्हणून त्यांनी कोपऱ्यांत ठेवलेले एक मोठे धूड उचलले. तो मराठी शाळेतला फळा होता व त्यावर भम्पक-रावांनी आपल्याकडून शक्य तितकी कलाकुसर करून रंगीबेरंगी खडूने आपल्या व्याख्यानाची जाहिरात लिहिली होती. तो फळा खांद्यावर धरून ते जवळच्या हमरस्त्यावर येरझारा घालू लागले.

सुमारे अर्धा तास हा व्यायाम करून ते परत आले व अध्यक्षासाठी स्वत:च नियोजित केलेल्या खुर्चीवर बसून धापा टाकू लागले.

इतक्यांत एकदोन गृहस्थ आंत डोकावले. "व्याख्यान इथंच आहे ना?" म्हणून त्यांनी विचारणा केली व इथंच आहे ही खात्री पटल्यावर मांडी ठोकली.

"अध्यक्ष आले नाहीत वाटतं ?" एकानं पृच्छा केली.

"यायचे कुठून ? इथंच राहतात ते" दुसऱ्यानं उत्तर दिलं.

"आपण सेक्रेटरी वाटतं ?" पहिल्यानं मला प्रश्न केला.

मी उत्तर देत नाही असे पाहून दुसऱ्यानं सुचवलं, "सेक्रेटरी खुर्चीवर बसले आहेत."

"मी व्याख्याता आहे." भम्पकरावांनी खुलासा केला.

"अहाहा! अलभ्य लाभ आहे" पहिले गृहस्थ उद्गारले. "काय लोक तरी पहा. जागतिक राजकारणाबद्दल कुणालाच आस्था नाही. एवढा अनुभवी व विद्वान् व्याख्याता, पण अजून कुणी इकडे फिरकत नाही."

"प्रतिगामी आहेत बेटे सारे. रशिया, क्रान्ति वगैरे शब्द वाचल्याबरोबर बायकोच्या पदरामागे दडले असतील!!"

उपाहाराचे आमिष दाखवून देखील व्याख्यानास न येणाऱ्या श्रोत्यांवरील भम्पकरावांची ही टीका आणखी कांही काळ चालल्यावर श्रीयुत चुटपुटे व आमच्या ऑफिसांतले दोन संशोधक उपस्थित झाले. "व्याख्यान अजून संपलं नाही वाटतं !" घड्याळाकडे पाहात त्यांनी प्रश्न केला. सात वाजत आले होते.

"अजून सुरुच झालं नाही" मी खुलासा केला.

"आता लवकर अध्यक्षांना बोलावून सुरू करून टाका. किती वेळ उशीर करायचा" चुटपुटे सुचविते झाले.

"कांही अपरिहार्य कारणामुळे अध्यक्ष येऊ शकणार नाहीत" मी जाहीर केले.

"मग आता तुम्हीच अध्यक्ष होऊन प्रसंग साजरा करा." संशोधक मित्रांनी सूचना केली.

मी भम्पकरावांजवळ जाऊन हळूच त्यांना सांगितले. "श्रोते फार कमी आहेत. मी अध्यक्ष झालो तर तेवढाच एक श्रोता कमी होईल. तेव्हा सर्वतोगामी अशा परमर्षि मार्क्स महाराजांनाच अध्यक्ष समजून व्याख्यान सुरू करावे."

भम्पकरावांना ही सूचना तत्काल पटली. आता लगेच व्याख्यान सुरू होईल असे जाहीर करून मी श्रोत्यामध्ये जाऊन बसलो.

भम्पकरावांची रसवंती सुरू झाली. "आजचे अध्यक्ष परमपूज्य मार्क्समहर्षि व सद्गृहस्थ हो, आजच्या व्याख्यानाच्या श्रोत्यांच्या संख्येवरून आपला देश किती मागासलेला आहे याची कल्पना येईल. त्यातून आमच्या भगिनी तर फारच मागासलेला दिसतात. वस्तुत: क्रांतीला घरातूनच सुरवात होते, हे लक्षात घेऊन आमच्या ज्ञानप्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी आम्ही एका विदुषीची योजना केली होती. पण या विदुषीना क्रांतीवरील व्याख्यानापेक्षा अचकटविचकट सिनेमाचेच महत्व अधिक वाटले..."

"त्याही मागासलेल्याच दिसतात." आमचे संशोधक मित्र उद्गारले.

"श्रोत्यांनी मध्येच बोलून व्याख्यानात अडथळा आणू नये" मी सूचना केली.

"मीही तेच म्हणतो." भम्पकराव गरजले." मला फार महत्वाचे विचार मांडायचे आहेत. मी नुकताच रशियाला जाऊन आलो. क्रांतीची फळे चाखावी तर रशियातच! अहाहा! काय तो देश! वैभव जसे कांही उताला चालले आहे. कुठे दुधाचा नळ तर कुठे मधाचा नळ. या वस्तु तिथे तोळचाने मोजल्या जात नाहीत. मी असाच एक नळ उघडून मनसोक्त दूध प्यालो. काय ते दूध! बासुंदी-





सारखे! अंतरात्मा शांत होऊन मी गुणगुणू लागलो. या आनंदात दुधाचा नळ बंद करायला विसरलो. झाले, थोड्याच वेळात मास्कोच्या रस्त्यावर दुधाचा पूर वाहू लागला, व रहदारी ठप्प झाली. तेव्हा माझ्या लक्षात माझी चूक आली. मी नळ बंद करण्यासाठी परत फिरलो. पण काय, नळापर्यंत पोचायच्या आधीच मास्कोच्या त्या थंडीने दुधाचे बर्फ झाले. अगदी दगडासारखे टणक. त्या बर्फावरून पुन: मास्कोतील वाहने आरामात जाऊ लागली..."

"काय थापा मारतो लेकाचा" एक संशोधक दुसऱ्या संशोधकाच्या कानात व्याख्यात्याला ऐकू जाईल इतक्या मोठ्याने "कुजबुजला."

भम्पकराव गरजले. "तुमच्यासारख्या भांडवलशाहीच्या बगलबच्यांना कम्युनिझमचे सामर्थ्य काय कळणार? अहो रशियातल्या म्हशी हत्तीएवढ्या मोठया असतात व रोज हजार शेर दूध देतात.."

"ही दुसरी लोणकढी" असा भाव चेहऱ्यावर दाखवीत दोघेही संशोधक मोठ्याने हसले.

भम्पकरावांच्या चेहऱ्यावरील हिंस्र भाव पाहून मी सामोपचाराने म्हटले, "श्रोत्यांनी वक्त्याला बोलू द्यावे, हसायचे असेल तर नुसते स्मित करावे व कुज-बुजायचे असेल तर व्याख्यात्याला ऐकू येणार नाही इतपतच मोठ्याने कुजबुजावे."

"मला वाटते श्रोते फार थोडे असल्यामुळे व्याख्यानाऐवजी चर्चाच ठेवावी." संशोधकांनी सूचना केली.

"चर्चेबरोबर उपाहारही सुरू ठेवता येईल." दुसऱ्या संशोधकांनी दुसरी सूचना केली.

उरलेल्या श्रोत्यांपैकी एक जण आपले नोटबुक व पेन्सिल सरसावून व्याख्यानाच्या नोट्स घेत होता. व्याख्यानात अडथळा आल्याबरोबर तो संतापला. "चर्चाबिर्चा कशाला? आम्हाला इतक्या विद्वान् वक्त्याला काय सांगायचं आहे ते ऐकण्याची इच्छा आहे. व्याख्याते क्रांतीचा संदेश द्यायला आले आहेत अन् तुम्हाला उपाहार सुचतो आहे."

आपल्या व्याख्यानाच्या एवढ्या काळजीपूर्वक नोट्स घेणारा हा गृहस्थ पोलिस रिपोर्टर तर नव्हे अशी भम्पकरावांना शंका आल्याचे त्यांच्या भेदरलेल्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होते.

"आपण काय व्यवसाय करता ?" भम्पकरावांनी प्रश्न केला.

'माझं पलीकडच्या बोळात पुस्तकांचं दुकान आहे. जागतिक क्रांती ही माझी हॉबी आहे" ते उत्तरले. "आज दुकानाचा सुट्टीचा दिवस होता म्हणून "हॉबीत" वेळ घालवणं क्रमप्राप्त होतं."

भम्पकरावांचा जीव भांड्यांत पडला.

उरलेल्या एका श्रोत्याला संशोधक महाशयांनी प्रश्न केला. "तुमचं काय मत आहे? चर्चा कीं व्याख्यान?"

"मालक म्हणतील ते खरं" उत्तर मिळालें.

"मालक ?"

"हो. मी यांच्याच दुकानावर काम करतो."

झालें. दोन विरुद्ध दोन मते झाल्यामुळे मला निर्णायक मत देण्याची सन्धि मिळाली. चर्चा जगाच्या अन्तापर्यन्त सम्पायचीच नाही या भीतीमुळे व भम्पकरावांची व्याख्यानाची हौस माहीत असल्यामुळें मी साळसूदपणे म्हणालो.

काय करावं हे श्रोत्यांची मतं घेऊन ठरवणं अप्रयोजक आहे. हे ठरवण्याचा अधिकार फक्त अध्यक्ष व व्याख्याते यांचा आहे.

इतक्यांत ८, १० वर्षांचा एक शेम्बडा मुलगा आंत घाईघाईनं आला. जागतिक क्रान्ति ही याचीही "हॉबी" आहे की काय अशी मला शंका आली. पण तिचा लवकरच निरास झाला. पुस्तकविक्रेत्याजवळ जाऊन तो म्हणाला, "तात्या, गिऱ्हाईक, बाहेरगांवचं आहे."

झालें. पुस्तकवाले ताबडतोब उठले व "आता येतो" म्हणून भम्पकरावांना त्यांनी नमस्कार केला. त्यांच्या मागोमाग त्यांचा साहाय्यक व तो शेम्बडा पोरगा सभागृह सोडून गेली.





आता आम्ही तीनच श्रोते उरलो. तेव्हा संशोधक म्हणाले, "आज व्याख्यान पुढे ढकलावे अशी माझी सूचना आहे. उपाहार आटपून आज कार्यक्रम समाप्त करूं या."

"प्रिय मित्र हो!" मी खुलासा करूं लागलो. "मला या बाबतीत तुमची फार निराशा करावी लागणार आहे. सौभाग्यवतींना कांहीं निकडीचे काम निघाल्यामुळें उपाहाराची व्यवस्था होऊ शकली नाही."

"मग आम्ही फुकटच आटापिटा केला म्हणायचा!" आपण विनोद करीत आहोत या भावनेनं संशोधक बोलले.

"अहो फुकट कशाला! व्याख्यान ऐकाना" भम्पकराव गरजले.

"आतां कांही मूड लागत नाही!" संशोधक उत्तरले.

इतका वेळ गंभीर चेहरा करून स्वस्थ बसलेल्या दुसऱ्या संशोधकांनी घड्याळाकडे पाहिले व म्हटले "अरे बापरे!"

"कां हो? काय झालं?"

"साडेसात वाजले! साहेबांनी बोलावलं होतं ना आज साडेसाताला" म्हणून ते तडक उठून चालू लागले.

आम्हालाही आता गेलंच पाहिजे म्हणून दुसरेही संशोधक उठले.

नेहमीप्रमाणे मीच भम्पकरावांचा एकुलता एक श्रोता उरलो. भम्पकरावांचा चेहरा मळलेल्या टिपकागदासारखा निस्तेज दिसत होता.

"जाऊं द्या झालं! पुन: केव्हां तरी" म्हणून मी भम्पकरावांची समजूत घालू लागलो.

इतक्यांत एक इसम आंत आला व मला सलाम करून त्याने माझ्या हातांत एक कागद दिला.

ज्ञानप्रसारकमंडळाचा सेक्रेटरी या नात्याने भम्पकरावांच्या व्याख्यानाची हॅण्डबिले छापल्याचे बिल माझ्या नावाने आले होते. ● ●

# ३ : अखिल भारतीय पुरोगामी परिषद्

"तुम्ही कमीतकमी भारताचे पंतप्रधान तर होणारच. दैवाचा फासा अनुकूल पडला तर जगाच्या सरकाराचे देखील प्रमुख व्हाल." असे भम्पकरावांची मनोदेवता त्यांना लहानपणापासून सांगत असे. पण वयाची ४५ वर्षे उलटून गेली तरी पंतप्रधान तर सोडाच, भम्पकराव दुय्यम कारकुनाचे अव्वल कारकून देखील होण्याचे चिन्ह दिसेना. तेव्हा आता सर्वच हवाला दैवावर ठेवून उपयोग नाही, त्या दिशेने स्वतःच काहीतरी प्रयत्न केला पाहिजे असे त्यांच्या मनाने घेतले.

पण त्या दिशेने प्रयत्न करायचा म्हणजे लोकमत आपल्या बाजूला वळवायचे. लोकमत आपल्या बाजूला वळवायचे म्हणजे आधी चारदोन तरी जीवश्चकंठश्च अनुयायी पाहिजेत.मी व सौ. (म्हणजे माझी सौ.) हे दोन तरी जीवश्चकंठश्च अनुयायी आपल्याला आहेत अशी भम्पकरावांची खात्री होती. (भम्पकराव स्वतःच्या सौ.चा अंतर्भाव शत्रुपक्षांत करीत असत.) आमच्या सौ., भम्पकरावांचा किती राग करतात हे त्यांच्यापासून लपून नव्हते. पण समस्त "वहिनी" वर्गाचा आपल्यावरील राग हा विरोधभक्तीचाच प्रकार आहे अशी भम्पकरावांची ठाम समजूत होती.

राहता राह्यलो मी. मी त्यांचा भक्त आहे असे भम्पकरावांना कां वाटत होते देव जाणे. "मला तुमच्या पंतप्रधान होण्याच्या उद्योगांत ओढू नका," असे मी म्हटले की ते म्हणायचे "वसंतराव, दैवाने तुम्हाला एका थोर पुरूषाचा संग





घडवून दिला आहे. मी पंतप्रधान झालो की गृहमंत्र्याची किंवा रक्षणमंत्र्याची जागा तुमचीच ही खात्री असू द्या.

"माझ्या जागेचा विचार तूर्त राहू द्या त्रिम्बकराव ! पण तुम्हाला पंतप्रधान व्हायचं म्हणजे आधी नोकरी सोडून राजकारणांत पडायला पाहिजे. यासाठी बराच पैसा पाहिजे. शिवाय एकादा पक्ष पाठीशी पाहिजे.

"त्याची काळजी करू नका." भम्पकराव बोलते झाले. जणू काही भम्पकराव पंतप्रधान कसे होणार याची मलाच काळजी लागून राह्यली होती ! "शुभ कार्याला पैसा तुमच्यासारख्या मित्रमंडळीकडून आपोआप उभा होतोच. अन् पक्ष म्हणाल तर मला इतरांच्या पक्षांची मुळीच जरूर नाही. मी स्वतःचाच एक पक्ष काढणार आहे."

"नांव काय ठेवणार पक्षाचं ?"

"मूल जन्मायच्या आधीच नांव विचारतां !"

"बरं तत्वं, धोरण वगैरे ?"

"तत्वं सगळी पुरोगामी, धोरण क्रान्तिकारक!"

"मग माझं नांव तुमच्या पक्षातून बाद समजा. मला पुढे जायचं नाही न् क्रान्ति तर मुळीच करायची नाही."

"अहो, क्रान्तीच्यां लोंढ्यातून का कोणी बचावू शकतो? तुम्ही आमच्या पक्षाचे जनरल सेक्रेटरी आहात. आता लवकरच एक परिषद् भरवून आमच्या पक्षाचे आम्ही सूतोवाच करणार आहोत."

भम्पकरावांच्या परिषदेला त्यांच्याशिवाय कोणीच हजर राहणार नाही हे मला अनुभवांती माहीत होते. त्यांच्या व्याख्यानाचा माझा अनुभव ताजा होता. अल्पाहाराचे आमिष दाखवूनही त्यांच्या व्याख्यानाला माझ्यासकट चार श्रोते हजर होते व त्यांतले मी सोडून तीन व्याख्यान सुरू झाल्याबरोबर निघून गेले होते.

पण सात आठ दिवसांनी परिषदेची पत्रिका जेव्हा माझ्या हातात पडली तेव्हा परिषद् चांगलीच गाजणार याबद्दल माझी खात्री झाली. परिषदेत पंचवीस पुरोगाम्यांची भाषणे होणार होती. शिवाय सोहराब मोदी, राजकपूर, नर्गिस, दुर्गा

खोटे, राजा गोसावी वगैरे कलाकार उपस्थित राहून प्रसंगाला शोभा आणणार होते.

पण त्यांत कांही विशेष नाही. कारण कलाकार पुरोगामी असतातच. विशेष हे की आचार्य विनोबा भावे, संत तुकडोजी महाराज, मेहेरबाबा व जे. कृष्णमूर्ति या विभूति परिषदेत जातीने हजर राहणार होत्या. "आख्या" संत-मंडळांत पुरोगामीपणाची एकदमच लाट उसळली होती.

पत्रिका वाचल्यावर परिषदेला न जाण्याचा माझा विचार डळमळू लागला. याचे कारण संतमंडळाचे किंवा कलाकारांचे दर्शन घेण्याची मला हौस होती असे नव्हे. तर पंचवीस व्याख्यात्यांमध्ये आमच्याबरोबर कॉलेजांत असलेली शीला ठाकुर ही होती. व्याख्यान देण्याची कला तिला लहानपणापासून चांगली अवगत होती. आपले अध्यात्मिक गुरु अप्पासाहेब कानविंदे यांनी लिहून दिलेली भाषणे ती गोड आवाजांत इतकी छान पाठ म्हणे की ऐकतच राहावं. ती भाषण "म्हणतांना" तिच्या कानातले हिऱ्याचे---म्हणजे कांचेचे---डुल असे चमकदार झोके घेत की पाहातच राहावं.

दुसरं आकर्षण म्हणजे आमचे परममित्र सोन्याबापू. सोन्याबापू व्याख्यान देणार हे एक आश्चर्य होतं. ते व्यासपीठाच्या जवळपासही फिरकत नसत. व्याख्यान ऐकायला गेले म्हणजे ते सगळ्यांत मागे बसत. व्याख्यात्यांचे भाषण सुरु झाले की त्यांच्याही तोंडाची टकळी सुरु होई. व्याख्यात्याने "सज्जनहो!" म्हटले की यांनी "आणि दुर्जनहो" अशी त्याला पुस्ती जोडावी, व्याख्यात्याने "आपण माझ्यासारख्या अनभिज्ञाला आजच्या प्रसंगी कां बोलावलं हे कळत नाही" असे म्हटले की "मी तरी तेच म्हणतो" असा यांनी रुकार भरावा. "तुमचे भाषणस्वातंत्र्य आमच्या श्रवणस्वातंत्र्याच्या आड येत आहे. चूप बसा नाहीतर ...." असा एखाद्या "आडमुठ्या" "रानटी" श्रोत्याने प्रसंग आणी-पर्यंत सोन्याबापूचे व्याख्यानावरील धावते भाष्य सुरूच असे.

सोन्याबापूंचे भाष्य फक्त इतरांच्या व्याख्यानावरच होत असे असें नाही. एकदोन मित्र घेऊन ते कुठेही बसत व आपल्या वाणीचा अखण्ड शरवर्षाव सुरु करीत. त्यांच्या वाणीला शिकारीचा फार शोक होता. रोज कुणावर तरी धार धरून आपल्या श्रोत्यांत यथेच्छ हंशा पिकवायचा हा त्यांचा नित्यक्रम असे.





सोन्याबापूंची वाणी एवढी तेज असून देखील तिचा पल्ला चारदोन मित्रमण्डळींच्या पलीकडे जात नसे. पण आता ती व्यासपीठाच्या मोर्चावर आरूढ होणार होती. हा योग मोठा अपूर्व होता.

सोन्याबापू व शीला"ताई" या द्विविध आकर्षणामुळे परिषदेला हजर राहायचे मी ठरवले.

परिषदेला हजर राहण्याचा बेत सौ. ला कळवतांच ती म्हणाली,

"बरोबरच आहे. भम्पकराव रामदास, तुम्ही त्यांचे कल्याण. तुम्ही कसे त्यांच्या परिषदेपासून दूर रहाल!"

"अग तसं नाही. फार बडी मण्डळी येणार आहेत परिषदेला" म्हणून परिषदेची पत्रिका मी पुढे केली.

पत्रिका वाचता वाचता "अस्सं, एकूण ही बया देखील भम्पकरावांच्या पन्थात आली वाटतं" असे म्हणून सौ. ने कुतूहल व्यक्तविले!"

कोणती बया?" मी.

"अहो ती शीला ठाकुर" सौ.

"बरी बोलते म्हणतात!" मी.

"काय तो किचकिचा आवाज!" सौ.

"सुन्दर आहे म्हणतात" मी.

"कोण म्हणतात? भम्पकराव?"

सौ. ने हा प्रश्न अशा स्वरांत विचारल्यावर भम्पकराव तसे म्हणत नसून अस्मादिकच तसे म्हणतात असे सांगण्याची आमची हिंमत झाली नाही. पण पुन: खडा टाकून पाहिला. "फार हुशार आहे असं ऐकतो."

"कुठून ऐकता तुम्ही हे सारं? एकदा ऐकाच तुम्ही तिचं भाषण. हातच्या काकणाला आरसा कशाला पाहिजे?" सौ.

"खरं म्हणजे तिचं भाषण ऐकायची मला फारशी उत्सुकता नाही. मी आपला आचार्य विनोबा, जे. कृष्णमूर्ति वगैरेंच्या दर्शनाला जाणार आहे." आम्ही सारवासारव केली. पण तरी "मला "तुमच्या" शीला ठाकुरलाही पाहायचं नाही न् आचार्य मण्डळींनाही पाह्यच नाही. तुम्ही आपले एकटेच जा" असा सौ. ने टोला हाणलाच.

शेवटी आम्ही एकटेच परिषदेला जायला निघालो. परिषदेचा मण्डप जवळ आल्याबरोबरच परिषदेला मिळणार असलेल्या "भरगच्च" यशाची चिन्हें दिसू लागली. माणसांची अगदी रीघ लागली होती. त्यातली एक टोळी शंख वाजवून "विनोबा सुस्वागतम्" अशा ध्वजा फडकावीत होती. जवळच तरुणींचे एक टोळके गोळा झाले होते. त्यांतल्या कांही तरुणी कपडयांचा उपयोग अंग झाकणे हा नसून त्याचे प्रदर्शन करणे हा आहे या तत्त्वाच्या उपासक होत्या. ईश्वराच्या ओबडधोबड कारागिरींत सुधारणा करण्यासाठी त्यांनी ओठकाण्डी, गल्लचूर्ण वगैरेंचा यथेच्छ वापर केला होता. कलावंतांचे दर्शन घेणे हा त्यांचा हेतु उघड दिसत होता.

दुसऱ्या कांहीं तरुणींचे मत नारीदेह घडवतांना ईश्वराने फाजील छचोरपणा केला असे असल्याचे स्पष्ट दिसत होते. खादीच्या जाड वेष्टनांत त्यांनी आपला नारीपणा पूर्णपणे गुण्डाळून ठेवला होता व आपल्याकडे पाहणाऱ्याला तावडतोब वैराग्य उत्पन्न व्हावे या उद्देशाने त्यांनी आपला चेहरा शक्य तितका "अध्यात्मिक" केला होता. त्यांचा उद्देश अर्थात् सन्तमण्डळाचे दर्शन घेण्याचा होता.

पण ही सर्व मण्डळी मण्डपाच्या दाराबाहेरच रस्त्याच्या दुतर्फा रेंगाळत होती. मण्डपांत भम्पकराव व त्यांचे पंचवीस पुरोगामी वक्ते स्थानापन्न झालेले होते. शीला ठाकुर पूर्णपणे पुरोगामी वेषभूषा करून घटकेत इथे तर घटकेत तिथे अशी प्रत्येक वक्त्याशी कानगोष्ट करीत सारखी उठबस करीत होती. सोन्याबापू एका कोपऱ्यांत अंग चोरून बसले होते. आतां लवकरच व्यासपीठावर चढावे लागणार म्हणून त्यांना हुडहुडी भरली होती. भम्पकराव अध्यक्षस्थानी विराजमान झाले होते. हे अध्यक्षस्थान एका बोहल्यावर टेबलखुर्ची ठेवून सजवण्यांत आले होते. भम्पकरावांना राष्ट्र "पति" व्हायचे असले तरी त्यांनी परिषदेसाठी व्यासपीठाऐवजी बोहले कां बान्धवावे हे मला कळेना!





मंडपांत वक्ता म्हणून न येता निव्वळ श्रोता म्हणून येणारा मीच एकटा होतो. कांही वेळ वाट पाहाल्यावर दाराशी शेकडो मंडळी असून ती मंडपांत कां येत नाहीत असा अध्यक्षांना प्रश्न पडला. तेव्हा ते उठून दाराशी गेले व मंडपांत येऊन बसण्यासाठी लोकांना विनंति करू लागले, तेव्हा एक गृहस्थ ओरडले---

"आम्ही परिषदेचे सभासद नाही."

"हरकत नाही." भम्पकरावांनी दिलासा दिला. "परिषद् सर्वांना मोकळी आहे."

"आम्ही फक्त विनोबाजीचे दर्शन घेऊन परत जाणार आहोत." एक आध्यात्मिक आवाज म्हणाला.

"राजकपूरांना हार घालण्यासाठी आम्ही येथे थाम्बलो आहोत" एका कलात्मक आवाजाने जाहीर केलें.

ही सर्व शतकृत्ये मंडपांत देखील करता येतील असे भम्पकरावांनी विनवून पाहिले. त्यावर पुन: अनुक्रमे आध्यात्मिक व कलात्मक आवाजांत उत्तरे मिळाली.

"बाबा मंडपांत शिरायच्या आधीच आम्हाला त्यांच्या चरणावर डोके ठेवायचे आहे."

"प्रवेशद्वारापाशीच आम्हाला "राजू"चे स्वागत करायचे आहे."

प्रवेशद्वाराच्या आंत पाऊलही न ठेवण्याचा सर्वांचा निर्धार पाहून भम्पक-रावांचा निरुपाय झाला. प्रवेशद्वारापाशी शेकडो लोक असूनही आपल्या परिषदेला कुणी येत नाही असे पाहून शेकडों राण्यांनी भरलेंल्या अंत.पुरांत सदा वावरून कोरडयाच राहणाऱ्या कंचुकीसारखे भम्पकरावांना वाटू लागले.

पण भम्पकराव त्या जुन्या काळच्या कंचुकीसारखे कच्चे थोडेच होते! मंडपासारख्या बंदिस्त व प्रतिगामी जागेत पुरोगाम्यांची परिषद् व्हावी हे लोकांना पसंत नाही, आपली परिषद् रस्त्यावरच्या मोकळया वातावरणांतच झाली पाहिजे असे त्यांनी वक्तृवर्गाला सांगितले व आपली टेबलखुर्ची डोक्यावर घेऊन

बाहेर प्रयाण केले. त्याबरोबर सर्व वक्तेदेखील त्यांच्या मागोमाग प्रवेशद्वाराशी आले.

सोन्याबापू मात्र मंडपांतच राहले. मी त्यांना विचारले "कां सोन्याबापू, तुम्ही इथेच?"

सोन्याबापू उत्तरले "आधीच हे सभेत बोलणं आपल्याला जमत नाही. भम्पकरावांच्या आग्रहामुळे कबूल झालो. पण आता मंडपाऐवजी रस्त्यावर जाऊन बोलायचं हे कांही "आपल्या बाच्यानेही ! होणार नाही !!!"

बोलता बोलताच सोन्याबापू मंडपाच्या मागच्या दाराने पसार झाले. आमचे दुसरे आकर्षण नाहीसे झाले.

इकडे प्रवेशद्वाराशी भम्पकरावांचे अध्यक्षीय भाषण सुरू झाले होते.

"आपल्या विनंतीस मान देऊन आम्ही परिषद् खुल्या जागेतच भरवायचे ठरवले आहे. कोंदट वातावरणाचा निरास करून मुक्ततेची पसरण करणे हा पुरोगामी परिषदेचा मुळी उद्देशच आहे. तोच उद्देश ..."

इतक्यात पोलिसाची कर्कश शिटी ऐकू आली व भम्पकरावांचा उद्देश तिच्या किंचाळण्यांत बुडून गेला. एक पोलिस अधिकारी आपले फौजी जोडे थाड्थाड आपटीत त्यांच्याजवळ गेला. खुल्या वातावरणाचा जन्मजात शत्रूच दिसला तो. "तुम्हाला रस्त्यावर सभा भरवता येणार नाही" असे त्याने अध्यक्षांना सरळ बजावले.

"आम्ही मंडपांतच सभा ठरवली होती. पण लोक आंत जायला तयार नाहीत." भम्पकराव गयावया करून सांगू लागले. त्यावर तो लोकांना उद्देशून बोलू लागला.

"रस्त्यावर सभा भरवणे हे कलम चौतीस भारतीय आरक्षी अधिनियम, कलम तेहेत्तीस महाराष्ट्र आरक्षी अधिनियमाबरोबर वाचला असता दंडनीय ठरते. तरी लोकांनी मंडपांत जाऊन सभा साजरी करावी ..."

"पण आम्ही सभेला आलोच नाही" एक आवाज़.





"बाबांचे दर्शन घेऊन आम्ही परतणार आहोत." दुसरा आवाज.

"राजूच्या गळ्यांत माळ घातली की झालं आमचं काम" तिसरा आवाज.

अशा अनेक आवाजांत पोलिस अधिकाऱ्याचे पुढचे भाषण गटंगळ्या खाऊ लागले. तेव्हा तो पुन: भम्पकरावांकडे वळून म्हणाला, "तुम्ही आधी मंडपांत जा. ज्यांना सभेला यायचं असेल ते मंडपांत येतील."

बिचारे भम्पकराव पुन: आपली टेबलखुर्ची उचलून मंडपाकडे चालू लागले. वक्तेमंडळी मात्र "रस्त्यावर सभा भरवणे हा नेहमीच गुन्हा होत नाही. चौतीसाव्या कलमांत तसे म्हटले असले तरी एकशे चौतीसाव्या कलमांत त्याला अपवाद सांगितले आहेत, शिवाय भारतीय अधिनियमाबरोबर महाराष्ट्र अधिनियम वाचायचा खटाटोप केलाच पाहिजे असे नाही" वगैरे कायदेशीर मुद्दे काढून पोलिस अधिकाऱ्याशी हुज्जत घालू लागली. ही हुज्जत फारच हातघाईवर आली तर वक्तेमंडळींना ठाण्याची वारी घडणार असे स्पष्ट दिसू लागले, म्हणून मी आपला निमूटपणे भम्पकरावांच्या मागोमाग मंडपांत गेलो. भम्पकराव पुन: बोहल्यावर आपली टेबलखुर्ची ठेवून अध्यक्षस्थानी विराजमान झाले होते. ते कांही बोलेनात म्हणून मीच शांततेचा भंग केला.

"परिषद् कशी निभावणार कुणास ठाऊक ! मंडपात कुणी श्रोतेच नाहीत."

"तुम्ही जन्माचेच रडत राऊत" भम्पकराव गरजले. "परिषद् न व्हायला काय झालं ? ते बाहेरचे मूर्ख लोक आत न आले तरी आमचे हे पंचवीस वक्ते तरी येतीलच की नाही ? की त्यांना स्वत:ही भाषण करायची इच्छा नाही ! स्वत:च भाषण करायला येणाऱ्या या पंचवीस intellectuals नी माझं भाषण ऐकलं तरी पुष्कळ आहे. बाकीच्या निर्बुद्धांशी मला कांही कर्तव्य नाही."

भम्पकरावांचे हे वीरश्रीयुक्त वक्तव्य सुरु असतांच बाहेरची हुल्लड जोरात सुरु झाली. शीला ठाकुर व उरलेले दहा बारा वक्ते धापा टाकीत मंडपात धावत आले. पोलिस अधिकाऱ्याशी अतिप्रसंग केल्याबद्दल दहा वक्त्यांना अटक करण्यात आल्याची भीषण बातमी त्यांनी सांगितली.

झाले ! भम्पकरावांच्या राखीव पंचवीस श्रोत्यांपैकी सोन्याबापू पळून गेले

होते व दहा "सरकारी पाहुणे" झाले होते. एकूण चौदा वक्ते व पंधरावा मी मिळून मोजून पंधरा श्रोतेच भम्पकरावांसाठी उरले होते.

"हरकत नाही" भम्पकराव अध्यक्षीय खुर्चीवरून जाहीर करते झाले. "मोठ्या कार्याला विघ्नंहि मोठीच येतात. पण त्यामुळे आपण डगमगून जाता उपयोगी नाही. आपण आता आपल्या कार्याला प्रारंभ करू. प्रत्येक वक्त्याला दहा मिनिटे देण्यात येतील. मग मी समारोप करीन. पहिले वक्ते श्री. आन्याजी भटकळ यांना मी भाषण करण्यास विनंती करतो."

अध्यक्षांची विनंती ऐकून देखील आन्याजी भाषण करायला उठेनात. "दहा मिनिटेच ?" म्हणून त्यांनी अध्यक्ष व इतर वक्ते यांच्याकडे प्रश्नांकित मुद्रेने पाहचले.

"अय्या ....! पण आप्पांनी मला वीस मिनिटांचं भाषण लिहून दिलंय नं !" म्हणून शीला ठाकुर नाक फेंदारत उद्गारली.

पण लगेच तिने जीभ चावली व हिरमुसलेल्या चेहऱ्यासमोर आरसा धरून ती ओठावर लिपस्टिक् फिरवू लागली."

"दहा मिनिटांत क्रान्तिकारक भाषण करायचं म्हणजे काय !" दुसरे एक क्रान्तिकारक वक्ते तक्रारते झाले.

हा सर्व असन्तोष पाहून भम्पकराव समजावणीच्या स्वरांत म्हणाले.

"दहा मिनिटं म्हणजे दहा मिनिटंच असं नाही. मी आपली एक सूचना केली..."

अध्यक्षांचे पुढील बोलणे सम्पायच्या आंतच आन्याजी व्यासपीठावर चढले. अध्यक्षांच्या आश्वासनाने त्यांचा उत्साह द्विगुणित झाला होता. त्यांनी आपल्या भाषणास सुरवात केली

"बन्धुभगिनींनो ! आजच्या माझ्या व्याख्यानाचा विषय cosmogony असा आहे. cosmogony म्हणजे सृष्टीची उत्पत्ति..."





"अहो ही राजकीय परिषद् आहे. तत्वज्ञान परिषद् नाही." अध्यक्षांनी उठून सूचना दिली.

'राजकारण वेगळं न् तत्वज्ञान वेगळं हे प्रतिगामी मत केव्हाच मागे पडलं आहे." आन्याजींनी अध्यक्षांना समज दिली. "सृष्टीची उत्पत्ति कशी झाली हे कळल्याशिवाय सृष्टीचा नाश करण्याचं क्रान्तिकारक राजकारण कसं करता येईल ?"

भम्पकरावांनी "मौनं सर्वार्थसाधनम्" या पक्षाचा आश्रय केला. आन्याजी दुप्पट मोठा आवाज काढून बोलू लागले.

"तात्पर्य काय की सृष्टीची उत्पत्ति कशी झाली हा आपल्यापुढे मोठा प्रश्न आहे. म्हणजे असं की हे जे भोवताली विश्व दिसतं आहे हे आलं कुठून ? हे जे सारं जग आहे ते झाले कसे ? हा चंद्र आला कुठून हा सूर्य झाला कसा ? हे तारे उगवले कुठून ? किम्बहुना आपण सर्व कसे उत्पन्न झालो..."

"अहो, ते आपल्याला माहीत आहे." शीला ठाकुरकडे तिरप्या नजरेनं पाहात एक पुरोगामी वक्ते, म्हणजे सध्यापुरते श्रोते---उद्गारले.

"अज्ञान ते हेच" आन्याजी उत्तरले "मला माहीत आहे ही भावना हे अज्ञानाचं प्रमुख लक्षण. ही सृष्टि आली कुठून हे कुणालाच माहीत नाही. म्हणूनच हा आपल्यापुढं मोठा प्रश्न आहे. आपण असं पहा. चौऱ्यांशी लक्ष योनि आहेत, त्यात चारशे कोटि मानव आहेत, त्यात दोनशे कोटि पुरूष व दोनशे कोटि स्त्रिया आहेत. या सर्व आल्या कुठून ? कुणी उत्पन्न केल्या ? कुणासाठी उत्पन्न केल्या ? कशा उत्पन्न केल्या ? फार मोठे प्रश्न आहेत हे. या प्रश्नाचं उत्तर मी गेला तासभर शोधतो आहे. पण प्रश्न मोठे बिकट आहेत. आंता हा आपल्या समोरचा खांबच घ्या ना..."

समोर बसलेल्या एका श्रोत्याला आन्याजींनी आपल्यालाच खाम्ब म्हटले असे वाटून त्याचा चेहरा लालबुन्द झाला. पण मागे वळून पाहिल्यावर तिथे खरोखरच मण्डपाची बल्ली आहे ही खात्री पटली व त्याचा चेहरा पूर्वरंगावर आला.

"हा खाम्ब कसा निर्माण झाला? कुणी निर्माण केला? कशासाठी निर्माण केला? असाच प्रश्न या मण्डपांतल्या प्रत्येक खाम्बाबद्दल विचारता येईल. हे खाम्ब ज्या झाडावरून तोडून आपले त्या प्रत्येक झाडाबद्दल विचारतां येईल.

त्या पानावरच्या प्रत्येक तन्तूबद्दल विचारता येईल. तात्पर्य काय की ही सृष्टि कशी निर्माण झाली हा आपल्यापुढे मोठा प्रश्न आहे . . ."

"आमची बोलायची पाळी केव्हा येणार हा आमच्यापुढे मोठा प्रश्न आहे ." एक भाषणोत्सुक वक्ते दुसऱ्या भाषणोत्सुक वक्त्यांच्या कानांत जोराने कुजबुजते झाले. पण सृष्टीचे गूढ उकलण्याच्या मागे लागलेल्या आन्यजींनी तिकडे दुर्लक्ष केले,

". . .तेव्हां माझं म्हणण असं की या मोठ्या प्रश्नाचा आपण कसून विचार केला पाहिजे. नाहीतर ही माती आली कुठून हे आपल्याला कसे कळणार? हे दगड झाले कसे हे आपल्याला तेव्हा कळणार? समुद्रांत पाणी न् खाणीत कोळसा कुणी ठेवला हे कोण सांगणार ? . . ."

"यांचं भाषण केव्हां सम्पणार . . .? समोर बसलेल्या वक्त्याने प्रश्न उपस्थित केला. पण यावेळी आन्याजी फक्त शब्द उच्चारण्याची क्रिया करीत होते. शब्द ऐकण्याची क्रिया त्यांनी पूर्णपणे स्थगित केली होती."

" . . . या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न अनेकांनी केला. विसाव्या शतकांत हा प्रयत्न झाला, एकूणिसाव्या शतकांत झाला, अठराव्या शतकांत झाला . . ."

ख्रिस्तानंतरची व ख्रिस्तापूर्वींची सर्व शतके सम्पल्याशिवाय आन्याजीचे वक्तृत्व सम्पणार नाही असा रंग दिसू लागला. पण आन्याजींनी फक्त ख्रिस्ता-पर्यन्तच मजल मारली व शतके मोजण्याचा नाद सोडून दिला. तेव्हा श्रोत्यांना थोडे हायसे वाटलें. पण हायसे वाटते न वाटते तोंच आन्याजींनी दुसरा पवित्रा दाखवला.

" . . . सर्व शतकाप्रमाणेच सर्व देशांत हा प्रयत्न झाला. भारतांत झाला, चीनमध्ये झाला, रशियांत झाला . . ."

आता सर्व देशांची यादी सम्पेतोपर्यंत प्राण कण्ठाशी धरावे लागणार अशी चिन्हे दिसू लागली. पण या "कठिण समयी" शीला ठाकुर मदतीला धावून आली.





"इथे जवळपास एखादं हॉटेल नाही का हो?" स्वभावत:च गोड असलेल्या आवाजात तिने विचारले. आधीच आवाज गोड, त्यांतून प्रश्न गोड आणि या बिकट प्रसंगी तर मगराच्या तावडीत सांपडलेल्या गजेन्द्राला भगवन्ताचे दर्शन जसे वाटले तसा तो प्रश्न मला वाटला.

"हो आहे तर काय!" म्हणून मी उठलो व "शीलाताईंना थोडी विश्रान्तीची जरुर आहे" असे अध्यक्षांना सांगून मी शीला "ताई" समवेत शक्य तितक्या चोरट्या पावलांनी बाहेर पडलो, तो थेट मण्डपाजवळच्या एका स्वच्छशा हॉटेलांत "फॅमिली" मध्ये जाऊन बसलो.

"तुम्ही कशावर बोलणार आहांत?" "ताई" ने विचारले.

"मी नुसता श्रोता म्हणूनच आलो आहे. तुम्ही कशावर बोलणार आहांत?"

"विवाहसंस्था की स्त्रियांचा तुरुंग" – ताई.

"विवाहसंस्थेवर तुमचा बराच रोष दिसतो." मी भीतभीत मत व्यक्तविले. ताईंशी बौद्धिक साहचर्य करण्याचा चांगला योग जुळून आला होता. पण साहचर्य थोडेसे बाळसे धरते न धरते तोच त्यावर यमराजांची दृष्टि वळली.

'फॅमिलीत असतील ते" बाहेर बोलणे ऐकू आले.

"छे, छे, ताई कधीच फॅमिलीत जाणार नाहीत."

"अहो, जरा डोकावून पहा तर खरे."

"वा! वा! अन् दुसरंच कुणी असलं तर!"

हा वादविवाद वाढू देऊन आणखी शोभा नको म्हणून कुणी आंत डोकावायच्या आधी मीच बाहेर डोकावलो.

"कोण पाहिजे तुम्हाला?"

"पहा मी म्हणालोच होतो" वक्तेमण्डळींपैकी एकाने "जितं मया" या सुरांत वक्तव्य केले. अहो या जरा इथंच."

आम्ही बाहेर पडलो. आमच्याप्रमाणेच आणखी दहा वक्ते "सृष्टीची उत्पत्ति" ऐकायचे सोडून हॉटेलाला उदाराश्रय द्यायला आले होते. सृष्टीच्या मातेचे बाळंतपण जसजसे लाम्बू लागले तसतसे कुणाला देहधर्मानीच बोलावलें, तर कुणाला तहान लागली, तर कुणाला भूक लागली व असे एकामागे एक दहाजण मंडपांतून बाहेर पडले ते थेट आमच्या मार्गावर !"

हेच तर या जगांत वाईट आहे ! चोऱ्या करण्याची प्रवृत्ति फार ! शीला–ताईंची हॉटेलात वेळ काढण्याची कल्पना या मंडळींनी चोरून आमच्या बौद्धिक साहचर्याला खीळ घातली होती.

"सृष्टीची उत्पत्ति सम्पली नाही वाटतं अजून ?" "ताई"नी पृच्छा केली.

ताज्या बातमीप्रमाणे सृष्टीच्या आईच्या प्रसववेदना अजून सुरूच होत्या. भम्पकराव आन्याजींचे शिष्योत्तम तात्याजी येळकोट हे दोघेच फक्त सूतिकागृहांत होते. तात्याजी आन्याजींच्या व्याख्यानाच्या नोट्स घेत होते. "आन्याजी, व्यक्ति आणि तत्वज्ञान" या त्यांच्या हजार पानी आगामी ग्रंथाची जाहिरात परिषदेत वाटली गेली होती. ती आम्ही वाचली तेव्हा ही हजार पाने ते कशी भरणार असा आम्हाला प्रश्न होता. पण आता हा प्रश्न मुळीच उरला नाही. आन्याजींचे एक व्याख्यान जरी छापले तरी ते सारे पुस्तक भरून जाण्यासारखे होते.

"आन्याजीनंतर तात्याजी बोलणार आहेत म्हणे." आन्याजींची cosmogony "हा त्यांचा विषय आहे. आन्याजींच्या व्याख्यानावरचं ते भाष्य करणार आहेत.' एका वक्तेमहाशयांनी माहिती पुरवली.

'हे राम !" साऱ्या वक्त्यांनी एकमुखाने नामस्मरण केले !

कांही वक्ते हॉटेलांत वामकुक्षी करण्याची सोय आहे की नाही म्हणून चौकशी करू लागले.

"मी आता जाते आपली घरी. मला नाही या परिषदेत बोलायचं" म्हणून ताईंनी गोड आवाजांत कोप व्यक्त केला.

ही मात्र फारच मोठी आपत्ति होती. आमचे मुख्य आकर्षणच परिषदेतून





नाहीसे होणार होते. मी भम्पकरावांना खालील आशयाची एक चिठ्ठी लिहून हॉटेलच्या पोऱ्याच्या हस्ते पाठवली.

"आन्याजींचे भाषण आवरते घ्या व तात्याजींचे भाषण पुढे ढकला. नाहीतर सर्व लोक घरी जायचा विचार करीत आहेत."

चिठ्ठीचा ताबडतोब परिणाम होऊन भम्पकरावांनी "आन्याजींचे भाषण सम्पले. तात्याजींचे भाषण पुढे ढकलले आहे. सर्वांनी यावे." असा निरोप पाठवला. निरोपाचा इष्ट तो परिणाम होऊन मंडळी हळूहळू परत मंडपाकडे वळली.

दुसरे व्याख्यान बटुकेश्वर पाणके यांचे होते. भाषण करण्याचा त्यांच्या आयुष्यांतला बहुधा तो पहिलाच प्रसंग असावा. त्यांनी आपले भाषण एका कागदावर लिहून आणले होते. थरथरत्या हाताने तो कागद धरून पाणके पहिली ओळ वाचतात न वाचतात तोच आन्याजी व तात्याजी उठून जातांना दिसले. "काय झालं ?" म्हणून अध्यक्षांनी विचारतांच "आमचं व्याख्यान झालं. आता दुपारी आमचे शिष्य तात्याजी त्यावर भाष्य करतील ते ऐकायला येऊ. बाकीच्या भाषणांमध्ये आम्हाला रस नाही" असे त्यांनी चक्क सांगितले.

बिचारे पाणके ! आधीच उल्हास त्यांत फाल्गुन मास अशी उलटच्या अर्थाने त्यांची गति झाली. लिहून आणलेला कागदही त्यांनी अर्धाच वाचला. तो त्यांच्या–शिवाय कुणालाही ऐकू गेला नाही. भाषण झाल्यावर तो कागद नीट घडी करून खिशांत ठेवीत ते थेट दाराकडे वळले.

अध्यक्षांनी पुन: "काय झालं" म्हणून विचारले. "आमचं काम झालं. आता आम्ही जातो" म्हणून पाणक्यांनी सगळ्यांना नमस्कार केला व प्रस्थान ठेवले.

यानंतरचे दोन वक्तेही असेच आपली भाषणे दहा मिनिटाच्या आंतच आटोपून निजधामास गेले.

निष्क्रमणाचा हा क्रम असाच चालू राहला तर आपण समारोपाचे भाषण करीपर्यंत कुणीच परिषदेत राहणार नाही अशी भम्पकरावांना धास्ती वाटू लागली. प्रसंगाचे गाम्भीर्य ओळखून त्यांनी आपल्या पूर्वीच्या डावापेचांत एकदम फरक केला व पुढच्या वक्त्याचे नांव घेण्याऐवजी स्वत:च बोलायला सुरवात केली.

"मित्रहो ! मला वाटतं आता भोजनाची वेळ जवळ येत चालल्यामुळे यापुढची भाषणे भोजनोत्तर दुपारी ठेवावी. मी आतापर्यंत झालेल्या भाषणांचाच आता समारोप करतो व मला जे काय चार शद्व सांगायचे आहेत ते सांगतो..."

नाही ! नाही ! सगळी भाषणं आधी होऊ द्या" सारे वक्ते एकमुखाने ओरडले.

"मग आपलं भाषण झाल्याबरोबर वक्त्यांनी घरी जाता कामा नये" भम्पकरावांनी बजावले.

या सूचनेचा कांही वक्त्यांनी जोराने पाठपुरावा केला तर कांहींनी तिल आपला मूकविरोध प्रकट केला.

इतक्यांत "मारो ! मारो ! डोकी फोडा मेल्यांची" म्हणून बाहेर जोरांत गलबला ऐकूं आला व मण्डपांत एकदोन दगडही येऊन पडले.

आमचे धाबे दणाणले. काय प्रकार आहे म्हणून आम्ही बाहेर पाहतो तो मघाचेच पोलिस अधिकारी परिषदेच्या जाहिरातीचे हॅंडबिल फडकावीत आले व यांत लिहल्याप्रमाणे खरोखरच राजकपूर, विनोबा वगैरे मण्डळी तुमच्या परिषदेला येणार आहेत काय म्हणून दरडावून अध्यक्षांना विचारू लागले.

विचारे भम्पकराव त, त, प, प, करू लागले. ही मण्डळी येणार होती, पण आयत्या वेळी येणे जमणार नाही अशा त्यांच्या तारा आल्या. तसे जाहीर करायला वेळ मिळाला नाही." असे त्यांनी चाचरत सांगितले.

"सगळयांच्या एकदम तारा आल्या ? कुठं आहेत तारा ?" पुन: दरडावणी.

"घ, घ, घ .... आहेत. सभा झाल्यावर दाखवीन" भम्पकराव काकुळतीने म्हणाले.

तुमची सभा आता राहूं द्या. "पांच मिनिटांच्या आंत विनोबाजी आले नाहीत तर परिषद्वाल्यांचा मुडदा पाडू" असं बाहेरचे लोक बोलताहेत. विनोबा येणार म्हणून खोटं लिहिल्याबद्दल तुमच्यावर फार चवताळले आहेत ते. मो होतो म्हणूनच तुम्ही बचावलात . . ."





"फोडून काढा भामटयांना . . . मारो लगाव . . ." बाहेर रणगर्जना उठल्या.

प्रसंग ओळखून शीला ठाकुरसकट सर्व वक्तेमण्डळी मण्डपाच्या मागच्या दाराने पसार झाली. नेहमीप्रमाणे भम्पकरावांचा मीच एकटा श्रोता उरलो होतो.

"तुम्ही तारा दाखवल्या नाहींत तर फसवेगिरीच्या गुन्ह्याबद्दल भारतीय दण्डविधान कलम चारशेवीस याखाली तुम्हांला अटक करावी लागेल ...." इन्स्पेक्टरसाहेबांचे वक्तृत्व सुरुच होते.

"दाखवीन ना तारा. आताच माझ्या सेक्रेटरीला फोन करतो." भम्पकराव उत्तरले.

इतक्यात एक नवेच गृहस्थ उपरणे सावरीत आत आले. भम्पकरावांची व त्यांची जुनी ओळख दिसली. "या ! बरे वेळेवर आलांत" म्हणून भम्पकरावांनी त्यांचे तोंड भरुन स्वागत केले.

पण त्यांची इच्छा मात्र तोंड फोडून भम्पकरावांचे स्वागत करण्याची दिसली.

"हो, हो. वेळेवरच आलो. तुमची हजेरी घ्यायला. काय हो, चक्क भामटे आहांत तुम्ही !! गुरूजींनी पाठवलं असं खोटंच सांगून मण्डपाचा कबजा घेतला तुम्ही. आताच गुरुजी भेटले होते. त्यांनी सांगितलं की आम्ही कुणालाच पाठवल नव्हतं म्हणून."

"काय भानगड आहे ? ' इन्स्पेक्टरसाहेब गम्भीर आवाजात विचारते झाले.

"अहो आमचे वऱ्हाड उतरणार आहे या घरांत. म्हणून आम्ही ही जागा भाडयानं घेऊन इथे मण्डप बांधला. या गृहस्थांनी मला सांगितलं की मी तुमच्या गुरुजींकडून आलो आहे. आमच्या परिषदेसाठी तुम्ही आपला लग्नमण्डप एक दिवस आम्हाला द्यावा अशी गुरुजींची आज्ञा आहे. आम्ही आपला मूर्खासारखा यांच्यावर विश्वास ठेवून दिला खुला करुन यांना मण्डप ! पण सगळचा थापा. आमच्या गुरुजींनी याचं तोंडही पाहयलं नाही."

"भलते आरोप करू नका. आणा तुमच्या गुरुजींना. आताच हा सूर्य आणि हा जयद्रथ होऊन जाऊं द्या." भम्पकराव आत्मविश्वासाने म्हणाले.

"काय हो ! तुम्हाला यातली कांही माहिती आहे काय ?" माझ्याकडे वळून इन्पेक्टरसाहेब विचारते झाले.

"मला यांतलं काही माहीत नाही. मी आपला हँडबिल वाचून परिषदेला आलो." मी उत्तर दिले.

"हे पहा रावसाहेब" भम्पकरावांकडे पाहून इन्स्पेक्टरसाहेब म्हणाले. "आधी तुमच्या सेक्रेटरीला बोलावून राजकपूर विनोबा वगैरेच्या तारा दाखवा. मग आपण यांच्या गुरुजींची भेट घेऊन मण्डपात परिषद् भरवल्याबद्दलही शहानिशा करूं. यांतून तुम्ही निभावला नाही तर कलम चारशे वीस..."

मी मण्डपातून काढता पाय घेतला.

●●●



# ४ : आन्तरराष्ट्रीय नवरेसंघ

भम्पकरावांचे आगमन मला संक्रांतीसारखे वाटे. ते आले की पेण्ढारी आले म्हटल्याबरोबर लोकांना कसे वाटत असेल यांची मला पुरी कल्पना येई.

पण असे असूनदेखील बरेच दिवसांत भम्पकरावांचे दर्शन घडले नाही तेव्हा मला त्यांची आठवण येऊ लागली. कांहीतरी चुकल्या चुकल्यासारखे वाटू लागले. म्हणून एके दिवशी संध्याकाळी वेळ काढून त्यांचा समाचार घ्यायला आम्ही त्यांच्या घराकडे मोर्चा वळवला.

पण आमच्या मोहिमेला मुहूर्त चांगला नव्हता. भम्पकरावांचे बिऱ्हाड आल्याबरोबर आंतून रणगर्जना ऐकू येऊ लागल्या.

"राष्ट्रपति होणार असाल तेव्हा व्हा. सध्या तुमच्या सिगरेटीपुरते पैसे मिळवाल तरी पुरे आहे."

भम्पकरावांच्या घरी वारंवार घडणाऱ्या चकमकीपैकीच ही चकमक होती. भम्पकरावांच्या नोकऱ्या अमेरिकन नटीच्या नवऱ्यांप्रमाणे वर्षाच्यावर कधीच टिकत नसत. खर्डेघाशी करण्यांत कांही महिने लोटले की भम्पकरावांना एकदम आपल्या अवतारकृत्याची आठवण होई. राष्ट्रपति वा पंतप्रधान होण्यासाठी आपला

जन्म असतांना खर्डेघाशी करण्यांत आपण विनाकारण वेळ घालवतो आहोत याची जाणीव होऊन ते तत्काळ नोकरीवर लाथ मारीत व राष्ट्रपति होण्याच्या उद्योगाला लागत. या उद्योगांत गोते खाल्ले की "तूच मज आई" म्हणून पुन: खर्डेघाशीकडे धाव घेत. राष्ट्रपति होण्याचा उद्योग सुरू असतांना अर्थात् सौ. भम्पकरावांचा पगार हा भावी राष्ट्रपतीचा करभार समजून ते वागत. पण आजकालची रयत विद्यमान राष्ट्रपतीलाच सुखासुखी करभार देत नाही तर भावी राष्ट्रपतीची गोष्टच बोलायला नको. या भावी राष्ट्रपतींच्या विरुद्ध वारंवार no tax campaign "लगान नही देंगे" मोहिमा होत. या मोहिमेपैकीच एकीचे प्रात्यक्षिक आम्हाला दिसले होते.

"पैसे, पैसे, पैसे...तुला दुसरं कांही दिसतं तरी कां. माझं भाग्य उदयाला येईपर्यंत थोडे कष्ट होणारच, टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवत्व येत नाही."

"देव व्हाल तेव्हा व्हाल. सध्या मात्र शुद्ध दगड आहात..."

"बस् बस्...पुरे कर आता. हा मी घराबाहेर पडलो. आजपासून तू माझी कुणी नाहीस. हा संसार सोडला. आता आमचा संन्यास..."

"शम्भराव्वा संन्यास आहे हा तुमचा..."

"यावेळी कायमचा आहे. मग कितीही पाया पड, लोटांगणं घाल..."

असं म्हणून भम्पकराव झटक्यानं घराबाहेर पडले.

नाइलाजानं भम्पकरावांच्या घरचा समरप्रसंग ऐकावा लागला होता, पण त्यांना तसं दाखवणं इष्ट नव्हतं म्हणून वेड पांघरून मी उद्गारलो----

"बोला भम्पकराव. कुठे निघालात?"

"निघालो तुमच्याकडेच"

"वा: आम्ही तुमच्याकडे न् तुम्ही आमच्याकडे! तुमचा पाहुणचार घ्यायला आलो आहे. चला."

"माझा या घराशी कांही सम्बन्ध नाही."





"असं कधी झालंय्! चला." म्हणून मी त्यांना ओढतच घरी घेऊन गेलो.

"काय वहिनी!" भम्पकराव आमच्या घरी शिरतांना जी परवल वापरीत तिची नक्कल करीत मी भम्पकरावांच्या घरात शिरलो.

माझ्या मागोमाग भम्पकरावही शिरलेले पाहून भम्पकरावांच्या सौ. खिजवीत उद्गारल्या----

"अग अग म्हशी, मला कुठे नेशी"

"हो! म्हशीचे प्राणनाथच पडलो." भम्पकराव चिडून उत्तरले.

"काय गुपित आहे तुमचं? आम्हाला सांगण्यासारखं आहे की नाही? को खास नवराबायकोचं आहे?"

"कांही गुपित नाही न् नवराबायकोचं तर मुळीच नाही. आजपासून मी हिचा कुणी नाही. सारा संसार सोडून संन्यास घेतला आहे." भम्पकराव उवाच.

"संन्यास घेणं हा पळपुटेपणा आहे भम्पकराव. संसारांतल्या कटकटींना तुमच्यासारख्या पुरुषांनी तोंड दिलं पाहिजे. अशी पाठ फिरवून काय उपयोग?" इति वयम्.

आमच्या बोलण्याचा भम्पकरावांवर कधीच परिणाम होत नसे. पण यावेळी मात्र माझी सूचना ऐकून, आपला सिद्धान्त पहिल्याप्रथम सुचला तेव्हा आर्किमिडीजच्या चेहऱ्यावर जसे भाव दिसले असतील तसे भम्पकरावांच्या चेहऱ्यावर दिसू लागले. एकदम "दे टाळी" म्हणून त्यांनी बायकोपुढे हात केला. पण लगेच झालेल्या प्रसंगाची आठवण होऊन त्यांनी आपली चूक सुधारली व तोच हात माझ्यापुढे केला.

"कसला शोध लागला त्रिम्बकराव? कळू तरी द्या" अस्मादिक.

त्यावर भम्पकराव उत्तरले "संन्यासाचा बेत रद्द केला...

हे ऐकल्याबरोबर भम्पकरावांना पुढे बोलू न देता त्यांच्या सौ. गुणगुणू लागल्या...

"शशमंडळात कोल्हा म्हणतो मी सिंहगर्जना करितो..."

"कुत्री कितीही भुंकली तरी हत्तीची चाल चळत नाही" भम्पकरावांनी प्रत्याघात केला. संन्यास घेऊन पळून जाण्यापेक्षा तुमच्या सल्ल्याप्रमाणे झगडायचं मी ठरवलं आहे. आजपर्यंत पुरुषजातीवर व नवरेलोकांवर झालेल्या अन्यायाचं परिमार्जन करण्यासाठी मी माझा देह खर्ची घालणार ! हा लढा असा एकट्या-दुकट्यानं करण्यासारखा नाही. त्यासाठी संघटनेची जरूरी आहे. मी आता एक नवरेपरिषद् काढणार आहे. जगांतल्या साऱ्या नवऱ्यांना माझा संदेश आहे. "एक व्हा. Husbands of the world unite...."

"You have nothing to lose but your wives..." "एका बायकोखेरीज गमावण्यासारखं तुमच्याजवळ काय आहे ?" आम्ही त्याला पुस्ती जोडली.

"हो अगदी बरोबर. शतकानुशतकं या बायकांनी आमची पिळणूक केली आहे. आम्ही निढळाच्या घामानं मिळवावं न् यांनी घरी बसून आयतं खावं..."

"चोराच्या उलट्या" भम्पकरावांच्या सौ. मध्येच उद्गारल्या.

पण भम्पकरावांच्या वक्तृत्वाचा ओघ एवढ्याने थांबणार नव्हता.

"साड्या, पावडर, दागिने, सारा शृंगार करावा यांनी न् पैसे पुरवावे आम्ही. मुलं होणार यांना न् त्याचं पालनपोषण करावं आम्ही..."

हे ऐकून भम्पकरावांच्या सौ. पाय आदळून उठल्या व धाडकन् दरवाजा लावून माजघरात गेल्या.

"काय भलतेच आरोप करतां त्रिम्बकराव ?" भम्पकरावांचा रोख न कळून मी म्हटलं.

भलतंच काय आहे यांत. बायकांना नाहीतर काय पुरुषांना मुलं होतात ? पुरुषांनी कां म्हणून बायकांच्या मुलांच्या खस्ता खाव्या ? शतकानुशतकं असंच आहे. पुरुष श्रमजीवी नि या बायका परजीवी, शोषक. साऱ्या जगाचा इतिहास हा या संघर्षाचा इतिहास आहे. श्रमजीवी व शोषक, नवरे व बायका...





"तुम्ही आता मार्क्सच्या कॅपिट्ल्सारखा "बायको" या नावाचा ग्रंथ लिहा." मी सुचविले.

"हो तर ! लिहिणारच आहे. साऱ्या मानवी इतिहासाचं मी त्यांत मन्थन करणार आहे. अगदी प्रारम्भापासून म्हणजे अगदी प्राथमिक बिनबायकोशाही-पासून."

'बिनबायकोशाही ?" आम्ही जिज्ञासलो.

"त्याचं असं आहे" अज्ञ विद्यार्थ्याला समजावण्याच्या आविर्भावाने भम्पक-राव म्हणाले, "प्रारम्भी विवाहसंस्था नव्हती. त्यामुळे शोषक व शोष्य असा वर्ग-भेद नव्हता. पुढे कालान्तराने स्त्रियांनी आपल्या स्वार्थासाठी विवाहसंस्था निर्माण केली. त्या काळचे पुरूष एखाद्या स्त्रीपुढे हार खाणारे नव्हते. म्हणून स्त्रियांनी संघ करुन एकेका पुरुषाला गठवायला सुरवात केली. ही जनानखानाशाही होती. मानवी इतिहासाची ही दुसरी अवस्था. या अवस्थेत तर पुरुषांवर अतोनात जुलूम झाला. पुरुषाची पिळणूक करण्यांत कडी कोण करणार याबद्दल अनेक बायकांत जणू अहमहमिका सुरु असे. पुढे या जनानखानाशाहीतून आधुनिक बायकोशाहीचा जन्म झाला. दगडापेक्षा वीट मऊ या न्यायाने जनानखानाशाहीपेक्षा ही बायको-शाही बरी. पण ती देखील किती असह्य असते हे तुम्ही आम्ही पाहतोच आहोत."

"फक्त तुम्हीच, आम्ही नव्हे." आम्ही आपल्या सौ.चे स्मरण करीत निषेध व्यक्तविला.

पण भम्पकराव त्या निषेधाला भीक न घालता बोलतच राहिले. "मात्र या बायकोशाहीचे दिवस देखील भरले आहेत. आता लवकरच नवरेवर्गाचा विजय होऊन नवरे व बायका ही वर्गशाही नष्ट होणार आहे."

"म्हणजे आमच्यासारख्यांवर फारच आपत्ति आहे म्हणायची" आम्ही चिंता व्यक्त केली.

"हीच ती गुलाम वृत्ति. तुमचं मन बायकोशाहीपर्यंत देखील प्रगत झालं नाही. अजून ते जनानखानाशाहीतच रेंगाळत आहे. आपल्याला एकच काय आणखी एखादी असली तरी बरंच असं देखील तुम्हाला मनांतून वाटत असेल..."

"आमच्या हिला सांगणार नसाल तर सांगतो..." आमचा प्रामाणिकपणा उफाळून आला.

"ते न सांगताच समजलं. या भम्पकरावांचं निदान कधी चुकायचं नाही. क्रांतीला सगळ्यांत जास्त विरोध शोषकवर्गापेक्षा त्यांच्या बगलबच्चा शोष्य वर्गाकडूनच होतो. वेश्याबंदीला सर्वांत मोठा विरोध कोण करणार? वेश्याच. औरंगजेबाने पाडलेले काशीविश्वेश्वराचे देऊळ पुन: बांधू नका म्हणून मराठ्यांच्या आड कोण आले? त्या विश्वेश्वराचे पुजारीच. सत्तावनचे स्वातंत्र्ययुद्ध कुणी मोडले? आमच्या देशी शिपायांनीच. कुऱ्हाड लाकडे कां फोडू शकते? दांडा गोतास काळ होतो म्हणून..."

"दिली एवढी उदाहरणे पुरेत." झाले एवढे ईशस्तवन पुरे या मराठी नाट्यसृष्टीतील मूर्धाभिषिक्त वाक्याची आठवण होऊन आम्ही बोललो.

"तेव्हा तात्पर्य काय की या बायकोशाहीचा काटा काढायच्या आधी तुमच्यासारख्या बाइलबुद्ध्यांचा काटा काढला पाहिजे."

भम्पकरावांचे हे घोषणावाक्य ऐकून आमच्या छातीत धडकीच भरली. बरॅंय् वहिनी, असं म्हणून आम्ही एकदम काढता पाय घेतला.

यानंतर काही दिवस भम्पकराव व त्यांची नवरेपरिषद् यांना मी विसरून गेलो. पण भम्पकरावांचे संकल्प इतक्या लवकर विसरून जाण्यासारखे नसतात, याचा प्रत्यय आम्हाला लवकरच आला.

एके दिवशी सकाळी आमच्या नेहमीच्या वर्तमानपत्राबरोबर "नवरे-युग" नावाचे एक नवेच वर्तमानपत्र हाती आले. त्यावर मोठ्या जाड टाईपात मथळा होता.

"नवीन पक्षाची स्थापना : नव्या युगाचा उष:काल"

मथळ्याच्या खाली एका विराट सभेचे छायाचित्र होते. सगळीकडे डोक्यांचा ... शारीरिक अर्थाने ... समुद्र. खाली भम्पकराव नवरेपरिषदेची घोषणा करीत आहेत असा उल्लेख होता.





भम्पकरावांच्या परिषदेला जनतेचा एवढा सागर लोटावा याबद्दल मला अचम्बा वाटू लागला. आश्चर्याची गोष्ट अशी की नवरेपरिषदेच्या श्रोतृवर्गांत काही स्त्रियाही दिसत होत्या!

"अग ए, हे पहा. भम्पकराव असेतसे नाहीत. पहा त्यांच्या व्याख्यानाला किती गर्दी लोटली" नवरेयुगाचा अंक सौ. च्या हाती देत मी म्हणालो.

सभेच्या फोटोकडे थोडावेळ न्याहाळून सौ. उद्गारली. "म्हणजे तुम्हीही गेला होतात वाटतं परिषदेला?"

एखाद्या निरपराध माणसावर खुनाचा आरोप ठेवला म्हणजे त्याला कसे वाटत असेल याची मला कल्पना आली.

"कुठे? केव्हा?" मी विचारू लागलो. तो सौ.ने नवरेयुगाचा अंक पुढे करून "हे कोण?" म्हणून सवाल केला.

सभेच्या दृश्यांत खरोखरच माझा फोटो होता! हातात हार घेऊन मी व्यासपीठाकडे जात होतो!!

"हे काय गौडबंगाल आहे" मी क्षणभर स्तम्भित झालो. पण लगेच डोक्यांत प्रकाश पडला. पंडित नेहरू मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन करायला आले तेव्हा दिल्ली साहित्य मंडळातर्फे मी त्यांना हार घातला होता. त्या प्रसंगाचा हा फोटो होता. फक्त भम्पकरावांनी पंडितजींच्या जागी स्वत:चा फोटो चिकटवून मूळ फोटोची दुरुस्त आवृत्ति काढली होती.

सौ.ला गयावया करून हे स्पष्टीकरण सांगू लागलो तेव्हा नवरेपरिषदेच्या टोळीत मी देखील आहे हा तिचा संशय अधिकच बळावू लागला.

"तुम्हाला वेळेवर सुचतंही बरं हो. नवरेपरिषदेत जाता त्यापेक्षा सरळ काडीमोडच का करत नाही. की मीच जाऊ पळून!"

असे म्हणत सौ. धाडधाड पाय आपटत आंत गेली. "अग देवाशपथ खरं सांगतो. ही सारी भम्पकरावांची कामगिरी." असं मी म्हणतच राह्यलो.

यानंतर सौ.ने दोन दिवस असहकारिता पाळली होती!

असहकारितेचे युग संपून सहकाराची पालवी फुटू लागते न लागते तोच आम्हाला भम्पकरावांच्या क्रांतिकार्याची पुन: एकदा झळ पोचली.

एका मध्यरात्री गाढ झोपेंत असतांना आपले घर भूकम्पाने हादरत आहे असा मला अनुभव येऊ लागला. थोडी जाग आल्यावर प्रलयकालचे मेघ उद्दाम गर्जना करून शिलावर्षाव करीत आहेत असे वाटू लागले. पोटांत धस्स होऊन पलंगावर उठून बसलो तेव्हां भूकंप व प्रलय नाही हे पाहून थोडे हायसे वाटले. दारावरची घण्टी सारखी कर्कशत होती व दारावर लाथा व बुक्यांचा आवाज होत होता.

"अहो! एवढे काय मशगूल आहांत. शय्यागाराच्या बाहेर या जरा" असा या सर्व आवाजावर कडी करणारा भम्पकरावांचा स्वर कानी पडला.

एवढे सर्व होऊनही सौ. अगदी निश्चेष्ट पडली होती. पण मी दार उघडायला जाऊ लागलो तोच ती ओरडून म्हणाली.

"कशाला जाता! गतप्राण झाल्यासारखे पडून रहा. जातील निघून".

"आपण खरोखरीच गतप्राण झालो असतो तरी भम्पकरावांनी आपल्या गर्जना थाम्बवल्या नसत्या" असे म्हणत मी पुढे सटकलो व दार उघडले. शक्य तितके अवसान आणून भम्पकरावावर खेंकसलो.

"काय हे त्रिम्बकराव! रात्र बेरात्र . . .

माझे वीरश्रीयुक्त भाषण सुरु असतांनाच भम्पकराव मध्येच प्रत्युत्तरले.

"कांही तुम्हाला रीतभात, शिष्टाचार वगैरे आहे की नाही वसन्तराव! सरळ पाहुण्यांचा अपमान करतां! बरं माझं एक असो पण यांचा तरी कांही मान ठेवाल की नाही?"

असे म्हणत भम्पकराव दिवाणखान्यांत जाऊ लागले तेव्हां त्यांच्या मागोमाग आणखी एक राजेश्री आंत शिरले. किडकिडीत देहयष्टि, अंगात एक खादीचा लाम्ब सदरा, गान्धी टोपी व गुडघ्यापर्यंत धोतर असा त्यांचा वेष होता. एकदम दिवाणखान्याच्या मुख्य कोचावर ते स्थानापन्न झाले. मी त्यांच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहूं लागलो तोंच भम्पकराव बोलते झाले.





"हे सेठ चन्दानी. आमच्या नवरेपरिषदेचे अध्यक्ष. बायको या संस्थेने यांची फारच पिळणूक केली आहे. यांचे पहिले लग्न वयाच्या पांचव्या वर्षी झाले. दहा वर्षे संसार करूनही पुत्ररत्न झाले नाही म्हणून पंधराव्या वर्षी यांनी दुसरे लग्न केले. पुन: दोन वर्षे शिकस्त करूनही फलप्राप्ति दिसेना म्हणून यांनी तिसऱ्या लग्नाचा विचार केला. पण तिसरे लग्न तुमच्या जीवास अशुभ ठरेल असे ज्योतिषाने सांगितल्यामुळे यांनी तिसरे लग्न न करता एकदम चौथेच करायचे ठरवले. पण चौथे लग्न बायकोच्या जीवास घातक अशी भविष्यवाणी होती म्हणून यांनी एका कोम्बडीशीच चौथे लग्न केले. लग्नानंतर दोन दिवसात ती कोम्बडी मरण पावली!! पांचवे लग्न अपत्यांच्या जिवास अपायकारक होईल अशी भविष्यवाणी होती. पण अपत्यांच्या जिवास अपाय झाला तरी अपत्ये होण्याचे सुख तर मिळेल असा थोडासा दशरथासारखा विचार करून यांनी पाचवे लग्न केले. पाचव्या लग्नाने मूल झाले पण ते पाचव्या दिवशीच गेले. !! दहाव्या लग्नात यांना झालेला मुलगा चक्रवर्ती होणार अशी भविष्यवाणी आहे. पण दहावे लग्न होण्यास आणखी चार लग्ने होणे जरुर आहे. . ."

"या बाबतीत मी काहीच मदत करू शकत नाही. शेटजींनी क्षमा करावी" मी काकुळतीने म्हणालो.

"लग्नासाठी मुलगी मागायला तुमच्याकडे आले नाहीत ते" भम्पकराव चिडून बोलले.

"मग आता रात्री एक वाजतां कशाला त्रास! आता सुखानं झोपा. उद्या सावकाश बोलूं"

"उद्या बोलायचं असतं तर आम्ही आता कशाला आलो असतो? माझ्या बुद्धिमत्तेची कीव करीत भम्पकराव विचारते झाले.

"एवढा काय आणीबाणीचा प्रसंग आहे?" आम्ही उत्सुकलो.

"आमच्या, नव्हे आपल्या, नवरे परिषदेच्या कार्यकारिणीची काल बैठक झाली. चांगली आठ तास बैठक भरली होती, नवरेपरिषदेच्या चळवळीची रुपरेखा आखण्यात आली. या चळवळीचा कार्यक्रम अमलांत आणण्यासाठी कार्यकारिणीने एक कृतिसमिती action committee नेमली आहे. तिचे आम्ही दोघे सदस्य आहोत. . ."

"अहो पण हा सर्व वृत्तान्त उद्या नाही का सांगता येणार ?" आम्ही त्रासून त्रासून पृच्छा केली.

"आजची मोहीम उद्यावर ढकलणं ही जनानखानाशाहीतील नवऱ्यांची युद्धनीति आहे."

"मग आता काय पाहिजे तुम्हाला ?"

"आम्ही बाइलबुद्धया नव-यांच्या घरावर निरोधन करायचं ठरवलं आहे. कार्यकारिणीने नेमलेल्या दहा हजार निरोधकांपैकी आम्ही दोघे निरोधक आहोत. तुम्ही बाइलबुद्ध्यांचे अग्रणी असल्यामुळे तुमच्या दाराशी धरणं धरायला आलो आहोत.

"दाराशी न बसता सरळ दिवाणखान्यात बसलाहात की तुम्ही."

"शब्दच्छल करू नका. सर्व नवऱ्यांनी संपावर जावं असा परिषदेचा आदेश आहे. हा आदेश जे पाळणार नाहीत त्यांच्यावर आम्ही निरोधन करणार."

"मी जवळ जवळ सम्पावरच आहे लिम्बकराव, फक्त तुमच्यासारखा माझा धावता सम्प नाही. निजता सम्प आहे एवढंच."

"तुमच्या थापांवर आमचा विश्वास नाही. आजपासून रोज महिनाभर तुम्हाला आमच्याबरोबर इथे या दिवाणखान्यात निजावं लागेल."

"अहो पण बिचाऱ्या शेटजींच्या सहा कुटुंबांची काय दशा होईल !"

"शेटजींनी वर्षाचा सम्प पुकारला आहे. त्यांची काळजी करू नका."

"मग बसा तुम्ही इथेच, मी जातो निजायला" म्हणून मी जाऊ लागलो, तोच भम्पकराव त्वेषाने म्हणाले –

"नवरेपरिषदेशी एवढा असहकार कराल तर आम्हाला तुमच्या शय्यागारांतच ठाण मांडून बसावं लागेल."

"असं कांहीतरी करणार असाल तर आतां फोन करून पोलिसांना बोलावतो" आम्ही अन्तिमोक्त उच्चारले.

"पोलिस" म्हटल्याबरोबर शेटजी ताडकन् उभे राह्यले न् भम्पकरावांना म्हणाले –

"या भानगडींत तुम्ही मला पाडणार असाल तर मी आपला आल्या पावली घरी जातो."

"असं काय बरं शेटजी ! बायकोशाहीविरुद्ध क्रान्तीचं निशाण उभारणाऱ्या वीरांनी पोलिसांना घाबरून कसं चालेल ?"





"पोलिसांना तोण्ड देण्यापेक्षा बायकांनाच तोण्ड देणं बरं" असं म्हणत शेटजी बाहेर पडले व भम्पकरावांच्या आक्रोशाला दाद न देता दिसेनासे झाले.

पळपुटे सरदार पळून गेले तरी शेवटपर्यन्त पानिपत गाजवणाऱ्या भाऊसाहेबांच्या आविर्भावाने भम्पकराव गरजले.

"हरकत नाही. हे भित्रे भागूबाई पळाले तरी मी तुमचा पिच्छा सोडणार नाही. मग पोलिसांना बोलवा नाहीतर यमदूतांना . . ."

भम्पकरावांचे वीरश्रीयुक्त भाषण सुरू होते तोच पुन: घंटा वाजली. भम्पकरावांच्या निरोधक सैन्यातले आणखी काही सरदार त्यांना कुमक घेऊन आले की काय अशी मला धास्ती वाटू लागली. मी भीतभीतच दार उघडले. पाहतो तो एक पोलिस अधिकारी.

पोलिसाला पाहताच भम्पकराव थरथरा कापू लागले.

"शेवटी मित्राचे असेच पांग फेडलेत ना वसंतराव" माझ्याकडे केविलवाण्या नजरेने पाहात ते बोलते झाले.

"यांच्या पत्नीचा आताच फोन आला होता" पोलिस अधिकाऱ्याने स्पष्टीकरण केले. शिवाय तुमच्याविरुद्ध अनेक तक्रारी आहेत. तुम्ही व तुमचे सहकारी रात्रीबेरात्री लोकांच्या घरी जाऊन त्यांना त्रास देता. तुमच्या अटकेचा हुकूम सुटलेला आहे. त्याची उद्या अंमलबजावणी करणार होतो. पण गुन्हा करतांनाच तुम्हाला अटक करणे अधिक इष्ट म्हणून आताच तुम्हाला अटक करीत आहे."

भम्पकरावांची प्रत्युत्पन्नबुद्धि त्यांच्या मदतीस आली.

"मी कोणताच गुन्हा केला नाही. फक्त बायकोशाहीविरुद्ध सनदशीर चळवळ करीत आहे. ठाणेदारसाहेब, तुम्हाला देखील या बायकोशाहीची झळ पोचतच असेल. तुम्ही वस्तुत: आम्हाला मदत करायला हवी.

"तुमचं तत्वज्ञान तुम्ही कोर्टात सांगा. मला हुकमाची अंमलबजावणी केलीच पाहिजे."

बिचारे भम्पकराव निरुपायाने पोलिसाबरोबर जायला उठले. ते दाराबाहेर होतात न होतात तोच इतका वेळ विंगमध्ये असलेली आमची सौ. बाहेर आली व म्हणाली.

"Good Night भम्पकराव !"

# ५ : चवथे शील

आठवडाभर कामाच्या रगाड्यांत काढल्यावर शनवार आला. आता दीड दिवस आराम करायचा या सुखद विचाराने ऑफिसातून घरी पोचलो तो भम्पक-रावांचे पत्र माझ्या अंगावर भिरकावीत सौ.ने निर्वाणीचे वचन ऐकवले.

“तुमच्या मित्रवर्यांचं पत्र आहे. मी जाते विभाकडे राहायला. सोमवारी ते गेल्यावर येईन.”

हे निर्वाणीचे वचन व भम्पकरावांचा खलिता या दोहोंचे एकाच वेळी मनन करण्याचे कठिण काम आम्ही करू लागलो.

भम्पकरावांनी लिहिले होते.

“चि. वसंतराव यांस.

अनेक आशीर्वाद .....”

चिरंजीव हं! माझे वय भम्पकरावांपेक्षा कमी आहे आणि असले तरी आम्ही त्यांचे “चिरंजीव” शोभतो हा साक्षात्कार मला नव्यानेच होत होता.





“शौच हे पंचशीलातले चौथे शील आहे. त्याचे महत्व तुम्हांस पटून तद-नुसार आचार तुमच्याकडून घडावा म्हणून तुम्हांस काही धडे देण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी वेळांत वेळ काढून येता सप्ताहान्त मी तुमच्याकडे घालवणार आहे. स्वागताची व्यवस्था करावी.

आपला,
आचार्य त्रिम्बकराव दन्ताळे

“मीही येतो विभाकडे ...” पत्र वाचून होताच मी सौ.ला म्हणालो.

“कांही नको. विभाकडे यायला तुम्ही अगदी एका पायावर तयार असता. माहित आहे मला.”

“तुझं आपलं भलतंच काहीतरी. तू मला एकट्यालाच भम्पकरावांच्या तोंडी देणार काय?”

“अहाहा! आव असा आणता की जणू ते नकोसेच आहेत ...”

नवराबायकोचा असा प्रेमळ संवाद होऊन भम्पकरावांच्या स्वागतासाठी आम्ही राहचलेच पाहिजे असा उभयपक्षी निर्णय--म्हणजे सौ.चा हुकूम झाला.

भम्पकरावांनी पहिल्या शीलापासून आमच्या शिक्षणाला सुरवात न करता एकदम चौथ्यावर उडी कां मारली याचा आम्ही विचार करू लागलो.

“विश्वकोश काय म्हणतो बरं! क, ख, च, च, .. हं. पंचशील. पहिले शील अहिंसा. बरोबरच आहे. भम्पकरावांच्या श्रीमुखांत भडकवण्याचे अनेक प्रसंग येऊनही आम्ही चुरमुरे खात बसलो तेव्हा भम्पकरावांनी आम्हाला अहिंसेत पहिल्या वर्गात पास केले यात आश्चर्य नाही. शील दुसरे .. सत्य. हेही बरोबर आहे. भम्पकरावांना (ते नसतांना) मूर्खशिरोमणि, बुवाबाज, भामटा, दरोडेखोर वगैरे विशेषणे आम्ही लावत असू. हे त्यांच्या कानी गेल्यामुळे आमची सत्यनिष्ठा त्यांना तत्काल पटली असली पाहिजे. शील तिसरे अस्तेय. भम्पकरावांच्या मते अस्तेय--म्हणजे कुणाचे काहीही हरण न करणे--हा बूर्झ्वा सद्गुण आहे, पुरोगामी दृष्टीने अमुक वस्तु माझी व तमुक तुझी--विशेषत: तुझी--असे म्हणणे भ्रममूलक आहे. तेव्हा अस्तेयाची उपासना करण्याचे कारणच नाही.

तीन शीलांचे मजले ओलांडून आम्ही चौथ्यावर कसे आलो हे स्पष्ट होते.

भम्पकरावांच्या पत्रोपरिषदाचे रहस्योद्‌घाटन झाल्यावर आसपास पाहू चले. सौ. अदृश्य झाली होती व "त्या टॅक्सीवाल्याची बोळवण करा बरं लवकर" असे म्हणत भम्पकराव प्रवेशत होते.

"एक फर्मास चहा होऊ द्या वयनी !" कोचावर अंग झोकीत त्यांनी फर्मावले.

"वयनी गेल्या आहेत बहिणीकडे" असा अनुप्रासयुक्त खुलासा केल्याबरोबर "हरकत नाही. मीच करतो चहा" म्हणून भम्पकरावांनी एकदम सैंपाकघरांत सूर मारला.

"वयनी नाहीत तर नाहीत, नोकर तर आहे" असा उदार विचार न करता भम्पकरावांना इतक्या लवकर स्वावलंबन कसे सुचले याचा मी अचम्बा करू लागलो.

पण तो फार वेळ करावा लागला नाही. दारात टॅक्सीवाला येऊन ठेपला.

"भम्पकराव ! तुमचा सारथी तुम्हास भेटू इच्छितो" हे मी ओरडून सांगू लागलो तोच आंत स्टोव्हचा गुंजारव सुरू झाला. त्यामुळे भम्पकरावांना माझे बोलणे ऐकू येणे शक्यच नव्हते.

"पांच मिनट के बाद वेटिंग चार्ज भी पडेगा साब. रूल नंबर चार." टॅक्सीवाल्याने आमच्या सामान्य ज्ञानांत भर घातली.

"भम्पकराव !" मी आणखी एकदा जोराने धावा केला.

स्टोव्हचा आवाज आणखी जोराने सुरू झाला. त्याच्या भरीला दोनचार भांडी दणादण खाली पडली.

निरुपायाने "आलीया भोगासी, असावे सादर, खिशावरी भार टाकूनीया" असे भजन करीत आम्ही टॅक्सीवाल्याची दक्षिणा पुरी केली.

टॅक्सीवाला दृष्टिपथातून दूर गेल्याबरोबर भम्पकराव दोन कप चहा घेऊन "घ्या. असा झकास चहा केला आहे तुमच्यासाठी" असे म्हणत बाहेर आले.





आधीच भम्पकरावांचे पाककौशल्य मोठे उद्वास गेलेले नव्हते, त्यातून त्या पाककौशल्यासाठी टॅक्सीचे भाडे द्यावे लागले होते. अशा विपरीत सौद्यांत पदरी पडलेला चहा गोड मानून घेणे काही सोपे नव्हते.

"पांच रुपये घेतले टॅक्सीवाल्यानं" आम्ही गाऱ्हाणे काढले.

"चहाचा ब्रॅण्ड चांगला वापरता तुम्ही." तिचाकीसाठी हट्ट करणाऱ्या मुलाचे पेपरमिंटवर समाधान करण्याच्या आविर्भावाने भम्पकराव बोलले.

"थोडा थांब म्हटलं तर ऐकेना. वेटिंग चार्ज पडेल म्हणाला." तिचाकीचा हट्ट पेपरमिंटने पुरला नाही.

"बरं केलं तुम्ही, लवकर पैसे दिलेत. वेटिंग चार्ज कशाला भरत बसा उगीच !" भम्पकरावांनी दूरदृष्टीबद्दल शाबासकी दिली.

भम्पकरावांना आपण कुठपर्यंत पुरे पडणार असा विचार करून तिचाकीचा नाद सोडून द्यावा लागला.

"आम्हाला दत्तक केव्हापासून घेतलं तुम्ही त्रिम्बकराव? अगदी चिरंजीव म्हणून मायना लिहिता !"

"गुरूनंशिष्याला चिरंजीव म्हणायचं नाही तर काय तीर्थरूप म्हणायचं ! हो, बरी आठवण केलीत. या चहाच्या नादापायी खरं काम विसरलोच होतो. तुम्हा दोघांच्याही अंगी शौच हे शील बाणावं म्हणून मी आलो आहे हे माझ्या चिट्ठीवरून तुम्हाला कळलंच असेल. वयनी आल्याबरोबर पाठाला सुरवात होईल."
"वयनी तुम्ही गेल्यावर येणार आहेत."

आजच्या पाठाला अर्जुन येऊ शकणार नाही हे कळल्यावर द्रोणाचार्यांना जसे वाटले असते तसेच भम्पकाचार्यांना ही बातमी ऐकून वाटले.

पण द्रोणाचार्यांपेक्षा भम्पकाचार्यांचा कणा अधिक मजबूत होता.

"हरकत नाही. तुमच्याचपासून सुरवात करतो. शौच म्हणजे अंतर्बाह्य स्वच्छता. तुमच्यात आतलीही स्वच्छता नाही न् बाहेरचीही स्वच्छता नाही.

तुमच्या मनात अगदी या क्षणी अमंगल विचार सुरू आहेत.

"हे कसं कळलं तुम्हाला !"

"उगीच नाही आचार्य झालो. तुम्हाला वाटतंय् काय ही ब्याद आली. चांगला दीड दिवस आराम केला असता. आता चौथ्या शीलाचे पाठ घ्यावे लागणार. शिवाय टॅक्सीभाडं बोकांडी बसलं. चहा पाजावा लागला..."

"मग हे काय अमंगळ विचार आहेत?"

"तुम्हाला त्याची जाणीव असती तर आम्हाला कशाला पाठ द्यायला यावं लागलं असतं? शीलशिक्षणापेक्षा आराम जास्त महत्वाचा आहे, आचार्यांच्या सान्निध्यापेक्षा पांच रुपये जास्त मोलाचे आहेत...."

"आचार्य कुणी केलं तुम्हाला त्रिम्बकराव...."

"मधे तोंड खुपसू नका. सिंहाला वनराज कुणी केलं? सूर्याला दिनराज कुणी केलं?"

"त्यानंच तुम्हाला आचार्य केलं. पुढे?"

"तर काय सांगत होतो -- हां, आचार्यांच्या सत्संगापेक्षा दीड दमडीचा चहा जास्त मोलाचा आहे असे विचार तुमच्या मनांत सुरू आहेत. ही मनांतली घाण आधी बाहेर काढा."

"काढली."

"काढलीत ना! आता शारीरिक स्वच्छता. आपण आता चहा घ्यालो असं तुम्हाला वाटतं होय ना?"

"म्हणजे काय टाकलं होतं त्याच्यात तुम्ही?"

"हां, हां. असे घाबरू नका. मी कशाला टाकायला पाहिजे. करणी करणारा आत्मारामच असतो. साखरेच्या एका कणांत तीस हजार जंतु असतात. चहाबरोबर साखरेचे निदान तीन हजार कण तुमच्या पोटांत गेले. म्हणजे तीस





हजार गुणिले तीन हजार, तब्बल नऊ कोटी जंतु झाले. या नऊ कोटीत साडेचार कोटी नर व साडेचार कोटी माद्या असतात. प्रत्येक जोडप्याला दर मिनिटाला निदान तीन पिलं होतात. तेव्हा साडेचार गुणिले तीन बरोबर साडेतेरा कोटी झाले. पुन: जंतूंची पिढी दोन मिनिटांची असते. तेव्हा दोन मिनिटांनी, साडेतेरा कोटी उणे साडेचार कोटी असे हे नवीन जन्मलेले नऊ कोटी जंतु पुन: साडेचार कोटी गुणिले तीन बरोबर साडेतेरा कोटी इतक्या जंतूंना जन्म देतील. हे साडेतेरा कोटी व पूर्वीचे साडेतेरा कोटी मिळून या दोन मिनिटांत तुमच्या पोटांत सत्तावीस कोटी जंतु होतील. या सत्तावीस कोटींत साडेतेरा कोटी नर...."

"कळलं कळलं. एकूण मुम्बईत जशी माणसं तसे माझ्या पोटांत जंतु झाले आहेत. मग काय त्या जंतूंना संततिनियमन शिकवू?"

"सुदैवानं तसं करायची जरूर नाही. आज मी चहा केला. तेव्हा शास्त्रोक्त पद्धतीनं ती साखर कढईत भाजून सारे जंतु आधीच मारून टाकले. यापुढे साखर भाजून खाण्याची काळजी घ्या."

"जशी आज्ञा."

"आता जरा तुमच्या कपड्याकडे पहा."

"काय झालं कपड्यांना?"

"ही तुमची गळपट्टी. रेशमाची आहे ना?"

"कबूल करणं भाग आहे." केविलवाण्या स्वरांत मी उत्तरलो.

"अहो रेशमाची गळपट्टी वापरण्यापेक्षा शंकरासारखे नाग बांधा गळ्यांत.

"रेशमानं काय होतं माहीत आहे?"

"काय होतं?"

"रेशीम अंगाला घासून त्यात वीज निर्माण होते. या विजेचा संचार साऱ्या शरीरांत होतो. आधी कातडीवर परिणाम होऊन ती पांढरी पडते, मग कातडी-खालचे मांस वाळक्या आमसुलासारखे होते, मग रक्तवाहिन्या नागपुरातल्या

नळासारख्या कोरड्या ठणठणीत होतात, मग हृदय...."

"अरे बापरे! हृदय देखील!" म्हणून मी पटकन रेशमाचा टाय काढून टेबलावर ठेवला. पण भम्पकराव त्याच्याकडे बऱ्याच ममतेने पाहात आहेत हे लक्षात आल्याबरोबर तो मी खिशांत टाकला.

"आता तुम्ही विचाराल की हे सर्व मला कां झालं नाही. भम्पकरावांना काळजी वाटली."

"नाही विचारणार!" मी आश्वासन दिले. त्याबरोबर भम्पकरावांनी मोर्चा वळवला.

आता तुमचा जाड फ्रेमचा चष्मा! कुणी सांगितलं तुम्हाला ही फ्रेम वापरायला?

"खुद्द डोळ्याच्या डॉक्टरनं दिली मला ती!"

"वाटलंच मला. अहो ही जाड फ्रेम नाकावर बाळगल्यानं नाकाला कॅन्सर होतो माहीत आहे?"

बापरे! कॅन्सर! गेली पंचवीस वर्षे मी ती फ्रेम वापरत होतो, इतके दिवस कॅन्सरशी सलगी केल्यामुळे मी खरोखरच जिवंत आहे की माझे भूत भम्पकरावां-पुढे बसले आहे याची मला शंका वाटू लागली.

"आता तुमच्या शरीरावरुन तुमच्या घराकडे वळतो. या बाबतीत तुमच्या-पेक्षा वयनींशी बोलून काही उपयोग झाला असता..."

"मग आता घराचा पाठ वयनी आल्यावर पुढच्या शनिवारी ठेवूं." पुढच्या शनवारी घरातून पसार होण्याची योजना करीत मी मोठ्या आशेने सूचना केली. पण ती भम्पकरावांना ऐकूच गेली नाही.

"तुमचं हे घर आहे की चव्हाटा? उघडी पडवी, उघडं अंगण..."

"मग काय सीलबंद शवपेटीत राहू की काय?"

"आतापर्यंत ती पाळी आली नाही ही त्या ग्रहांची कृपा समजा."

हे ऐकून त्या आकाशस्थ ग्रहांना मी कायावाचामनेकरून लम्ब नमस्कार केला.

"भम्पकरावांचा उपदेश सुरू होता."





"घराच्या भोवताली एक खंदक खणा. त्यांत काचेचे तुकडे भरा. म्हणजे घरात अजगर शिरू शकणार नाहीत."

"अहो पण अंगणात पोरं खेळतात, त्यांना इजा होईल ना."

"पोरांच्यासाठी काचेच्या खंदकाच्या आंत एक बिनकाचेचा खंदक खणा."

"पण भम्पकराव, एवढा आटापिटा करायची काय जरूर आहे? मी आज-पर्यंत या घराजवळ अजगर फिरकतांना देखिल पाहिला नाही."

अजगर काय असा भालदार चोपदारांच्या ललकाऱ्यानिशी येणार आहे! तो गुपचूपच येत असला पाहिजे. रात्री निजानीज झाल्यावर तो येतो व आ वासून जोराने श्वास घेऊ लागतो. त्याबरोबर आसपासचे सारे जीव त्याच्या घशात ओढले जातात. एखादे दिवशी जाल तुम्हीही त्याच्या घशात, तुमच्या पलंगासकट."

"अरे बापरे! शंकरा, तूच रक्षणकर्ता आहेस."

"शंकराचा धावा करून काय होणार? अजगर मारायसाठी एक स्पेशल बंदूक मिळते ती घेऊन ठेवा."

"म्हणजे हजार दोन हजाराचा खर्च"

"प्राणापेक्षा पैसे जास्त मोलाचे वाटतात तुम्हाला? जा मग अजगराच्या पोटात."

"किती निष्ठुर होता त्रिम्बकराव. एखादा स्वस्त उपाय सांगा नं. तुमच्या-सारख्या बुद्धिमंताला काय कठिण आहे!"

हे शब्द ऐकल्याबरोबर भम्पकरावांचा चेहरा उजळला व लगेच अजगराचे पोट नाहीतर दोन हजार रुपयांचा खर्च हे दोनच पर्याय नाहीत याची त्यांना जाणीव झाली.

"मग असं करा. तुमच्या मोहल्ल्यांत वर्गणी करा न् एक सामुदायिक बंदूक घ्या. नाहीतरी अजगरापासून सगळ्यांनाच धोका आहे. पाळीपाळीने एकेका घरात बंदूक राहू द्या."

"वा! त्रिम्बकराव! भवानरावांकडे बंदूक असतांना त्यांच्या घरी अजगर आला तर?"

"बरं ते राहू द्या. वस्तुत: अजगर व शौच हे शील यांचा साक्षात् सम्बन्ध नाही. अजगर हा रक्षणखात्याचा प्रश्न आहे. आपला प्रश्न आध्यात्मिक आहे. तेव्हा अजगराकडून शुद्ध भोजनाकडे वळू. भोजनाचा काय बेत आहे?"

"आज मला उपास आहे?"

वयनी घरी नाहीत. भोजनात शुचिता कशी आणावी याचा पाठ तुम्हाला देण्यात काहीच अर्थ नाही. तेव्हा आपण असं करू. क्वालिटीत जाऊ."

"भम्पकरावांची संक्रांत नेहमी आमच्या खिशावर असे. पण यावेळी त्या संक्रांतीला चुकवण्याचा प्रयत्न न करता मी तिचे स्वागत केले. त्यातच मला मुक्ततेचा मार्ग दिसला."

"टॅक्सी आणरे, खुशालसिंग . . ." भम्पकराव आमच्या नोकराला हुकूम सोडू लागले.

"नको नको. टॅक्सी कशाला! आपण बसनंच जाऊ." म्हणून मी विद्युद्वेगानं घराच्या बाहेर पडलो.

भम्पकरावही निरुपायानं मागोमाग बसस्थानावर आले.

बस येईपर्यंत भम्पकरावांचे पंचशीलावर एक सम्पूर्ण व्याख्यान झाले. बस आली तेव्हा जन्मठेपेच्या शेवटच्या दिवशी कैद्याला कसे वाटत असेल याचा मला साक्षात् अनुभव आला.

'तुम्ही व्हा पुढे" मी उदारपणे भम्पकरावांना वाट दिली. ते बसमध्ये शिरल्यावर "काय बुवा चावरा जोडा आहे" म्हणून जोडा काढून मी आपला पाय कुरवाळू लागलो. भम्पकराव थेट समोरच्या बाकावर एका आधुनिक महिलेजवळ बसले. तोपर्यंत बस सुरू झाली.

बस सुरू झाल्यावर आमची पायाची व्यथा एकदम थांबली व आम्ही एक टॅक्सी करून थेट विभाच्या घराचा रस्ता धरला.



# ६ : भम्पकरावांचे ब्रह्मचर्य

भम्पकरावांच्याबद्दल आम्हा मित्रमण्डळांत एक कथा प्रचलित आहे. ती खरी की खोटी हे मला माहीत नाही. मलाच काय, सापेक्षतासिद्धान्त जगांत दोघांनाच कळला होता, त्याचप्रमाणे श्री. व सौ. भम्पकराव याखेरीज कुणालाही ती कथा खरी की खोटी हे सांगता येणार नाहीं. भम्पकरावांना मी एकदा "काय हो त्रिम्बकराव, खरंच का हे?" म्हणून हटकले. तेव्हा ते मोठा दयाळू चेहरा करून म्हणाले –

"दया येते मला तुमची वसन्तराव !"

"म्हणजे ? मला नाही बोध झाला. सूत्रावर जरा भाष्य पाहिजे."

"भम्पकरावांचे भाष्य सुरु झाले."

"थोर पुरुषांबद्दल वाईटसाईट कण्ड्या पिकवणं हा कांहीं लोकांचा धन्दाच असतो. पण तुमच्यासारख्यांनी त्यांना एवढं महत्त्व द्यावं ही फार दुःखाची गोष्ट आहे. थोर पुरुषांची निन्दा करणे हे जसं पाप आहे तसं ती ऐकून घेणं हे देखील पाप आहे. हे महापाप तुमच्या हातून घडलं आहे. पण इलाज नाही. पापी लोकांवर दया करायला मी शिकलो आहे. क्षमा करतो तुम्हांला."

"मग खोटंच आहे म्हणतां सारं!" आम्ही पुन: जिज्ञासलो. "म्हणजे माझ्या बोलण्यावर विश्वास नाही तुमचा?" भम्पकराव गरजले व ताडतोड पाय आपटत चालते झाले.

पण आमची जिज्ञासा कांहीं स्वस्थ बसेना. रहस्य जाणणाऱ्या दोन ज्ञानी व्यक्तींपैकी एक तर निकालात निघाली.

दुसरी म्हणजे सौ. भम्पकराव. पण त्यांना या बाबतींत छेडणं हे धैर्याचंच काम होतं. एवढं धैर्य आमच्या जवळ असतं तर आम्ही भम्पकराव नसतो झालो?

पण आमच्याजवळ धैर्याचा नसला तरी युक्तीचा बराच "श्टाक" आहे. आम्ही लगेच सौ. ला साद घातली.

"अग ए, जरा एक काम करतेस का?"

"त्या भम्पकरावांचं कांहीं असलं तर मला मुळीच त्यांत गोवूं नका" सौ. ने बाण सोडला.

"भम्पकरावांचं नाही. पण त्यांच्या बायकोला कांही विचारायचं आहे."

"मग तुम्हीच कां नाही विचारत? आव असा आणता की जसं परस्त्रीकडे पाहणं देखील तुम्हाला वर्ज्य आहे!"

"पाहणे वर्ज्य नाही. पण असलं कांहीं विचारायची छाती नाही होत बुवा!"

"असलं कसलं?"

"भम्पकरावांबद्दल आमच्या मित्रमंडळात एक कथा प्रचलित आहे ती खरी की खोटी हे विचारायचं आहे."

"भम्पकरावांबद्दल कथा ना? मग मी सांगते. चांगली असेल तर खोटी न् वाईट असेल तर खरी."

"पण ही कथा चांगली की वाईट हेही सांगणं कठिण आहे."

"अशी कसली कथा आहे. ऐकू द्या तरी."





"भम्पकरावांचं लग्न झालं त्यावेळची गोष्ट आहे. लग्नाच्या दिवशी त्यांच्या एका मित्रानं — मी नव्हे बरं का — त्यांना संतचरितामृत भेट म्हणून दिलं. रात्री भम्पकराव शय्यागारांत बायकोची वाट पाहात बसले, पण आप्तेष्टांच्या घेऱ्यातून बिचारीची लवकर सुटका होईना. भम्पकराव कंटाळले व वेळ घालवण्या-साठी त्यांनी भेटीत मिळालेले ते नवे कोरे संतचरितामृत उघडले. त्यात पहिले चरित्र गोऱ्या कुम्भाराचे होते. भम्पकराव गोऱ्या कुम्भाराची शतकृत्ये वाचू लागले. ईश्वरनामाचा गजर करण्यात तल्लीन होऊन गोऱ्या कुम्भाराने तान्ह्या मुलाला पायाखाली कसे तुडविले हे वाचून भम्पकराव गहिवरले. "धन्य तो गोरा कुम्भार! नाही तर आम्ही!" गहिंवर अनावर होऊन भम्पकरावही ईश्वरनामाचा गजर करू लागले. "पार्वतीपते हर हर महादेव!" (पार्वती त्यांच्या बायकोचे नांव होते)

भम्पकरावांचा गजर बायकांच्या घोळक्यात असलेल्या पार्वतीबाईंच्या कानावर पटला न् त्यांना फार अवघडल्यासारखं झालं.

"अधीर झाले आहेत बिचारे!" बनूताई उद्गारल्या.

"जावयांना एकूण पोच कमीच दिसतो" वेणूताईंनी निर्णय जाहीर केला.

बिचाऱ्या पार्वतीबाईंना मेल्याहून मेल्यासारखे झाले.

पण या बिचाऱ्या बायकांना काय माहीत की भम्पकराव नवोढा पत्नीच्या मीलनासाठी आतुर झालेले नसून ईश्वरनामसंकीर्तनात तल्लीन झाले आहेत.

गोऱ्या कुम्भाराप्रमाणे नामसंकीर्तन तर केले पण त्याप्रच्यामाणे पायाखाली तुडवायला खोलीत मूल सांपडेना. म्हणून भम्पकरावांना फार हळहळ वाटू लागली. शेवटी या बाबतीत आपली थोरवी गोऱ्या कुम्भाराच्या पदाला पोचू शकत नाही म्हणून भम्पकरावांनी हार मानली व बायको येते आहे का म्हणून फिरून कानोसा घ्यायसा सुरवात केली.

इकडे पार्वतीबाई देखिल अधीर झाल्या होत्या. गराडा घालून बसलेल्या बायका लवकर टळाव्या म्हणून त्यांनी एक युक्ति योजली. "आई ग. म्हणून त्या धाडकन् बेशुद्ध पडल्या."

"गर्दीमुळें गुदमरली बिचारी." एका आजीबाईंनी निदान केले.

"आतां सगळया साळकाया माळकाया पसार होतील असे पार्वतीबाईंना वाटून त्यांचा चेहरा फुलला.

"इवलीशी पोर बिचारी! पहिल्या रात्रीला घाबरलेली दिसते. तरीच मी म्हणत होते आज तिला पाठवूं नये म्हणून." पार्वतीबाईंच्या मातोश्री कळवळल्या.

हे ऐकून पार्वतीबाईंच्या पोटांत धस्स झाले. त्यांची बेशुद्धी नाहींशी होऊन त्या ताडकन् उठून बसल्या!

इकडे भम्पकराव निराश होऊन पुन: गोरा कुम्भार प्रकरण वाचू लागले.

"गोऱ्या कुम्भाराचे लग्न झाले तेव्हां त्याचे श्वशुर म्हणाले "मुलगी तुमच्या स्वाधीन केली आहे. आमच्यासारखंच तुम्हीही तिच्यावर प्रेम करा." श्वशुरांची आज्ञा गोऱ्या कुम्भाराने तन्तोतन्त पाळली. बायकोवर तो त्यांच्या-सारखेच म्हणजे पितृवत् प्रेम करू लागला. पण त्याची बायको त्याच्याइतकी "आध्यात्मिक" कुठे होती. विषयोपभोग व मुलेबाळे यांतच तिचा जीव गुन्तला होता त्यामुळे पितृप्रेमामुळे ती दु:खी झाली. विषयसुख नाही तर नाही निदान घरांत मुलेबाळे तरी खेळावी म्हणून ती नवऱ्याला म्हणाली, "माझ्या बहिणीशी लग्न करा." झाले. बायकोच्या बहिणीशी गोऱ्या कुम्भाराचे दुसरे लग्न लागले. लग्नाच्या वेळी श्वशुर म्हणाले, "दोन्ही बायकांवर सारखंच प्रेम करा." गोऱ्या कुम्भाराने हीही आज्ञा शिरसावन्द्य मानली व दुसऱ्या बायकोवरही तो पितृवत् प्रेम करू लागला . . . ."

मध्येंच सौ. ने शंका काढली. "का हो, गोरा कुम्भार दोन्ही बायकांवर पितृवत् प्रेम करत होता तर पायाखाली तुडवायला त्याला मूल कुठून मिळालं!"

"ते मला काय माहीत? सन्तचरितामृतात भम्पकरावांनी काय वाचलं ते सांगतो." आम्ही कानावर हात ठेवले.

गोऱ्या कुम्भाराचे आदर्श वैवाहिक जीवन हृत्पटलावर मुद्रित होऊन पुन: गहिंवरल्या स्वराने भम्पकराव उद्गारले "धन्य! धन्य! दोन बायका असून विषयपंकात मग्न न होणारा व पतित्वावांचूनच पितृत्वाप्रत पोंचलेला गोरा कुम्भार धन्य आहे! नाहीतर मी. शय्यागारांत अधीरपणे बायकोची वाट पाहात





बसलो आहे. त्रिम्ब्या! त्रिम्ब्या! धि:कार असो तुझ्या पशुत्वाला!"

हे शेवटचे वाक्य भम्पकरावांनी एवढया जोराने उच्चारले की खाली वेणूताईला ते ऐकू गेले . . . न् त्या उद्गारल्या.

"जावई कावले आहेत. लवकर आटपा."

इकडे स्वत:च्या पशुत्वाचा धि:कार केल्यामुळे भम्पकरावांच्या हृत्पटलावरचा विषयपंक पुसला गेला. सद्विचाराची तहान लागून त्यांनी पुन: सन्तचरितामृत वाचायला सुरवात केली.

एका मुलाला ब्रह्मपदी पाठवून परत आणणे, दोन बायकांना कन्येसमान वागवणे वगैरे गोऱ्या कुम्भाराचे जीवितकार्य वर्णून लेखकाने त्याचे चरित्र आटपले होते.

भम्पकरावांनी त्याच्या पुढची चरित्रे वाचायला सुरवात केली. पुढच्या चरित्रांतही तोच सन्देश होता. "रामकृष्ण परमहंस आपल्या पत्नीला माता मानत. सूरदासाने स्त्री दृष्टीस पडू नये म्हणून डोळे फोडून घेतले . . ."

हे वाचून सूरदासांप्रमाणे डोळे फोडून घेण्याची भम्पकरावांना स्फूर्ति झाली, व ते दाभण शोधूं लागले. त्यांचा संकल्प सत्य असल्यामुळे त्यांना दाभण सांपडली, पण ती फारच अणकुचीदार असल्यामुळे तो संकल्प पुरा न करण्याचे त्यांनी ठरविले.

सूरदासाप्रमाणे डोळे फोडण्यास साधने अनुकूल नाहींत तेव्हां निदान मसूरकर महाराजांप्रमाणे स्त्री दिसल्याबरोबर डोळे मिटून घ्यावे असा विचार त्यांच्या मनांत आला. पण स्त्रीचे दर्शन टाळण्यापेक्षा तिच्याकडे माता म्हणून पाहण्यांत अधिक सन्तत्व आहे अशा निर्णयाप्रत ते शेवटी पोचले.

त्यांचा हा निर्णय होतो न होतो तोंच कुणीतरी सौ. भम्पकरावांना आंत लोटले. भम्पकरावांनी "जय बजरंग" म्हणून – – – मनांतल्या मनांत – – – गर्जना केली व आपल्या नवोढा पत्नीकडे माता या दृष्टीने पाहायचा चंग बान्धला.

"सुटले एकदाची" भम्पकराव काहींच बोलत नाहींत असें पाहून सौ. भम्दकरावांनी सूतोऽवाच केले.

ते गोड शब्द ऐकून भम्पकरावांना आपल्या दृष्टीतली भावना बदलत असल्यासारखे वाटले: पण लगेच हा भ्रम आहे असे त्यांच्या मनोदेवतेने त्यांना सांगितले.

भम्पकरावांनी पार्वतीबाईंना या स्वरुपांत कधीच पाहिले नव्हते. तलम साडी, अळत्याचा लाल मादक रंग, विडयाने बिम्बफलासारखे दिसणारे ओठ. "छे ! छे ! आपल्या मनोदेवतेने लोणकढी थाप मारली ! आपली दृष्टि मातेकडे पाहणाऱ्या मुलाची खास नाही." भम्पकरावांची खात्री झाली.

"मारुतिराया !" म्हणून त्यांनी खुर्चीवर अंग टाकून दिले व मसूरकर महाराजांप्रमाणे डोळे मिटले.

"बरं नाही वाटत" म्हणून पार्वतीबाई भम्पकरावांच्या डोक्यावरून हात फिरवू लागल्या.

"हा पापी स्पर्श मला नको" म्हणून बायकोचा हात झिडकारून द्यावा असे भम्पकरावांना क्षणभर वाटले. पण आईने मुलाला कुरवाळले तर त्यांत कसले पाप !" असा उदात्त विचार त्यांच्या मनोदेवतेने लगेच त्यांना सुचवला.

पण थोडया वेळातच भम्पकरावांना त्यांच्या मनोदेवतेची ही दुसरी लबाडी कळून आली.

"हा स्पर्श काही आईचा नाही. आपण पापाच्या पंकात खोल रुततो आहोत. तो गोरा कुम्भार, ते रामकृष्ण परमहंस, तो सूरदास, ते मसूरकर महाराज काय म्हणतील आपल्याला?" भम्पकरावांच्या मनात विचाराचे तांडव सुरू झाले.

पण पार्वतीबाईंचा हात काही त्यांना दूर करवेना. मनाच्या रणांगणावर चाललेले चांगल्या व वाईट प्रवृत्तीचे हे युद्ध असह्य होऊन भम्पकराव सद्गदित झाले. त्यांच्या डोळयांत अश्रु आले.

"फारच डोकं दुखतंय् वाटतं, अंजन घेऊन येते." म्हणून सौ. भम्पकराव अंजन आणायला गेल्या.

"धन्य ! धन्य ! प्रभो ! तुझी कृपा अपार आहे. पापाच्या खाईत माझा तोल





जातच होता तोच तू धावून आलास आणि त्या खाईलाच दूर ओढून नेलेस." भम्पकराव प्रभूचा महिमा गाऊ लागले.

पण घडलेली प्रभुकृपा तात्पुरती आहे, बायको लगेच अंजन घेऊन येणार आहे, याची भम्पकरावांना आठवण झाली. तापलेला देह शांत करून पुन: बायको-रूपी वैरिणीला तोंड देण्याची तयारी केली पाहिजे याची त्यांना जाणीव झाली.

"देह शांत करण्याचे उपाय दोन" भम्पकराव कॉलेजांत असतांना वाचलेल्या ''ब्रह्मचर्य, ब्रह्मचर्य, ब्रह्मचर्य, त्रिवार ब्रह्मचर्य" या पुस्तकाची आठवण करून विचार करते झाले. "एक म्हणजे नळाखाली बसणे. पण या रात्रीच्या वेळी नळा-खाली बसायला कोठे जावे ? नळाचे पाणी भारीच थंड लागणार ! आपल्याला देह थंड करायचा म्हणजे अगदीच थंडा करायचा नाही. तेव्हा उपाय नंबर एक रद्द.

उपाय नंबर दोन शीर्षासन. पण जेवण झाल्यावर शीर्षासन करू नये म्हणतात ..."

भम्पकरावांचे चिंतन सुरू असतांनाच जिन्यावर बायकोची पावले वाजली. आता विचार करायचा वेळ नाही म्हणून भम्पकराव एकदम पलंगावर शीर्षासन करून उभे झाले.

"हो, शीर्षासनानं डोकं थाम्बतं म्हणतात. बरं सुचलं तुम्हाला" पार्वतीबाई खोलीत प्रवेशत उद्‌गारल्या. "शीर्षासनांतच अंजन चोळते म्हणजे अधिक परिणाम होईल."

पार्वतीबाई भम्पकरावांच्या कपाळावर अंजन चोळू लागल्या. "अहाहा ! अंजनाचा तो मादक वास ! बायकोचा पहिल्या रात्रीचा तो मादक स्पर्श !" शीर्षासनाने देह शांत होण्याऐवजी आणखीच भडकू लागला !

भम्पकराव निरुपायाने सरळ होऊन पलंगावर बसले. डोळे मिटून त्यांनी मारुतिरायाचे ध्यान केले, व बायकोला उद्देशून ते बोलू लागले.

"आई"

मस्तकशूल असह्य झाल्यामुळे पतिराज मातोश्रींचे स्मरण करीत आहेत असे वाटून पार्वतीबाई म्हणाल्या --

"डॉक्टरला बोलावणं पाठवते !"

"नको ! नको !" भम्पकराव डोळे न उघडता बोलू लागले. "माझं डोकं दुखत नाही."

"नाही दुखत ना आता? तरीच म्हटलं अंजनाचा गुण आल्याशिवाय राहणार नाही." पार्वतीबाई उल्हासल्या.

बायकोच्या अज्ञानाची कींव करीत भम्पकराव बोलते झाले.

"पार्वती !"

एवढे सम्बोधन उच्चारल्यावर पुढे कोणती शब्दयोजना करावी याचा विचार करीत ते थोडावेळ घुटमळले.

आतां गाडी रुळावर येत चालली म्हणून पार्वतीबाईंना हायसे वाटले. आतां लवकरच "अशी दूर काय बसतेस. जरा बस ना इथे" असे नवरा म्हणेल या आशेने त्या दूर बसल्या.

पण भम्पकरावांनी बायको दूर बसली म्हणून समाधानाचा सुस्कारा सोडला व आपले वक्तव्य करायला सुरवात केली.

"पार्वती ! मी मघाशी आई म्हणालो. अयाई म्हणालो नाही. यावरून तुझ्या लक्षांत यायला हवं होतं कीं मस्तकशूळ असह्य झाल्यामुळे मी ती हांक मारली नव्हती. मी तुलाच उद्देशून "आई !" म्हणालो.

"तरीच मी ऐकत होते की तुमचा स्वभाव जरा मुलखावेगळाच आहे म्हणून."

"हो. खरंच ते. या पुस्तकांतल्या सगळयाच पुरुषांचा स्वभाव मुलखावेगळा होता. वाच जरा हे" असे म्हणून भम्पकरावांनी "सन्तचरितामृत" बायकोच्या हाती दिले.

"पुष्कळ वेळ आहे पुढे वाचायला. यावेळी काय हे भलतंच काढलं?"





"भलतंच नाही. हाच सन्मार्ग आहे. आपण दोघेही आज याच सन्मार्गाने जाण्याची प्रतिज्ञा करू."

"बरं आहे. तुमचं सुख ते माझं सुख. मग जाते मी दुसरीकडे निजायला." सहधर्मचारिणी बोलली.

आपला विवाहित ब्रह्मचर्याचा संकल्प ऐकून बायको हिरमुसली होईल, मग विषयवासना कशी पापमय आहे याचे (बीभत्स) रसभरित वर्णन करून आपल्याला तिची समजूत घालावी लागेल अशी भम्पकरावांना काळजी वाटत होती. पण तसे कांही करावे लागले नाही. बायको आपल्याला शोभणारी मिळाली, म्हणून भम्पकरावांना धन्यता वाटली.

विषयासक्त व्यक्तीला उपदेश करून परावृत्त करण्याचे पुण्यकर्म घडले नाही म्हणून त्यांना आध्यात्मिक दुःख झाले.

"दुसरीकडे जायची कांही जरूर नाही. मी इथेच खाली अंथरुण टाकून निजतो. तू पलंगावर नीज." मनोनिग्रही भम्पकराव बोलते झाले.

"नाही, नाही. मीच खाली निजते. तुम्ही पलंगावर निजा."

"नाही मी खाली. नाही मी खाली." असा पतिव्रता पत्नी व ब्रह्मचारी पति यांचा थोडा वेळ प्रेमळ झगडा झाल्यावर भम्पकराव त्या मऊ पलंगावर निजण्यास मोठ्या मिनतवारीने कबूल झाले. कारण (बायकोरूपी) मातेची आज्ञा त्यांना शिरसावंद्य होती.

बायकोला लवकर झोप लागणार नाही व ती आशेने आपल्या हालचालीचा कानोसा घेत राहील अशी भम्पकरावांची खात्री होती. म्हणून आपला मनोनिग्रह किती अढळ आहे हे दाखवून तिला धडा घालून देण्यासाठी ते निश्चल पडून राहिले.

पण थोडा वेळ निश्चल राहिल्यावर पाठीला कळ लागू लागली. तेव्हा निग्रह झाला म्हणून काय झाले? निग्रही माणूस कड बदलत नाही असे थोडेच आहे असा विचार करून त्यांनी जिकडे बायको होती तिच्या उलट दिशेला कड बदलला. पण त्या स्थितीत देखील फार वेळ राहवेना म्हणून शेवटी बायकोच्याच

दिशेने कड बदलून ते पडून राहिले. मात्र या स्थितीत मसूरकर महाराजांप्रमाणे डोळे मिटून राहण्याची त्यांनी खबरदारी घेतली होती.

डोळे मिटल्या मिटल्या विचार सुरू झाला. "खरे पाप डोळयांत नसून मनात असते.आपले मन तर बर्फासारखे, नव्हे अग्नीसारखे निर्मळ आहे. मग डोळे उघडायला का घाबरावे? असला भ्याडपणा उपयोगी नाही . . ."

भम्पकरावांनी डोळे उघडले. पण त्यांना काहीच दिसले नाही. दिवा बंद होता. "आता आपला मनोनिग्रह बायकोला दाखवावा तरी कसा?" भम्पकरावांना प्रश्न पडला. ते लगेच उठले व त्यांनी दिवा लावला. बायको गाढ झोपलेली त्यांना दिसली.

"हिला झोप कसची लागते? ढोंग करीत असली पाहिजे" म्हणून तिची परीक्षा पाहण्यासाठी भम्पकरावांनी सिगरेट शिलगावली व तिच्या दोन्ही डोळयासमोर धरून पाहिली.

पण ती काहीच हालचाल करीना.

जळती सिगरेट हिच्या अंगालाच लावल्याशिवाय हिची समाधी भंग होणार नाही. भम्पकराव स्वगतले.

स्वगत संपते न संपते तोच भम्पकरावांच्या अग्नीसारख्या निर्मल अंत:करणांत एक नवाच किरण फांकू लागला.

"आपली बायको दिसण्यात चारचौघींसारखी आहे असे आपल्याला वाटत होते. पण ते खरे नाही. ती लाखांत एक, निदान हजारात एक तरी आहेच. अन् कुणी सांगितले आपल्याला ही काळीसावळी आहे म्हणून. तिच्या डोळयांवर जळती सिगरेट धरली तेव्हा तिची कांति सोन्याच्या मुशीसारखी भासली . . ."

विचार असह्य होऊन भम्पकरावांनी हाक मारली "पार्वती !". . .

* * *

आपल्या निश्चयाचा पहिल्याच रात्री असा बाजा वाजला म्हणून भम्पकराव खट्टू झाले. मनोनिग्रह असा एकदम साधणार नाही. त्यासाठी साधना करावी लागेल म्हणून त्यांनी साधनेला सुरवात केली.





साधनेचे उद्यापन म्हणून आधी सर्व अनर्थास कारण असलेल्या सापाचा दात उपटला पाहिजे. बायकोच्या मोहकतेचा खिमा केला पाहिजे. म्हणून त्यांनी सौ.स खालील सूचना केल्या.

१) केश मागे न बांधता गौतम बुद्धासारखे डोक्यावर बांधावे.

२) साडीचोळीचा उंचसखल पोशाख न करता सर्व शरीर गिरणीच्या बम्ब्यासारखे दिसावे म्हणून कफनी घालावी.

३) कफनीचा रंग भगवा असावा.

४) कफनीच्या आरपार दिसू नये म्हणून ती गोणपाटाची शिवावी.

५) अंगाला नेहमी घासलेट चोपडावे.

पण भम्पकरावांच्या दुर्दैवाने त्यांच्या बायकोचे पातिव्रत्य कसास उतरले नाही. वरील सूचनांचे पंचशील तिने शेंडाबुडासकट फेटाळून लावले.

"जे काय थेर करायचे असतील ते तुमचे तुम्ही करा. मला माणसासारखं राहू द्या" भम्पकरावांना अंतिमोक्त मिळाले !

"सीतेकडून रामाला व सावित्रीकडून सत्यवानाला असेच उत्तर मिळाले असते काय ?" म्हणून भम्पकरावांनी कळवळून बायकोला विचारले तेव्हा तिने साशंकपणे त्यांच्याकडे पाहिले, न् ताडताड पाय आपटत खोलीत जाऊन धाडकन् दरवाजा लावून घेतला.

झाले ! "स्त्री जात तेवढी निमकहराम !" असे मराठी हॅम्लेटांतले वाक्य नानासाहेब फाटकांप्रमाणे उच्चारल्याशिवाय भम्पकरावांना गत्यंतर नव्हते.

अगतिक अवस्थेत विचार करता करता भम्पकरावांच्या डोक्यात एकदम प्रकाश पडला. बायकोची मोहिनी आपल्यावर पडली म्हणून आपला व्रतभंग झाला असे थोडेच आहे? तीच आपल्यावर मोहित झाल्यामुळे केवळ दयार्द्र बुद्धीने आपण आपले व्रत मोडू दिले ! तेव्हा तिची आकर्षकता कमी करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा आपण आपलीच आकर्षकता कमी केली पाहिजे !

नवीन युद्धसूत्र स्फुरल्याबरोबर नेपोलियनला जसे वाटत असेल तसेच भम्पकरावांना वाटले!

तडक न्हाव्याकडे जाऊन त्यांनी डोक्याचा गोटा केला. पोशाखाची छान–छोकी सोडून पंचा नेसायचा विचार केला. पण फक्त पंचा नेसल्यास आपले सुंदर शरीर उघडे पडून बायको अधिकच बेचैन होईल म्हणून त्यांनी तो विचार सोडून दिला, व पंचाच्या ऐवजी पायघोळ कफनी हा पोशाख मुक्रर केला.

एवढी काळजी घेतल्यामुळे भम्पकरावांचा दिवस चांगला निष्काम रीतीने पार पडला. रात्र जवळ येऊ लागली. तेव्हा वानरांच्या स्तुतीमुळे मारुतीचे शरीर जसे वाढू लागले तशी त्यांच्या व्यक्तित्वांतली मोहिनी वाढत चालली. आपले रूप अनाकर्षक करण्याचा एवढा प्रयत्न करूनसुद्धा रात्रीच्या सान्निध्याने बायकोला पुनः मोह पडणार याची भम्पकरावांना खात्री वाटू लागली; कारण अध्यात्माच्या मार्गावर तिची वाटचाल सुरुही झाली नव्हती. म्हणून त्यांनी स्वतंत्र खोलीत आपला शय्या थाटली.

शय्येला पाठ टेकल्यावर लगेच झोपावे असा भम्पकरावांनी आधी बेत केला होता. पण पाठीला शय्येचा स्पर्श झाल्यावर त्यांना बायकोची काळजी वाटू लागली. बिचारी तळमळत असेल! ती कितपत कष्टी आहे हे निदान खिडकीतून पहावे असा दयाळू विचार त्यांच्या मनात आला.

ते उठून खिडकीजवळ आले. आंतले दृश्य दिसल्याबरोबर "मारुतिराया!" म्हणून त्यांनी गहिवरून नामस्मरण केले.

बायको चोळी बदलत होती!

"बायकोला चोळी बदलण्याची आसुरी इच्छा का व्हावी!" भम्पकराव चिंता करते झाले. आसुरी कृत्यांचे दर्शन देखिल वाईट म्हणून ते खिडकीपासून दूर झाले.

आसुरी वृत्ती दारातून देखिल बाहेर येईल म्हणून त्यांनी दार लोटलेले होते त्याला बाहेरून कडी लावली.





पण आसुरी वृत्ति नुसत्या कडीने आवरणार नाही म्हणून त्यांनी कडीला कुलूप घातले.

कुलूप घातल्याने देखिल त्या खोलीतले आसुरी वातावरण बंदिस्त होणार नाही. आपल्या खिशातला किल्ली अलगद कुलुपात ओढून घेण्याचे त्या वातावरणांत सामर्थ्य आहे हे भम्पकरावांच्या चाणाक्ष बुद्धीला लगेच कळले व त्यांनी ती किल्ली खिडकीतून बायकोच्या खोलीत फेकली!

आसुरी वातावरणाचा याप्रमाणे बंदोबस्त केल्यावर भम्पकराव निर्धास्तपणे पलंगावर येऊन पडले.

पण बिचाऱ्या भम्पकरावांना निर्धास्तपणा फार वेळ लाभी नसे. त्यांचा डोळा लागतच होता इतक्यात "अहो, दार कुणी गधड्यानं लावलं बाहेरून, उघडा" वगैरे बायकोचा आरडाओरडा व दारावर लाथाबुक्क्यांचा मारा यांचा कल्लोळ उडला.

"हिला संयम कसा तो नाहीच. थोडा वेळ झाला नाही तोच आली नवऱ्याची आठवण!" भम्पकराव सात्विक संतापाने कुलूप उघडायला उठले.

पण दाराजवळ जाताच किल्ली आपण आंत फेकली याची त्यांना आठवण झाली.

"किल्ली आत खोलीतच राहिली आहे खिडकीजवळ कुठेतरी शोध" त्यांनी बायकोला सांगितले.

"कमाल आहे तुमची! किल्ली आत ठेवून कुलूप काय लावता? उद्या डॉक्टराकडून डोकं तपासून घ्या! न् कुठे खिडकीजवळ किल्ली आहे? मला नाही दिसत! काय . . . खाली. जमिनीवर असेल? चांगलीच जागा आहे किल्ली ठेवायची. फोडा कुलूप न् नंतर तोच दगड हाणा आपल्या डोक्यात! . . ."

बायकोचे वक्तृत्व असह्य होऊन भम्पकरावांनी दगडाने कुलूप फोडले. (पण तोच किंवा आणखी कोणताही दगड आपल्या डोक्यात हाणण्याच्या दुसऱ्या सूचनेला त्यांचा तात्विक विरोध असल्यामुळे ती त्यांनी अमलात आणली नाही.

दार उघडल्याबरोबर बायकोचा राग शान्त होईल व ती "असं काय बरं . . ." म्हणून आपला अनुनय करायला आपल्या खोलींत येईल अशी भम्पकरावांची खात्री होती, म्हणून ते गुपचूप खोलींत जाऊन पडले.

पण बायको येण्याची कांहींच चिन्हे दिसेनात.

गेली तरी कुठे ही म्हणून त्यांनी टेहळणी करण्यास सुरवात केली. तो ती स्नानगृहांत असल्याचा त्यांना शोध लागला.

"बिचारी दाह शान्त करण्याचा उपाय नंबर एक अमलांत आणीत आहे." भम्पकरावांच्या दयार्द्र मनांत विचार आला व ते परत आपल्या पलंगावर गुपचूप येऊन पडले.

पण काय आश्चर्य ! उपाय नंबर एकाबरहुकूम स्नानगृहांत नळाचा प्रयोग झाल्याचे लक्षण आंतून येणाऱ्या ध्वनिविशेषांत दिसेना.

पार्वतीबाई लवकरच बाहेर आल्या व भम्पकरावांच्या खोलीच्या दाराशी उभ्या राहिल्या.

भम्पकरावांचे हृदय पौर्णिमेच्या सागराप्रमाणे उचम्बळू लागले.

पार्वतीबाईंनी खणखणीत आवाजांत सुनावले, "तुम्हाला राहवत नसेल तर स्वत:ला कोण्डून घ्या. मी लावते कुलूप. पण मला कोण्डायच्या भानगडींत पडू नका. आतां पुन: असा कांही प्रकार झाला तर उद्याच्या उद्या चालती होईन !"

अपौरुषेय वाङ्‌मयाचा हा उत्कृष्ट आविष्कार ऐकून भम्पकरावांच्या मनांत अनेकविध भावनांनी गर्दी केली. बायको प्रणययाचनेसाठी आली नसून खरड काढायला आली म्हणून अवसानघात, आपल्यालाच संयम नाही असे तिला वाटले म्हणून तिच्या बुद्धीबद्दल करुणा, उद्या ती कदाचित् चालती होईल म्हणून भीति, तिचा कोकिलरव ऐकून व शयनोन्मुख रूपाकडे पाहून शृंगार . . .

* * *

"काही हरकत नाही. दोनदां आपटी खाल्ली तरी माझा निश्चय कायम आहे. व्रत सोडायचे नाही. पण व्रत कायम राहण्यास जरा चित्तशुद्धीची आवश्यकता आहे. चित्तशुद्धीसाठी उपास व ईश्वरभक्तीची आवश्यकता आहे. तेव्हां आजपासून हे दोन नियम जारीने अमलांत आणायचे . . ." असा विचार करीत भम्पकराव दुसऱ्या दिवशी उठले.





उठल्याबरोबर बायकोने पेटवलेल्या स्टोव्हचा मंजुळ आवाज त्यांच्या कानी पडला व त्यांना चहाची आठवण झाली. पण चहा पिणे नियम नंबर एकाच्या अनुसार निषिद्ध होते !

"आता काय करावे ! उपास करायचा विचार चहाच्या नंतर सुचला असता तर बरे झाले असते. पण, भम्पकराव, द्या हातावर टाळी ! अहो उपास म्हणजे अन्न खायचे नाही ! चहा प्यायचा नाही असे थोडेच आहे? चहात बेटी साखर असते. पण कुणी सांगितले साखर हे अन्न आहे म्हणून ! साखर हे औषध आहे. अन् दूध ! भम्पकराव, एवढंही कसं कळत नाही तुमच्यासारख्या बुद्धिमंताला ! गाईचं दूध, म्हणजे आईचंच दूध, त्यानं का ब्रम्हचर्य वितळणार आहे तुमचं ?..."

अशा काही ऋचांचा भम्पकरावांना साक्षात्कार झाला व ते फर्मावते झाले.

"चहाला दूध गाईच घे बरं ! "

"गाईचं नाही न् बाईचं नाही. घरात फक्त म्हशीचं दूध आहे " भम्पक-रावांच्या अर्धांगांतून निर्वाणीचे शब्द निघाले.

"गाईचंच दूध घातलं आहे असं म्हणायला काय हिचं जात होतं ?" असा प्रश्न भंपकरावांच्या मनात त्रासिकपणे चमकला

शेवटी दूध ते दूध, मग ते गाईचे असो, म्हशीचे असो की गाढवीचे असो या जातिधर्मातील तत्त्वाचे भंपकरावांना दर्शन झाले व त्यांनी सौ. शी ब्रह्मचर्यपोषक हास्यविनोद करीत मिटक्या मारीत चहा घेतला.

नियम नंबर दोन ईश्वरभक्ति ! त्याच्या पालनार्थ भम्पकराव घरा-बाहेर पडले. एका देवळाच्या बाहेर "प्रा. डॉ. ज्योतिषी यांची मधुराभक्ती-वरील प्रवचने" असे विज्ञापन वाचून त्यांनी आंत प्रवेश केला.

प्रोफेसर मजकुरांचे प्रवचन सुरू होते. "मधुराभक्ति हा भक्तीचा सर्वश्रेष्ठ व मधुर प्रकार आहे. मधुराभक्ति म्हणजे ईश्वराला प्रियकर व स्वत:ला प्रेयसी समजून वागणे. या भक्तींत केलेल्या कामचेष्टा हा ब्रह्मचर्याचा अत्युच्च प्रकार आहे...."

आपल्या सिद्धान्ताचा शोध लागल्याबरोबर आर्किमिडीज जसा पळत सुटला तसे भम्पकराव ताडकन उठून बाहेर धावले. पण ते स्नानगृहात नसल्यामुळे त्यांना नाइलाजाने कपड्यासकट पळावे लागले व दुर्दैवाने आर्किमिडीजच्या मानाने ते डावे ठरले.

भम्पकराव ताडकन उठून पळाल्यामुळे कांही श्रोते "साप ! साप !" म्हणून बाहेर पळू लागले व कांही चोर चोर म्हणून त्यांच्या पाठीस लागले.

बिचाऱ्या प्रोफेसरांच्या मधुराभक्तीचा झरा पहिल्या उद्रेकांतच आटला..

इकडे भम्पकराव धावत बाजारओळीत आले व त्यांनी एका माळ्याकडून मोरपिसांचा मुकुट करवून घेतला, जवळच्याच दुकानांतून मुरली विकत घेतली व घराकडे धाव ठोकली.

हातांत मुरली, मुकुट वगैरे घेतलेले भम्पकराव धापा टाकीत पळत येत आहेत असे पार्वतीबाईनी पाहिले तेव्हा एखादा पिसाळलेला कुत्रा त्यांच्या पाठीस लागला असावा असे त्यांना वाटले व पतिव्रताधर्मास अनुसरून "अहो ही घ्या काठी" म्हणून त्यानी एक मोठी थोरली काठी भम्पकरावांकडे फेकली.

ती काठी भम्पकरावांच्या अंगावर कोसळली व तेथून केलेल्या अपराधा-बद्दल क्षमा मागण्यासाठी तिने त्यांच्या पायाशी लोळण घेतली.

नमस्काराला प्रतिनमस्कार म्हणून भम्पकरावांनीहि लोटांगण घातले.

हा शिष्टाचार पाळता पाळता भम्पकरावांचा चेहरा व गुडघे रक्तमिश्रित धुळीच्या गुलालाने अलंकृत झाले, मोरपिसाच्या मुकुटाची पिसे मोडली व एका मुरलीच्या दोन मुरल्या झाल्या.

"काय वेड लागलंय् का तुला. सरळ नवऱ्याला काठी फेकून मारतेस. थोडक्यातच तुझं सौभाग्य वाचलं नाहीतर . . ." भम्परावांचे वक्तृत्व सुरू झाले.

"अहो मारीन कशी मी तुम्हाला? मला वाटलं तुमच्यामागे कुत्रा लागला





आहे, म्हणून त्याला मारायला काठी दिली. फारच लागलंय् बरं. आयडिन लावून देते . . ." सौभाग्यवती प्रेमाने नवऱ्याची शुश्रूषा करू लागल्या.

भम्पकरावांचा राग त्या प्रेमळ उपचारांनी शांत झाला. आयडिनची आग प्रणयचेष्टातील क्षताप्रमाणे त्यांना सुखद वाटली व त्यांची मधुराभक्ति उचम्बळून आली.

"हे फार छान दिसेल तुला" म्हणून मोरपिसांचा मुकुट त्यांनी बायकोच्या शिरावर चढवायला सुरवात केली.

नवरा माणसांत येत चालला म्हणून पार्वतीबाईनी हायसे वाटले.

"आता जरा दूर उभी रहा पाहू. हं अशी नाही. श्रीकृष्णासारखी पायांची फुली करून करून. हं बरोबर. आता ही मुरली जरा वाजव पाहू." म्हणून मघाच्या अपघातांत मोडलेल्या मुरलीचे उत्तमांग भम्पकरावांनी पुढे केले.

नवरा फारच रंगात आला आहे म्हणून पार्वतीबाई खुषीने मुरली वाजवू लागल्या.

भम्पकरावांनी आपल्या धोतराचा सोगा सोडला, त्याचा पदर डोक्यावरून घेतला, बालगन्धर्वाप्रमाणे "खडा मारायचा झाला तर" म्हणून एक मुरका मारला व "सर्वस्वी मी तुझीच राधा" म्हणून गळा काढून भजन करायला सुरवात केली.

"हे काय आठवलं आज तुम्हाला !" पार्वतीबाईनी आवाज चढवून विचारले.

"ही मधुराभक्ति आहे. आजपासून मी राधा व तू कृष्ण. अशा तऱ्हेने केलेला शृंगार हे ब्रह्मचर्याचे अत्युच्च स्वरूप आहे. . . ."

कुत्र्याचे शेपूट सरळ झाल्याची वेडी आशा आपण करीत होतो याची दु:खद जाणीव पार्वतीबाईना झाली. लवकरच दु:खाचे रूपान्तर क्रोधात झाले.

त्यांनी ती मोडलेली मुरली फरशीला भम्पकरावांचे डोके समजून त्यावर धाडकन आपटली,

भम्पकरावांच्या लोटांगणाने मुरलीचे राहु केतु झाले होते. आता या दुसऱ्या अपघातामुळे त्या राहूचा जरासन्ध झाला.

"तुमचं पहावं ते एकेक नवीनच. तुम्ही जरा ठाण्याला जाऊन या कांही दिवस. जरा बरे झाल्यावर या घरी." पार्वतीबाई अग्निवर्षाव करू लागल्या.

पण भम्पकराव आता मधुराभक्तीच्या सागरात बुडले होते. त्यांना हा अग्निवर्षाव काय करणार! अग्निवर्षावावर भक्तिजलाचा वर्षाव करीत ते बोलू लागले.

"कृष्णसख्या, खरंच! मला वेड लागलं आहे. पण या वेडाचं कारण तूच. अरे ठाण्याला जाऊन का हे वेड शमणार आहे! या वेडावर उपचार करू शकणारा धन्वन्तरी तूच!"

भक्तिजलाचे सिंचन केल्यावर पुन: एकदा मुरका मारून भम्पकराव कृष्णसख्याला आळवू लागले.

"उठताऽ बसताऽऽ तुझेच चिन्तन . . ."

पार्वतीबाई नेहमीप्रमाणे ताडताड पाय आपटत गेल्या व त्यांनी धाडकन आपल्या खोलीचे दार लावून घेतले.

बायकोच्या असहकारामुळे आपले कोणतेच व्रत सुरळीत चालत नाही. म्हणून भम्पकराव सन्तप्त झाले. पण बायकोने दार लावून घेतल्यामुळे त्यांचा सन्ताप तिच्यापर्यन्त पोचेना. तेव्हा त्यांनी आत्मशुद्धि या एकमात्र उद्देशाने पुढील भजन दुमजली आवाजात गायला सुरवात केली.

स्त्री हा तो मासाचा गो ऽ ळा ऽ ऽ
कां करिसी तेथे वास ऽ ना गोळा ?
स्त्री हा तो पापाचा म ऽ ळा
तेथे क ऽ शाला हो लोळा !
स्त्री हा नरकाचा गाळ
सख्या त्यांचा संग टाळ





बराच वेळ गाऊन घसा कोरडा झाला तरी बायकोच्या खोलीतून या अध्यात्मवाणीचा प्रतिध्वनि उमटेना. तेव्हा भम्पकरावांनी दार उघडून पाहिले.

आत कुणीच नव्हते त्यांनी सारे घर धुण्डाळले. बायको घरीच नव्हती. भम्पकरावांचा अगदी अवसानघात झाला. श्रोत्याशिवाय भजन म्हणून काय आत्मशुद्धि होणार कपाळ !

भम्पकरावांचा अवसानघात झाला तेव्हा क्रौंचवधाचे दृश्य पाहून द्रवलेल्या वाल्मीकीच्या मुखातून जसा नवीन छन्दातला नवीन श्लोक उत्स्फूर्तपणे निघाला तशी भम्पकरावांच्या मुखातून अभावितपणे-त्यांनी पूर्वी ऐकलेली कां असेना—"गुरुबिन तेरी कोन खबर ले" ही ओळ बाहेर पडली !

झाले. भम्पकरावांना पुन: नवतत्त्वाचे स्फुरण झाले. ते तडक घराबाहेर पडले व स्वामी ब्रह्मचर्यानन्द यांच्या कुटीकडे त्यांनी धाव घेतली.

"स्वामीजी काय करू. लग्नाच्या पहिल्या रात्रीच मी ब्रह्मचर्याची शपथ घेतली. पण बायकोला मोह आवरत नाही. ती सारखी गळी पडत असल्यामुळे माझी प्रतिज्ञा टिकू शकत नाही . . ."

"वत्सा, घाबरू नकोस" स्वामींजींनी दिलासा दिला. एकदम एवढे कडक व्रत तिला बिचारीला झेपायचे नाही. क्रमाक्रमाने अभ्यास वाढवावा. आज रात्री १० वाजेपर्यन्त ब्रह्मचर्य पाळ. मग उद्या अकरा वाजेपर्यन्त, मग परवा बारा वाजेपर्यन्त असा एकेक तास वाढवीत जा म्हणजे तिला बिचारीला जड जाणार नाही."

प्रगाढ मानसशास्त्रावर आधारलेला हा सल्ला ऐकून भम्पकराव आनन्दाने घरी गेले. फक्त दहा वाजेपर्यन्त ब्रह्मचारी राहायचं. हे काही तिला कठिण वाटू नये."

बायको न्हाऊन ओवरीवर केस वाळवीत बसली होती. ते दृश्य पाहून भम्पकरावांना मधुराभक्तीचा उमाळा आला. पण त्यांनी लगेच हवेत एकावर शून्य असा दहाचा आंकडा काढला व स्थितप्रज्ञाप्रमाणे तो उमाळा दाबून टाकला.

नवरा चालता चालता हवेंत लेखन करीत व स्वत:शीच बोलत आहे हे पाहून पार्वतीबाईंनी कपाळावर हात मारला.

घाईघाईने जामानिमा करून त्या बाहेर पडल्या.

इकडे त्रिम्बकरावांनी उपाय नंबर एक म्हणजे नळाखाली स्नान उरकले. तोंच पार्वतीबाई परत आल्या व त्यांनी घोषणा केली.

"अहो आज माझ्या वडलांचे एक स्नेही डॉ.डोके आपल्याकडे जेवायला येणार आहेत. जाऊ नका कुठे बाहेर. ते डोक्याचे डॉक्टर आहेत. दोन तीन दिवस आपल्याकडेच राहून तुम्हाला चांगलं डोळ्याखाली घालतील. फार दिवस हेळसांड करणं बरं नाही . . ."

भम्पकरावांचे डोळे इंगळासारखे लाल झाले. पण लगेच त्यांचे सन्तत्व जागृत झाले. आपल्याला महनीय पिसे लागले आहे. आपल्या बायकोसारख्या कामपंकांत लोळणाऱ्या पामरांना महनीय पिसे व साधे पिसे यांतला फरक कळत नाही म्हणून त्यांच्यावर रागावण्या ऐवजी त्यांची कीव केली पाहिजे."

भम्पकराव निमूटपणे आपल्या खोलींत जाऊन स्वामी ब्रह्मचर्यानन्द यांची जीवनकथा वाचूं लागले.

त्या जीवनकथेत पंधरावीस मिनिटे अवगाहन केल्यावर भम्पकराव सैंपाकघरांत डोकावून सौ. स विचारते झाले.

"का ग, किती वाजले ?"

"अहो घड्याळ त्या समोरच्या खोलींत आहे नं." घराच्या भूगोलाबद्दल पार्वतीबाई ही माहिती पुरवीत असतांनाच बाराचे ठोके पडले.

"हं. अजून दहा तास आहेत." भम्पकराव स्वत:शीच पुटपुटले.

"अहो एवढं वैतागायला काय झालं. दहा तास आहेत म्हणे. झालंच आहे माझं. डॉ. डोके आले की वाढते. पार्वतीबाईंनी दिलासा दिला.

भम्पकरावांनी पुन: एकदां बायकोची कीव केली.





आता पुन: खोलींत जाऊन डॉ. डोके यईपर्यंत स्वामी ब्रह्मचर्यानन्द यांची संगत करावी म्हणून भम्पकरावांनी त्यांची जीवनकथा उघडली. पण त्यांत मन लागेना म्हणून रेडिओ सुरू केला.

रेडिओ गाऊं लागला "पग घुंगरु बांध मिरा ना ऽ ऽ ची रे ऽ ऽ . . ."

भम्पकरावांना पुन:एक नवे तत्त्व स्फुरले. स्वामी ब्रह्मचर्यानंदांचा क्रमाभ्यास व प्रोफेसर ज्योतिषी यांची मधुराभक्ति यांचा समन्वय कां करू नये !

भम्पकराव विचाराप्रमाणे आचार करणारे थोर पुरुष होते. त्यांनी लगेच घरांत घुंगरू शोधायला सुरवात केली. सारे घर शोधूनही घुंगरू कुठे सांपडेनात.

पण बुद्धिमन्ताचे साधनावाचून अडत नाही. भम्पकरावांनी एक टिनाचा डबा काढला, त्यांत बरेच नवे पैसे भरले व तोच पायाला बान्धून छुम् छुम् नाचायला सुरवात केली.

इतक्यांतच "काय हो, त्रिम्बकराव दन्ताळे कुठे राहतात" म्हणून विचारपूस करीत डॉ डोके दाराशीं ठेपले. मधुराभक्तींत तल्लीन होऊन नाचणारे भम्पकराव दृष्टीस पडतांच दन्ताड्यांचे घर ते हेच व ज्यांच्या कीर्तीचा परिमल आपल्या मानसिक नाकपुड्यांत दरवळत आहे ते महापुरुषही हेच अशी त्यांची खात्री पटली.

प्रसंग आल्यास लगेच सूंबाल्या करता यावा म्हणून उघड्या दाराकडे लक्ष ठेवीत, भीत भीत डॉ. डोक्यांनी सुरवात केली.

"नमस्कार त्रिम्बकराव !"

"नमस्कार. कोण आपण. ओहो, ते डोक्याचे डॉक्टर होय. या. बसा."

आपले इतके चांगले स्वागत होईल अशी डॉ. डोक्यांची अपेक्षा नव्हती. तरी भीत भीत बारकाईने भम्पकरावांचे निरीक्षण करून ते नि:शस्त्र आहेत अशी खात्री करून घेत ते स्थानापन्न झाले.

थोड्याच वेळांत पाहुणा व यजमान भोजनास बसले.

पण डॉ. डोके भोजनासाठी थोडेच आले होते. ते भम्पकरावांचे निरीक्षण करण्यास आले होते. आपले मानसशास्त्राचे व वैद्यकीचे सारे ज्ञान सज्ज ठेवून ते भम्पकरावांचे निरीक्षण करू लागले.

वामकुक्षी झाल्यावर शेजारच्या खोलींत डॉ. डोके व आपली बायको यांचे काहींतरी खलबत चालले असल्याचे भम्पकरावांच्या कानी आले. ते कानोसा घेऊ लागले.

"अहो निदान फार सोपं आहे" डॉ. डोके सांगत होते. 'तुमच्या यजमानांना मातृगण्ड झ ला आहे."

"म्हणजे काय ?"

"याला इंग्रजीत इंडिपस कॉम्प्लेक्स म्हणतात. म्हणजे असं की त्याचं आपल्या आईवर प्रेम होत."

"आईवर प्रेम असणं हा काय रोग आहे ?" पार्वतीबाई आश्चर्यल्या.

"अहो प्रेम म्हणजे नुसतंच प्रेम नाही. "तसलं प्रेम. म्हणजे फक्त मनांतल्यामनांत हं."

"काहींच्या बाहीच बोलूं नका.

"रागावू नका. आमच्या शास्त्रात आहे तसं सांगतो. आईवरच्या 'तसल्या" प्रेमाबद्दल त्यांना खन्त वाटते. तुमचा चेहरा त्यांच्या आईसारखा असल्यामुळे..."

"अहो काय उगीच नांव ठेवता. सासूबाईंच्या सारखं माझ्या चेहऱ्यांत कांही देखील नाही . . ."

"असलंच पाहिजे. तुम्हाला दिसत नसलं तरी त्यांच्या दृष्टीला दिसत असलंच पाहिजे. ते तुम्हाला आई मानायला लागलेत ते काही उगीच नाही."

"मग करायच काय ?"

"आजच्या पुरती माझी फी देऊन टाका. मी आणखी थोडं निरीक्षण करतो. बरे होतील लवकरच . . ."

भम्पकरावांनी जोराने दार आदळून आंत प्रवेश केला.

भिन्तीवरच्या घड्याळांत तीन वाजले होते. "अजून सात तास आहेत" भम्पकराव पुटपुटले.





पार्वतीबाईंनी खूण करून डॉ. डोक्यांचे तिकडे लक्ष वेधले.

आपले घड्याळ हळू चालते आहे याची भम्पकरावांना खात्री पटली. वेळेबद्दल दुसऱ्या घड्याळाची साक्ष घ्यावी असा विचार मनात येताच डॉ. डोक्यांच्या खिशात घड्याळ असल्याचे बाहेर डोकावणाऱ्या साखळीने त्यांच्या लक्षात आणून दिले.

वेळेच्या बाबतीत आप्तवाक्यावर विश्वास ठेवणे धोक्याचे आहे, प्रत्यक्ष प्रमाणानेच शहानिशा केली पाहिजे म्हणून त्यांनी डॉ. डोक्यांच्या खिशातले घड्याळ स्वत:च काढून पाहिले. साडेतीन वाजले होते.

भम्पकराव अंगाशी येताच डॉ. डोके गडबडले पण त्यांनी घड्याळ परत ठेवताच त्यांना हायसे वाटले.

"वाटलंच मला घड्याळ मागे आहे म्हणून" असे म्हणत त्यांनी भिंतीवरच्या घड्याळाचे काटे फिरवून त्यात चार वाजवले.

आता दहा वाजेपर्यंतचा वेळ मित्रांबरोबर सिनेमा व नंतर हॉटेलात जेवण यात घालवावा या हेतूने भम्पकराव "नमस्कार डॉक्टर, येतो आता" असे म्हणत पसार झाले.

सिनेमा सुरू झाल्याबरोबर झक मारली न् सिनेमा पाहायला आलो असे भम्पकरावांना होऊन गेले. इथून तिथून सारी ब्रह्मचर्य-विघातक आसुरी दृश्ये. पडद्यावरच्या बायका कपडे करीत त्या काढून दाखविण्यासाठीच. प्रेम काय, चुम्बनं काय! शिव! शिव! भम्पकरावांनी डोळे तरी किती वेळा मिटावे! "लेकांनो! प्रेम करता ते करा. पण अशी सगळ्यांच्या समोर चुम्बनं!"

भम्पकराव घाईघाईने उठले. रांगांच्या मध्ये अशरली उभा होता. त्याच्या पॅंटच्या खिशातला टॉर्च काढून भम्पकरावांनी त्याच्या हातांतल्या घड्याळात पाहिले.

साडे नऊ झाले होते!

"धावत पळत गेलो तरच दहाची वेळ साधेल" म्हणून भम्पकरावांनी धूम ठोकली.

अशरलीचा टॉर्च त्याच्या खिशात न टाकता भम्पकरावांनी आपल्याच खिशात टाकला होता.

एकदम बिजलीहल्ला झाल्यामुळे अशरली गांगरला होता. सावध झाल्या-बरोबर आपण उणे टॉर्च आहोत हे त्यांच्या लक्षात आले व चोर चोर करून तो भम्पकरावांच्या मागे धावू लागला . . . .

*　　　*　　　*

गोष्ट संपल्याबरोबर आमच्या सौ. म्हणाल्या "अहो मी सांगते तुम्हाला. हे सगळं अक्षरशः खरं असलं पाहिजे. सौ. भम्पकरावांना विचारायची काही जरूर नाही."



# भम्पकरावांचा कायदेभंग

बायकांनी चालवलेल्या पिळणुकीपासून नवऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी भम्पकरावांनी आंतरराष्ट्रीय नवरेसंघ काढला होता हे आमच्या वाचकांना विदित आहेच. या संघाचे कार्य करताना एकदा पोलिसांनी त्यांना कोर्टासमोर खेचले. कोर्टाने त्यांच्यावर सामाजिक कटकट – public nuisance म्हणून शिक्का मारला. त्यांच्या वकिलाने फार गयावया करून आमच्या अशिलाचे डोके नेहमीच ठिकाणावर असते असे नाही हे लक्षात घेता त्यांच्या ह्या कृत्याकडे थोडे सदयतेने पाहिले पाहिजे अशी कैफियत मांडली म्हणून त्यांना नुसती कोर्ट उठेपर्यंत शिक्षा झाली. नाहीतर बिनभाडयाच्या घरात सरकारी पाहुणचार घेऊन थोर विभूति होण्याची त्यांना एक नामी संधि आली होती. वकिलाच्या कृष्णकृत्यामुळे ती गमावली म्हणून यापुढे वकिलाचे तोंड पाहणार नाही अशी भम्पकरावांनी प्रतिज्ञा केली व विभूतिमत्वाचा मार्ग तुरुंगातून जातो या तत्वानुसार विभूति होण्याची जारीने खटपट सुरू केली. या खटपटीचे सोळा आणे यश अगदी पदरात पडण्याच्या बेतात असताना त्यांच्या दैवाने पुन: घात कसा केला व भम्पकरावांचा "मी नाही तर माझे शिर तरी तुरुंगात पडू द्या" हा निश्चय कसा विफल झाला हे सांगण्याचे येथे योजले आहे.

भम्पकरावांचे 'नवरेयुग" हे साप्ताहिक मी नियमितपणे वाचीत असे. सौ.च्या आवडत्या स्त्री मासिकात "नवरेयुग" दडवून हा वाचनाचा कार्यक्रम होत असे हे सांगणे नकोच. "एक लाख नवऱ्यांचा निजता सम्प", "नवरेआघाडीची प्रचण्ड सभा" वगैरे नवरेयुगातले जाड मथळे वाचून जिवाला थोडे बरे वाटे. वाचकहो, मी पत्नीनिष्ठेत तुमच्यापेक्षा कमी आहे असे समजू नका. पण हे मथळे वाचून मला बरे वाटे हे काही खोटे नाही.

अलीकडे "नवरेयुगा"च्या सम्पादकीयांमध्ये एक विशिष्ट सूर येऊ लागला होता. नवऱ्यांनी सांमुदायिक कायदेभंग केला पाहिजे असे आवाहन दर रविवारी त्यात येऊ लागले. सुरवातीस भम्पकराव कोणत्या कायद्याचा भंग करण्यास आम्हाला पाचारण करीत आहेत याचा बोध झाला नाही. पण लवकरच भम्पकराव आपल्या कायदेभंगाची योजनाच स्पष्टपणे सांगू लागले. काटयाने काटा काढावा त्याप्रमाणे बायकांच्या जुलमांवर उपाय म्हणजे अधिक बायका असे त्याचे म्हणणे होते. अर्थात् सर्व नवऱ्यांनी सामुदायिकपणे आणखी दोन किंवा तीन लग्ने करून बहुपत्नीकत्वाला बंदी घालणारा कायदा मोडावा असे भम्पकरावांचे युद्धसूत्र होते.

या जगात गुलाबाला काटे, खारकेत बिया व तुकारामाच्या जीवनांत मम्बाजी अशी योजना विधात्याने बुद्धिपुरःसर केली यांत संशय नाही. नाहीतर नवरेयुगाच्या पुढच्याच अंकात आले तसे पत्र आले नसते. "एक गांजलेला नवरा" अशा सहीने हे पत्र आले होते. मोठा साळसूदपणाचा आव आणून ते लिहिले होते. पण भम्पकरावांच्या कायदेभंगाच्या मोहिमेची हुर्यो उडवणे हा त्याचा हेतु अस्मादिकांसारख्या चाणाक्ष माणसास स्पष्ट दिसण्यासारखा होता. भम्पकरावांचा कायदेभंग स्त्रियांच्या सहकार्याशिवाय सुरू होणे देखील शक्य नाही. ज्यांच्या विरुद्ध चळवळ करायची त्यांचेच सहकार्य मागण्याची ही क्लृप्ति कितपत व्यवहार्य आहे असा या पत्रकाराने प्रश्न उपस्थित केला होता. "असल्या स्त्रीधार्जिण्या चळवळीमुळे भम्पकराव हे नवरेवर्गाचे खरे हितचिंतक नसून स्त्रियांचे बगलबच्चे हेर आहेत असा संशय घेण्यात आपल्या हितशत्रूस जागा होणार नाही काय?" अशीही पृच्छा केली होती.

भोळे बिचारे भम्पकराव! त्यांना पत्रकाराच्या शंका रास्त वाटल्या व त्यांनी त्याला चार कॉलमी अग्रलेख लिहून उत्तर दिले. मुत्सद्यांचे डावपेच





कळण्याची कुवत या पत्रलेखकांत नाही. यूलिसिस्ने लाकडी घोड्याच्या पोटात ग्रीक सैनिक लपवून अभेद्य तटबंदीच्या शत्रूच्या शहरात त्यांचा शिरकाव करून दिला. आपली युक्ति त्याच तोलाची आहे. प्लेटो, अरिस्टॉट्ल, अलेक्झांडर वगैरे रथीमहारथींना जन्म देणाऱ्या त्या प्राचीन ग्रीक लोकांची गुणग्राहकता साम्प्रत नवरेसमाजात उरली नाही. नाहीतर यूलिसिस्चा नवा अवतार म्हणून ते आपल्याला डोक्यावर घेऊन नाचले असते, असा भम्पकरावांच्या त्या महान अग्रलेखाचा मथितार्थ होता.

भम्पकरावांची युक्ति खरोखरच यूलिसिसच्या तोडीची आहे व त्यांचा सपरहू अग्रलेख "सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?" या लोकमान्यांच्या अग्रलेखांप्रमाणे ऐतिहासिक ठरणार आहे अशा आशयाचे एक पत्र लवकरच नवरेयुगात झळकले.

या पत्राच्या खाली माझी सही होती!

ती वाचल्यावर माझे डोळे फिरू लागले. हे पत्र मी केव्हा लिहिले? याचा मलाच प्रश्न पडला. माझ्या नावावर खोटे पत्र छापल्याबद्दल संपादकाची हजेरी घेणारे एक प्रतिपत्र लिहावे असे मला क्षणभर वाटले. पण हे पत्र भम्पकराव छापणार नाहीत, तेव्हा जातीनेच त्यांची हजेरी घ्यावी म्हणून नवरेयुगाच्या कचेरीवर आम्ही मोर्चा वळवला.

नवरेयुगाची कचेरी आधी भम्पकरावांनी आपल्याच घरी उघडली होती. सौ. भम्पकराव कामावर गेल्या आहेत असे पाहून त्यांनी आपल्या घरावर "नवरेयुग" अशी भली मोठी जाहिरात चिकटवली. पण त्या परत आल्यावर "माझ्या घरी असले थेर चालणार नाहीत" म्हणून त्यांनी ती जाहिरात टरकन फाडून टाकली. फाडून टाकल्यावरही त्यांचा राग शांत होईना म्हणून त्या कागदाची त्यांनी खलबत्त्याने भुकटी केली. तरी क्रोधाग्नि ओसरेना म्हणून त्यांनी ती भुकटी चुलीत घातली व त्यावर आपला संध्याकाळचा चहा केला!!

एवढे झाल्यावर नवरेयुगाची कचेरी हलवणे प्राप्तच होते. आपल्या कचेरीला थारा कुठे मिळणार या विवंचनेत भम्पकराव असताना त्यांचा एक मित्र धावून आला. या मित्राचा एक छापखाना होता. एके दिवशी त्याचे आपल्या बायकोशी

कडाक्याचे भांडण झाले तेव्हा तो तडक भम्पकरावांकडे आला व पहिल्या तिमाहीत एक पानी "नवरेयुगाच्या" पंचवीस – – – त्रिम्बकरावांच्या मते एक लक्ष – – – प्रती फुकट छापून देण्याचा त्याने संकल्प सोडला. याच छापखान्या–च्या समोर एका झाडाखाली भम्पकरावांनी एक टेबलखूर्ची मांडली व "नवरेयुग" अशी माणूसभर उंचीची अक्षरे खडूने लिहिलेला एक फळा तेथे ठेवला.

आम्ही दरकूच दरमजल करीत भम्पकरावांच्या एवंगुणविशिष्ट कचेरीत, आलो. भम्पकराव दृष्टीस पडल्याबरोबर ते नुसत्या दृष्टीनेच भस्म व्हावे म्हणून डोळ्यावरचा चष्मा काढून खिशांत ठेवला व आपले मिचमिचे डोळे बटारून शक्य तितके मोठे केले. शिव्या देण्यास रटाळ मराठीपेक्षां साहेबी इंग्रजी व नबाबी उर्दू अधिक प्रभावी म्हणून कांही इग्रजी व कांही उर्दू शिव्यांची मनांतल्या मनांत तालीम केली व जोराने "त्रिम्बकराव"! अशी हाक मारून 'नवरेयुग" म्हगून बिरुद मिरवणाऱ्या फळ्यावर जोराने ठोठावू लागलो!

वाचकहो! हाय! इथूनच आमच्या त्या दुर्दैवाला सुरवात झाली. फट म्हणता ब्रम्हहत्या व्हावी तसे घडले." एकूण हॅम्लेटमध्यें व अस्मादिकामध्ये बरेच साम्य आहे. बापाचा खून करणाऱ्या काकाला मारण्याची प्रतिज्ञा करून हॅम्लेटने तरवार उपसावी पण एक काका सोडून बाकीच्याच लोकांना मारत सुटावे. आम्हीही भम्पकरावांची हाडे मोडण्याची अनेकवेळां प्रतिज्ञा करावी. पण आमच्या वीरश्रीचा भम्पकरावांना कधीच अनुभव येऊ नये. इतर बिचाऱ्या निरपराध लोकांनाच तिचा प्रसाद मिळावा!

हे मधेच उपस्थित झालेले ब्रह्मनिरूपण सोडून पुन: कथेकडे वळायचे म्हणजे, मुद्याची गोष्ट अशी की आमच्या वीरश्रीयुक्त ठोठावण्याने "नवरेयुगा"चा फळा कोलमडला व आंतून भम्पकरावांच्या स्वराऐवजी who the hell, rascal वगैरे एका गावठी मडमिणीचे कर्कशणे एकूं आले. फळा पूर्ववत् करून आंत शिरलो तो भम्पकरावांचे नांवनिशाण दिसेना! त्यांच्याऐवजी एक ध्यान "लोचनांस गोचर" झाले! खाली पँट, वर सदरा, बरेच दिवस हजामत न केल्यामुळे केस भलतेसे वाढले आहेत कीं फाजिल हजामती केल्यामुळे भलतेच आखुडले आहेत असा संशय उत्पन्न करणारे डोके, ओठावर वस्तुत: लालगडद पण त्वचेच्या काळ्याकुट्ट रंगामुळे जाम्भळी वाटणारी लिपस्टिक, व ओठातून एखाद्या जन्मजात अवयवाप्रमाणे बाहेर फुटलेली सिगरेट, एवंगुण





विशिष्ट हे ध्यान होते. "Oh ! Christ ! How . . . . !" ध्यानाच्या तोंडून सतत पुष्पवृष्टि सुरु होती.

"माफ करा. चुकून फळा पडला. मला भम्पकरावांना भेटायचं होतं"

"ट्रिबी माझ्यासाठी सिगरेटस् आणायला गेलाय्."

"आणि आपले शुभ नाम?"

"मिस् रॅले"

"आनंद झाला आपल्याला भेटून मिस् रॅले"! असे म्हणत आम्ही स्थाना–पन्न झालो.

मिस् रॅलेने आमच्याकडे एक भलामोठा तिरस्कारयुक्त कटाक्ष फेकला!!

आम्हाला पाहून तुम्हाला आनंद झाला असला तरी तुम्हाला पाहून आम्हाला मुळीच आनंद झाला नाही असा त्या कटाक्षाचा स्पष्ट अर्थ होता.

रॅलेभवानीने आमच्या आडमुठेपणामळे बिघडलेले आपले प्रसाधन ठाकठीक करायला सुरवात केली. तितक्यात भम्पकराव सिगरेटस् घेऊन आले, माझ्याकडे न पाहताच त्यांनी एक सिगरेट तोंडात खुपसली व मिस् रॅलीच्या सिगरेटच्या जळत्या टोकावर आपली सिगरेट पेटवून उष्ण चुम्बनाचा विधि उरकला!

"त्रिम्बकराव"! म्हणून मी जोरात ओरडलो तेव्हा माझ्याकडे पाहात, दात विचकत ते उद्गारले

"ओ हो! वसंतराव, या. बसा. या मिस् रेळे. यांना . . .

"रेळे? की रॅले?" ध्यान गरजले.

"हो खरं म्हणजे रॅलेच. माझ्या लक्षातच राहत नाही."

"Triby, Darling, you are the limit !"

अगदीच भट आहेस बुवा तू. धड उच्चारही करता येत नाही माझ्या नावाचा तुला!"

भम्पकरावांना डार्लिंग म्हटलेले ऐकून आम्ही चाटच पडलो. भम्पकरावांना एखादी स्त्री–मग ती एखादे ध्यान का असेना — — डार्लिंग म्हणेल हे मला स्वप्नातही खरे वाटले नसते. पण सत्य स्वप्नापेक्षाही चमत्कृतिमय असते याचा प्रत्यय भम्पकरावांनी अनेकवेळा आणून दिला होता.

चूक दुरुस्त करून भम्पकराव पुन: ओळख करून देऊ लागले.

"या अन्नपूर्णा रॅले . . . .

"Cut that ghastly name out. Say Ann."

रॅलेबाई जोरात ओरडल्या.

घशातील वायूला सताड वाट करून देताना आपल्या तोंडात सिगरेट आहे याचे त्यांना भान न राहिल्यामुळे ती सिगरेट अलगद भम्पकरावांच्या पँटवर पडली.

रॅलीदेवीची सिगरेट म्हणून जळती असूनही भम्पकरावांनी ती मांडीवर राहू दिली.

अर्थात् व्हायचे तेच झाले. पँटने पेट घेतला.

"Oh ! how clumsy you are Triby"

म्हणून किंचाळत रॅलेभवानी आपणच लावलेली आग विझवण्यासाठी तीवर फुंकर घालू लागल्या. पण फुंकर घातल्याने ती अधिकच भडकली व भम्पकराव "आई" म्हणून ओरडले !

आतापर्यंतच्या अनेक नाट्यप्रसंगांनी भम्पकरावावरचा माझा राग थंडावत चाललाच होता, तो त्यांची ही आर्त किंकाळी ऐकून पार नाहीसा झाला व ती आग विझवण्यासाठी मी आसपास पाणी शोधू लागलो. पाणी कुठे दिसेना तेव्हा भम्पकरावांच्या टेबलावर नुकतीच भरलेली एक दौत होती तीच मी आगीवर उपडी केली.

आग शमली पण भम्पकरावांच्या पँटवर एक मोठे भोक व एक मोठा शाईचा डाग असे दोन गुणविशेष अवतीर्ण झाले.





"चांगला डाग पाडून ठेवला माझ्या पॅन्टवर तुम्ही" भम्पकराव खेकसले.

"तुमचा प्राण वाचवला याबद्दल आभार माना माझे" मीही रागावून प्रत्युत्तर दिले.

भम्पकरावांना चांगली सुनावली म्हणून थोडे समाधान वाटते न वाटते तोच भम्पकरावांनी मटकावलेली पॅन्ट ही त्यांची नसून माझीच आहे हे माझ्या लक्षात आले. आठवड्यापूर्वी ती शोधशोध शोधून दिसली नव्हती. नेहमी धोतर नेसणारे भम्पकराव मिस् "अॅन रॅले"वर इम्प्रेशन मारण्यासाठी पॅन्ट घालू लागले होते. या नवीन "सार्वजनिक" उपक्रमासाठी त्यांनी पहिली वर्गणी आमच्याकडून उपटली होती!

पॅन्ट चोरल्याबद्दल भम्पकरावांवर पुन: वीररसाचा प्रयोग करण्याच्या बेतात मी होतो तोच रॅलेबाईंनी अचानक माझा हात धरला व congrats करत माझ्याशी जोराने हस्तांदोलन केले.

हे कॉंग्रॅट्स् कशाबद्दल अशी आम्ही पृच्छा करायच्या आधीच "what presence of mind ! Triby, learn something from him" वगैरे वाक्ये रॅलेभवानीच्या मुखकमलातून निघाली.

एकूण अस्मादिकांनी भम्पकरावांचे प्राण वाचवले याचे भम्पकरावांना काहीच वाटत नसले तरी रॅलेदेवीच्या दरबारी ही सेवा रुजू झाली होती !

पण हे भम्पकरावांना खपावे कसे ? ते एकदम उसळले "हा वशा कसला presence of mind दाखवणार ? अन्न . . . अॅन ! मी गेल्या युद्धांत आफ्रिकेच्या आघाडीवर जनरल रोमेलशी लढलो तेव्हा . . .

"गेल्या युद्धांत लढलात तुम्ही त्रिम्बकराव !" मी शंका व्यक्त केली.

तिचे "चूप बस लेका" म्हणून भम्पकरावांनी समाधान केले.

या समाधानावर रॅलेबाईंनी Triby is a hero of forty battles असे भाष्य केले.

"अहो त्रिम्ब्याला मी जन्मापासूनच ओळखतो. पण तुमची ओळख झाली

नाही अजून" मधल्या अग्निप्रलयामुळे रॅलेबाईची "तारीफ" ऐकण्याचे काम राहून गेले होते ते पुरे करण्याच्या हेतूने मी म्हणालो.

"मिस् रॅले आमच्या नवरेसंघाच्या कायदेभंगात सक्रिय भाग घेणार आहेत" भम्पकरावांनी घोषणा केली.

मी चाटच पडलो!

"म्हणजे खरं म्हणता? धडधडत्या हृदयावर हात ठेवत मी विचारले.

"उद्या मी आणि ट्रिंबी मॅरेज करणार आहोत" रॅलेबाईंनी संशयाला जागाच ठेवली नाही.

"अहो पण यांचं झालंय् ना?" मी एक बाळबोध अडचण उपस्थित केली.

"झालंय् म्हणूनच तर यांच्याशी लग्न करण्यात मजा आहे" माझ्या बुद्धिमत्तेचो कींव करीत रॅलेदेवी उद्‌गारल्या.

"उद्याच्या नवरेयुगांत आमच्या दोघांच्या फोटोसकट ही बातमी – पहिल्या पानावर झळकेल." भम्पकरावांनी घोषणा केली.

नवरेयुगाला एकच पान असल्यामुळे कोणत्याही बातमीला पहिल्या पानावर झळकल्याशिवाय गत्यन्तरच नसे.

"उद्या सकाळी माझ्या घरी येऊन तुम्हीच मला Marriage Registry त घेऊन चला" रॅलेबाईंनी आम्हाला आज्ञा केली.

आम्ही निर्विकारपणे "हूँ" म्हणालो.

घरी परतलो तेव्हा रॅलेबाईंची आज्ञा अमलांत आणायचा मुळीच विचार नव्हता. पण दुसऱ्या दिवशी सकाळी नवरेयुगाचा अंक हाती पडला तेव्हा माझा हा बेत बदलू लागला. नवरेयुगात इंचभर अक्षरांत पुढील शीर्षपंक्ति होत्या.

आजच सकाळी त्रिम्बकराव नवरेयुगाचे तोरण बांधणार.

नवरेआघाडीचे रणशिंग वाजू लागले.





नवरेआघाडीचे रणशिंग वाजणार की भम्पकरावांचा शंख वाजणार हे स्पष्टच दिसत होते. पण काय ती मजा प्रत्यक्षच पाहण्याची मला दाट उत्कंठा वाटू लागली. रजिस्ट्रीचा अधिकारी भम्पकरावांना बहुपत्नीक होण्यात हातभार लावणे शक्य नव्हते.पण त्याला भम्पकरावांचे आधीच झाले आहे हा पत्ता लागणार नाही अशी भम्पकरावांना बळकट आशा दिसत होती.

भम्पकरावांच्या बळकट आशा, टोणगा प्रसवणाऱ्या भरंवशाच्या म्हशीप्रमाणें असत. रजिस्ट्रीच्या अधिकाऱ्याला भम्पकराव षट्‌भुज होणाच्या आधीच चतुर्भुज असल्याचा शोध लागेल व बहुपत्नीकत्वाचा कायदा मोडून सरकारचे घरजावई होण्याचा भम्पकरावांचा बेत गर्भगळित होईल असा माझा अंदाज होता.

पण खरोखर घडले असे की भम्पकरावांच्या भरवंशाच्या म्हशीचे बाळंतपणच झाले नाही व माझा अंदाज चुकून मीच गोत्यांत सापडलो.

नवरेयुगातली बातमी वाचल्यावर मी मोटर घेऊन मिस् "ॲन् रॅले"च्या निवासस्थानाकडे जाऊ लागलो. रॅलेभवानी नवरीच्या नेपथ्यांत अगदी तयार असतील अशी माझी अपेक्षा होती पण त्या अजून उठल्याच नाहीत असे कळले. त्यांना नेण्यासाठी मी आलो आहे असे कळवण्यास हॉस्टेलच्या चपराशाला सांगितले. तेव्हा त्या आपल्या झोपण्याच्या पोषाखांतच बाहेर आल्या.

"कपड्यावर जास्तीत जास्त पैसे खर्चून शरीराचा कमीतकमी भाग झांकणें म्हणजे सुधारणा," या सुधारणेच्या व्याख्येप्रमाणे रॅलेबाई अगदी सुधारकाग्रणी होत्या. पण एवढी सुधारणा अस्मादिकांना पचायला जडच होती. रॅलेबाईंच्या अवतारामुळे मलाच संकोच वाटू लागला. पण त्याला न जुमानता, त्या माझ्या जवळच येऊन बसल्या, व माझी समजूत काढू लागल्या.

"अहो आज आमच्या हॉस्टेलांत मी व माझी मैत्रीण एवढ्याच आहोत. बाकीच्या मुली सकाळीच सहलीला गेल्या. तेव्हा पोशाखाच्या बाबतीत अगदीच औपचारिक राहायची काही जरूर नाही. तुमची हरकत नसेल असं धरून चालते." रॅलेबाईंनी खुलासा केला.

"नाही, नाही, माझी कसली हरकत"! असे म्हणून मी कोच सोडून एका खुर्चीवर जाऊन बसलो व "इतर मुली नसल्या तरी त्यांनी स्वत:च्या विवाह-

समारंभासाठी वेषभूषा करून बाहेर पडायला हवं" अशी त्यांना नम्र सूचना केली. त्यावर त्या म्हणाल्या–

"Thank you for reminding me" !

"म्हणजे तुम्हाला आठवणच नव्हती ?" मी आश्चर्याने विचारले.

"आठवण नव्हतीसं नाही पण एवढी काय घाई आहे ?"

अहो विवाह नोंदणी म्हणजे सरकारी मामला. वेळेवर गेलं नाही तर appointment रद्द व्हायची.

"झाली तर झाली, दुसरी अपॉइन्टमेंट घेऊ."

"अन् भम्पकराव तिकडे कासावीस होतील ना"

'ट्रिबीची फार काळजी दिसते तुम्हाला !"

"बाळमित्र पडले ना ते आमचे !"

"मित्र चांगला जोडला मात्र ट्रिबीनं. काय प्रसंगावधान दाखवलंत त्या दिवशी." असे म्हणत रॅलेभवानी एक खुर्ची ओढून आमच्या जवळ येऊन बसल्या.

"कसचं, कसचं !" आम्ही अंग चोरून शालीनता प्रकट करू लागलो.

"तुम्ही मोठे लेखक आहात म्हणे" रॅलेदेवींनी दुसरा गोळा सोडला.

"कसले मोठे. राहवत नाही म्हणून काहीतरी खरडतो झालं पण आता किती वेळ थांबायचं ? उगीच उशीर कशाला ? चलायला पाहिजे.

"तुम्ही पिच्छा सोडत नाहीच म्हणायचे.चला तर मग" असे म्हणून ॲनबाई आंत गेल्या. विवाहदिवशी तरी त्या धड पोशाख करतील अशी मला आशा होती. पण त्या एकदोन मिनिटातच सदरा पॅंट घालून बाहेर आल्या."

मोटरीत शिरल्यावर त्या सारथ्याच्या जागीच बसल्या व "आज मी

* हा खुलासा आम्ही मर्त्य भाषेत सांगितला आहे. पण रॅलेबाईचे सर्व भाषण नवभारताच्या देवभाषेत होत असे.





चालवणार तुमची मोटर" म्हणून त्यांनी आपला निर्धार जाहीर केला.

रॅलेभवानीने मोटर अशी भरधाव सोडली की परवाच एका विमा एजन्टाला परत पाठवल्याबद्दल मला पश्चात्ताप होऊं लागला. पाटीदप्तर घेऊन एक मुलगा चालला होता त्याच्या शरीरावरून आता मोटरचे चाक जाणार म्हणून आम्ही आर्तस्वराने पितृपादांचे नामस्मरण केले तोच रॅलेभवानीने जोराने सुकाणू फिरवले ! बाकीच्या मोटरीशी समोरच्या चाकानी समकोण केला व मोटरीने उजवीकडे मुसण्डी मारली. आम्ही रॅलेबाईच्या अंगावर कोसळलो. तोच एक म्हैस उजव्या चाकासमोर स्थितप्रज्ञासारखी रवन्थ करीत उभी असलेली दिसली. रॅलेबाईनी तात्काळ डावीकडे गरगर चाक फिरवले तो आम्ही मोटारीच्या डाव्या दारावर जाऊन आदळलो. उजव्या बाजूच्या म्हशीला टाळण्यासाठी मोटर इतकी डावीकडे गेली की आता बाजूच्या नाल्यात पडणार इतक्यात रॅलेबाईनी पुन: उजवीकडे वळवून रस्त्यावर आणली. आम्ही पुन: त्यांच्या देहावर थडकलो !

"फारच नर्व्हस दिसता तुम्ही ! किती घाम आलाय् तुम्हाला !" म्हणून रॅलेबाईनी डाव्या हाताने -- म्हणजे रुमालाने नव्हे, नुसत्या हाताने -- आमचा घाम पुसायला सुरवात केली !

आता मात्र आम्हाला खरोखर व दरदरून घाम सुटला व आम्ही लगेच दाराजवळ सरकून बसलो.

'पुरुषासारखे पुरुष तुम्ही अन् बायकासारखे लाजता" रॅलेबाईनी भाष्य केल.

"आता मी मोटर चालवू का ? आपल्याला फार श्रम झाले असतील" मी भीतभीत विचारले.

"छे ! छे ! कसले श्रम ! तुम्हाला काय वाटतं मी अपघात करणार होते ! मी मुद्दामच थोडी गंमत केली, तुमचा touch me not पणा घालवायला.

यावर आम्ही काय बोलणार !

हे शब्द रॅलेभवानीच्या तोंडून न निघता एखाद्या सुंदरीच्या मुखातून निघाले

असते तर – – – असा एक विचार मनाला चाटून गेला.

पण सौ. चे स्मरण करीत तो आम्ही दाबून टाकला.

मोटरीने आपले तांडवनृत्य सोडून थोडचा सन्थ गतीचा अवलंब केला तेव्हा थोडे हायसे वाटून रस्त्याकडे दृष्टिक्षेप केला. मोटर विवाहदप्तराकडे जात नसून शहराबाहेर जात आहे हे लक्षात आले.

"रस्ता चुकलात तुम्ही" आम्ही हटकले.

"रस्ता चूक की बरोबर हे कुठे जायचे यावर अवलंबून आहे" लहान मुलाला दोन न् दोन चार असे शिकवावे त्या सुरात रॅलेबाई बोलत्या झाल्या.

"म्हणजे लग्नाला जायचं नाही का तुम्हाला ?"

"जाऊं सावकाश. लग्न काही पळून जात नाही."

"पण तिकडे भम्पकरावांचा प्राण कासावीस होईल ना."

"ट्रिबीची भलतीच काळजी असते तुम्हाला !"

रॅलेदेवीच्या हातात मोटर असल्यामुळे त्या नेतील तिकडे जाणे प्राप्त होते. जे जे होईल ते ते पहावे या मार्गाचा अवलंब करून आम्ही स्वस्थ बसलो.

मोटर एका नदीजवळ उभी राहिली. "चला थोडी मोकळी हवा खाऊ" असे म्हणत रॅलेबाई खाली उतरल्या व नदीकाठी एका खडकावर जाऊन बसल्या.

प्रकृतीच्या फेऱ्यात सापडलेल्या पुरुषाप्रमाणे आम्हीही तेथे जाऊन बसलो.

घटकाभर कोणीच काही बोलले नाही. मग रॅलेदेवींनी बोलायला सुरवात केली.

ट्रिबीशी लग्न करून कायदेभंग करावा असं मला वाटत होतं. पण त्या दिवशी तुम्ही "नवरेयुगा"च्या ऑफिसात भेटलात तेव्हापासून माझा विचार डळमळू लागला. तुमचं प्रसंगावधान, बुद्धिमत्ता वगैरे पाहून मी आकृष्ट झाले. कायदेभंगच करायचा तर ट्रिबीबरोबर कशाला ! तुम्ही. . .





हे सारं ऐकत असतांना माझे डोळे पांढरे होऊ लागले. तिकडे भम्पकराव वाट पाहतील, वाट पाहून थकल्यावर आमच्या घरी जातील, सौ. ला आम्ही मोटर घेऊन कुठे गेलो ते कळेल ! रॅलेदेवी घरीही नाहीत असे पाहून आम्ही त्यांच्या भावी वधूला पळवली म्हणून भम्पकराव पोलिसात तक्रार गुदरतील अशी सारी भीषण दृश्ये दृष्टीसमोर थय्थय् नाचू लागली.

तो थयथयाट असह्य होऊन जवळच्याच एका गवताळ मऊ जमिनीवर आम्ही अलगद बेशुद्ध पडलो.

# संशोधन खात्यात भम्पकराव

प्रधानमंत्री वा राष्ट्रपति होण्याचा योग अजून येत नाही. नोकरी करा म्हणून बायको सारखा मागे लकडा लावीत आहे, पण पाच हजाराखाली नोकरी करणार नाही अशी प्रतिज्ञा केल्यामुळे नोकरी लागत नाही अशी भम्पकरावांची अवस्था झाली होती.

या परिस्थितीत वर्ष गेल्यावर त्यांची मिळवती बायको कडाडली.

"तुमचे पाच हजार जाऊ द्या चुलीत. महिन्याच्या आंत कारकुनाची असो नाहीतर चपराशाची असो, नोकरी धरा. नाहीतर या घरात तुम्हाला जेवायला मिळणार नाही."

झाले. निरुपाय होऊन भम्पकराव नेहमीप्रमाणे माझ्याकडे आले.

"काय त्रिम्बकराव, लागली का नोकरी?" आम्ही मर्मावर धाव घातला.

मर्मावर धाव बसल्याबरोबर त्यांच्यातला भम्पकराव जागृत झाला व ते म्हणाले —





"अहो न मिळायला काय झालं? टाटा मुंबईतले आपले एक ऑफिस सांभाळण्यासाठी आठ हजारावर बोलावीत होते. पण मी म्हटलं तुम्हा भांडवल-शहांचा मजुरांना पिळून मिळविलेला पैसा मला नको. त्यानंतर जिनीव्हामधील एक ऑफिस चालविण्यासाठी युनायटेड नेशन्सची दहा हजाराची ऑफर आली. पण मी म्हटले, "तुमच्या युनायटेड नेशन्सचा काय भरंवसा? आज नोकरीवर येईन व बड्या बड्या राष्ट्रांत कटकटी उद्‌भवून युनायटेड नेशन्सचा बोऱ्या वाजेल व मला घरी बसावे लागेल, मी आपला बहुमूल्य वेळ खर्चून असल्या आळवावरच्या पाण्याचे हार बांधू इच्छित नाही. त्यानंतर ..."

भम्पकरावांना मिळालेल्या बड्या नोकऱ्यांची यादी आपण संपविल्याशिवाय संपणार नाही म्हणून मी मध्येच तोंड खुपसले.

"तात्पर्य काय की, गेल्या एकदोन महिन्यात दररोज एक दोन तरी पाच हजारावरील नोकऱ्या तुम्ही ठोकरुन दिल्या. मग आता काय विचार आहे?"

"आता असा विचार आहे की, पैशाची फिकिर न करता मानवी ज्ञानात भर घालण्याच्या कामात काळ कंठावा. तुमच्या संशोधनखात्यात घेता का मला?"

"अहो त्रिम्बकराव, माझ्या हातात फक्त शंभर ते दीडशेच्या जागा आहेत. अधिकाऱ्यांच्या जागा सर्व यू.पी. एस्.सी.च्या मार्फत भरतात."

"अहो पाहिजे आहे कोणाला अधिकाऱ्याची जागा? नुसता लठ्ठ पगार घ्यायचा न् झोपा काढायच्या. मला ज्ञानाची सेवा करावयाची आहे, पैशाची नव्हे. एखाद्या असिस्टंटची जागा असेल तर ..."

शेवटी खटपट करून दीडशे रुपयाची एका दुय्यम सहायकाची जागा मी भम्पकरावांना मिळवून दिली.

लवकरच झक् मारली न् भम्पकरावांवर उपकार करायला गेलो असे मला होऊन गेले. पहिल्याच दिवशी कार्यालयांत गेलो तेव्हा भम्पकराव माझ्या खोलीत माझ्याच खुर्चीत बसलेले दिसले. बाहेर भम्पकराव माझे मित्र असले तरी कार्यालयात त्यांच्या व माझ्या हुद्द्यात पाच पायऱ्यांचा फरक होता. पण हे त्यांच्या गावीही नव्हते. मला पाहताच "या .. वसंतराव!" म्हणून त्यांनी टाहो फोडला.

मी जरा कठोर आवाजात म्हणालो–

‘ हे पहा त्रिम्बकराव, तुम्ही माझे मित्र आहात ते घरी, येथे तुम्ही पाच पायऱ्या खाली आहात हे समजून इतर दुय्यम सहायकासारखेच माझ्याशी वागले पाहिजे. मला वसंतराव न म्हणता सर म्हटले पाहिजे. हो शिस्त तुम्ही पाळली नाही तर सारी मैत्री विसरून मला तुमच्या विरुद्ध सरकारी कारवाई करावी लागेल.”

बऱ्या बोलाने ऐकतील तर ते त्रिम्बकराव कसचे! त्यांनी नेहमीच्याच सुरांत सुरवात केली–

“या बूर्झ्वा कल्पना ………”

“गेट आऊट” मी गरजलो.

भम्पकरावांनी माझा हा अवतार कधीच पाहिला नव्हता. भम्पकराव माझी कार्यालयातील प्रतिष्ठा धुळीस मिळविणार या भीतीने मला अवसान आले होते.

भम्पकराव मुकाट्याने बाहेर गेले.

हा आमच्या कार्यालयातील भम्पकराव नाटकाचा पहिला अंक.

## अंक दुसरा

दुसऱ्या दिवशी एक छापील पत्रिका माझ्या टेबलावर ठेवलेली आढळली.

त्रिम्बकरावसेवासंघ

महात्मा त्रिम्बकराव दन्ताळे वाढदिवस

वेळ — १३ ऑगस्ट १९७१, सकाळी ११ वाजता

स्थळ – त्रिम्बकराव दन्ताळे यांचा बंगला

सर्वांनी अगत्य यावे. अल्पाहार होईल. नाइलाज झाल्याशिवाय भेटी आणू नयेत.





या छापील अक्षरांच्या खाली भम्पकरावांनी स्वहस्ते लिहिले होते —

“कार्यालयातील सहकाऱ्यांसाठी कार्यालयातून जाण्यासाठी वाहनाची सोय करण्यात येईल.”

भम्पकराव कामाच्या वेळी स्वतःचा वाढदिवस साजरा करणार एवढेच नव्हे तर साऱ्या कार्यालयाला घेऊन जाणार हे पाहून माझ्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्यांना बोलावून चांगले सुनावण्याचा विचार करू लागलो तोच माझे लक्ष समोरच्या कालदर्शकाकडे गेले. १३ ऑगस्टला जन्माष्टमीची सुट्टी होती. चला, भम्पकरावांना निदान सुट्टीच्या दिवशी तरी जन्मास येण्याची बुद्धी सुचली याबद्दल आभार मानतो तोच आठवण झाली, १३ ऑगस्ट हा भम्पकरावांचा वाढदिवस कधीपासून झाला? मागे एकदा २५ डिसेंबरला त्यांनी आपला वाढदिवस साजरा केला होता. भम्पकरावांना विचारावे म्हणून त्यांना बोलावले. तो ते नेहमीप्रमाणे जागेवर नव्हते. तेव्हा त्यांच्या सौभाग्यवतींना शाळेत फोन करून विचारले, त्या म्हणाल्या –

“ते काही विचारु नका! रामनवमी, कृष्ण जन्माष्टमी, ख्रिस्त जयंती, बुद्ध पूर्णिमा, वगैरे सर्व त्यांचेच वाढदिवस आहेत. यापैकी कोणताही ते आपला वाढदिवस म्हणून साजरा करतात.”

“आणि त्रिम्बकराव सेवासंघाच्या अध्यक्ष तुम्ही वाटत! सदस्य कोण कोण आहेत?”

“अध्यक्ष, सदस्य सर्व काही तेच आहेत.”

इतक्यात भम्पकराव आंत आले “वाढदिवसाला अवश्य यावे” त्यांनी विनंती केली.

“अर्थात्” मी दाटून उत्तर दिले.

खोल्याखोल्यातून फिरून भम्पकरावांनी आमंत्रण दिले. सर्वांनी येण्याचे तोंडभर आश्वासन दिले.

## संशोधनखात्यात भम्पकराव

भम्पकराव जयंती आली व गेली. मला भम्पकराव नजरेसमोरुन हलल्यावर त्यांच्या आमंत्रणाचा जो विसर पडला तो पुन्हा घरी भेटायला येईपर्यंत कायम होता .........

"कसं काय भम्पकराव !" मी विचारले.

माझ्या, प्रश्नाला उत्तर मिळण्याच्या आंतच एक सहा फूटी भक्कम देहाचा सरदारजी आंत आला. मी प्रश्नार्थक मुद्रेने त्याच्याकडे पाहू लागलो तोच भम्पकरावांनी खुलासा केला—

"वाढदिवसाला सगळ्यांना नेण्यासाठी मी बस घेऊन ऑफिसात गेलो. तासभर वाट पाहिली. पण ऑफिसात चिटपांखरू देखील नव्हते. माझ्या वाढदिवसाला मोठा जनसमर्द लोटला होता. पण आपल्या ऑफिसातून मात्र कुणीच आले नाही. हा सरदारजी बसचे पन्नास रुपये टाका म्हणून मानगुटीस बसला आहे. रुपये टाका नाहीतर मारीन म्हणतो."

"सुट्टीच्या दिवशी तुमच्या वाढदिवसासाठी ऑफिसात कोण येणार त्रिम्बकराव ?"

माझ्या प्रश्नाचे उत्तर देण्याच्या मन:स्थितीत भम्पकराव नव्हते. कापल्या आवाजात त्यांनी विचारलं—

"पण पन्नास रुपयाचं काय ?"

"त्रिम्बकरावसेवासंघाच्या निधीतून द्या ना पैसे !"

"संघाचे सर्व पैसे वाढदिवसांत संपले."

"मग सौ. त्रिम्बकरावांना म्हणा, राखा नवऱ्याची लाज"

हं, त्या नवऱ्याची लाज राखणार ! त्या म्हणतात, "तुम्हाला अशीच अद्दल घडली पाहिजे."

"अरेरे ! मग आता काय ?"





आपत्काली जो उपयोगी पडतो तोच खरा मित्र. भम्पकरावांच्या तोंडून सुभाषित बाहेर पडले.

तुम्ही आपत्ती ओढवून घ्यायच्या न् आम्ही त्या निस्तरायच्या असं किती दिवस चालेल त्रिंबकराव ?

"पण तुम्हा लोकांच्या सोयीसाठीच मी बस केली होती." मी तुमचा उपकारकर्ता व तुम्ही मात्र कृतघ्न अशा अविर्भावात त्रिंबकराव उत्तरले.

"तो फिर पैसा नही मिलता !" सरदारजीने दरवाजातून भम्पकरावांना विचारले.

त्या दरडावणीने भम्पकरावांचा चेहरा सिंहाच्या जबड्यात सापडलेल्या कोकरासारखा झाला. तेव्हा मला त्रिंबकरावांची दया आली व म्हणालो–

"सरदारजी, जरा सबूर, मी यांचा साहेब आहे. पुढच्या महिन्यात यांच्या पगारातून कापून पन्नास ऐवजी साठ रुपये देऊ. सध्या यांना सोडून द्या." "त्रिंबकराव ! साठ रुपये पगारातून कापून घ्यावे म्हणून अर्ज लिहून द्या..." "सरदारजीलाही पुढच्या महिन्यात साठ रुपये देईन असे लिहून द्या..."

भम्पकरावांनी मुकाट्याने अर्ज लिहून दिला. सरदारजीलाही पुढच्या महिन्यात साठ रुपये देईन असे लिहून दिले तेव्हा सरदारजी परत गेला.

## अंक तिसरा

कार्यालयाच्या खोलीत पाय ठेवताच एक दहा पानी निवेदन माझ्या टेबलावर ठेवलेले आढळले. निवेदन भम्पकरावांचे होते. ते येणेप्रमाणे–

प्रि. वसंतराव, नव्हे तर,

माझ्या सान्निध्याचा लाभ तुमच्या खात्याला देण्याच्या उद्देशाने मी काल पासून म्हणजे बरेच दिवसापासून रुजू झालो, पण माझे सहकारी दुय्यमसहाय्यक निवडतांना तुमच्या खात्याने काहीच चोखंदळपणा दाखविलेला दिसत नाही.

अगदी नालायक लोक आहेत. चौघांच्या चार तऱ्हा आहेत. अन् त्या खोलीत मनस्वी उकाडा. म्हणून मी जरा बुश शर्ट, बनियन काढून पंख्याखाली बसलो. पंखा लावणाऱ्याने पंखा खुर्चीच्या वर न लावता टेबलाच्या वर लावला म्हणून मला टेबलावर बसावे लागले. त्याला मी काय करू ? पण एवढ्यानेच कु (म्हणजे कुमारी असे म्हणतात, वस्तुत: त्यांच्या बाबतीत कु म्हणजे वाईट असा गीर्वाण अर्थ केला पाहिजे) वळवळे म्हणाल्या, "अहो सरळ आमच्या टेबलावर विवस्त्र होऊन फतकल मारू न बसलात ! ही काय रीत झाली!" दुसरे लुडबुडे त्याबरोबर फिदीफिदी हसत म्हणाले. "अहो त्रिबकराव. दाढी करताना वस्तरा तुमच्या छातीवर व पोटावरही फिरू देत जा. या सेक्युलर राज्याला डुकराचा विटाळ होतो." तिसरे करकरे की कुरकुरे "लंबोदर पीतांबर" वगैरे आरती करू लागले.

कु. वळवळे यांना आपण कपडे घालून बसलो आहोत असे वाटत होते. पण दोन्ही बाजूने जळणाऱ्या मेणबत्तीप्रमाणे त्यांचा ब्लाऊज वरून व खालून आकुंचन पावत अदृश्य होण्याच्या मार्गाला लागला आहे. त्यांच्या पारदर्शक साडीतून "सुस्वागतम्" अशी अक्षरे लिहिलेला परकर देखील स्पष्ट दिसतो. लुडबुड्यांना आमच्या अंगावरच्या केसांचा हेवा वाटतो. साहजिक आहे. जिसके बदन पे नही बूरा व नही मरद पूरा. हे लुडबुडे अर्धे मर्दच असणार...

"माझ्या सिहकटीला लंबोदर म्हणणाऱ्या या करकऱ्यांना डोळे आहेत की नुसतीच गुडगुडीची भोकं आहेत ? . . ."

त्रिबकरावांचे सर्व निवेदन वाचणे शक्यच नव्हते. टेबलावर उघडेबंब बसणे कार्यालयाच्या शिस्ती विरुद्ध आहे. भम्पकरावांनी यापुढे असा प्रकार करता कामा नये, जे काय निवेदन पाठवायचे असेल ते सरळ माझ्याकडे न पाठवता खालील अधिकाऱ्याच्या मार्फत पाठवले पाहिजे असा शेरा मारून भम्पकरावांचे निवेदन मी त्यांच्याकडे रवाना केले.

या शेऱ्याचा परिणाम होऊन भम्पकरावांचा लेखनद्वारा व भाषणद्वारा आम्हाला साक्षात्कार होणे बंद झाले.

पण भम्पकरावांच्या पराक्रमाचा डंका लवकरच आमच्या कर्णपथावर आदळल्याशिवाय राहिला नाही.





## अंक चवथा

माझ्या दुय्यम श्रीमती घोष एक दिवस माझ्याकडे आल्या व म्हणाल्या–

"साहेब तुमच्या त्या दन्ताळ्यांनी तर उच्छाद मांडलाय."

"काय झालं?" मी विचारलं.

त्यावर घोषबाईंनी भम्पकरावांचे पुढील लीळाचरित्र ऐकवले.

"एक दिवस पंख्याच्या खाली स्वत:साठी एक खुर्ची व स्टूल मांडून त्यांनी टेबल भिंतीशी सरकवलं, व बाकीच्यांच्या खुर्च्या टेबलाशी मांडून ठेवल्या तेव्हा बाकीच्यांनी मिळून त्रिंकरावांची खुर्ची व स्टूल ढकलून पुन: पूर्वीच्या स्थानावर ठेवलं.त्रिम्बकराव अडथळा करू लागले तेव्हा करकऱ्यांनी त्यांना दूर ढकलून दिले."

दन्ताळे हे गाऱ्हाणे मला दोन तास ऐकवत होते. दोष तुमचाच आहे असे त्यांना सांगून मी परत पाठवले. पुन: दुसऱ्या दिवशी ते तक्रार घेऊन आले की, कु.वळवळ्यांचे पाठपोट उघडेच असते. त्यामुळे आमचे कामात लक्ष लागत नाही.

मी त्यांना सांगितले, "आजकाल तशीच फॅशन आहे. खोलीत इतरही लोक आहेत, त्यांचे कसे कामात लक्ष लागते ?"

त्यावर ते म्हणाले, "ते सर्व डांबिस लोक आहेत, त्यांना काय पाठचेच नव्हे तर कमरेचंही सोडून वळवळे नाचल्या तरी हवंच आहे, पण मी सभ्य माणूस आहे."

मी त्यांना सांगितलं "तुमचा सभ्यपणा या बाबतीत थोडा कमी करावा लागेल."

तिसऱ्या दिवशी पुन: त्रिम्बकराव मी यायच्या आधीच माझ्या खोलीत बसलेले दिसले. "आज काय झालं?" मी विचारलं. ते म्हणाले, "मी आज केवळ एक वरिष्ठ अधिकारी म्हणून नव्हे तर एक स्त्री म्हणून तुमचा सल्ला घ्यायला आलो आहे मी त्यांना साफ सांगितलं, "माझे व तुमचे संबध केवळ वरिष्ठ व कनिष्ठ असे आहेत. मी तुमच्यापुढे केवळ एक स्त्री म्हणून बसले नसून तुमची वरिष्ठ

म्हणून बसले आहे हे तुम्ही विसरता कामा नये." तेव्हा ते म्हणाले, "मी तुमचा सल्ला स्त्री म्हणून घेणार असलो तरी त्यांचा संबध या कार्यालयातल्या वातावरणाशीच आहे म्हणून माझे वरिष्ठ या नात्याने देखील तुम्ही मला सल्ला दिलाच पाहिजे."

"वरंय् काय आहे तुमची भानगड ?" मी विचारलं. तेव्हा ते म्हणाले "माझ्या आगमनामुळे या ऑफिसचं वातावरण बिघडत चाललं आहे.

"ते आम्हाला तुम्ही आल्यावर एक दोन दिवसांतच कळलं. तुम्हाला याची जाणीव आहे यावरून सुधारणा होण्याची आशा दिसते."

मी असं म्हटल्यावर त्रिम्बकरावांचा चेहरा एकदम प्रफुल्ल झाला व ते म्हणाले—

"म्हणूनच तर मी तुमच्याकडे येतो."

मला त्याच्या बोलण्याचा अर्थच कळेना पण फार वेळ त्याबद्दल डोकं खाजवावं लागलं नाही. त्रिम्बकराव बोलते झाले—

"या ऑफिसातल्या साऱ्या स्त्रिया माझ्यामागे लागल्या आहेत. मी विवाहित आहे हे सगळ्यांना माहित आहे तरी हा ससेमिरा सुटत नाही. ही वळवळेच पहा मी आलो की पदर सावरण्याच्या मिषाने खाली पाडते, आरसा काढून केस ठाकठीक करते, लिप्स्टिक लावते, न् ती सरदारणी ? मला पाहताच तिचे गाल गुलाबी होतात. एकदा ती मला म्हणाली "त्रिम्बकराव तुमच्या रोल्स राइसमध्ये एकदा आम्हाला काश्मीरला घेवून चला."

"रोल्स राइस ?" मी विचारलं.

"आमच्या घरी रोल्स राइस आहे." त्रिम्बकरावांनी माहिती पुरविली.

ऑफिसात तर तुम्ही सायकलवर येता !

"वैभवाचं प्रदर्शन करणं मला आवडत नाही. मी असा गरीबासारखा राहतो तरी ही स्थिती ! मग रोल्स राइस घेऊन येऊ लागलो तर या बापड्यांचे





काय होईल ? तात्पर्य, माझा ध्यास लागल्यामुळे या मुलीकडून काम होत नाही. तेव्हा काय करावं याचा सल्ला मागायला मी आलो आहे."

'भम्पकराव धन्य आहात!' आमच्या तोंडून अभावितपणे उद्गार बाहेर पडला.

श्रीमती घोष पुढे म्हणाल्या. "मी त्यांना करडया आवाजात सांगितलं—

"त्रिम्बकराव ! त्या मुली काम करतात की नाही हे पाहाण्यास आम्ही समर्थ आहोत. तुम्ही मात्र आल्यापासून काडीचंही काम केलं नाही. असे फाजिल स्वप्नरंजन करण्यापेक्षा थोडं काम कराल तर बरं होईल. गेले सात दिवस तुम्ही रोज माझ्या खोलीत येऊन वायफळ बोलण्यात माझा वेळ दवडता.यापुढे –सुपरिटेंडेंट–च्या मार्फत परवानगी काढल्याशिवाय मला भेटायला येत जाऊ नका. तुम्ही जाऊ शकता."

"यानंतर तीन चार दिवस थोडी उसंत मिळाली. कु. वळवळेला त्रिम्बकरावांत काही सुधारणा आहे काय म्हणून विचारलं तर ती हसायला लागली. खोदून विचारताच म्हणाली,

त्रिम्बकरावांना वेड लागलंय्

कसं काय ?

"सांगू का ?"

"हो सांगावसं म्हणूनच तर विचारले"

"ते तुमच्या यजमानांचा पत्ता विचारत होते. म्हणाले त्यांच्याकडे तक्रार करायची आहे"

"वेड लागलंय् खरंच पण हे वेड नुसत्या पत्त्यावर थांबले नाही. हे पहा एक निनावी पत्र माझ्या यजमानांना आलं आहे.त्रिम्बकरावांशिवाय कुणाचं असणार?" म्हणून मी तिला पत्र दाखवलं ते हे —

"तुमच्या पत्नीचं माझ्यावर प्रेम बसलं आहे. माझ्याकडून तिला काहीच उत्तेजन मिळणार नाही पण मी एक साळसूद निघालो तरी स्त्रीचा फायदा घेणारे दुसरे भामटे असणारच तेव्हा सावध असा !!!"

भम्पकरावांची काही व्यवस्था केलीच पाहिजे, कितीही ताकीद दिली तरी कुत्र्याचं शेपूट सरळ होणार नाही. त्यांना माझ्याच कार्यालयात नोकरी देववून मी आपल्या सदऱ्याखाली उन्दीर घुसवून घेतला. आता तो बाहेर कसा काढावा याची चिंता करण्यात एक दोन दिवस निघून गेले.

एकदा टयूबमधून बाहेर काढलेली पेस्ट परत टयूबमध्ये घालणे जेवढे कठीण तेवढेच एकदा सरकारी नोकरीत शिरलेल्या इसमाला बाहेर काढणे कठीण. शिवाय भम्पकरावांच्या बाबतीत ताबडतोब कठोर उपाययोजना न करता प्रकरण हाताबाहेर गेल्यावर शंख करीत बसण्याची आमची खोड सुटता सुटत नव्हती.

शेवटी भम्पकरावच मदतीला धावून आले.

"फार महत्वाच्या कामासाठी त्रिम्बकराव भेटू इच्छितात, त्यांना भेट घेऊ द्यावी असे श्रीमती घोषांनी सांगितले, म्हणून भम्पकरावांना भेटीस बोला–विले ते म्हणाले—

"माझ्या या खात्याविरुद्ध फार तक्रारी आहेत. एक तर मला काम करायला स्वतंत्र खोली नाही. बाकीच्या लोकांचा मनस्वी त्रास होतो. कुणी काम करू देत नाही. शिवाय स्वतंत्र खोली असली तरी ही उकडहांडी काम करू देणार नाही. तेव्हा खोलीत एक कूलर पाहिजे. शिवाय चहा कॉफी प्यायला मला सतरा वेळा बाहेर जावं लागतं. तो वेळ वाचवण्यासाठी एक चपराशी हवा म्हणजे तो खोलीत सारं आणून देईल.पण ते सारं शारीरिक शीण घालविण्यासाठी. संशोधनकार्याचा मानसिक शीण घालवायचीही काही व्यवस्था पाहिजे. तसा मी आमचा ट्रांझीस्टर बरोबर आणतोच. पण त्यापेक्षा सरकारनंच आपल्या खर्चानं एखादा रेडिओग्राम व टी.व्ही. लावल्यास .........

"त्रिम्बकराव तुम्ही मागता ते सर्व मन्त्र्यांच्या खोलीत देखील असत नाही"

"मन्त्र्यांना माझ्याइतका डोकं शिणवावं लागत नाही"

"तुमच्या सहकाऱ्यांना तर शिणवावं लागतं ना?"

"त्यांना डोकी आहेतच कुठे?"





'म्हणजे सगळ्या जगात फक्त तुम्हालाच डोकं आहे! तुम्ही बृहस्पति आहात पण सरकारी यंत्रणेप्रमाणे तुम्ही मागता ते सर्व तुम्हाला देता येत नाही. त्याशिवाय तुमचे काम होत नसेल तर तुम्ही राजिनामा द्या."

"कबूल!" म्हणून लगेच भम्पकरावांनी, राजिनामा लिहून आणला. दुसऱ्या दिवशी भम्पकरावांच्या लीलांचे वर्णन करून त्यांचा राजिनामा वरिष्ठांनी शक्य तितक्या लवकर मंजूर करावा म्हणून मी वर शिफारस पाठवणार होतो तोच सौ. त्रिम्बकरावांचा फोन आला–

"त्यांचा राजिनामा वर पाठवू नका. मी त्यांना तो परत घ्यायला सांगते. मोठ्या कष्टाने नोकरी मिळाली आहे, ती टिकवली पाहिजे."

वहिनीची अशी काकुळतीची विनंती आल्यावर तिला मान न देणे अशक्य होते. दोन चार दिवसांनी भम्पकराव राजिनामा परत मागायला येतील अशा समजुतीने मी तो वरिष्ठाकडे न पाठविता स्वत:जवळच राहू दिला.

राजिनामा दिल्यावर भम्पकरावांचे प्रताप अधिकच जोरावले. एके दिवशी ते पुन: पूर्वीप्रमाणे माझ्या खुर्चीत स्थानापन्न झालेले दिसले. मी खवळलो—

"त्रिम्बकराव! मला हे चालणार नाही म्हणून मी साफ सांगितलं होतं ना? मग पुन: इथे का बसलात?"

"मी आता राजिनामा दिलाय् ना. आता ऑफिसचे धरबंध कशाला पाळायचे?"

"तुमचा राजिनामा मंजूर होईपर्यंत तुम्हाला ते पाळावेच लागतील. आणि तुम्ही या नोकरीचा राजिनामा पाठविल्यावर लगेच याच्या वरच्या अधिका–ऱ्याच्या जागेसाठी अर्ज पाठविला आहे. हे कसे काय? ही जागा मिळाल्यावर तुम्हाला कूलर व टी.व्ही. मिळेल असे वाटते काय?"

"निदान स्वतंत्र खोली तरी मिळेल की नाही? बाकीचे पुढे पाहू"

भम्पकरावांचे कार्यालयातील पराक्रम अजून कागदावर नमूद झालेले

नव्हते. म्हणून त्यांना यू.पी.एस्.सी. ने मुलाखतीस बोलावले. या मुलाखतीसाठी सल्लागार म्हणून मला आमंत्रण होते. भम्पकरावांची मुलाखत अगदी संस्मरणीय झाली. ती अशी–

भम्पकराव आत आले ते दोन्ही हात वर करून सगळ्यांना आशीर्वाद देत. त्यांची दाढी वीटभर वाढलेली होती. डोक्यावरचे केसदेखील वीटभरचे होते. अशी त्यांनी डोक्यावर व तोंडावर केसांची समता साधली होती. अंगात किंचित् भगवी झाक मारणारा कुडता होता. त्याला बहुधा त्रिम्बकरावांच्या एकदोन पिढयापासून पाण्याचा स्पर्श झाला नव्हता. रेशीम जेवढें मळेल तेवढे अधिक खुलून दिसते असा त्रिम्बकरावांचा सिद्धांत होता. त्यांच्या गळयात एक ताईत होता. त्यावर त्यांचा स्वत:चाच फोटो होता. भम्पकराव आल्याबरोबर कुणी न सांगताच स्थानापन्न झाले व गळयातला ताईत काढायचा प्रयत्न करू लागले. त्याची साखळी त्यांच्या हनुवटीस अडकली. ती निघता निघेना.

त्रिम्बकराव तिची सारखी ओढाताण करू लागले.

आम्हाला या प्रकाराचा बोधच झाला नाही. निवडसमितीचे सदस्य एक–मेकांच्या तोंडाकडे पाहू लागले. शेवटी भम्पकरावांनी खसकन् ओढल्यामुळे साखळी तुटली व ताईत बाहेर निघाला.

"हे पहा" म्हणून त्यांनी तो अध्यक्षांच्या हातात दिला. अध्यक्षांनी थोडा वेळ पाहून इतर सदस्यांना तो पाहायला दिला व हे तुम्ही कशासाठी दाखवता म्हणून भम्पकरावांना विचारले. तेव्हा ते म्हणाले–

"तो माझाच फोटो आहे"

"हो ते आम्ही ओळखलं"

"दिव्याखाली धरून पाहिलं की, डोक्याच्या मागे देवादिकांना दिसतो तसा ऑरा [तेजोवलय] दिसतो."

"बरं मग"

"तुम्हाला वाटेल ही फोटो काढणाऱ्यांची करामत आहे. पण तसं नाही. मला खरोखरीच ऑरा आहे. श्रद्धापूर्वक पाहिल्यास तो दिसतो."





"तुम्ही इथं नोकरी मागण्यास आला आहात. या टॉमफूलरीचा काय अर्थ?"

"टॉमफूलरी नाही. एवढा ऑरा असलेल्या पुरुषास सोडून तुम्ही दुसऱ्या कोणाला पसंत कराल हे शक्य नाही.

"मला वाटतं या उमेदवाराला जाऊ द्यावं" एक सदस्य म्हणाले.

त्यावर अध्यक्ष डोळे मिचकावून म्हणाले "थोडे श्रद्धापूर्वक यांच्या ऑऱ्या–कडे पाहू या. पाच मिनिटे धीर धरा" व त्यांनी भम्पकरावांशी बोलण्यास सुर–वात केली.

"तुम्हास ऑरा आहेसा वाटतो खरा"

हे ऐकताच द्या टाळी अंशा अविर्भावत त्रिम्बकरावांनी हात पुढे केला. पण अध्यक्षांनी हात पुढे न केल्यामुळे त्यांना तो परत मागे घ्यावा लागला.

अध्यक्षांनी प्रश्न विचारायला सुरवात केली.

"तुमचा हा ऑरा तुम्हाला कसा फुटला?"

"तो जन्मसिद्ध आहे. मी राष्ट्रपती होणार असे भाकित आहे. राजचिन्हं लहानपणापासून दिसतात असं सामुद्रिकाचं म्हणणं आहे."

"मग तुम्ही या क्षुद्र नोकरीसाठी अर्ज का केलात?"

"भावी राष्ट्रपतीला खालपासून देशाच्या कारभाराची माहिती असावी म्हणून"

"बरंय् तुम्ही जाऊ शकता."

भम्पकराव गेल्यावर पुढचा एक उमेदवार आपल्याला मुलाखतीस यायचे नाही म्हणून निघून गेला असे अध्यक्षांच्या सहायकाने सांगितले. त्या पुढचा उमेदवार आला व तो सात्विक संतापाने म्हणाला—

"मघाशी ज्यांचा इंटरव्ह्यू झाला ते गृहस्थ बाहेर येऊन म्हणाले की"

"या नोकरीसाठी निवड झाल्याबद्दल अध्यक्षांनी माझं अभिनंदन केलं.तुम्ही लोक व्यर्थ इंटरव्हयूला जात आहात." यावर एक उमेदवार रागावून निघून गेला. मीही जाणार होतो. पण या प्रकाराबद्दल माझा विरोध नोंदविण्यास मी आलो आहे. सर्वांचे इंटरव्हयू व्हायच्या आधीच एखाद्याची निवड करणे हा नंतर इंटरव्हयूला येणाऱ्यावर अन्याय आहे."

यावर अध्यक्षांनी त्या उमेदवाराची खातरजमा केली 'आम्ही कोणाचीही निवड केलेली नाही. तो उमेदवार थापा मारीत होता. तुम्ही निःशंकपणे आमच्या प्रश्नांची उत्तरे द्या."

XXX XXX XXX XXX

दुसऱ्या दिवशी भम्पकराव कार्यालयात भेटले व "माझ्या नेमणूकीचा हुकूम परवापर्यंत मिळेल का?' म्हणून विचारु लागले.

"हुकूम केव्हा येईल वा येणारच नाही हे मी तुम्हाला सांगू शकत नाही. पण तुम्ही बाकीच्या उमेदवारांना "आपली निवड झाल्याबद्दल अध्यक्षांनी आपलं अभिनंदन केलं असं खोटंच सांगितलं हे फार गैर आहे."

"नाहीतर माझ्याशिवाय कोणाची निवड होणार? ते मूर्ख व्यर्थ आशा लावून बसले होते. त्यांना भ्रमांत ठेवणं बरं नव्हे असा आम्ही विचार केला."

भम्पकरावांच्या तोंडी लागण्यात अर्थ नव्हता. मी ऑफिसातून घरी पोचतो तो भम्पकराव आमच्या दिवाणखाण्यात कोचावर आडवे पडून आरामांत वर्तमान पत्र वाचताना दिसले, मला पाहताच "या वसंत ......... करुन त्यांनी जीभ चावली व उभे राहून" "सर" म्हणून चाचरत पुस्ती खोडली.

"काय त्रिम्बकराव?" आम्ही जिज्ञासलो "कसं काय"?

"या देशाचं भवितव्य अगदी वाईट आहे."

"अहो देशाचं नाही विचारलं मी?" तुमचं कसं काय आहे?

"आमच्याशीच देशाचं भवितव्य निगडित आहे. तो करकरे?





"म्हणजे आपल्या ऑफिसातला तुमचा सहकारी ना"

"माझा सहकारी कसला. म्हशीचा प्राणनाथ."

"त्यांच्याशी देखील देशाचं भवितव्य निगडीत आहे वाटतं"

"नाही. त्या टिनपाट माणसाची काय किंमत?"

"मग असेना तो म्हशीचा प्राणनाथ."

"असेना काय. त्या मूर्खालाच नेमला ना तुम्ही शेवटी," माझं व्यक्तिमत्व, माझ्या पदव्या, माझा ऑरा .........

"हे सर्व निवडसमितीनं लक्षात घेतलं होतं."

"आणि तरी रत्न सोडून तुम्ही गारगोठी उचललीत"

"ही जागा तुमचे व्यक्तिमत्व, बुद्धिमत्ता, पदव्या व विशेषत: तुमचा ऑरा लक्षात घेता तुम्हाला फारच लहान पडते असं निवडसमितीचं मत पडलं. भावी राष्ट्रपतीने खालपासून देशाच्या कारभाराचा अनुभव घ्यायचं म्हटलं तरी इतक्या खालपासून सुरवात करायला नको. इथपासून राष्ट्रपतिपदापर्यंत जाण्यात सात जन्म खलास व्हायचे. निदान डायरेक्टर जनरल पासून तरी तुम्ही सुरवात करायला हवी. डायरेक्टर जनरलच्या जागेसाठी अर्ज केल्यास ते तुम्हाला नक्कीच घेतील."

"माझाही तोच विचार होता. डायरेक्टर जनरलच्या जागेची एक जाहिरात आली आहे. पण माझ्या राजिनाम्याचं काय झालं?"

"राजिनामा द्यायचा विचार कायम आहे तुमचा? मी तर तुमचा विचार बदलेल म्हणून राजिनामा माझ्याच जवळ ठेवलेला आहे."

"असा घटकेत विचार बदलायला मी काय पोर आहे? मला वाटलं आता-पर्यंत राजिनामा मंजूर होऊन आला असेल. आता ही डायरेक्टर जनरलची नोकरी मला मिळणार आणि मी इथेच खर्डेघाशी करीत राहू?"

दुसऱ्या दिवशी राजिनामा ताबडतोब वर पाठवावा म्हणून भम्पकरावांनी

लेखी विनंती केली. वहिनींची क्षमा मागून राजिनामा वर पाठविण्याशिवाय मला गत्यतंरच नव्हते. महिन्याभरात राजिनामा मंजूर झाला.

"भम्पकरावांना निरोप देण्यासाठी सहकाऱ्यांनी अल्पाहाराचा कार्यक्रम आयोजिला. निरोपाची भाषणे करताना कु. वळवळे म्हणाल्या—

"त्रिम्बराव गेल्यानं आम्हा सर्वांना फार दु:ख होणार आहे"

"अहो असे असेल तर मी अजूनही जाणार नाही" भम्पकरावांनी धमकी दिली.

"तसं नव्हे. तुमच्या उत्कर्षातच आम्हाला आनंद आहे" कु. वळवळे भीती-ग्रस्त स्वरांत म्हणाल्या.

यानंतर लुडबुडे उवाच—

त्रिम्बकराव आल्यापासून ऑफिसच्या रुक्ष वाळवंटात विनोदाची हिरवळ दिसू लागली. एकच प्याल्यात श्यामलालच्या प्रवेशानंतर तळीरामचे प्रवेश आल्यावर जसं वाटतं तसं त्रिम्बकराव आल्यावर वाटू लागलं ........

यावर साऱ्यांनी टाळयांचा कडकडाट केला.

आता करकरे बोलायला उठले.

"माझ्याऐवजी त्रिम्बकरावांची निवड करून सरकारनं एका भावी राष्ट्र-पतीला खर्डेघाशीत गुंतवून ठेवण्याचं महत्वाचं केलं नाही याबद्दल सरकारचे मी आभार मानतो. त्रिम्बकराव राष्ट्रपती झाल्यावर आम्हा गरीबाची आठवण ठेवतीलच ........"

शेवटी त्रिम्बकराव बोलायला उठले. कार्यालयातले निदान पंचवीस लोक अल्पाहाराला उपस्थित होते. एवढा मोठा समुदाय त्रिम्बकरावांनी जंग जंग पछाडले तरी त्यांच्या व्याख्यानाला केव्हाच नव्हता. यामुळे त्यांना अपूर्व उत्साहाचे भरते आले व ते बोलू लागले—





"बंधुभगिनिनो. विशेषत: भगिनींनो ! मी जाणार म्हणून तुमचे अंत:करण जड झाले आहे, कुणाच्या डोळ्यांत अश्रु तरळत आहेत. कुणाला हुंदका अनावर झाला आहे."

हे ऐकताच करकऱ्यांनी हुंदका काढला.

... 'हे पाहून मला श्रीकृष्ण – गोकुळातून जायला निघाला तेव्हाच्या दृश्याची आठवण होते. पण श्रीकृष्ण गोकुळात परत कधीही आला नाही. तसे माझे होणार नाही. हे जाणून साऱ्यांनी दु:ख आवरावे. मी लवकरच तुमचा डायरेक्टर जनरल बनून येणार आहे."

हे ऐकताच साऱ्यांनी दु.ख आवरल्याचे प्रमाण म्हणून टाळयांचा कडकडाट केला. तो तब्बल पांच मिनिटे चालला होता.

कडकडाट ओसरल्यावर भम्पकराव बोलते झाले –

"पण इतके आनंदित होऊ नका. डायरेक्टर जनरल बनून आल्यावर एखाद्या वर्षाच्या आतच मला राष्ट्रपतीचे पद विभूषित करण्यासाठी पुन: तुम्हाला सोडून जावे लागेल..."

यावर करकऱ्यांनी पुन: हुंदका काढला. हा हुंदका तुम्ही राष्ट्रपति होणार या प्रीत्यर्थ नसून तुमचा एक वर्षाने पुन: वियोग होणार याचे दु:ख आगाऊ नोंद-विण्यासाठी आहे असा त्यांनी खुलासा केला.

"नाही. एवढे दु:ख करू नका. मी राष्ट्रपति झाल्यावर तुम्हा साऱ्यांना मंत्रिमंडळात घेणार आहे. मग पुन: आपला सहवास घडेल."

यावर पुन: टाळयांचा कडकडाट झाला. तो दहा मिनिटे झाली तरी थांबण्याचा रंग दिसेना.

"यांच्या सहवासाशिवाय मंत्रिमंडळात जाण्याचा काही मार्ग नाही काय ? कु. वळवळे श्री. करकऱ्यांना त्या कडकडाटात हळूच विचारत्या झाल्या.

टाळ्या थांबत नाहीत असे पाहून मी बोलायला उभा राहिलो. व भम्पकरावांना बसायला सांगितले. भम्पकराव खरोखरच बसले हे पाहताच टाळ्या थांबल्या. मंत्रिमंडळात घेण्याचे आश्वासन दिल्याबद्दल मी भम्पकरावांचे आभार मानून त्यांना निरोप दिला.

यापुढे बरेच दिवस त्रिम्बकरावांचे दर्शन झाले नाही. डायरेक्टर जनरलची जागा भरली पण ती भम्पकरावांना मिळाली नाही – वाचकहो हे सांगायलाच पाहिजे काय? – व त्या निमित्ताने पुन: त्यांचे दर्शन घेण्याचा योग आला नाही. डायरेक्टर जनरलच्या पायरीवर न रेंगाळता एकदमच राष्ट्रपति होण्याचा भम्पकरावांनी निश्चय केला असला पाहिजे असे मला वाटले. पण माझीही ही अटकळ चूक ठरली. भम्पकराव एका सभेत भेटले. मी विचारताच त्यांनी आपले भेटपत्र माझ्या हातात दिले. त्यावर लिहिले होते.

डॉ. त्रिम्बकराव दन्ताळे

पी.एच्.डी. [टोकीयो] डी.फिल्. [मास्को] डी.एस्.सी. [बर्लिन]

डायरेक्टर जनरल नॅशनल सायन्स लॅबोरेटरी

"एवढ्या पदव्या तुम्ही केव्हा मिळविल्या त्रिम्बकराव? अन् ही नवी लॅबोरेटरी कोणती?" आम्ही जिज्ञासलो.

देशी विद्यापीठं माझी कदर करीत नसली तरी विदेशी विद्यापीठांनी माझ्या संशोधन कार्याचा सन्मान म्हणून या पदव्या दिल्या आहेत. मला तुमच्या खात्याच्या डायरेक्टर जनरलच्या जागेची ऑफर आली होती. पण मी ती धुडकावून लावली. पुन: त्या करकरे अन् वळवळे यांचा ताप नको. मी स्वत:च ही नवीन लॅबोरेटरी काढली आहे..."

लॅबोरेटरी काढणे म्हणजे कार्डावर तिचे नांव छापणे असे भम्पकरावांचे समीकरण होते. भम्पकराव आता लवकरच स्वत:चा एक देश काढून त्याचे राष्ट्रपति होणार व त्यांच्या मंत्रिमंडळात आम्हाला घेणार हे भविष्य आम्हाला स्पष्ट दिसू लागले.





बरेच दिवस भम्पकरावांचे दर्शन झाले नाही. पुढे एकदा ऑफिसातून आलो तो भम्पकराव माझ्या दिवाणखान्यात बसून आरामात चहा पीताना दिसले. तो चहा अर्थात् सैपाकघरात जाऊन त्यांनी स्वत:च केला होता. कोपऱ्यात त्यांची सूटकेस ठेवलेली होती. नोकरीवाल्या बायकोने घरातून काढून दिल्यामुळे स्वारी नेहमीप्रमाणे आमच्याकडे ठाण मांडून बसणार हे स्पष्ट होते.

"या वसंतराव, चहा घ्या" म्हणून आमच्याच घरात त्यांनी आमचे स्वागत केले!"

# माझा खोकला

मथळा वाचून काही वाचक उद्गारतील "एवढे कोण हो तुम्ही टिपुंजी?" गौतम बुद्धाचा दात, पैगंबराचा केस, तसा तुमचा खोकला लागून गेला आहे होय! अन् त्याबद्दल वाचत बसण्याशिवाय काय आम्हाला दुसरा उद्योग नाही? आशिया-आफ्रिकेच्या स्वातंत्र्याचे रक्षण करणे, जगाला अणुयुद्धापासून वाचवणे वगैरे अनेक उद्योग आम्हा भारतीयांच्या मागे आहेत. तुमचे खोकणे ऐकण्यात आम्ही वेळ दवडू इच्छीत नाही.

वाचकहो, तुमच्यापैकी जे 'आन्तरराष्ट्रीय' असतील त्यांचा अमूल्य वेळ घेऊन मी जगाचे नुकसान करू इच्छीत नाही. पण ज्यांना खोकला होण्याचा संभव आहे अशा वाचकांनी थोडासा वेळ माझी कहाणी वाचण्यास दिला तर तो सर्वस्वी वायाच जाईल असे नाही एवढेच आश्वासन देऊ इच्छितो.

तर आख्यानास प्रारंभ करायचा म्हणजे अस्मादिकास खोकला झाला. सुरुवातीस औषधावाचून खोकला गेल्यास बरे या नीतीचा अवलंब करून तिकडे दुर्लक्ष केले. पण आम्ही उदार मनाने खोकल्याकडे दुर्लक्ष केले तरी खोकला आमच्याकडे दुर्लक्ष करण्यास तयार नव्हता. आमच्या गळयात जे घर करून बसला ते युद्धपूर्व दराने भाडे देणाऱ्या भाडेकरूप्रमाणे सोडण्यास तयार नव्हता.

तेव्हा आता पुढचे पाऊल म्हणजे डॉक्टरकडे धाव घेणे. त्याप्रमाणे आम्हीं आमचे कुलडॉक्टर अप्सायलन् बीटा, उर्फ ये. बे. उर्फ वाय्. बी. लघाटे यांच्याकडे गेले.





डॉ. लघाटे यांच्या पाटीवर वरीलप्रमाणेच त्याचे नाव लिहिले होते. डॉ. लघाटे नुसतेच डॉ. नसून इंग्रजीच्या साहाय्याने मराठी समृद्ध करण्याची दीक्षा घेतलेले प्रगतिवादी होते. नावाची आद्याक्षरे या. बा. अशा रीतीने प्रतिगामी नागरीत लिहिणे त्यांना बिलकुल नापसंत होते. त्याऐवजी अफ् सायलण् बीटा ही ग्रीक म्हणजे "पुरोगामी" व ये. बे. ही अरबी म्हणजे "निधर्मी" अक्षरे वाय्. बी. या 'आन्तरराष्ट्रीय" रोमनच्या समवेत वापरून डॉ. लघाटयांनी आपले नाव व मराठी भाषा समृद्ध केली होती.

डॉक्टरांना आमचे गाऱ्हाणे सांगताच त्यांनी उच्चस्वराने आपल्या कम्पौण्डरास 'चमचा आण रे' म्हणून हाक मारली. चमचा आमच्या जिभेवर ठेऊन आ करण्यास सांगितले व आमच्या आमध्ये एक भला मोठा टॉर्च जवळ-जवळ खुपशीत त्याचा खटका दाबला. खटका दाबूनही टॉर्चचा काही उजेड पडलेला दिसला नाही.

टॉर्चचा उजेड पडला पाहिजे ही जुनीपुराणी समजूत आहे. अत्याधुनिक पद्धतीप्रमाणे टॉर्च उजेडासाठी नसतो असे उत्तर मिळेल म्हणून मी टॉर्च विरुद्ध तक्रार केली नाही.

डॉक्टरांनी उपचारविधि लिहण्यास सुरुवात केली व तोंडाने, दिवसातून तीन वेळा मिक्श्चर निजताना दोन गोळ्या, मधून मधून गार्गलस् वगैरे गुरुमन्त्र उच्चारला.

मी तो मन्त्र घोकत घरी गेलो, आठवडाभर त्या मन्त्रानुसार आन्हिक केले. पण माझ्या खोकल्याला अत्याधुनिक औषधिशास्त्राची माहिती नसल्यामुळे तो त्या औषधांना दादच देईना. उलट आज घशापासून उद्या गळ्यापासून, परवा छातीपासून तर तेरवा पोटापासून असा त्याचा अधःपात सुरूच होता.

आठवड्यानंतर डॉक्टरांनी औषध बदलून दिले. पण औषध बदलले तरी खोकला बदलण्यास तयार होईना पोटाच्याही खाली सरकण्यास वाव नसल्यामुळे तो आणखी खाली सरकला नाही. पण तिबेटात ठाण मांडून बसलेल्या चीन्याप्रमाणे तो जो आमच्या शरीरात स्थानापन्न झाला तो शरीर कायम असेपर्यन्त हटण्याचे लक्षण दिसेना.

आम्ही पुन: डॉक्टराकडे धाव घेतली. डॉक्टर म्हणाले, 'या पिण्याच्या औषधांना खोकला बधत नाही तेव्हा आता कॉटरायझेशन करावे लागेल. कॉटरायझेशनने भागले नाही तर आठवडचातून दोन अशी पंधरा इन्जेक्शने तुम्हाला घ्यावी लागतील. त्यानेही भागले नाही तर तुमचे रक्त व थुंकी तपासून पाहावी लागेल. त्यात काही न सापडल्यास तुमच्या छातीचा फोटो काढून तुम्हाला क्षय आहे की काय याचे निदान करावे लागेल. क्षय नसल्यास . . . ."

"म्हणजे माझ्या खोकल्याबद्दल तुमच्याजवळ पंचवार्षिक योजनातयार आहे एकूण."

"अहो, पंचवार्षिकच काय आम्ही जन्मभर देखील तुमच्या खोकल्याची निरनिराळ्या तऱ्हेने तपासणी करून त्यावर निरनिराळे उपाय करू शकतो. एवढे आमचे शास्त्र पुढारलेले आहे."

"पण खोकला बरा होण्याचे काय?"

' इतक्या मॉडर्न उपायांनी देखील दाद न देण्याची कोणत्या खोकल्याची प्राज्ञा आहे?"

आमच्या खोकल्याची तशी प्राज्ञा आहे हे लवकरच दुर्दैवाने (आमच्या) व डॉक्टरांच्या ध्यानात आले. कॉटरयाझेशनने खोकला जळून जाण्याऐवजी आमच्या घशावरच अति भाजलेल्या पापडासारखे काळे डाग पडले. सुया टोचून खोकल्याचा मर्मच्छेद होण्याऐवजी आमच्या दण्डाचीच चाळणी झाली. कितीही फोटो काढले तरी छाती दारासिंगाच्या छाती सारखी निरोगी असल्याचा निर्वाळा मिळे. थुंकी मारुतीच्या थुंकीसारखी वीर्यशाली व रक्त नव्या प्रेमिकासारखे सळसळणारे आहे, अशी तज्ज्ञांनी ग्वाही दिली.

डॉक्टरांच्या लठ्ठ विदाग्यांनी रिकामा होत चाललेला खिसा या ग्वाह्यांच्या चिटोऱ्यांनी भरू लागला.

आमच्या खोकल्याचे मात्र एवढ्या शिफ़ारसी दाखवूनही समाधान होईना. कितीही कागदाचे चिटोरे आणा, हे शरीर माझे आहे, ते मी सोडणार नाही असे तो मला बजावीत राहिला.





'शेवटी सारी औषधे व पैसा वाया गेला ना डॉक्टर?' मी वेदना व्यक्त केली.

'छे, छे,' डॉक्टर आनंदाने म्हणाले. "एवढी तपासणी केली हे फार बरं झालं. तपासणीत काही सापडत नाही व एवढी नामांकित औषधे लागू होत नाहीत त्या अर्थी तुम्हाला खोकला नाहीच हे सिद्ध झाले.

"अहो, पण काहीही सिद्ध झाले तरी आमचा त्रास काही चुकला नाही." मी.

' तुम्ही असं करा, डॉ. बक्षी नावाचे माझ्या ओळखीचे एक सायकायट्रिस्ट आहेत, त्यांच्याकडे जा." डॉक्टर.

"म्हणजे माझं डोकं फिरलं आहे, अस तुमच म्हणणं." मी.

"तस नाही हो, सायकाट्रिस्टकडे जायला डोकंच फिरावं लागतं अस नाही. मनाचा, डोक्याप्रमाणेच घशाशी संबंध आहे. तुमचा खोकला नक्कीच मानसिक आहे. डॉ. बक्षी तुमचं मन ठीक करून देतील". डॉ.

पाप फिटण्यासाठी काशी/गया केली. मग आता मथुरावृन्दावन करायला काय हरकत आहे, असा विचार करून आम्ही आमच्या कुल-डॉक्टरांची चिठ्ठो घेऊन डॉ. बक्षी यांच्याकडे गेलो.

डॉ. बक्षी यांच्या दवाखान्यावर डॉ. व्ही. पी. बक्षी, डी. सी. पी. (लंडन), एल्. पी. एस्. (न्यूयार्क) अशी मोठी पाटी होती. नावाच्या पुढे एवढ्या पदव्या अन् त्याही इंग्लंड व अमेरिका या देवभूमीतल्या–असलेला डॉक्टर मिळाल्यावर आता आपल्या खोकल्याची धडगत नाही अशी मला खात्री वाटू लागली. एवढ्या मोठ्या डॉक्टराकडे य:कश्चित् खोकला घेऊन येण्यात काय अर्थ आहे, चांगला दमा नाहीतर फुप्पुसदाह असता तर डॉक्टरांच्या ज्ञानाचे चीज तरी झाले असते असा विचार मनाला चाटून गेला.

दवाखान्यात शिरताच एक निळ्या डोळ्याची, सोनेरी केसांची युरोपीय मुलगी हसत मुखाने सामोरी आली. सुंदर मुलींना पाहून खोकला वाढतो असा

जगाचा–माझा नव्हे–अनुभव आहे म्हणून त्या सुन्दरीचे हसतमुख पाहून कितीही आनंद झाला तरी डॉ बक्षीच्या दवाखान्यात आपला खोकला बरा होण्याचे नाव नको असा निराशाजनक विचार मनाला चाटून गेला.

सुन्दरीने गोड आवाजात आमचे नावगाव विचारून लिहून घेतले व डॉ. आता भेटतील असे आश्वासन देऊन आम्हाला बसण्यास सांगितले.

पण 'आता' या शब्दाचा अर्थ जगाच्या अन्तापर्यन्त असा होतो हे माझ्या लक्षात आले नव्हते. खोलीत दुसरा कुणीही रोगी नव्हता. सुंदरी सारखे काही तरी टाईप करीत बसली होती, मधून मधून सारखा फोन उचलून डॉक्टरांना अमुक दिवशी वेळ नाही तमुक दिवशी वेळ नाही, फलाण्या दिवशी तीन वाजून अकरा मिनिटांनी या असे ती सांगत होती. इतके रोगी डॉक्टराकडे धाव घेत असून आज मात्र माझ्याशिवाय कोणीच आलेला दिसत नव्हता. मी मोठ्या शुभमुहूर्तावर आलो असे थोडेसे समाधानकारक विचार डॉक्टरांची वाट पाहून कंटाळ्याचा डोंगर शिरावर वाहत असताही मनात येऊन गेले.

हा डोंगर वाहण्याची तपश्चर्या शेवटी फळास आली व डॉक्टरांनी आत बोलावले. डॉक्टराकडे पाठ केलेल्या एका आराम खुर्चीत अस्मादिकांना बसवण्यात आले. सुंदरीने विचारलेल्या साऱ्या प्रश्नांची डॉक्टरांनी एकदा उजळणी केली व मग मी अपेक्षिलेला खास मानसशास्त्रीय प्रश्न डॉक्टरांनी विचारला.

"स्त्रीसुखाच्या बाबतीत तुम्ही समाधानी आहात काय?"

डॉक्टरांनी माझ्या खोकल्याचे खापर माझ्या अतृप्त वासनेत शोधण्यात वेळ दवडू नये म्हणून मी जोरात उत्तर दिले.

"स्त्रीसुख माझ्या नशिबाने मला भरपूर आहे. मला लग्नाची एक व बिनलग्नाची एक, अशा दोन भार्या आहेत. शिवाय अनेक प्रेमळ मैत्रिणी."

डॉक्टरांनी जो विषय सोडावा म्हणून मी थडाकून उत्तर दिले तोच नेमका सुरू करायची मी त्यांना संधी मिळवून दिली.





"वाटलंच मला" डॉक्टर म्हणाले. "या प्रामिस्क्युइटीमुळे तुमच्या कुटुंबात किंवा तुमच्या मनातच कॉन्फ्लिक्ट उत्पन्न झाला असावा. असा कॉन्फ्लिक्ट कधी कधी खोकल्याच्या रूपाने व्यक्त होतो.

"मग डॉक्टर, श्रीकृष्णाला नेहमीच खोकला होत असला पाहिजे."

"असंच काही नाही. शेरभर बासुन्दी खाल्याने एखाद्या काडी पैलवानाच पोट बिघडले म्हणून गामा पहेलवानाच बिघडेलच असं नाही."

"पण माझ्या मनात वा कुटुंबात मुळीच कॉन्फ्लिक्ट नाही."

"कॉन्फ्लिक्ट नाकबूल करण्याचा तुमचा एवढा अट्टाहास आहे यावरूनच पाणी मुरतं आहे, हे सिद्ध होतं. या कॉन्फ्लिक्टला तुम्ही आपल्या अनकॉन्शस-मध्ये दडवून ठेवायचा प्रयत्न करीत आहात. तो प्रांजलपणे कबूल करा व एकनिष्ठ राहा म्हणजे तुमचा खोकला नाहीसा होईल."

"असं असेल तर उद्यापासून–नव्हे आजपासूनच एकनिष्ठेला सुरुवात करतो."

"नुसता आचारात बदल होऊन भागणार नाही. तुमच्या मनात कॉन्फ्लिक्ट आहे हे तुम्हाला मनोमनी पटलं पाहिजे."

"पटलं. अगदी सर्वांशानं पटलं."

असं म्हणून डॉक्टरांच्या खोलीत निर्माण केलेल्या बिनलग्नाच्या बायकोला त्या खोलीतच (मानसिक) सोडचिठ्ठी दिली. प्रेमळ मैत्रिणीचे प्रेम कायमचे नाहीसे व्हावे म्हणून त्यांना उद्धटपणे (स्वगत) निरोप दिला व "त्वमेव माता व पिता त्वमेव "अशी सौ. ची प्रार्थना करीत डॉक्टरांच्या खोलीतून परतण्यास उठलो. तेव्हा डॉक्टर म्हणाले."

"रोज याच वेळेस येत जा. चार सहा महिने असेच संभाषण झाले म्हणजे तुमच्या अनकॉन्शसचा मला पुरता थांग लागेल."

"पण तुम्ही तर निदान करून टाकलं आहे ना डॉक्टर. एकनिष्ठेचा अभाव . . ."

"हो, पण तेवढ्याने भागत नाही. तुमच्या मनाची अन्तर्बाह्य सफाई केली पाहिजे. त्यातून आणखी काय काय घाण बाहेर पडेल ते सांगता येत नाही. निदान सहा महिने तरी . . ."

पुढील चार महिने प्रभु रामचन्द्राप्रमाणे कायिक, वाचिक, मानसिक एकपतीव्रत व रोज अर्धा तास डॉ. बक्षीच्या समोर पाठमोरे बसून वार्तालाप असा कार्यक्रम सुरू होता. या अर्ध्या तासात तोंडच्या वाफेबरोबरच खिशातून पाच रुपये दवडत. असे दररोज पाच रुपये न दवडताही चार महिन्यात खोकला बरा व्हायला हवा होता. पण तसे काही झाले नाही.

शेवटी कंटाळून मी डॉक्टरांना म्हणालो, "डॉ. आमचं मन तुम्ही एवढं घुसळलं, पण काही उपयोग होत नाही. तेव्हा आता हे सर्व बंद करावं व आपलं नशीब म्हणून स्वस्थ बसावं असं मला वाटत."

"काही उपयोग झाला नाही असं कसं म्हणता तुम्ही." डॉक्टर जरा वरच्या आवाजात म्हणाले. मग थोडे समजावणीच्या स्वरात त्यांनी सुनावले, ज्याअर्थी चार महिने खोकला सुरू आहे त्याअर्थी तो मानसिक आहे हे सिद्ध झालं. तुम्हाला सकिंगकॉम्प्लेक्सच्या रूपाने व्यक्त होणारं मदरफिक्सेशन झालं आहे. वयात येऊन देखील तुम्हाला आईचा आधार पाहिजे. अजून आईचे स्तन चोरवून दूध पिण्याची तुमची सुप्त इच्छा आहे. ती तृप्त होत नाही म्हणून तुम्ही खोकता. ही सुप्त इच्छा उघडकीस आली व तुम्ही आपल्या मनाशी कबूल केली की तुमचा खोकला गेलाच समजा."

यावर मी जरा खवचटपणेच म्हणालो, "चार महिने जी सुप्त इच्छा जागृत झाली नाही ती केव्हा तरी जागृत होईल असा संभव नाही. पण तुम्ही म्हणता तेखरं समजायला मी तयार आहे. आता या वयात आई काही पैदा करता येत नाही. तेव्हा बाटलीनं दूध पितो काही दिवस. त्यानं ही सुप्त इच्छा तृप्त झाली तर पहातो."

"चांगली युक्ती काढली. ज्याअर्थी इच्छातृप्तीची युक्ति तुम्हालाच सुचली त्याअर्थी मी म्हणतो आहे याला आणखी एक प्रमाण मिळालं." डॉक्टर विजयाने बोलले.

माझा खोकला बरा करण्यापेक्षा स्वतःच्या सिद्धान्तांना प्रमाणे मिळवण्याचीच त्यांना जास्त उत्सुकता होती.





दुसऱ्या दिवशी सकाळी सौ. ने चहाचा कप पुढे आणून ठेवला तेव्हा मी तिला फर्माविले, "आजपासून कपातला चहा बंद. सारा चहा या बाटलीत भरून आण." लगेच डॉक्टरांच्या आदेशप्रमाणे तातडीने विकत घेतलेली बाळदुधाची बाटली मी सौ. च्या पुढे केली. त्याबरोबर ती म्हणाली, "इतके दिवस घसा वाईट होता. आता डोकं ही . . ."

"डॉक्टरांनी घशावर हे नवीन औषध सांगितलं आहे."

"खरच ?"

"खरंच नाही तर काय. बोंडल्यान दूध प्यायला मला काय वेड लागल आहे ?"

'तेही काही अशक्य नाही." सौ. ने हसत हसत शेरा मारला.

"बऱ्या बोलानं चहा निवायच्या आत बाटलीत भर." आमच्यातला नवरा उद्गारला.

सौ. ने बाटली भरून आणली. पण बाटलीने दूध पिण्याची कल्पना डॉक्टरांची नसून आमच्याच "विक्षिप्त" डोक्यातून निघाली असली पाहिजे असा दृढ विश्वास तिच्या चेहऱ्यावर दिसत होता.

यापुढे चहा, कॉफी, पाणी वगैरे सर्व पेये मी बाटलीनेच पिऊ लागलो. महिनाभर हा कार्यक्रम सुरू होता.

मातृसवित व चौषगण्ड यांची शांती करण्यासाठी एवढा विधि केला. पण त्याची तिळमात्र शांती होईना. खोकल्याच्या रूपाने तो आपला प्रभाव गाजवीतच राहिला.

डॉ. बक्षीकडे पुनः गाऱ्हाणे नेले तेव्हा ते म्हणाले, "मात्रा लागू झाली आहे. आता लवकरच तुमचा कॉम्प्लेक्स नाहीसा होणार.

'अहो पण माझ्या खोकल्याचं काय ?' मी

'खोकल्याचं काय घेऊन बसलात हो. असे हजार खोकले येतील व जातील. पण मदरफिक्सेशन समूळ उपटून काढलं पाहिजे.'

'डॉक्टरांना आता रामराम ठोकण्याची वेळ आली असे समजून मी उठलो. डॉक्टर लगेच म्हणाले,

'बसा हो, तुम्हाला सध्या खोकल्याचं महत्व वाटतं हे स्वाभाविक आहे. पण सकिंग कॉम्प्लेक्स आहे तोपर्यंत खोकला गेला तरी सर्दी येईल, सर्दी गेली तरी पित्त होईल, पित्त गेलं तरी वात होईल. खोकला हे नुसतं बाह्यचिन्ह आहे. खरा रोग आहे सकिंग कॉम्प्लेक्स.'

'मग आणखी काही दिवस बाटली चोखू म्हणता.' – मी

'नुसत्या बाटलीनं भागणार नाही.' डॉक्टर

'मग आता या वयात दाई कुठून आणू ?' – मी

'हो तोही प्रश्नच आहे. असं करा तुमच्या आईचा एखादा पुतळा...'डॉक्टर

'आमच्या जीवनाचा फार्स करायचा इरादा दिसतो तुमचा.' – मी

'वरवर तसं दिसतं खरं. पण अन्कॉंशसमध्ये एकापेक्षा एक सवाई फार्स नित्य घडत असतात. अशा उपायानं ते उघडयावर आणले म्हणजे परगेटिव घेतल्याप्रमाणे मन साफ होतं.' – डॉक्टर.

'आणि घसा साफ होण्याचं काय ?' – मी

'मन साफ झाल्यावर घसाच काय, सारं शरीर साफ होईल.' – डॉक्टर

घसा साफ होण्याची आशा मी सोडलीच होती. "पण खोकल्याच्या निमित्तानं डॉ. बक्षीकडून आपलं मन साफ होत असेल तर काही वावगं नाही." असा विचार करून आणखी एक महिना डॉक्टरांच्या तंत्राप्रमाणे चालायचं आम्ही ठरवलं.'

मॅडोनाच्या पवित्र्यात असलेला आमच्या मातोश्रींचा एक पुतळा करवून घेतला. या मॅडोनाच्या हृदयाशी बाळ नव्हतं. बाळाचे डोके धरण्याच्या अवस्थेत





उजवा व नितम्बाला आधार देत डावा हात होता. हात बोचू नये म्हणून दोन्ही हातावर उशा ठेवून घेतल्या. मातृप्रेमाचा अनुभव कोरडाच राहू नये म्हणून पुतळ्यात दूध भरण्याची व्यवस्था केली.

पुतळा घरी आला. मोठी धडपड करून बाळाच्या पोझमध्ये आम्ही मातोश्रींच्या हातावर विराजमान झालो. ही धडपड करताना आमचा चोषगण्ड दूर होण्याऐवजी आमचे कपाळ पुतळ्यावर अनेकवेळा आपटून त्यावर [कपाळावर] गण्ड उगवले. मातोश्रींच्या डाव्या पंजावर नितम्ब व उजव्या पंजावर डोके ठेवून थोडा मातृसुखाचा अनुभव घेतो तोच...

'हद्द झाली बाई आता... हे सुद्धा तुम्हाला डॉक्टरांनीच सांगितलं का ? खरच डोकं फिरलं तुमचं...' सौ गरजत खोलीत शिरल्या.

'डॉक्टरांनी नाही तर काय मला हौस आहे शेकडो रुपये उधळून कपाळाला टेंगळे आणण्याची ?'

'आमचे स्पष्टीकरण ऐकताच सौ ने झपाट्याने फोन उचलून डॉक्टरांना जाब विचारला. उत्तर मिळताच झपाट्याने फोन आदळला व 'हे डॉक्टर आहेत का तुमच्याच माळेतले कोणी आहेत ?' वगैरे सरबत्त्या करीत खोलीतून उचलता पाय घेतला.

पुतळ्यापासून मातृसुखाचा अनुभव घेण्याच्या प्रयत्नात १५, २० दिवस गेले. या १५, २० दिवसात मातृसुखाचा अनुभव येणे तर दूरच, उलट त्या कसरतीमुळे पाठ दुखू लागली. पुतळ्यावर हजारो रुपये खर्च झाले. पुतळ्यात दूध घातल्यावर त्याची चव अशी काही बदले की ते दूध नसून पंचगव्य आहे अशी मला शंका येई.

एवढे सोसूनही खोकला आपला जसाच्या तसाच होता.

एवढेच नव्हे तर हजारो रुपयांची चोट, पाठ दुखणे व पंचगव्यपान यापेक्षाही एक मोठी आपत्ती त्या पुतळ्याच्या पायी माझ्यावर ओढवली.

एका शनिवारी सकाळी नेहमीप्रमाणे कॉलेजात गेलो व शिकविण्यासाठी

वर्गात शिरलो तोच कागदी कावळे, मार्जारध्वनी, हजार पायातील जोडच्यांनी एकदम फरशी घासल्याचे आवाज, या सर्वांचा आमच्यावर वर्षाव झाला. काय प्रकार आहे म्हणून थांबून इकडे तिकडे पाहिले तो फळ्यावर कोणा नवोदित चित्रकाराने मातोश्रींच्या पुतळ्यावर बालकाच्या पोझमध्ये लवंडलेल्या अस्मादिकांचे चित्र काढलेले दिसले.

ते चित्र अस्मादिकांचे होते याचा अर्थ एवढाच की दुसऱ्या कोणाचे नव्हते.

खोकल्यावर अगदी अत्याधुनिक रीतीने उपचार करण्याचा आमचा उपक्रम या माकडांना कसा कळला हे एक गूढच होते.

मी मुकाट्याने खुर्चीवर बसलो. हलकल्लोळ केव्हा तरी थांबणारच असा कयास होता. त्याप्रमाणे तो ५, १० मिनिटात थांबला. मी मोठ्या समजावण्याचा स्वनात बोलायला सुरुवात केली.

'मला गेले पाच महिने खोकला आहे, हे तुम्हाला माहितीच आहे ..'

असे म्हणताच मागच्या बाकावरून खो, खो खोकल्याचे आवाज ऐकू येऊ लागले. कोण खोकते आहे हे पाहण्यासाठी पुढच्या स्त्रीलिंगी माना मागे वळल्या व मग त्या वळलेल्या तोंडातून दुमजली खोकण्याचे आवाज निघू लागले.

माझ्या एकट्याचा खोकला बरा करता करता साऱ्या वर्गालाच खोकला झाला. त्या खोकल्याचा आवाज कॉलेज प्रमुखांच्या कानापर्यंत गेला. प्राध्यापक महाशय आले नाहीत व त्यामुळे मुले दंगा करीत आहेत असे त्यांना वाटले. ते तावातावाने वर्गात आले. फळ्यावरील चित्रकला व आमची असहायता त्यांच्या लवकरच निदर्शनास आली. कॉलेजच्या नावाला कलंक लावणारे वर्तन केल्याबद्दल त्यांनी आपल्या करड्या आवाजात विद्यार्थ्यांची कानउघाडणी केली, झालेल्या प्रकाराची चौकशी होईल व अपराध्यांना शिक्षा दिली जाईल असे बजावून त्यांनी वर्ग बरखास्त केला.

आमची कहाणी ऐकून त्यांनाही आमच्या सौ. प्रमाणेच शंका आली. व डॉ. बक्षींना ताबडतोब फोन करून त्यांनी खात्री करून घेतली. १०, १५ दिवस सुट्टी घ्यावी व मग बदली करून घ्यावी, त्याशिवाय विद्यार्थ्यांतील हुल्लडीचे





वातावरण शमणार नाही असा त्यांनी सल्ला दिला.

वरिष्ठांचा सल्ला म्हणजे आज्ञाच. शिवाय त्यावाचून गत्यंतरही नव्हते. सुट्टी काढली व विश्रांतीसाठी खेडेगावी गेलो. तेथे आमच्या मावशी होत्या. मावशींना घरगुती औषधांचा बराच अनुभव होता. पण जो खोकला अत्याधुनिक औषधे व मनोविश्लेषण यांना दाद देईना तो मावशींच्या झाडपाल्याला काय दाद देणार म्हणून त्यांच्याजवळ मी गोष्टच काढायची नाही असे ठरवले. पण आम्ही ठरवून काय उपयोग. दारिद्र्य, मूर्खपणा व रोग लपून राहू शकत नाही. आम्हाला पाहताच मावशी उद्गारल्या.

'वाळलास किती रे. अन् सारखा खोकतोयस्. पाहू बरं काय झालं?'

'अग मावशी तुला नाही कळणार त्यातलं काही. पाच महिने झाले. सारे धन्वंतरी थकले. मातृसक्ति म्हणजे आपलं मदर फिक्सेशन'

'त्या लाम्ब लाम्ब नावात मला काही कळत नाही. घसा पाहू दे.'

घसा दाखवला तर आपले काय जाते म्हणून मी आ वासला. मावशीनं बारकाईने निरिक्षण केले व ती उद्गारली.

'कसले धंवतरी आहेत देव जाणे. डोळे उघडून पाहणं देखील जमत नाही. आता बरा करते तुझा खोकला.

म्हणून त्यांनी सरळ आपली बोटे माझ्या घशात खुपसली व हा तुझा खोकला बाहेर काढला म्हणून आपली चिमूट माझ्या डोळ्यासमोर धरली.

चिमटीत एक केस अटकलेला होता.

केव्हा तरी खाण्याबरोबर एक केस घशात गेला व पडजिभेला वेटोले घालून बसला.

— त्या इवल्याशा केसाला पाहून, मातृसक्ति, चोषगण्ड, मातोश्रींचा पुतळा, रक्ततपासणी, इंजेक्शने, कॉटरायझेशन वगैरे सर्व चित्रपट माझ्या डोळ्यासमोर साकार झाला आणि खो खो खोकण्याऐवजी मी खो खो हसत सुटलो.

# थोर पुरुष

एक थोर पुरुष होता व एक क्षुद्र स्त्री होती. त्या क्षुद्र स्त्रीचं त्या थोर पुरुषावर प्रेम बसल. थोर पुरुषाच कुणावर प्रेम बसायची काय जरूर होती! त्याच मन आधीच सर्वभूतीं प्रेमान ओतप्रोत होत. त्यांत ती क्षुद्र स्त्री आलीच. पण त्या क्षुद्र स्त्रीला वाटल हा थोर पुरुष सर्वस्वी आपला असावा. म्हणून ती त्याला लग्नासाठी विनवू लागली. तेव्हा त्या थोर पुरुषाने तिला एक लोकोत्तर तत्त्वज्ञान सांगितल.

"अग लग्नांत काय ठेवल आहे. लग्न म्हणजे बन्धन. प्रेमासारख्या उदात्त भावनेला अस बन्धनांत जखडून ठेवायच! वनराजाला राज्यभिषेक करावा लागत नाही. सूर्याला दिवा दाखवावा लागत नाही. खऱ्या प्रेमावर लग्नाचं शिक्कामोर्तब कराव लागत नाही!"

क्षुद्र स्त्रीला हे तत्त्वज्ञान पटल. खरंच, मन एकमेकांत मिसळून गेल्यावर पाणिग्रहणाचीं काय जरूर! जीवनाची वाटचाल बरोबर सुरू केल्यावर सप्तपदीची काय जरूर!

झालं. थोर पुरुषाचं नि क्षुद्र स्त्रीचं सहजीवन सुरू झाल. आपला व तिचा "तसा" कांही सम्बन्ध आहे हे लोकांना कळू न देण्याची थोर पुरुषानं





पुरेपुर दक्षता बाळगली. तो तिच्याबरोबर एका घरांत कधी राह्यला नाही. त्यांने स्वत:च्या विरुद्ध लेखी पुरावा निर्माण होऊ दिला नाही.

पण निसर्गानं नेहमींप्रमाणे डाव साधला. थोर पुरुषानं त्याचा निकाल लावून टाकण्याबद्दल त्या क्षुद्र स्त्रीचं खूप मन वळवून पाह्यल. पण ती क्षुद्र होती तशीच महामठ्ठही होती. ती म्हणाली "वा: आपल्या प्रेमाचं हे प्रतीक चुरगळून टाकू होय! हा माझा आयुष्यांतला सगळ्यांत मोठा ठेवा आहे. प्राण गेला तरी याच्या केसाला धक्का लागू देणार नाही!"

झालं. याचा व्हायचा तोच परिणाम झाला. त्या क्षुद्र स्त्रीला समाजांतून उठवण्यांत आलं. (याच्याशी त्या थोर पुरुषाचा सम्बन्ध असेल असं मात्र कुणालाही वाटल नाही). जुना काळ असता तर दगड मारून तिचा प्राण घेण्यांत आला असता. पण नवीन काळ असल्यामुळे असे रानटी उपाय वापरण्यांत आले नाहींत. तर तिची न तिच्या बाळाची अन्नान्नदशा करणे यासारखे सौम्य व सुधारलेले उपाय वापरण्यांत आले.

पण हे त्या थोर पुरुषाला कसं पाहवेल? त्यानं पतितोद्धार या विषयावर लेख व भाषणे देण्याचा सपाटा लावला. "पतितांचा द्वेष न करता त्यांच्यावर प्रेम केलं पाहिजे. नाहींतर त्यांचा उद्धार कसा होणार!" असा त्यानं गर्हिवरून समाजाला प्रश्न केला. आपण त्या स्त्रीचा उद्धार करणार आहोंत अशी त्यानं जाहीर प्रतिज्ञा केली. मग काय विचारता! लोक त्याचं नैतिक धैर्य व परोपकार बुद्धि यांची तारीफ करूं लागले. त्यान तिच्या बाळाला घरी आणलं व त्याच्या पालनपोषणाची व्यवस्था केली. दुसऱ्याच्या मुलावर एवढं प्रेम दाखवण्याबद्दल त्या थोर पुरुषाच्या थोर अन्त:करणाचा गौरव होऊं लागला. क्षुद्र स्त्रीच्या मनांत त्याच्याविषयी जे प्रेम होतं त्याला तर आता इतकं भरतं आलं की सीमा नाही. मुलगाच त्याच्याजवळ असल्यामुळे आता तिला राजरोस त्याच्याकडे जाता येऊ लागलं. याप्रमाणे तिचे बरेच दिवस आनन्दात गेले.

पण आनन्दाला तडा पडण्याचा प्रसंग लवकरच उद्भवला. ती थोर पुरुषाकडे असतांना एकदा तो कुठे तरी गायब झाला. एक दिवस झाला' दोन दिवस झाले तरी तो घरी येईना. कुठं जाणार हे तो सांगूनही गेला नव्हता.

त्यामुळे तिचा जीव फार अस्वस्थ झाला. गावांतले सगळे लोक तिच्याशी तुसडेपणान वागत. त्यामुळे कुणाला जाऊन विचारण्याची सोय नव्हती. थोर पुरुषाचा पालनपुर गांवी मंगलाश्रम नांवाचा एक आश्रम होता. तिथेच तो गेला असेल या समजुतीनं ती पालनपुरला फोन करायला प्रेषालयात गेली. फोन करून कांही उपयोग झाला नाही. थोर पुरुष पालनपुरांत नव्हताच. ती निराशेन परत येऊ लागली तेव्हां पत्रवाहानं तिला पाहिले. मिस्किलपणे हंसून तो म्हणाला —

"बाई, तुमची पत्रं आहेत कांही. दोन तीन दिवसांपासून पडली आहेत.

"माझी ?" तिन आश्चर्यान विचारल.

"हो. म्हणजे अगदी तुमचीच असं नाही. महाराजांची."

क्षुद्र स्त्री जरा मठ्ठच होती हे मागे सांगतलंच आहे. तिला त्या पत्रवाहाचा मिस्किलपणा कांही कळला नाही. उलट महाराजांची पत्रं ती आपलीच पत्र अस लोक समजतात याबद्दल तिला अतोनात अभिमान वाटला. तिनं आनंदान ती पत्र मागून घेतली. घरी गेल्यावर तिला वाटलं, 'महाराज आणि आपण एकच आहोत. मग आपल्याला त्यांची पत्र वाचायला काय हरकत आहे ? क्षुद्र मनांत वाईट विचार किती लवकर शिरतात पहा! झालं, तिनं त्यांतल एक पत्र फोडून वाचायला सुरुवात केली. चारपांच ओळी वाचल्या-बरोबर तिच्या भोंवतालच जग फिरायला लागलं. तिन धाडकन् शय्येवर अंग टाकल न् स्फुन्दून स्फुन्दून रडायला सुरवात केली.

खरं म्हणजे असं त्या पत्रात काय होतं ? एवढं अकांडतांडव करण्यासारखं काहीही नव्हतं. थोर पुरुषावर जसं त्या क्षुद्र स्त्रीचं प्रेम होतं तसंच इतर अनेक क्षुद्र स्त्रियांचं होतं. "कमलन को रवि एक हैं, रवि को कमल अनेक". या अनेक कमलिनीपैकीच एकीनं त्याला प्रेमपत्र लिहिलं होतं न् ते वाचून तो क्षुद्र स्त्री एवढा आकांत मांडत होती ! सूर्य मला फुलवतो तसाच इतर कमलिनींनाही फुलवतो म्हणून एखाद्या कमलिनीनं सूर्यावर रागावण्याचाच प्रकार ! !

बरं असं त्या पत्रात होतं तरी काय ? काही नाही. त्या पत्रातलाच काही भाग तुम्हाला दाखवतो म्हणजे झालं. त्या कमलिनीनं लिहिलं होतं — —





"प्राणप्रिया,

तू फार लबाड आहेस, किती दिवसापासून माझ्याकडे आला नाहीस. आपण त्या बेटावर एक आठवडा बरोबर काढला. तेव्हा मी अगदी स्वर्गात होते. तुला मी न् मला तू. तिसरं कुणीही नाही रंगात भंग करायला. पण आता मात्र तू माझी आठवण विसरलास असं दिसतं. गेल्या महिन्यात तुझं पत्र नाही. काहीच खबरबात नाही. न् अलीकडे म्हणे तू कोण्या एका ढालगज सटवीच्या मागे लागला आहेस. कोण आहे रे ही ? असेल मेली एखादी बाजारबसवी ! तू पडलास भोळा ! पसरलं हिनं आपलं जाळं ! हिचा निकाल लावल्याशिवाय कांही मी राहणार नाही. . . ." वगैरे वगैरे.

आता तुम्हीच सांगा. यात एवढं जळफळण्यासारखं काय आहे ? पण त्या क्षुद्र स्त्रीला हे वाचून अगदी कडेलोट झाल्यासारखं वाटलं. बराच वेळ रडून झाल्यावर तिनं पुन: ते पत्र उचललं. लिफाफ्यावर पत्ता फक्त प्रेषालयाचा होता. घरचा नव्हता. आपली पत्र घरी दुसऱ्या कुणाच्या हाती पडू नयेत याबद्दल थोर पुरुष फार दक्षता बाळगत होता हे स्पष्ट होतं. बाळगायलाच पाहिजे दक्षता ! वेद पढायला अधिकार लागतो. अनधिकारी व्यक्तीच्या हाती आपली पत्रं कशी लागू द्यायची !

क्षुद्र स्त्रीनं आणखी एकदोन पत्र फोडून वाचली. सगळ्यात तेच संगीत होतं. "साजणा तुझा सहवास घडून महिना झाला, दोन महिने झाले. मला का विसरलास" वगैरे वगैरे.

हे सर्व वाचून क्षुद्र स्त्रीचा पारा आणखीच चढायला लागला. बरी अद्दल घडली दुसऱ्याची पत्र चोरून वाचल्याबद्दल !

क्रोधागारात गेलेल्या कैकेयीप्रमाणं तिनं जमिनीवरच अंग टाकलं. इतक्यात तो थोर पुरुष आपली अनेक समाजकार्यं आटोपून परत आला. क्षुद्र स्त्रीचा अवतार पाहताच काहीतरी बिनसलं आहे हे त्यानं ओळखलं. त्यानं आराधनेला सुरुवात केली — —

"काय राणीसाहेब, कुणा अपराध्याला सुळावर चढवू? की भरताला राज्याभिषेक व रामाला चौदा वर्षे वनवासाला पाठवू. सेवक आज्ञेची वाट पाहत आहे."

क्षुद्र स्त्रीनं काही उत्तर दिलं नाही. फक्त ती पत्र त्याच्या अंगावर भिरकावली.

पत्र पाहताच सगळा प्रकार थोर पुरुषाच्या लक्षात आला. आता समजुती–च्या गोष्टी बंद करून त्यानं रुद्रावतार धारण केला. तो गरजला – –

"इतके दिवस माझ्याजवळ राहून देखील तुझी ही नैतिक पातळी! माझी पत्र चोरून वाचतेस! असलं नीच कर्म करायला लाज नाही वाटली तुला. जा आताच्या आता माझ्या घरातून चालती हो. यापुढे तुझा म झा संबंध तुटला."

हा वर्षाव झाल्यावर क्षुद्र स्त्रीचा नूर एकदम पालटला. ती गयावया करू लागली.

"नका हो मला असं दूर लोटू. तुम्ही न् मी एक असं समजून वाचली मी तुमची पत्र. पण आता नाही वाचणार. अन् अशी मी कोण लागून गेले आहे की माझा एकटीचाच तुमच्यावर हक्क सांगावा. मला तुमचा जेवढा अंश मिळेल तेवढ्यावरच समाधान मानायला मी तयार आहे."

क्षुद्रच होती ती. अन्नावाचून तडफडून मरेन, पण उष्टा घास खाणार नाही." असा स्वाभिमान तिच्या ठायी कुठून असणार!!

थोर पुरुषाचं साहाजिकच या शरणागतीनं समाधान झालं नाही. तो म्हणाला, "तुझा अपराध फार मोठा आहे. नुसती क्षमा मागून भागणार नाही. काहीतरी प्रायश्चित्त घेतलं पाहिजे. त्याशिवाय मी तुला क्षमा करणार नाही."

"काय प्रायश्चित्त घेऊ?" मोठ्या काकुळतीनं तिनं विचारलं.

"तुला दोन दिवस तळघरात कोंडून ठेवण्यात येईल, व हे दोन दिवस तुला अन्न मिळणार नाही." थोर पुरुषानं शिक्षा फर्मावली.

प्रिय व्यक्तीला केवळ कर्तव्यबुद्धीनं शिक्षा देताना थोर पुरुषाला आतल्या आत किती वेदना होत आहेत हे त्या क्षुद्र स्त्रीला स्पष्ट दिसत होतं.





"जशी आपली आज्ञा." असं म्हणून ती आपण होऊन तळघरात गेली. थोर पुरुषानं तळघराला कुलूप ठोकलं.

दोन दिवसांनी तळघराचं कुलूप उघडण्यात आलं. थोर पुरुषानं स्वत: करून आणलेलं लिम्बाचं सरबत क्षुद्र स्त्रीला दिलं.

तो तिच्या कल्याणासाठी नेहमीच असा झटत असे.

त्या सरबतावर तिचा दोन दिवसाचा उपास सुटला. थोर पुरुषानं तिला जवळ घेतलं व पूर्ण क्षमा दर्शविणारी मोहर केली. मग तिला कुरवाळत तो बोलू लागला.

"आता तू प्रायश्चित्तातून मुक्त झालीस तसाच मीही होरपळणाऱ्या अग्नी–तून बाहेर पडलो आहे तुझ्या नैतिक प्रगतीसाठी केवळ दयार्द्रबुद्धीनं मी तुला शिक्षा दिली. माझं ते कर्तव्यच होतं. तुझ्या पोटात दोन दिवस अन्न नव्हतं. तेव्हा मला अन्नाचा घास कसा घेववेल! अन्न तर दूरच राहो. गेले दोन दिवस माझा डोळा देखील लागला नाही. आता घडलेल्या सर्व उपासाचं आपण बरोबरच पारणं फेडू."

थोर पुरुषाला जरी दोन दिवस अन्न, पाणी, झोप हे सर्व पारखं झालं होतं तरी त्याच्या मूळच्या अध्यात्मिक बलामुळं त्याच्यावर त्याचा काहीही परिणाम झालेला दिसत नव्हता. तो सकाळी उमललेल्या फुलासारखा टवटवीत दिसत होता. क्षुद्र स्त्री मात्र मुळात काहीच अध्यात्मिक बल नसल्यामुळे अगदी सुकून गेली होती. तरी बरं तिला फक्त अन्नाचाच उपास घडला होता. पाणी व झोप याची तिला मुळीच मनाई नव्हती. शेवटी सोनं ते सोनं न् पितळ पितळ!!

थोर पुरुष पुढं बोलू लागला – –

"आता त्या पत्रांबद्दल तुझ्याशी बोलायला हरकत नाही. तू अगदी मूर्ख आहेस. तुला वाटलं की या पत्र लिहिणाऱ्या बाया जशा माझ्या मागे वेड्या झाल्या आहेत तसाच मीही त्यांच्यामागे वेडा झालो आहे. वेडी रे वेडी! अग त्यांनी लिहिलेली पत्र तू वाचलीस, मी त्यांना लिहिलेलं एखादं प्रेमपत्र कधी तुला सांपडलं आहे काय? स्त्रिया माझ्यासाठी वेड्या होतात त्याला मी काय करू? त्या मला

प्रेमपत्र लिहितात त्यावर माझा काय इलाज आहे ! मी तुझ्याशिवाय कुणावरही प्रेम करीत नाही."

क्षुद्र स्त्रीच्या डोक्यात आता प्रकाश पडला. खरच, देवाला हजारो लोक भजतात तरी सगळ्यांना देव पावतो थोडाच. थोर पुरुषाचं प्रेम तिला मिळालं हे तिचं भाग्य ! पण वाटेल तिनं त्याला प्रेमपत्र लिहावी न् त्याचं प्रेम मिळवावं इतका तो सवंग थोडाच होता.

आपल्याबरोबर थोर पुरुषानं एका बेटावर एकान्तात दिवस घालवले असे जे पत्र लिहिणाऱ्या प्रणयिनीनं लिहिलं होतं ते तिचं नुसतं स्वप्नरंजन असलं पाहिजे.

पुन: तिचे बरेच दिवस आनन्दात गेले. थोर पुरुष कितीही थोर असला तरी सर्वस्वी आपला आहे अशी तिची खात्री होती. पण तिचा श्रद्धाभेद करणारा आणखी एक प्रसंग लवकरच घडला. ती आजारी पडल्यामुळे बरेच दिवस थोर पुरुषाकडे जाऊ शकली नव्हती. थोर पुरुषाला अनेक लोककल्याण-कारक कामांमुळे तिच्याकडे जाण्याची फुरसत झाली नव्हती.

शिवाय रोग्याबद्दल जास्त आस्था दाखवू नये, नाहीतर रोग वाढतो असं त्याचं मत होतं. या शास्त्रशुद्ध मतावरील निष्ठेमुळं वेळ मिळाला असता तरी केवळ तिच्या कल्याणासाठी तो तिच्याकडे गेला नसता. प्रेयसी रोगाना तडफडत असतां केवळ तिच्या कल्याणासाठी तिच्या भेटीस न जाण्याचा निश्चय आचरणांत आणतांना थोर पुरुषाच्या दयार्द्र अन्त:करणाला किती वेदना होत होत्या हे क्षुद्र स्त्रीला स्पष्टपणे कळत होते.

थोर पुरुषानं दुर्लक्ष केल्यामुळे क्षुद्र स्त्रीचा आजार लवकर बरा झाला. पण ती क्षुद्र असल्यामुळे तिच्यांत संयम नव्हता. आजारातून उठल्यावर थोडे दिवस विश्रान्ति घेण्याऐवजी ती तडक थोर पुरुषाच्या घरीं गेली. आजारांत घडलेला थोडासा विरह आणखी थोडे दिवस तिनं सहन केला असता तर काय बिघडल असतं ! पण नाही. ती अनाहूतपणे थोर पुरुषाच्या घरी थडकली. निरोप बिरोप न पाठवता सरळ आंत गेली. या अशिष्ट वर्तनाचं तिला चांगलाच फळ मिळालं.





थोर पुरुषाच्या शय्यागृहातून एक स्त्री बाहेर पडली. तिचे केस बन्धमुक्त होत चालले होते व अंगाबाहेर धावपळ करू पाहणारं वस्त्र ती आवरून धरीत होती. क्षुद्र स्त्रीला पाहतांच ती सन्तापानं लाल झाली व तिने प्रश्नांचा भडिमार सुरू केला.

"कोण तुम्ही ? कोण पाहिजे ? कशाला पाहिजे" वर्दी न देता आंत कां आला ? . . ."

क्षुद्र स्त्री थोडीशी घाबरली. चाचरत ती म्हणाली "मी महाराजांची . . ." तिची जीभ अडखळली.

"महाराजांची ? . . . कोण महाराजांची ? शयनोत्थितेनं खडसावलं.

"खरंच. मी महाराजांची कोण ?' क्षुद्र स्त्रीला प्रश्न पडला. ती गांगरली. पण प्रश्नाच उत्तर न देता तिनंच शयनोत्थितेला प्रश्न विचारला "आपण कोण?"

विचित्रच दिसता तुम्ही, माझ्या प्रश्नाच उत्तर न देता मलाच प्रश्न विचारता" शयनोत्थितेनं आवाज चढवला.

इतक्यांत थोर पुरुष बाहेर आला. त्यानं शयनोत्थितेला आत जायला सांगितले. ती आंत गेल्यावर थोर पुरुष क्षुद्र स्त्रीला दुसऱ्या खोलींत घेऊन गेला. तिथे गेल्यावर त्याचे डोळे सात्त्विक सन्तापानं इंगळासारखे लाल झाले. क्षुद्र स्त्रीवर तो गरजला,

"गैरबर्तनाबद्दल इतके वेळा तुला प्रायश्चित्त दिलं. इतके दिवस माझ्या सहवासात राहिलीस. तरी तुझं मन काही शुद्ध होत नाही. चोरून पत्र वाचण्याच्या जोडीला आता चोरून घरात शिरणं सुरू केलंस. आजपासून तुझा माझा संबंध संपला."

"नका हो असे कठोर होऊं इतके दिवस तुमच्या भेटीसाठी तळमळत होते मी. तुमचं घर ते माझं घर समजून शिरले मी आत आधी न कळवता. पण आता नाही शिरणार. मला कोणतंही प्रायश्चित्त द्या. पण कायमचं दूर लोटू नका. मी पुन: उपास करायला तयार आहे. पुन: तळघरात जायला तयार आहे." क्षुद्र स्त्री विनवू लागली.

हासत कर्म करायचं न् बेतली म्हणजे गयावया करायची ही क्षुद्र लोकांची रीतच आहे,

पण अशा रडण्यानं वितळायला थोर पुरुष बाइलबुद्धचा व मेणचट थोडाच होता. थोर पुरुषांची अंतःकरणे प्रसंगी वज्रापेक्षाही कठिण होतात. अशाच वज्र–कठोर अंत:करणानं थोर पुरुष म्हणाला – –

"उपवासाचा न् तळघराचा तुझ्यावर काहीच परिणाम होत नाही हे स्पष्ट आहे. तेव्हा त्यापेक्षा मोठं असं एखादं प्रायश्चित्त दिलं पाहिजे. परिग्रह हे पापाचं मूळ आहे असं भगवंतानं सांगितलं आहे. तेव्हा तुझ्याजवळ जे काही आहे त्या सगळ्यावरची मालकी सोडून दे. त्याशिवाय तुझ्या अंत:करणातलं कल्मष नाहीस होणार नाही."

"कबूल आहे मला" असं म्हणून क्षुद्र स्त्रीनं आपल्या अंगावरचे सगळे दागिने उतरवून थोर पुरुषाच्या पायावर वाहिले, व ती म्हणाली

"या व्यतिरिक्त माझ्याजवळ बाबांनी माझ्या लग्नासाठी राखून ठेवलेले हजार रुपये व बाबांचं घर आहे. मी एकुलती एक मुलगी असल्यामुळं ते घर आता माझंच आहे. घर कसलं. आहे आपली एक झोपडी. आजपासून हा सर्व परिग्रह तुमचा आहे."

"ठीक आहे. तुझं मन शुद्ध नसलं तरी फारच अशुद्ध नाही. केलेल्या पापा–बद्दल तुला चटकन् पश्चाताप होतो व तू प्रायश्चित्त घ्यायला तयार होतेस यावरून तुझा उद्धार करणं कठिण नाही हे स्पष्ट आहे. आता मी तुला क्षमा केली आहे" असं म्हणून थोर पुरुषानं तिला जवळ घेतलं.

इतके दिवसांचा विरह व आताचा अनावर क्रोध यानंतर झालेलं प्रियकराचं ते मीलन. मग काय विचारता. क्षुद्र स्त्रीचं देहभान हरपलं, थोर पुरुष मात्र पूर्ण स्थितप्रज्ञ होता. त्याचं मन पूर्ण निष्काम होतं. शरीरानं तो क्षुद्र स्त्रीजवळ असला तरी मनानं कधी थोड्या वेळापूर्वी क्षुद्र स्त्रीवर खेकसणाऱ्या शयनोत्थितेजवळ तर कधी शेकडो मैल दूर असलेल्या दुसऱ्या एखाद्या विरहिणीजवळ राहत होता. थोर मनं अष्टावधानी असतातच.





इतकी अवधानं सांभाळून देखील क्षुद्र स्त्रीचं घर आपल्या नावानं करून घेण्यास व तिचे हजार रुपये हस्तगत करण्यास तो चुकला नाही.

तिला परिग्रहाचे पाप लागू नये म्हणून तो अगदी दक्ष होता.

तिचे दागिने मात्र "तुझ्याच अंगावर ते शोभतात" म्हणून त्याने स्वत:च्या हातानं तिच्या अंगावर चढविले.

याप्रमाणं आत्मशुद्धि झाल्यावर क्षुद्र स्त्री पुन: आनंदात राहू लागली. पण पत्र लिहून थोर पुरुषाची सम्मति मिळविल्याशिवाय ती त्याच्या भेटीस जात नसे. तिच्या चारित्र्यातील या सुधारणेमुळे थोर पुरुष खुष झाला व एकदा प्रेमात येऊन तिला म्हणाला – –

"त्या दिवशीची ती स्त्री कोण होती हे तू विचारलं नाहीस?"

"मी कशाला विचारू? माझा काय तिच्याशी संबंध" क्षुद्र स्त्रीनं उत्तर दिलं.

यावर थोर पुरुष पुढील थोर वचने बोलू लागला.

"मी आता असं ठरविलं आहे की कुणाच्याही प्रेमाचा अव्हेर करायचा नाही. इतक्या स्त्रिया माझ्यासाठी जीव टाकतात. त्यांच्या प्रेमाचा स्वीकार न करणं हा दुष्टपणा आहे. गंगा कुणाला माझ्यात स्नान करू नकोस असं म्हणत नाही. झाड कुणाला माझ्या सावलीत बसू नकोस असं म्हणत नाही. मग मीच का कुणाशी दुजाभाव करावा. हा माझा तो तुझा ही थोराची रीत नाही. थोरांना सर्वच आपले वाटतात.

थोर पुरुषाच्या अंत:करणाची ही उदारता पाहून क्षुद्र स्त्रीला गहिंवर आला. ती म्हणाली – –

"खरच किती उदार आहात तुम्ही. मी मागेच सांगितलं तुम्हाला की तुमच्या सारखा थोर पुरुष सर्वस्वी आपला असावा असा माझ्यासारखीनं आग्रह धरणं हा नीचपणा आहे. तुमचा जेवढा अंश मला मिळेल तेवढाच मी भाग्याचा समजते. पण त्या दिवशीच्या त्या बाईला कबूल आहे का हे?"

"नाही. ती तुझ्यासारखी मोठ्या मनाची नाही. तिची तेवढी प्रगति अजून झाली नाही. मी पाळलेल्या मुलाची तू आई आहेस हे मी तिला सांगितलं. पण तुझा माझा काही संबंध आहे हे तिला कळू देण्याइतका तिचा मनोविकास अजून झाला नाही. तो होईपर्यंत हे तिला कळता कामा नये."

"कसं कळणार?" क्षुद्र स्त्रीनं विचारलं.

"हो. तिला कळू नये म्हणून तू काळजी घेतेसच. पण उगीच आपलं सांगितलं." असं म्हणून थोर पुरुष खुषीत आला. त्याला क्षुद्र स्त्रीबद्दल प्रेमाचं भरतं आलं. तो म्हणाला, "तू फारच गुणाची आहेस बुवा. चल आज आपण मजा करू. गावाबाहेर जंगलामध्ये दूधधारेजवळ तो डाकबंगला आहे नं, तिथं सहल करायला जाऊ."

हे ऐकून क्षुद्र स्त्रीचा आनंद गगनात मावेना. थोर पुरुषानं इतर स्त्रियांवर अनुग्रह करायचं ठरवलं असलं तरी ते केवळ दयाबुद्धीनं. त्याचं खरं प्रेम आपल्यावरच आहे याबद्दल तिला आता शंका उरली नाही; तिनं सहलीला जायची तयारी केली. जायच्या वेळी ती आपल्या मुलालाही बरोबर घेऊ लागली तेव्हा थोर पुरूष म्हणाला, "राहू दे नं त्याला इथंच. सारजा पाहील त्याला. उद्या सकाळी परतच येणार आहोत आपण."

"इतक्या लवकर?" क्षुद्र स्त्रीनं खट्टू होऊन विचारलं. सुखोपभोगात योग्य प्रमाण न राखणं हे तर क्षुद्रतेचं लक्षणच आहे.

"हो. उद्या आलंच पाहिजे. मला खूप कामं आहेत." थोर पुरुषानं निर्णायक स्वरांत म्हटले.

यानंतर क्षुद्र स्त्रीला जास्त हट्ट करणं शक्यच नव्हतं. तरी ती म्हणाली, "बरं उद्याच परत येऊ. पण तरी याला घेऊन जायला काही हरकत नाही. हा जवळ नसला तर माझा आनंद पुरा झाल्यासारखं मला वाटणार नाही."

काय दुराग्रह! पण थोर पुरुषानं तो सहन केला व "मूर्ख छंदानुरोधेन" या न्यायानं मुलाला बरोबर येऊ दिलं.





गावाबाहेर दूर रम्य वनश्री होती. लहानमोठ्या टेकड्या, लहानमोठे ओहळ व लहानमोठी झाडं. असामान्य असं काहीही नाही. पण तरी त्यात एक प्रकारची प्रबल मोहकता होती. मोहकतेसाठी गाजलेल्या एकाद्या नदीत न आढळणारी मोहकता एखाद्या सामान्य ग्रामगंगेत आढळावी त्याप्रमाण तिथले निसर्गसौन्दर्य होती. त्यातच एके ठिकाणी चारपांच फुटावरून पडणारी दूधधारा होती.

या दूधधारेच्या शेजारच्या डाकबंगल्यांत थोर पुरुष व क्षुद्र स्त्री येऊन पोचली. स्नान, आराम वगैरे विधि आटोपेपर्यंत संध्याकाळ झाली.

"चल, आता आपण फिरून येऊ" थोर पुरुषान सूचना केली.

क्षुद्र स्त्रीने वेषभूषा केली. मुलाला कडेवर घेतलं व दोघे सहलीसाठी बाहेर पडली.

"पहा, याला घरी ठेवल असतं तर सोयीच नसतं झालं." थोर पुरूष म्हणाला.

"आता काय गैरसोय आहे?" कडेवर माझं वैभव, शेजारी माझा नाथ व भोवताली ही शोभा. माझ्या आनन्दात यावेळी कांहींही उणे नाही."

हे वाक्य तिन उच्चारलं तेव्हां भवितव्यतेचं ज्ञान असलेलं दैव विकटपणे हसलं!

मूर्खाच्या तोण्डी लागण्यात अर्थ नाही म्हणून थोर पुरूष चूप राहिला.

फिरता फिरता ते दोघे बरेच दूर गेले. मनुष्य वस्तीची चिन्हं नाहींशी होऊ लागली व पशुवस्तीची चिन्हं अधिकाधिक दिसू लागली. पुढे जाणे सुरक्षित नाही हे स्पष्ट दिसत असूनही त्यांना त्याचं भान राहिल नाही. प्रणयाचा कैफ त्यांच्यावर चढला होता.

पण हा कैफ एका क्षणांत उतरला. त्या निःशब्द वातावरणांत वनराजाची गर्जना उठली. त्या गर्जनेनं जमीन हादरू लागली, पर्वत कापू लागले, आकाश कोसळू लागलं. गर्जनेचा आवाज ओसरल्यावर, चारी बाजूंनी, नदीखोऱ्यांतून,

दरोगुहांतून त्या गर्जनेला प्रत्युत्तर मिळालं. आरसेमहालांत एका बिम्बाची असंख्य प्रतिबिम्बं होतात. वनराजाच्या त्या महालात एका गर्जनेला असंख्य गर्जनांचे पडसाद मिळाले. शान्त होऊं लागलेली धरणी पुन: हादरली, सावरलेले पुर्वत पुन: कापू लागले, स्थिरावलेले आकाश पुन: कोसळूं लागल. त्या वनांत बाकी कांहींही अस्तित्वांत नव्हतं, असून नसल्यासारख होत. तिथले सारे स्थिरचर एकाच गोष्टींत विलीन झाले होते. ती गगनभेदी गर्जना ! !

थोर पुरूष फार समयज्ञ होता. गर्जना ऐकल्याबरोबर तो चटकन् जवळच्या झाडावर चढला. केवढं प्रसंगावधान ! ! एखादा सामान्य माणूस मोकळ्या जंगलांत सिंहाची गर्जना ऐकल्याबरोबर बेशुद्धच पडला असता.

थोर पुरूष झाडावर चढला. पण क्षुद्र स्त्री झाडावर चढू शकली नाही. मुलाला कडेवर घेऊन कुठे झाडावर चढता येत ! ती थोर पुरूषाला विनवूं लागली.

"अहो खाली उतरा. याला घेऊन आपण दोघंही वर चढू" काय मूर्खपणाची कल्पना !

"त्याला घेऊन वर चढण्याचा प्रयत्न केला तर तिघांपैकी एकालाही वर चढता येणार नाही." थोर पुरूषान स्पष्टपणे बजावले.

"मग आपण तिघही खालीच राहू" क्षुद्र स्त्री म्हणाली.

"अन् तिघही सिंहाच्या तोण्डी जाऊं !" थोर पुरूष वेडावून उत्तरला.

"मुलाचं रक्षण करणं हे आपलं कर्तव्य आहे" क्षुद्र स्त्री आपला हट्ट पुढे चालवूं लागली.

"कर्तव्याच्या गोष्टी मला सांगू नकोस" थोर पुरूषानं तिला आपल्या अधिकाराची जाणीव करून दिली. "सर्वनाशाच्या प्रसगी शहाणे लोक शेपुट देऊन शीर वाचवतात."

"माझं बाळ म्हणजे माझं शेपुट नाही. ते माझं हृदय आहे. माझं सर्वस्व आहे." क्षुद्र स्त्री आर्त स्वरांत म्हणाली.

तिचं क्षुद्र मन दीड वितीच्या त्या क्षुद्र जीवांत गुंतलं होतं ! थोर पुरुषासारखा उदार व सुज्ञ विचार ती करूं शकत नव्हती.

तरीदेखील थोर पुरूषानं तिच्यावर न रागावता उदार मनानं तिला वाचवण्याचा प्रयत्न सुरू ठेवला.





"तुझी भावना मला समजते. पण भावनेच्या आहारी जाणं बरोबर नाही. मरण कुणाला टळलं आहे ! 'मरणं प्रकृति: शरीरिणा विकृतिर्जीवितमुत्यते बुध: !' बाळाचं मरण ओढवल आहे. ते आपण कस टाळणार ! तू एकटीच झाडावर चढ."

"शक्य नाही" क्षुद्र स्त्रीनं सांगितल. "मला भावना सोडून जगायचं नाही. मला भावनेच्या आहारी जाऊन मरायच आहे."

"तू फारच हट्टी आहेस. अशा प्रसंगी तत्त्वज्ञानी वृत्तीनं विचार केला पाहिजे. दुसऱ्या प्राण्यांना मारल्याशिवाय सिंहाचं पोट भरत नाही. ईश्वरानंच हा नियम घालून दिला आहे. आज सिंहाच्या समाधानासाठी ईश्वरानं बाळाची योजना केली आहे आपण ती कशी फिरवणार ?"

"ईश्वर ! कोण ईश्वर ? माझ्या बाळाला सिंहाच्या पोटी देणारा ईश्वर कीं सैतान ?" क्षुद्र स्त्री सन्तापाने ओरडली.

थोर पुरूष तिच्याप्रमाणे ताळ न सोडता शान्तपणे म्हणाला,

"असं बोलूं नये. आपण फक्त आपल्यापुरता विचार करतो. पण ईश्वराला साऱ्या सृष्टीची काळजी आहे. त्याच्या विशाल दृष्टीला तुझं बाळ दिसत तशीच सिंहाची भूकही दिसते. आपणही त्याच्या दृष्टीनं विचार करायचा प्रयत्न केला पाहिजे."

"मग उतरा खाली. आपण तिघंही सिंहाच्या पोटी गेलो म्हणजे त्याची भूक पुर्ण शान्त होईल." क्षुद्र स्त्रीनं आकाण्डताण्डव केलं.

पुन: सिंहाची गर्जना उठली

थोर पुरुष झपाट्यान झाडाच्या अगदी टोकावर चढला.

सिंहासारख्या य.कश्चित् प्राण्याच्या भूकेसाठी थोर पुरुषाची योजना करण्याइतका ईश्वर असमंजस थोडाच होता.

आतापर्यन्त ज्याच्या आगमनाच्या नुसत्याच ललकाऱ्या ऐकूं येत होत्या तो सिंह आतां खरोखरच प्रकट झाला. क्षुद्र स्त्रीला कांही न सुचून ती सैरावैरा धावत सुटली. पण सिंहाने पाहता पाहता क्षुद्र स्त्रीला गाठल व पंजाच्या एका तडाख्यानं तिच्या बाळाला ओढून घेतल. बाळानं प्राणान्तिक किंकाळी फोडली.

ती किंकाळी ऐकतांच त्या स्त्रीचं स्वरूप एकदम पालटल. तिची भीति पार नाहींशी झाली. तिनं सापडतील ते दगडधोंडे उचलून सिंहाला मारायला सुरवात केली. एकामागून एक दगडांचा वर्षाव झाल्यावर सिंहानं बाळाला

खाली टाकलं व तिच्यावर झडप घालण्यासाठी पवित्रा घेतला. इतक्यांत त्या स्त्रीला एक फान्दी सापडली. मग काय विचारता! होती नव्हती ती शक्ति एकवटून सिंहाची झडप पडावयाच्या आधी तिनेंच सिंहावर झडप घातली. सिंहाच्या डोक्यावर, नाकावर, पोटावर, दणादण प्रहार होऊं लागले. मातृत्वाचं सारं सामर्थ्य त्या प्रहारांत एकवटल होत.

त्या अनपेक्षित आघातानं सिंह थोडा वेळ गांगरला. पण लगेच एका पंजाच्या फट्कान्यान त्यान त्या स्त्रीचं हृदय बाहेर काढल. "बाळ" अशी एकच मरणान्तिक आरोळी ठोकून ती स्त्री धाडकन् खाली पडली.

सिंहानं शान्तपणे मुलावर अपल भोजन उरकलं. मग तो त्या स्त्रीच्या प्रेताकडे वळला, जोरान गर्जना केली, समोरचे पाय जमिनीवर सपाट पसरून तो थोडा वेळ ओणवा झाला. मग पुनः एकदा गर्जना करून भोवतालच्या झाडींत नाहीसा झाला.

तिच्या शौर्याला वनराजानं केलेल ते अभिवादन होतं.

* * * * *

थोर पुरुष झाडावरून हा सर्व प्रकार पाहत होता. सिंह नाहीसा झाल्यावर देखील बराच वेळ तो झाडावरच बसून होता. सिंह आता परतणार नाही अशी खात्री झाल्यावर तो खाली उतरला, व क्षुद्र स्त्रीच्या प्रेताजवळ आला. दोन प्रिय व्यक्तींच्या या अपघाती मरणामुळं त्याला किती वेदना होत होत्या हे त्याच्या भक्तांना यावेळी त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसलं असतं.

पण दुखः मुळ गांगरून जाणारा तो नव्हता.

क्षुद्र स्त्रीच्या अंगावर दोन तीन सोन्याचे दागिने होते. ते त्याच्या दृष्टीस पडले. सर्वनाशाच्या प्रसंगी जेवढं वाचवता येईल तेवढं वाचवावं हे त्याच ब्रीद होत. तसंच क्षुद्र स्त्रीनं आपलं सर्वस्व त्याला अर्पण केलेलं होत. या दृष्टीन हे दागिने त्याचेच होते. शिवाय इतर कुणाच्या हातांत सम्पत्ती असण्यापेक्षा थोर लोकांच्या हातांत ती असल्यानं समाजाचा जास्त फायदा होतो.

असा सर्व तात्त्विक विचार करून थोर पुरुषानं ते दागिने काढून घेतले व जड अन्तःकरणाने -- आणि दागिन्यांच्या भारान जड झालेल्या खिशाने -- तो घरी जायला निघाला.

● ● ●



# "खानोजीराव हडपे"

कान्होजीराव भण्डपे आयकर विभागात अधिकारी होते. पण त्यांना त्यांच्या खऱ्या नावाने क्वचित्‌च कोणी ओळखीत होते. त्यांचे लोकमान्य नाव खानोजीराव हडपे असे पडले होते सरकारला केवळ लोकांच्या आयराशींवर कर लादण्याचा अधिकार आहे, पण आयकर अधिकाऱ्याला लोकांप्रमाणेच सरकारच्या देखील आयराशींवर कर लादण्याचा अधिकार आहे असे त्यांचे मत होते. त्यामुळे ते कधी कोणावर योग्य त्यापेक्षा कमी कर आकारुन उरलेल्या कराचा एखादा हिस्सा स्वतःच्या खिशात टाकीत. त्यांच्या या कामाला हातभार न लावणारा एखादा भेटला की त्यावर दुप्पट कर लादून ते सरकारचे नुकसान भरून काढीत. या दुसऱ्या कोटीत विधात्याने जरूरीपेक्षा जास्तच लोक जन्मास घातले आहेत, त्यामुळे या मार्गाने इतर अधिकाऱ्यांच्या मानाने आपण सरकारला जास्त कर मिळवून देऊ शकतो याबद्दल सरकारने आपला सत्कार केला पाहिजे असे खानोजीरावांचे [मनात] म्हणणे होते.

खानोजीरावांची ही मनातच ठेवलेली मनीषा सरकारपर्यंत पोचली नाही व त्यांना पद्‌मश्री, पद्‌मभूषण वगैरेपैकी काहीही मिळाले नाही.

पण या क्षुल्लक पदव्यांत काय ठेवले आहे? खानोजीरावांना त्या न मिळाल्याबद्दल फारसे वैषम्य वाटले नाही. त्यांचा पगार, भत्ते मिळून फक्त दोन हजाराच्या घरात असला तरी त्यांची मिळकत दहा वीस हजारांच्या घरात होती.

चुकलो! त्यांची मिळकत नव्हे, त्यांच्या नातेवाईकांची ही मिळकत होती. हे पाच पन्नास नातेवाईक ईश्वराप्रमाणेच मिळकतीचे केवळ धनी होते, उपभोक्ते नव्हते. ईश्वरापुढे ठेवलेला नैवेदय ईश्वर कधी खातो काय?

खानोजीराव नेहमी इंपाला कारमधून हिंडत. कार वर्दी घातलेला ड्रायव्हर चालवी. कार केव्हा व कशी घेतली म्हणून सरकारकडून विचारणा झाला तेव्हा खानोजीरावांनी सांगितले. "कार माझी नाहीच. माझ्या व्याहयांची आहे."

खानोजीराव एका आलिशान बंगल्यात राहत, तो बंगला देखील त्यांचा नव्हता. त्यांच्या साडूंचा होता. बगल्यात भुताटकी आहे अशी बदंता पसरल्यामुळे बंगला कोणीच घेण्यास तयार नव्हते. साऱ्या जगात खानोज राव हेच भूतास न जुमानणारे निधड्या छातीचे निघाल्यामुळे त्यांनाच माफक भाड्याने बंगला देण्यात आला.

खानोजीरावांच्या घरचा स्त्रीवर्ग उंची दागिने घालून मिरवी. पण हे दागिने खानोजीरावांच्या मालकीचे नसून त्यांच्या मामे भावाच्या मालकीचे होते. या मामेभावाचे जव्हेऱ्याचे दुकान होते व तेथून हे दागिने खानोजीराव भाड्याने आणीत अशी "कागदावर" वस्तुस्थिती होती.

स्वत: निष्कांचन राहून कांचनाचा उपभोग घ्यायचा हा जसा खानोजी-रावांचा कांचनाच्या बाबतीत योग होता तसाच कामिनीच्या बाबतीतही होता. खानोजीरावांची बायको यथातथाच होती, कारण त्यांचे लग्न झाले तेव्हा त्यांची परिस्थिती सामान्य होती. पण आयकर विभागातल्या नोकरीमुळे त्यांच्या भोवती हळूहळू म्हणजे लवकर लवकर जसे कांचनाचे वलय चढू लागले, तसतशी कामिनीची वलये देखील त्यांच्या भोवती दिसू लागली. खानोजीराव नेहमी एखाद्या अप्सरेबरोबर, कुठे सिनेमात, कुठे एखाद्या आलिशान हॉटेलात, तर कधी एखाद्या बॉलनृत्यात दिसत. त्यांची अर्धांगिनी त्यांच्याबरोबर बाहेर कधीच दिसली नाही. ती आपली "गृहकृत्यात दक्ष" असे. खानोजीरावांच्या द्रव्योपभोगात त्यांच्या पगाराचा वाटा जसा थोडा होता, तसा त्यांच्या कामिनीसंगात गृहस्वामिनीचा वाटा फारच थोडा होता.

इतर आयकर अधिकाऱ्यांपेक्षा सरकारला अधिक आयकर मिळवून देऊन





आपण सरकारची व देशाची सेवा करतो, त्याचप्रमाणे प्रेमासाठी भुकेल्या कुमारिका व पतीशी पटत नसलेल्या विवाहिता यांची प्रेमाची भूक भागवून आपण स्त्री जातीची व त्याद्वारे एकूण समाजाची सेवा करीत आहोत अशी खानोजीरावांची प्रामाणिक श्रद्धा होती. पण खानोजीरावांच्या परिसरातील कुमारिकांचे आप्तेष्ट व विवाहितांचे नवरे अत्यंत 'प्रतिगामी' व "संकुचित" मनाचे असल्यामुळे त्यांना खानोजीरावांच्या या समाजसेवेचे महत्व पटत नव्हते.

तथापि कोणालाही कोणतीही गोष्ट पटवून देण्याची "सोन्याची" साधने खानोजीरावांजवळ होती. या साधनाचा प्रयोग करताच वरील "प्रतिगामी" मंडळी-पैकी बरीच "पुरोगामी" व उदार बनू लागली. पण एकदोन असाध्य असामी उरल्याच. एकाने खानोजीरावांना कोर्टात खेचले, पण पुराव्याच्या अभावी खानोजीराव निर्दोष मानले गेले. एवढेच नव्हे तर त्यांची नाहक बदनामी केल्याच्या आरोपावरून त्यालाच दंड भरावा लागला.

दुसऱ्याने कीर्टाच्या भानगडीत पडता खानोजीरावांना एकटे गाठून त्यांची हड्डी नरम केली.

तेव्हापासून खानोजीरावांनी कुठेही एकटे जाणे सोडले. "त्यांच्या व्याहयांनी" एक अक्राळ विक्राळ पठाण शरीररक्षक त्यांचा ड्रायव्हर म्हणून नेमला. व तो हाकेच्या अंतरावर असल्याशिवाय खानोजीराव कोठेही फिरकेनासे झाले.

कनक आणि कामिनी यांच्या बाबतीत असा भाग्योदय करवून घेतल्यावर खानोजीरावांना कीर्ती या तिसऱ्या ककाराची आठवण झाली. धनाढ्य म्हणून देखील कीर्ती होऊ शकते, पण तशी आपली कीर्ती होऊ नये म्हणून खानोजी-रावांनी काटेकोर दक्षता बाळगली होती. आता दुसऱ्या कोणत्या क्षेत्रात कीर्ती मिळवावी याचा विचार करताच खानोजीरावांना आपल्या हुकमी एक्क्याची आठवण झाली. पैशाने काय विकत घेता येत नाही?

त्यांनी एका प्रकाशकाशी संधान बांधले.

"काय हो, तुम्ही तुमच्या सगळ्यात मोठ्या लेखकाला काय देता?"

खानोजीराव आयकर अधिकारी या नात्याने विचारत आहे तेव्हा खर्च फुगवून सांगावा या समजूतीने प्रकाशक म्हणाले,

"अहो लेखक फार महाग आहेत. लेखकाच्या अनुभवाची कक्षा वाढण्यासाठी त्याला परदेशगमन, परस्त्रीगमन वगैरे सर्व करावे लागते. त्याचा सर्व खर्च आम्हालाच पडतो. पुस्तकामागे दहा हजारात भागलं तर नशीब समजा."

"मग असे करा, माझ्यातर्फे त्यांना पन्नास हजार द्या. मात्र एक अट आहे. पुस्तक माझ्या नावे प्रसिद्ध झाले पाहिजे. याबाबत लेखकाचं मन वळविण्याचं काम तुमचं, काम झाल्यास तुम्हालाही भरपूर कमिशन मिळेल."

प्रकाशकाने पन्नास काय वीस हजारावरच लेखकाचे मन वळविले. उरलेले तीस हजार व शिवाय कमिशन म्हणून दहा हजार असे चाळीस हजार स्वतःच्या खिशात टाकले.

झाले. खानोजीरावांच्या नावे पहिले पुस्तक प्रसिद्ध झाले. पहिलीच कृति असून अगदी सिद्धहस्त लेखकाप्रमाणे सफाईदार आहे म्हणून टीकाकारांनी आश्चर्य प्रकट केले. मूळ लेखकाच्या कृतीला नेहमी नाके मुरडणारे टीकाकार देखील खानोजीरावांच्या या पहिल्या कृतीला डोक्यावर घेऊन नाचू लागले. मूळ लेखकाला साहित्य अकादमीच्या दाराजवळ देखील फिरकायला मिळाले नव्हते. पण खानोजीरावांच्या पुस्तकाला साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले. त्यांच्याकडे प्रकाशकांच्या मागण्या येऊ लागल्या. मग काय विचारता, खानोजीरावांच्या लेखणीतून आघाडीवरच्या नवकवीशी स्पर्धा करणाऱ्या नवकाव्याप्रमाणेच आघाडीवरच्या पुरातनकवीचे पुराणकाव्य, सनातनधर्म समर्थक प्रथितश विद्वानापासून तो माओवादाच्या प्रसिद्ध प्रचारकापर्यंत, खदखदून हसविणाऱ्या विनोदचूडामणीपासून हळहळून रडविणाऱ्या करुणरसनिर्मात्यापर्यंत हरतऱ्हेच्या आघाडीवरील साहित्याशी स्पर्धा करणारे साहित्य बाहेर पडू लागले. साहित्यसम्राट केळकरांनी सर्व तऱ्हेचे लिखाण केले, पण त्यांच्या सर्वच लिखाणावर केळकरी छाप आहे. खानोजीरावांच्या लिखाणावर असा कोणताच छाप नाही. खानोजीरावांचे व्यक्तित्व बहुरुप आहे म्हणून टीकाकार त्यांच्यावर साश्चर्य स्तुतिसुमने उधळू लागले.त्यातही काही 'कोत्या' "संकुचित" मनाचे टीकाकार निघालेच.खानोजीराव पैसे देऊन पुस्तके आपल्या नावे लिहवून घेतात. असा आरोप करायला त्यांनी कमी केले नाही. खानोजीरावांनी त्यांना बदनामीच्या आरोपावरून कोर्टात खेचले. आपले म्हणणे सिद्ध करता न आल्यामुळे खानोजीरावांना हजारो रुपये भरपाई देऊन त्यांना आपली सुटका करून घ्यावी लागली.

**भम्पकराव बाताडे व इतर गोष्टी**



याप्रकारे कनक, कामिनी आणि कीर्ती, हे तीन्ही ककार खानोजीरावांनी प्राप्त केले व त्यांचा योगक्षेप अबाधित चालू राहिला. दैवयोगाने आरोग्यदेवतेची देखील त्यांच्यावर कृपा होती. त्यामुळे यमदेवाने देखील त्यांच्याकडे अनेक वर्षे दुर्लक्ष केले.

पण हा देव कुणालाही कायमचा कधीच विसरत नाही. खानोजीरावांना देखील "कृतान्तकटकामलजध्वजरा दिसो लागली" व इतके दिवस त्यांच्या मनात कधीही न आलेले मृत्यू व परलोक यांच्या बद्दलचे विचार येऊ लागले. "मृत्यूनंतर स्वर्ग की नरक याचा निवाडा होणार आहे. बापरे! आजपर्यंत स्वर्गात जाण्यासारखं आपण काहीच केले नाही. म्हणजे आपल्या नावे नरकच! इतके दिवस स्वर्गसुख अनुभवल्यावर नरकात जायचं? तिथं म्हणे विष्ठेचे ढीग, मूत्राच्या नद्या असतात! कुठे आराम करायला पडावे तर अंगावर शेकडो उन्दीर येऊन मासाचे लचके तोडू लागतात! पृथ्वीवर जीवन असह्य झाले की आत्महत्त्या तरी करता येते. पण नरकात म्हणे कुणाला मृत्यूच नाही. पापाचा हिशेब पुरा करायला तर गणितातल्या संख्या देखील पुऱ्या पडायच्या नाहीत. परद्रव्य, परदारा, परवाङमय, सुरापान, सारेच करून चुकलो. म्हणजे हजारो वर्षे ते विष्ठेचे डोंगर..! छे, छे, छे! यांतून काहीच मार्ग नाही काय?"

विचार करता करता खानोजीरावांनी एकदम उडी मारली. "सापडला! उपाय सापडला! जो उपाय पृथ्वीवर लागू झाला तोच स्वर्गात का लागू होऊ नये? शेवटी पापपुण्याचा हिशेब कोण ठेवतो? चित्रगुप्त! म्हणजे हा देखील आपल्या सारखा एक सरकारकुनच! पृथ्वीवरच्या मोठमोठ्या सरकारकुनावर कनकाची मात्रा लागू झाली. मग चित्रगुप्तच असा कोण लागून गेला आहे! इतके दिवस देवाची कारकुनी करून देखील त्याला स्वर्गाच्या आत डोकावता देखील आले नाही. एवढे तर पुण्य त्याच्या गाठी आहे. पापपुण्याचे हिशेब नीट ठेवण्यासाठी त्याला नेहमी पृथ्वीवर दौरे काढावे लागतात. या दौऱ्यासाठी त्याला देवाकडून भरपूर प्रवासभत्ता मिळत असला तरी पृथ्वीवरचा स्वर्ग लुटण्यासाठी तो कसा पुरा पडणार? चित्रगुप्ताचा हा खर्च पुरविणारे हरीचे लाल पृथ्वीवर असणारच! आपणही चित्रगुप्ताचे हे चोचले पुरवून आपल्या पापपुण्याच्या हिशेबात हवा तो फेरफार करून घ्यावा.

**खानोजीराव हडपे**

चित्रगुप्त मुंबईत आला की त्याने एम एल् .ए रेस्ट हाऊसमध्ये रहावे अशी देवाघरची व्यवस्था होती. पण चित्रगुप्ताने देवाघरची व्यवस्था पाळली असती तर आतापर्यंत तो केव्हाच स्वर्गवासी झाला असता. एम.एल्.ए. रेस्ट हाऊसमध्ये चित्रगुप्ताचा चपराशीच फक्त राही. स्वत: चित्रगुप्त व त्याचा पी.ए. ताजमहल हॉटेलात एका बडया स्वीटमध्ये राहत.

खानोजीरावांनी चित्रगुप्ताची मुलाखत मागितली. मुलाखतीच्या अर्जात मिळवतीचा आकडा द्यावा लागे. खानोजीरावांनी मासिक २०००/– हा आपल्या पगाराचा आकडा दिला. त्यांना लगेच उत्तर आले.

"एम.एल्.ए. रेस्ट हाऊसमध्ये माझ्या चपराशाला भेटा?"

उत्तर छापलेले होते व त्यावरची चित्रगुप्ताची सही देखील छापलेली होती. एकूण असेच उत्तर सर्व अर्जदारांना जाते म्हणायचे. म्हणजे माझा अर्ज चित्रगुप्तापर्यंत पोचलाही नसेल."

पण चडफडून काय उपयोग? खानोजीराव मुकाटयाने चपराशाला भेटायला गेले, तेथे त्यांना कळले की मासिक २०००/- च्या खाली उत्पन्न असेल त्यांच्या अर्जांना उत्तरच येत नाही. ५००० पर्यंत उत्पन्न असणाऱ्यांना चपराशाला भेटायला सांगण्यात येते. १५०००/– च्या वरील उत्पन्न असणाऱ्यांना पी. ए. ला भेटायला सांगण्यात येते, १५०००/– वर उत्पन्न असणाऱ्या काही निवडक लोकांनाच फक्त स्वत: चित्रगुप्त भेटतो.

"म्हणजे एकूण चपराशाच्यावर आपली पोच नाही. बरे आता आलोच आहोत तर त्याच्या कानावर आपले काम घालावे म्हणून खानोजीराव बोलू लागले. तोच चपराशी म्हणाला."

"हं हं हं, मिळकतीच्या आकडयावर माझी भेट झाली, पण याचा अर्थ तेवढयावर मी तुमचे काम ऐकून घेईन असं नाही. काम ऐकण्यासाठी तुमची महिन्याची मिळकत ईश्वराच्या कोशात जमा करण्यासाठी कोर्ट फी म्हणून द्यावी लागेल."

"त्याशिवाय गत्यंतर नसेल तर देऊ. पण काम ऐकून घेतल्यावर मग तुम्ही





ते चित्रगुप्ताच्या कानी घालाल ना?" आपल्या कोर्ट फीचे काय चीज होणार याचा अंदाज घेत खानोजीरावांनी विचारले.

"हं हं हं, चित्रगुप्त साहेबांचा कान एवढा स्वस्त नाही. मी तुमची केस फक्त पी.ए. च्या कानावर घालणार. पी.ए. ला योग्य वाटल्यास तो चित्रगुप्त साहेबांच्या कानावर घालील"

खानोजीराव आपल्या कामात बरेच मुरलेले होते. त्यांना तात्काळ ओळखले की आपली केस योग्य आहे असे पी.ए. ला वाटायला काहीच कारण नाही. तेव्हा चपराशीमार्गे चित्रगुप्तापर्यन्त केस पोचण्याची आशाच नको. सरळ चित्रगुप्तास गाठले पाहिजे पण त्यासाठी आपले मासिक उत्पन्न १५०००/– च्या वर आहे असे अर्जात लिहावे लागेल. काय हरकत आहे लिहायला? नाहीतरी चित्रगुप्ताच्या सर्वसाक्षी नजरेला ते दिसले असणारच. चित्रगुप्त ही गोष्ट आयकर खात्याला कळवील. अशी भीती बाळगण्याचे कारण नाही. कारण तो पृथ्वीवरच्या व्यवहारात ढवळाढवळ करीत नाही. फक्त त्याचा हिशेब ठेवतो.

झाले. खानोजीरावांनी उत्पन्न १५०००/– च्या वर दाखवणारा दुसरा अर्ज केला. त्यांना यथाकाल चित्रगुप्ताचे बोलावणे आले. "तुम्हाला रात्री दोन एकेचाळीस ते दोन शेहेचाळीस, पाच मिनिटे वेळ देण्यात येत आहे"

चित्रगुप्त महाराजासाठी ताजमहालमध्ये एक खास दिवाणखाना तयार करण्यात आला होता. आपला दिवाणखाना स्वर्गातील इंद्राच्या दिवाणखान्यासारखा असावा म्हणून पुण्य संपल्यावर स्वर्गातून पृथ्वीवर भ्रष्ट झालेले काही शिल्पी चित्रगुप्ताने ताजमहालाच्या मदतीस दिले होते. स्वर्गात त्याला स्वत:ला प्रवेश नसल्यामुळे स्वर्गातला दिवाणखाना त्याने पाहिला नव्हता. स्वर्गभ्रष्ट शिल्पकारांनी आपल्या आठवणीप्रमाणे तो हुबेहुब स्वर्गातल्या दिवाणखान्यासारखा तयार केला होता.

खानोजीराव चित्रगुप्ताच्या भेटीइतकेच तो स्वर्गीय दिवाणखाना पाहण्यास उत्सुक झाले होते. ते २.४६ च्या पाच मिनिटे आधीच प्रतीक्षागृहात येवून बसले. रीतीप्रमाणे त्यांनी महिन्याची मिळकत कोर्ट फी म्हणून भरली होती.

प्रतीक्षागृहात त्यांच्यासारखेच दहा लोक वाट पहात बसले होते. दोन झाले, तीन झाले, साडे तीन झाले तरी चित्रगुप्ताचे बोलावणे येईना तेव्हा त्यांनी शेजारच्या प्रतीक्षकाला विचारले,

"तुमची मुलाखत केव्हा आहे?"

"आहे कसली! होती! एक वाजता होती? पण चित्रगुप्त महाराजांचे एक केव्हा वाजणार हे तेच ठरवू शकतात.

आताजास्त विचार करण्यात अर्थ नाही म्हणून खानोजीराव बोटे चोळीत स्वस्थ बसले.

तब्बल सात वाजता प्रतीक्षागृहाचे ध्वनिक्षेपक बोलू लागले. "चित्रगुप्त महाराज रात्रभर काम करून थकले आहेत. आता ते शयनागारात गेले. आजच्या सान्या मुलाखती उद्यावर ढकलण्यात आल्या आहेत."

खानोजीरावांना यात काहीच नवीन नव्हते. ते बऱ्या बोलाने पुन: दुसऱ्या दिवशी म्हणजे रात्री हजर झाले. दोन तास तिष्ठत बसल्यावर त्यांच्या नावाचा पुकारा झाला.

मध्यभागी लोडावर चित्रगुप्त महाराज विराजमान झाले होते. त्यांच्या कानावर सोन्याची लेखणी ठेवली होती. समोर सोन्याच्या तबकात काचेचे मदिरापात्र होते भूलोकातील अमृताचे सुवर्णचषक घेऊन दोन बाजूला भुलोकीच्या दोन अप्सरा उभ्या होत्या. त्या कंचुकहीन म्हणजे टॉपलेस होत्या. तरी त्यांनी ते सोन्याचे चषक आपल्या दोन्ही हातांची ओंजळ करुन त्यात अशा रीतीने धरले होते की त्यांचे उरोजदर्शन होण्यासाठी प्रयत्न करावा लागत होता.

"काय काम आहे चटकन् बोला. पांच मिनिटाच्या वर एक क्षणही मुलाखत वाढणार नाही" चित्रगुप्ताने बजावले.

चषकधारी मदिराक्षीकडे पहात खानोजीराव म्हणाले, "मला एकांतात बोलायचे आहे."





"हा एकांतच आहे, माझे सारे व्यवहार या नायिकांच्याच समोर चालतात. कानांनी ऐकलेले त्यांच्या मुखातून कधीच बाहेर पडत नाही."

खानोजीरावांना निरुपायाने काम उच्चारावेच लागले "माझ्या पापपुण्याच्या हिशेबात. . . ."

"कळले काम, हिशेब दुरुस्त करण्यात येईल. मात्र तुमचे इहलोकीचे वास्तव्य आहे तोपर्यंत माझा ताजचा खर्च तुमच्या डोक्यावर म्हणजे खिशावर राहील, मुलाखत समाप्त

चित्रगुप्ताने असे म्हणून घंटा दाबली व लगेच दुसरा मुलाखती हजर देखील झाला. खानोजीराव मुकाटयाने बाहेर आले.

बाहेर आल्याबरोबर एका शिपायाने मॅनेजर साहेब आपली वाट पहात आहेत असे सांगितले. मॅनेजरांनी चित्रगुप्ताच्या चालू खर्चाबद्दल ताबडतोब १०००० ची व्यवस्था करण्यास सांगितले.

खानोजीरावांनी १०००० चे पाच भाग करुन आपल्या पाच आसामीवर भार वाटून दिला.

चित्रगुप्ताने खानोजीरावांच्या. हिशेबात पापाच्या जागी पुण्य व पुण्याच्या जागी पाप लिहून पापपुण्याची अदलाबदल केली.

खानोजीरावांची नरकाची चिंता दूर झाली. त्यामुळे त्यांची प्रकृति अधिकच टंच झाली. तशात निवृत्तीनंतर त्यांना एका कंपनीने पूर्वीचे ऋण स्मरुन दुप्पट पगाराची नोकरी दिली पण ती दोनच वर्षे टिकली. खानोजीरावांना आपण पुरेपुर भरपाई दिली अशा समजुतीने कंपनीने त्यांना निवृत्त केले.

आता मात्र खानोजीरावांच्या आयुष्यात एकदम नाटयदृश्यच बदलल्यासारखे परिवर्तन झाले. त्यांच्या हातातली सत्ता गेल्याबरोबर ज्यांच्या नावे त्यांनी मालमत्ता केली होती ते हळूहळू तीवर हक्क सांगू लागले. पेन्शनीव्यतिरिक्त वरचे उत्पन्नही नाहीसे झाले. बादशाही राहणीची सवय झालेल्या खानोजीरावांच्या कपाळी जिवंतपणीच नरकवास आला, चित्रगुप्ताच्या ताजची

बिले थकू लागली, त्यांच्या भोवतालच्या महिलादेखील सोडून गेल्या. ताजची बाकी थकली तर हिशोबाचा फेरविचार करावा लागेल असा चित्रगुप्ताच्या चपराशाने निरोप कळविला.

या निरोपाने खानोजीरावांनी हाय खाल्ली व लवकरच त्यांची इहलोकाची यात्रा संपली.

चित्रगुप्ताने जितके दिवसांची ताजची बाकी खानोजीरावांनी थकविली होती, तितक्या दिवसाच्या खानोजीरावांच्या हिशेबात पापाच्या जागी पाप व पुण्याच्या पुण्य म्हणजे शून्य लिहिले. बाकीचा हिशेब मात्र पापपुण्याची अदलाबदल करुन लिहिला होता. त्यामुळे खानोजीरावांचा पुण्यवन्तात इतका वर नंबर लागला की त्यांना स्वर्गात प्रवेश मिळायला काहीच अडचण पडली नाही.

खानोजीराव स्वर्गात विराजमान झाले. त्यांना राहण्यास एक प्रासाद मिळाला. त्याची अवर्णनीय शोभा काय वर्णावी? सोन्याची चमक, लोखडाची मजबुती, फुलांचा नाजुकपणा, इंद्रधनुष्याचे रंगसौंदर्य व हिमालयाची भव्यता इत्यादि सर्व गुणांचा समुच्चय त्यात झाला होता. प्रासादात पाऊल ठेवल्यावर खानोजीरावांना धन्य झाले. "इथे येण्यासाठी लोक पृथ्वीवर नरकवास सहन करतात यात काहीच आश्चर्य नाही. आपण मात्र सोप्या युक्तीने इहलोक-परलोक दोन्ही साधली" याप्रमाणे स्वतःची पाठ थोपटात खानोजीराव शीळ घालू लागले. या आनंदसंगीतास साथ देण्यासाठी त्यांना आपल्यानेहमीच्या साथीदाराची आठवण झाली. "कोण आहे रे तिकडे" त्यांनी हाक मारली.

एक अप्सरा समोर येऊन उभी राहिली. "स्कॉचव्हिस्की" खानोजीरावांनी फर्मावले.

हे शब्द ऐकून अप्सरेला काहीच बोध झाला नाही. ती प्रश्नार्थक मुद्रेने पाहात राहिली. 'स्कॉच व्हिस्की" खानोजीरावांनी पुन: फर्मावले.

"नाही समजलं मला" अप्सरेने क्षमार्थी स्वरात म्हटले.

काय तो स्वर!! मंजुळता, अर्थबोधकता, भावुकता या कोणत्याच





बाबतीत त्याची बरोबरी करील असे खानोजीरावांनी पृथ्वीवर काहीच ऐकले नव्हते.

"नाही समजलं? आश्चर्य आहे. स्कॉच व्हिस्की हे मर्त्य लोकातलं अमृत आहे. इथं स्कॉच व्हिस्की देखील नाही. म्हणजे हा स्वर्ग आहे की थट्टा आहे?"

"असं रागावू नये!" अप्सरा आर्जवाने म्हणाली, "स्वर्गात येवून मर्त्य लोकीच्या अमृतात काय इच्छा अडकवून ठेवता? स्वर्गात स्वर्ग लोकीचच अमृत घ्याना! ते एकदा घेतलं की तुम्हाला मर्त्य लोकीच्या भिक्कारड्या अमृताची आठवणही होणार नाही."

"असं म्हणतेस, बरं आण."

अप्सरा सोन्याच्या चषकात अमृत घेऊन आली. खानोजीरावांनी सोन्याचा प्याला तोंडाला लावला. "व्हिस्कीची काही सर नाही" ते अप्सरेला म्हणाले. "पण पाहू घेऊन. सवय व्हायला थोडा वेळ लागेल."

अमृताची चव काही वाईट नव्हती, म्हणून खानोजीरावांनी प्याला रिकामा केला, पण आख्खा प्याला रिकामा केल्यावरही "किक्" काही येईना. खानोजीराव तुच्छतेने त्या प्याल्याकडे पाहू लागले.

"नाही आवडलं?" अप्सरेने विचारल.

'अमृत, अमृत म्हणून ऐकत होतो ते हेच का? अशी सरबतं आमच्या पृथ्वीवर गल्लोगल्ली मिळतात. कशाला इथे आलो कुणास ठाऊक" असे म्हणून खानोजीरावानी सोन्याचा प्याला भिरकावून दिला.

अप्सरेनं तो अलगद उचलला व प्रणाम करुन ती बाहेर गेली.

खट्टू झालेले मन रिझवण्यासाठी खानोजीराव प्रासादाच्या उद्यानात येरझारा घालू लागले. पृथ्वीवर त्यांनी शालिमार पाहिला होता, स्विट्झर-लंडची वनश्री पाहिली होती पण ते सर्व या आपल्या अंगणातल्या बागेपुढे तुच्छ आहे, अशा बागेत राहुनही ईव्हला ज्ञानाचे फळ चाखण्याची

अवदसा आठवली. कदाचित् स्कॉच व्हिस्किची कीर्ती ऐकून ईव्हने तसे केले असेल.

बागेतल्या वातावरणाने प्रसन्न झालेल्या खानोजीरावांच्या मनात मधेच पुन: असंतोषाचा सूर उमटला.

पण इतक्यात कल्पवृक्षांच्या फुलांचा सुगंध पसरवीत वाऱ्याची एक गोड झुळुक खानोजीरावांना कुरवाळून गेली. ते पुन: प्रसन्न झाले व बागेत येरझारा घालू लागले.

किती वेळ तरी ते येरझारा घालित होते. पण त्यामुळे त्यांना थकवा न येता उलट हुषारीच वाटत होती.

थोड्याच वेळात त्यांना सपाटून भूक लागली. ते आपल्या प्रासादाकडे परत फिरले. प्रासादात सुसज्ज सैंपाकघर असेल असे त्यांना वाटत होते. पण सैंपाकघर कुठेच दिसेना. भोजनगृह दिसेना. त्यांनी पुन: अप्सरेला हाक मारली व फर्मावले.

"मला भूक लागली आहे. मुर्ग मसल्लम, कबाब वगैरे जेवण घेऊन ये. अन् इथले भोजनगृह कुठे आहे?"

"इथे वेगळे भोजनगृह नाही. जी मोठमोठी नावे तुम्ही आता घेतली त्या नावाचे पदार्थही स्वर्गात मिळत नाहीत. भूक लागली की इथले लोक जिथे असतील तिथेच अमृत मागवून पितात."

"अमृत! म्हणजेच मधाचे सरबत! प्यायलाही ते, खायलाही तेच! स्कॉच व्हिस्की नाही तर नाही, मुर्गा कबाबही नाही म्हणजे काय? कशाला इथे यायला लोक धडपडतात कुणास ठाऊक?"

"फार लवकर तुम्ही मत बनवता? अमृतापुढे तुमच्या पृथ्वीवरची सगळी पेयं व सगळी खाद्यं तुच्छ आहेत. पण पूर्वीच्या संवयी जायला थोडा वेळ लागेल. तोपर्यंत जरा धीर धरा."

धीर धरण्याशिवाय खानोजीरावांना गत्यंतर नव्हते. पोटात कावळे ओरडू लागले होते. त्यांनी बऱ्या बोलाने कबाबाची भूक अमृतावर भागविण्याचे ठरविले.





भूक लागल्यावर कोणतेही अन्न अमृतासारखे लागते. मग खुद्द अमृताचीच थोरवी काय वर्णावी? अमृताचे चषकावर चषक रिकामे करताना खानोजीराव ब्रम्हानंदाच्या लहरीवर पोहत होते. पृथ्वीवरच्या भोजनाने लवकर पोट भरते. पण अमृताने त्यांची भूक वाढतच होती. अमृताच्या आस्वादात देहभान विसरून खानोजीरावांनी तासन्‌तास घालविले.

पण अमृत झाले म्हणून काय झाले? त्याच्या आनंदालाही मर्यादा आहेत. हळूहळू त्यानेही पोट भरले व तृप्ती झाली.

पृथ्वीवर भोजन केल्यावर खानोजीराव कामकुक्षी करीत, मांसमच्छीचे मसालेदार जेवण पोटी गेल्यावर डोक्याकडे जाऊ लागे पण अमृताचे भोजन केल्यावर गुंगी येण्याऐवजी खानोजीरावांना उलट तरतरी वाढू लागली. 'खरंच, अमृत मासमच्छीपेक्षा श्रेष्ठ आहे."

पण थोडा वेळ गेल्यावर खानोजीरावांचे विचार बदलू लागले. अमृताने तरतरी वाढते खरी पण. मांसमच्छीच्या मसालेदार भोजननंतरची ती सुस्ती व कामकुक्षी, यांची मजा काही औरच होती. चोवीस तास तरतरी घेऊन करायचें काय? वेळ कसा घालवायचा?

इथे शराब नाही, कबाब नाही. हे एक असो. चोविस तास काही शराब कबाबात जाऊ शकत नाहीत. पृथ्वीवर उचलेगिरी करण्यात वेळ कसा भर्कन निघून जायचा! इथे आपल्या हातात काहीच सत्ता नाही. उचलेगिरी कशी करायची?

उचलेगिरी कशी करायची याचा विचार करायच्या आधी येथे उचलण्यासारखे काय व कोठे आहे याचा तपास करावा असे खानोजीरावांनी ठरविले. बाहेर निघायची तयारी करण्यासाठी ते आपल्या वॉर्डरोबकडे जाऊ लागले. पण त्या वॉर्डरोबमध्ये काहीच नव्हते. निरनिराळ्या तऱ्हेचे उंची सूट, रंगीबेरंगी टाय, काहीच नाही. नुसता एक सोन्याचा मुकुट व रेशमाचे उत्तरीय. स्वर्गवासी, नेसलेले पीतांबर कधीच बदलत नसत. कारण स्वर्गात कोणत्याही प्रकारचा मळ वा धूळ नसल्यामुळे नेसलेला पीतांबर नेहमीच स्वच्छ व परिटघडीचा राही. स्वर्गवासी

नेहमीच अधांतरी चालत असल्यामुळे त्यांच्यात जोडे घालायची चाल नव्हती. त्यामुळे पृथ्वीवर खानोजीरावांजवळ जसे उंची मुलायम जोडे होते तसले येथे काहीच दिसत नव्हते. पृथ्वीच्या आठवणीने पुन: अस्वस्थ होत खानोजीरावांनी बाहेर जाण्यासाठी रेशमाचे उत्तरीय व सोन्याचा मुकुट चढविला. महालाच्या बाहेर पाऊल टाकतात तोच त्यांना आपल्या इंपाला गाडीची व जरतारी ड्रायव्ह–रची आठवण झाली. पण स्वर्गात या चिजा कुठून असणार म्हणून त्यांनी अप्सरे–ला इथे बाहनाची काय व्यवस्था आहे असे विचारलं. तेव्हा स्वर्गातल्या सर्व लोकांना आकाशगमनाची कला साध्य असते, जिथे व जितक्या वेगाने जायची इच्छा असेल तिथे तितक्या वेगाने नुसती इच्छा करताच प्रत्येकजण आकाशमार्गे जाऊ शकतो अशी त्यांना माहिती मिळाली.

आकाशगमनाने खानोजीरावांचा स्वर्गाचा फेरफटका सुरू झाला, पण फेर–फटका करण्यासारखे त्यांना काहीच दिसेना. सर्वत्र त्यांच्या महालासारखेच महाल व त्यात तसलीच उद्याने. पृथ्वीवर मोठ्या शहरात प्रशस्त रस्त्यावर तऱ्हेतऱ्हेच्या नव्याकोऱ्या मालाची दुकाने असतात. सर्वांगावर ऊंची भूषणे मिरविणाऱ्या युवतीसारख्या त्या पण्यवीथीका कुठे अन् कुठे हे जंगलाचे जाल! खानोजीराव आपल्या इम्पालामधून त्या पण्यवीथींमध्ये हिंडत. एखादा माल पसंत पडला की तो घरपोच करायला सांगत. त्याची किंमत महिन्याचा हिशेब करताना मिळेल असे आश्वासन देत. पण हिशेब महिन्याचा नसून वर्षाचा असे. आयकराच्या हिशेबात योग्य त्या दुरुस्त्या करून ते त्या दुकानदारांची भरपाई करीत. पण इथे कुठून काय उचलावे! आपल्या महालात नाही असे या दुसऱ्या महालात काय आहे?

खानोजीरावांनी दिवसभर आकाशगमन केले, पण चित्रपटाच्या रिळावर एकच चित्र पुन: पुन: फिरून पडद्यावर प्रक्षेपित व्हावे त्याप्रमाणे सर्व दृश्ये त्यांना वाटली. कंटाळून ते घरी आले. पृथ्वीवर असताना संध्याकाळी घरी आल्यावर त्यांचा चहाचा कार्यक्रम असे. गरमागरम चहा पोटात जात असताना सर्वांगामध्ये हळूहळू तरतरी संचरावी, मध्येच एखादा टोस्टचा तुकडा चघळावा, अशा आनंदात त्यांचा बराच वेळ जाई. आपल्या महालात पोचल्यावर त्यांना या कार्यक्रमाची आठवण झाली व अभावितपणे त्यांनी अप्सरेला हाक मारली. पण लगेच त्यांच्या लक्षात आले की त्याचा काही उपयोग नाही. त्रासिकपणे त्यांनी अप्सरेला म्हटले.





"तुमच्या स्वर्गात चहा मिळत नसेलच!"

"हे नाव मी ऐकले नाही पण काही पेय हवे असेल तर अमृत ..."

"चुलीत घाल तुझे अमृत" खानोजीराव गरजले.

बराच वेळ त्यांनी येरझारा घातल्या. पण चहाची तल्लफ जाईना. तेव्हा निरुपायास्तव चहाची तहान अमृतावर भागवायचे त्यांनी ठरविले व अप्सरेला हुकूम केला.

"बरं आण तुझं अमृत"

पृथ्वीवर संध्याकाळी क्लबात जाण्याचा कार्यक्रम असे. त्यावेळी एखादी मदिराक्षी बरोबर असायची. तिच्याबरोबर मदिरापान, भोजन, नृत्य वगैरे झाल्या-वर रात्री एखाद्या "पंचतारक" हॉटेलात ते तिच्याबरोबर मुक्कामाला जात अशा अनेक हॉटेलात त्यांच्यासाठी खोल्या राखून ठेवलेल्या होत्या. स्वस्त्री ही परस्त्री वाटेपर्यंत अनेक रात्री बाहेर घालविल्यावर एखादी रात्र खानोजीराव घरी घालवीत.

"पृथ्वीवरच्या संध्याकाळी व रात्री अशा होत्या. आता स्वर्गात काय करावे? येथे "पंचतारक" हॉटेल कुठे मिळणार? बाहेर जाऊन उपयोग काय?

आजची रात्र आपल्याच महालात काढावी. बाहेरची मजा पुढे पाहू असा शेवटी खानोजीरावांनी निर्णय घेतला व अप्सरेला हाक मारली —

"या महालात किती अप्सरा आहेत?"

"आठ आहेत. आणखी हव्या असल्यातर इंद्रमहाराज व्यवस्था करतील!"

"अंत:पुराचा मार्ग दाखव" 'वेत्रवति, सोपानमार्गमादेशय' या संस्कृत नाटका-तील राजांच्या आविर्भावात खानोजीराव म्हणाले.

अंत:पुर बरेच विशाल होतं. आठ अप्सरांना आठ वेगळ्या कक्षाली व आठ वेगळी उद्याने होती. शिवाय सर्वांना मिळून एक महाकक्ष व महाउद्यान

होतं. खानोजीरावांच्या आठही अप्सरा महाउद्यानात जमून टिपऱ्या खेळत होत्या. कोण कुणापेक्षा सुन्दर हेच कळेना. प्रत्येकीच्या अंगावर तलम उत्तरीय होते त्या खाली उरोजांना उन्नत करणारी रेशमी कंचुकी स्पष्ट दिसत होती खाली नितम्बाला वक्राकार खुलविणारे कौशल्य होते. प्रत्येकीचा देह कदळीसारखा गौर, भरघोस कज्जलपुंजासारखे केस, कमळासारखे डोळे व चंद्रासारखं मुख होते. टिपऱ्यावर त्या खानोजीरावांना उद्देशूनच प्रीतिगीत गात होत्या.

हे दृष्य पहाताच खानोजीरावांना पहिल्यांदाच स्वर्गात येण्याचे सार्थक झाल्यासारखे वाटले. असं रुप पृथ्वीवर कुठेतरी दिसेल का?

पुढे होण्याऐवजी खानोजीराव त्या अप्सरांची क्रीडा पाहत राहिले क्रीडा पाहता पाहता खानोजीरावांच्या डोक्यात विचारचक्र सुरू झाले. स्वर्गात आल्यावर आपल्याला आठ अप्सरा मिळाल्या. उद्या आपली बायको स्वर्गात आली तर तिलाही आठ देवदूत मिळतील की काय? आपण पापपुण्याच्या हिशेबात अफरा-तफर करून स्वर्गात आलो. आपल्या बायकोला तसे काही करायची जरूर नाही. ती जात्याच सदाचरणी, देवलसी आहे. आपल्या बाहेरख्यालीपणाबद्दल चकार शब्द न काढता ती पातिव्रत्यावर अढळ राहिली. तेव्हा ती स्वर्गात येणार हे नक्की. स्वर्गात आल्यावर पृथ्वीवरच्या पतिव्रत्याच्या मोबदल्यात ती आठ देवदूतांबरोबर — — — —

खानोजीराव अस्वस्थ होऊ लागले. अधिक विचार करता त्यांच्या लक्षात आले की स्वर्गात अप्सराशिवाय कोणीही स्त्री दिसली नाही. म्हणजे आपली बायको अप्सरा होणार! पण अप्सरा झाली तरी ती आपल्याच अन्तपुरात राहील याचा नेम काय? इथे आल्यानंतर ती आपली बायको राहणार नाही व तिने कुठे रहावे हे ठरविण्यात आपल्या इच्छेची काहीच मातम्बरी असणार नाही.

खानोजीराव पुन: अस्वस्थ होऊ लागले.

"कसल्या काळजीत आहात?" अप्सरेने विचारले.

चोरी करताना पकडल्यासारखं खानोजीराव एकदम दचकले व म्हणाले.

"नाही, काळजी काही नाही. पण पृथ्वीवरच्या पुण्यवान् स्त्रिया येथे अप्सरा





होऊन आल्या की त्यांची काय सोय करतात याचा विचार करीत होतो.

"पुण्यवान् स्त्रिया स्वर्गात आल्या की त्यांना पुरुषांचा जन्म मिळतो. व तुमच्या सारखाच त्यांचीही सोय होते."

"मग तुम्ही अप्सरा कोठून येता?"

आम्ही पृथ्वीवरून येत नाही. स्वर्गवासी नागरिकांनी सेवा करण्यासाठी येथेच आमची निर्मिती झाली आहे. आम्ही सेविका आहोत, नागरिक नाही.

हे ऐकून खानोजीरावांना हायसे वाटले. एकूण स्त्रीजन्मात तरी आपल्या बायकोचा परपुरुषाशी संबंध येणार नाही.

अप्सरांच्या टिपऱ्या संपेपर्यंत खानोजीराव धन्यतेने पाहत राहिले. मग तेच पुढे झाले. सर्व अप्सरा उभ्या राहिल्या.

"आता आपण रासक्रीडा करू या" खानोजीरावांच्या तोंडातून अभावितपणे उद्गार बाहेर पडले. वस्तुत: त्यांनी रासक्रीडा कधीच केली नव्हती. पण स्वर्गात आल्यावर आकाशगमन जसे त्यांना सहजसाध्य झाले तशीच अप्सरांनी ताल धरल्याबर त्याची पावले सहजगत्या रासक्रीडेत सरावल्यासारखी पडू लागली. वर्तुळाकार रांगेत नृत्य करणाऱ्या अप्सरांच्यामधून एकदा वर्तुळाच्या आतून व एकदा बाहेरुन, एकीचे चुम्बन घ्यावे दुसरीला आलिंगण द्यावे असे करीत संचार सुरू झाला.

अप्सरांशी क्रीडा करण्यात रात्र केव्हा गेली त्यांना कळलेही नाही. अलोचन रात्री पृथ्वीवरही त्यांनी घालविल्या होत्या. पण त्या रात्रीनंतर थकवा, तर कधी डोकेदुखी याचा त्रास असायचा. पण स्वर्गात या गोष्टी अस्तित्वात नव्हत्या. अमृताची तहान लागण्याइतकाच थकवा यावा व अमृताचे घुटके घेतल्यावर पुन: ताजेतवाने व्हावे. झोपेची गरजच नाही. मद्यप्रमाणे अमृताचा शेषशूल-हँगओव्हर-देखील सकाळी त्रास देत नाही.

अशा अनेक रात्री गेल्या.

मग हळूहळू खानोजीरावांना पुन: आपल्या पृथ्वीवरील बाह्याचाराची

आठवण होऊ लागली. अप्सरा फार सुन्दर आहेत खऱ्या पण त्या सर्व आपल्याच म्हणजे स्वस्त्रिया. केवळ स्वस्त्रीबरोबर क्रीडा करण्यात–मग त्या एक सोडून आठ असल्या तरी शतकृत्य ते काय! शिवाय अप्सरा संख्येने आठ असल्या तरी सगळ्याच एक–दुसरीच्या प्रतिकृति आहेत. सगळ्यांचे डोळे कमळासारखे, केस भृंग्यासारखे, त्वचा कदलीसारखी, बांधा लतेसारखा, एकाच चित्राच्या आठ प्रति. आपल्याला त्यांना वेगळे ओळखणेही कठीण जाते.

"ही फक्त आपल्याच अप्सरांची गोष्ट आहे असे नाही. बाहेर दुसऱ्यांच्या अप्सरा पाहिल्या. त्या आपल्या की दुसऱ्यांच्या हे काही आपल्याला ओळखू येत नाही. या स्वर्गात परस्त्रीगमनाची मजा नाहीच एकूण,"

"स्वर्गात अप्सरावाचून दुसऱ्या कोणी स्त्रियाच नाहीत का?" त्यांनी आपल्या सेविकेला विचारले.

"आहेत ना." इंद्राणी आहे. विष्णूची लक्ष्मी व सरस्वती आहे. शंकराची पार्वती आहे. . . . . .

"हो, हो हे मी पृथ्वीवरही ऐकले होते." खानोजीराव उत्तरले. "म्हणजे आता परस्त्रीगमन करायचे म्हणजे या धेंडापैकी कुणालातरी गठवायला पाहिजे." त्यांच्या मनात विचार आला.

हा विचार आल्याबरोबर वीज कडाडल्यासारखा आवाज झाला. क्रोधाने थरथरणारा इंद्र समोर उभा असलेला त्यांना दिसला. त्यांच्या वज्राचे तेज साऱ्या प्रासादात फाकून एका वज्राची शतश: वज्रे झालेली दिसत होती. मेघगर्जनेतून पुढील वाक्ये ऐकू आली.

"इंद्राणीचा अभिलाष तुझ्या मनात उत्पन्न झाला आहे. स्वर्गात येणाऱ्या मनुष्याच्या मनात अशी पापी अभिलाषा उत्पन्न झालेली पूर्वी कधी ऐकली नव्हती. इंद्राणीची प्राप्ति व्हायला इंद्रपद मिळावे लागते. पुन: अशी इच्छा करशील तर तत्काल तुझे पुरुषी सामर्थ्य नष्ट होईल. तरी तुझ्या वासना कायम राहतील व स्वत:च्या पत्नीशी परपुरुषाचा व्यभिचार तुला पहावा लागेल."

"खानोजीरावांची बोबडीच वळली. क्षमा मागण्याचा ते प्रयत्न करतात.





तोच पुन: भीषण शंखध्वनि ऐकू आला. व सुदर्शन चक्र नन्दक खड्ग व कौमोदकी गदा फिरवीत विष्णु प्रकट झाले. त्यांच्या शंखातून पुढील वाणी ऐकू आली.

"माझ्या लक्ष्मी–सरस्वतीची तुला अभिलाषा उत्पन्न झाली आहे. पहिला अपराध म्हणून मी क्षमा करतो. पण पुन: अशी अभिलाषा करशील तर तुला पृथ्वीवर टाकले जाईल. तुझे शरीर महारोगाने विद्रूप होईल व दारोदार भिक्षा मागत तुला फिरावे लागेल."

या दुसऱ्या शापवाणीने खानोजीराव पुन: सुन्न झाले, थोडेसे सावध होतात तोच डमरुचा कर्णभेदी कडकडाट ऐकू येऊ लागला, ताण्डव नृत्य करीत शंकर प्रकट झाले. त्यांच्या कंठातील नागाने आपली फणा उभारली होती. तिसरा डोळा बंदच होता. तरी त्याची पापणी आत धगधगणाऱ्या अग्नीमुळे लालबुंद दिसत होती. त्यांच्या डमरूतून पुढील शब्द फुटले.

"मला जन्मजन्मांतरी निष्ठावंत राहणाऱ्या पार्वतीची अभिलाषा धरतोस? लक्षात ठेव. पुन: असे करशील तर हा तिसरा डोळा उघडेल. पण त्यातल्या अग्नीने तू भस्म न होता, तो एखादा वस्त्रासारखा तुला वेष्टून राहील व अनन्त काळ पर्यन्त त्याच्या वेदना सहन करीत तुला जगावे लागेल.

ही तिसरी शापवाणी ऐकून खानोजीराव भयातिशयाने बेशुद्ध पडले. सावध झाले तेव्हा त्यांच्या आठ अप्सरा त्यांना वारा घालीत होत्या. अमृताचे एकदोन घोट घेतल्यावर त्यांना हुषारी आली. ते पुन्हा विचार करू लागले.

"येथे परस्त्रीगमनाचा पराक्रम करायचा असेल तर आपल्याला अप्सरेपैकीच कुणाशी तरी संधान बांधायला पाहिजे. देवस्त्रियांचा विचारही मनात येता उपयोगी नाही.

"पण या अप्सरा इथून तिथून सारख्याच दिसतात . . . . दिसल्या तरी काय हरकत आहे? दुसऱ्याची, ती दुसऱ्याचीच, तिची मजा काही औरच असते. .

"मग आता कुणाची गठवावी? कुणाची काय? शेजाऱ्याची. शेजाऱ्यावर प्रेम करा असे क्रिस्ताने वा कुणीसे म्हटले आहे. शेजाऱ्याची बायकोही शेजारीण असते की,

खानोजीरावांच्या शेजारी संतोजीराव राहात होते. पृथ्वीवर लग्न

झालेले असूनही आजन्म ब्रम्हचारी राहिल्यामुळे त्यांना स्वर्गप्राप्ति झाली होती. पृथ्वीवरच्या ब्रम्हचर्याच्या मोबदल्यात त्यांना खानोजीरावांच्या आठ ऐवजी सोळा अप्सरा मिळाल्या होत्या.

संतोजीराव एकदा शंकराच्या भेटीस कैलासास गेले ही संधी साधून खानोजीराव त्यांच्या महालात शिरले.

"संतोजीराव कैलासावर गेले आहेत" त्यांच्या एका अप्सरेने सांगितले.

"केव्हा येणार आहेत ?"

"ते सांगून गेले नाहीत. पण ते देवादिकांच्या भेटीस गेले की बरेच दिवस येत नाहीत."

"वारंवार असा विरह घडल्यामुळे तुमचे जीवन फार कष्टाचे होत असेल नाही !"

"त्याच्या सुखासाठी आम्ही आहोत, आमच्या सुखासाठी ते नाहीत"

खानोजीराव एकदम दचकलेच. ही तर अगदी आर्य स्त्रीसारखी बोलते आहे ते तिला स्त्रीमुक्तीचे मनोविज्ञान सांगू लागले.

"एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या सुखासाठी आहे ही सत्ताधारी लोकांची शिकवणूक आहे. प्रत्येकाला आपले सुख पहिले पाहिजे. माझ्या अंतःपुरात आठ अप्सरा आहेत. पण तू दृष्टीस पडलीस तेव्हापासून मी तुझ्यासाठी झुरतो आहे."

"स्वर्गात असे आजपर्यंत कुणी बोलल्याचे आठवत नाही. इतर अप्सरांसारखीच मी आहे. पण तुम्हाला मीच पाहिजे असेन तर इंद्रमहाराज संतोजीरावांना विचारून मग तुमच्या अंतःपुरात सहज पाठवतील".

"अन् संतोजीराव नाही म्हणाले तर ?"

"स्वर्गात अशा तऱ्हेची मागणी कधी कोणी केलीच नव्हती."

"म्हणजे आता संतोजीराव येईपर्यंत वाट पहायची."

"नाही, नाही. स्वर्गात विचारक्रान्तीने कुणाशीही संभाषण करता येते.





तुम्ही आताच इच्छा करा. इंद्राशी संपर्क स्थापित होईल."

'ही विनंती तूच का नाही करीत ?"

"आम्ही सेविका आहोत, आम्ही अशी विनंती करणे हे इंद्राच्या पूर्वीच्या आज्ञेत दोष काढण्यासारखे होईल."

खानोजीरावांचा निरुपाय झाला. त्यांनी अप्सरेच्या म्हणण्याप्रमाणे इंद्राशी संपर्क साधला. इंद्राने क्षणार्धात संतोजीरावांशी संपर्क साधून त्यांची संमती असल्याचे कळविले. अप्सरा लगेच खानोजीरावांच्या अंतःपुरात आली.

या एकंदर प्रकाराने खानोजीराव खट्टूच झाले. एकूण आपली अप्सरा दुसऱ्याच्या अंतःपुरात गेली याची संताजीरावांना काहीच तमा नाही, ही अप्सराही इन्द्राची आज्ञा होईल तिथे जाणार. तिला संताजीराव काय, खानोजीराव काय सारखेच, अप्सरा म्हणाली की आपल्यासारखी विनंती इथे कधीच कोणी केली नाही, कशाला करील ? साऱ्या अप्सरा एकाच छापाच्या. ज्याला जेवढ्या पाहिजे असतील तेवढ्या इंद्र पुरवितो. मग आपली एखादी अप्सरा दुसऱ्याला देण्यात काय अनमान वाटणार आहे? आणि अशा स्थितीत दुसऱ्याची अप्सरा उपटण्यात शतकृत्य ते काय ? पृथ्वीवर असतांना किती सुन्दरी नवऱ्यांना चुकवून आपल्याशी रममाण होत होत्या. त्यात आपण व त्या दोघेही धाडस करीत होतो. वाघाची शिकार करण्याचा आनंद त्यात होता संतोजीरावांची अप्सरा घेण्यात माशी मारण्याचाही आनंद नाही.

"स्वर्गात आल्यापासूनच शराब नाही, कबाब नाही, परवित्त नाही, परनारी नाही असे एकावर एक अनुभव आल्यामुळे सुग्रास अन्न खातांना पदोपदी खडे लागावे तसे खानोजीरावांना होऊन गेले. तेच अमृत, त्याच अप्सरा, तेच बगीचे. काय करायचे इथे राहून? पृथ्वीवर परत जावे झाले.

ते परत जायला निघाले. बहिर्द्वारापर्यंत आकाशगमन केल्यावर द्वारपालाने त्यांना अडविले.

"बाहेर जायचे पारपत्र कुठे आहे ?

"म्हणजे पृथ्वीवर परत जाण्यासाठी देखील परवानगी लागते का?

"अर्थात्. ज्या पुण्याच्या भरशावर स्वर्गात जागा मिळाली, ते संपल्याशिवाय तुम्हाला पृथ्वीवर जाता येणार नाही."

हे संकट खानोजीरावांना स्वप्नातही अपेक्षित नव्हते. त्यामुळे ते घटकाभर हतबुद्ध झाले. पण लगेच असल्या संकटावर पृथ्वीवर असतांना हमखास लागू होणारा रामबाण त्यांना आठवला. त्यानी एकदम आपल्या खिशात हात घातला. पण बाघ समोर आल्यावर बंदुकीचा चाप ओढावा व तिच्यात गोळी नाही हे लक्षात यावे अशा वेळी शिकाऱ्याची जी मनस्थिती होत असेल तीच खानोजीरावांची झाली. स्वर्गामध्ये शराब नाही, कबाब नाही, परवित्त नाही, परनारी नाही त्या प्रमाणे आपला रामबाण टक्काही नाही. तेव्हां या स्वर्गातून निसटून जाण्याचा काही उपायच नाही.

पूर्णपणे निराश होऊन खानोजीराव निरुपायाने स्वर्गातले उरलेले दिवस कंठण्यास परत फिरले.



# बजबजपूरचा कारखाना

बजबजपूरचा पोलाद कारखाना हे साऱ्या देशाचे आशास्थान होते. साऱ्या प्रगतीची आधारशिला म्हणजे पोलाद. ते तेथे तयार होत होते. या कारखान्यावर एखादी आपत्ति येणे हे साऱ्या देशावरच आपत्ति येण्यासारखे होते. त्यामुळे देशातील सर्वोत्तम अधिकाऱ्यांची त्या कारखान्यात नेमणूक करण्यात आली होती.

कारखान्याचा कारभार अवाढव्य. त्याच प्रमाणात कारखान्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्याही अवाढव्य. कारखाना स्थापन झाल्याबरोबर भोवतालच्या वस्तीतले लोक "कारखाना चोवीस तास धूर ओकीत असतो. त्यामुळे आम्हो व आमची पोरेबाळे लवकरच गुदमरून मरणार" अशी हाकाटी करू लागले. पण कारखान्याच्या धुराने गुदमरून मरणे हे प्रगत औद्योगीकरणाचे लक्षण आहे अशी देशातील प्रगतशील लोकानी भूमिका घेऊन त्यांची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न केला.

काही दिवसांनी एका अमेरिकन धेंडाने कारखान्याला भेट दिली. त्याचा पुरेपुर आदरसत्कार झाल्यावर मॅनेजरांनी त्याला चार शब्द बोलायला सांगितले. त्याने चार शब्द उच्चारले. पण त्या चारातले दोन "धूर" असे होते. अमेरिकेत कारखान्यातील धुरामुळे नागरिकांचें स्वास्थ्य धोक्यात आले आहे. म्हणून कार–

खान्याच्या धुरावर नियंत्रण घालण्यासाठी आम्ही कोट्यावधि डॉलर खर्चीत आहोत असे त्याने सांगितले.

हे सांगणे ऐकून धुराने गुदमरणे हे प्रगतीचे लक्षण नसून धूररोधी यंत्रे वापरणे हे प्रगतीचे लक्षण आहे या सत्याचे सान्या श्रोत्यांना दर्शन झाले

मुस्कटदाबी झाल्यामुळे धुळीबद्दल तक्रार करणारे लोक बरेचसे चूप झाले होते. पण आता मॅनेजरांनी स्वत:च धुळीवर उपाययोजना करणे जरूर आहे अशी मागणी केली तेव्हा कारखान्याची पाहणी करण्यासाठी दोन अमेरिकन व दोन रशियन तज्ज्ञ बोलावण्यात आले.

दोन तज्ज्ञांच्या या दोन गटांनी एकमेकापासून अलिप्त राहून स्वतंत्रपणे कारखान्याला भेट दिली व कारखान्यात प्रदूषणनियंत्रक यंत्रे लावण्यात यावीत अशी शिफारस केली.

आता ही यंत्रे मागवावी कोठून असा प्रश्न उद्‌भवला. उजव्या गटाने यंत्रे अमेरिकेतून मागवावी असे मत दिले. यावर डावा गट म्हणाला की अमेरिकन यंत्रांनी धूराचे प्रदूषण रोखले गेले तरी भांडवलशाहीचे प्रदूषण वाटेल. तेव्हा अमेरिकन यंत्राकडे ढुंकूनही पाहू नये. रशियातून यंत्रे मागवावी. उजवा गट म्हणाला की रशियातील यंत्रांनी कम्युनिझमचे प्रदूषण वाढेल इतकेच नव्हे तर धूराचे प्रदूषण कमी होईल की नाही याचीही शंकाच आहे. मागे एका विकासशील देशाने रशियाकडून धूर रोखणारी यंत्रे मागवली तेव्हा रो मधला र गळून पडला व धूर ओकणारी यंत्रे येऊन पडली. यावर डाव्या गटाचे म्हणणे पडले की उजव्यांच्या बूधूर्वा मेंदूतून ही बनावट कथा प्रसृत करण्यात आली आहे.

या भांडणात शेवटी असे ठरले की अमेरिकन व रशियन अशा दोन्ही यंत्रांचे संच मागविण्यात यावे. एका वर्षी अमेरिकन व दुसऱ्या वर्षी रशीयन यंत्र अशी आळीपाळीनेही यंत्रे वापरण्यात याची म्हणजे एकाच यंत्रावर भार पडणार नाही व कोणते यंत्र चांगले हेही कालान्तराने कळून येईल.

लवकरच कारखान्यात धूररोधी यंत्रे बसविण्यात आली व भोवतालच्या लोकांना धुरापासून पुष्कळच सुटका मिळाली.





धुराची समस्या दूर झाली. पण कारखान्यात दुसरी एक समस्या फार दिवसापासून आहे हे तेथे काम कारणाऱ्यांना जाणवू लागले. ही समस्या म्हणजे धुळीची समस्या. दारे खिडक्या लावून चोवीस तास घरी बसले तरी नाका तोंडात धूळ जाणे वाचत नसे, मग बाहेर गेल्यावर तर विचारूच नका. हा त्रास वाचविण्यासाठी काय करावे हे सुचविण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती तीन वर्षापूर्वीच मॅनेजरांनी नेमली होती. या समितीचे अध्यक्ष एक मोठे वैज्ञानिक होते.

देशातील प्रत्येक गोष्ट विज्ञानाधिष्ठित असल्याशिवाय आपल्या देशाची प्रगति होणार नाही अशी मॅनेजरांची शिकवणूक असे. त्यांनी आपल्या कारखान्याच्या आवारात विज्ञानदेवतेचे एक मंदिर उभारले होते. या मन्दिरात कारखान्यातल्या सर्व लोकांनी प्रार्थना केली पाहिजे असा नियम होता. आजच्या युगात विज्ञान हाच देव असल्यामुळे कारखान्याच्या आवारात दुसऱ्या कोणाचेही मंदिर उभारण्यास मनाई होती.

समिती नेमून तीन वर्षे होऊन गेली तरी अहवाल तयार झाला नव्हता. धूळ निवारण्यासाठी काय करावे याचा अभ्यास करण्यासाठी समितीचे सदस्य युरोप, अमेरिका, रशिया, जपान वगैरे देशात जाऊन आले होते. मॅनेजरांनी धुळीचा प्रश्न फार निकडीचा आहे म्हणून समितीने आपला अहवाल लवकर सादर करावा म्हणून तगादा लावला. तेव्हा एका शुभ मुहूर्तावर समितीने आपला हजार पृष्ठांचा अहवाल सादर केला.

या अहवालाचा विचार करण्यासाठी मॅनेजरांनी तो कारखान्यातील उच्चाधिकाऱ्यांच्या सभेपुढे ठेवला. हजार पृष्ठांचा अहवाल कारखान्याचे उच्चाधिकारी नंतर सवडीने वाचतील, या सभेत समितीच्या अध्यक्षांनी अहवालाचा कार्यकारी भाग म्हणजे ऑपरेटिव्ह पार्ट काय आहे तेवढे फक्त समजावून सांगावे अशी मॅनेजरांनी विनंती केली.

समितीचे अध्यक्ष बोलायला उठले. पण सभेच्या खोलीत इतकी धूळ होती की अध्यक्ष कोणते, मॅनेजर कोणते व इतर सदस्य कोणते हे पाहून ओळखू येत नसले तरी अध्यक्षांच्या आवाजातून ते अध्यक्षच बोलत आहेत हे सदस्यांना ओळखू येत होते. अध्यक्ष म्हणाले,

"सभ्य स्त्रीपुरुषहो, केवळ आपल्या कारखान्यातच नव्हे तर साऱ्या भारतवर्षात धुळीची समस्या फार मोठी आहे. साऱ्या देशात एक अब्ज, दहा कोटि, पाच लाख दोन हजार सातशे टन धूळ आहे असे आमच्या समितीने अनेक प्रकारची आधुनिक यंत्रे वापरुन मोजून काढले आहे. खुद्द राजधानीत सहा लक्ष चार हजार तीनशे दशांश चिन्ह पाच टन धूळ आहे.

यावर एक विज्ञानात अक्षरशत्रू असलेले सदस्य म्हणाले,

"अहो धूळ पुष्कळ आहे हे आम्हा सर्वांना माहीत आहे, ती नाहीशी करण्यासाठी काय करावे एवढे फक्त सांगा."

"तेव्हा अध्यक्ष जरा नाराजीतच म्हणाले,

"आमची समिती ही धूळ झाडणाऱ्यांची समिती नाही. वैज्ञानिकांची समिती आहे. अशिक्षित झाडूवाला धूळ पाडण्याच्या आधी किती धूळ आहे हे मोजत बसत नाही. आमच्यासारख्या वैज्ञानिकांनीही तसेच करावे असे माननीय सदस्यांचे म्हणणे आहे काय? धूळ किती आहे हे मोजल्याशिवाय ती नाहीशी करण्याचा प्रयत्न करणे हे विज्ञानपूर्व युगात वावरण्याचे लक्षण आहे. धूळ किती आहे हे मोजण्यासाठी समितीने लाखो रुपये व महिनोगणती वेळ वेचला आहे. तेव्हा धूळ किती आहे हे न सांगताच ती निवारण्याचे उपाय सांगत बसणे म्हणजे हा सर्व पैसा व काळ समितीने फुकटच खर्चला असा आरोप करण्यासारखे होय."

मॅनेजरांनी या म्हणण्याला दुजोरा दिला. "अध्यक्ष म्हणतात ते बरोबर आहे. सर्व काही विज्ञानपूत असले पाहिजे. आपण सारे रोज विज्ञानदेवतेच्या मन्दिरात जातो ते फुकटच काय? मग एका झाडूवाल्यात व आपल्यात फरक काय? तेव्हा महावैज्ञानिक अध्यक्षांचे भाषण मध्ये काही व्यत्यय न आणता सगळ्यांनी ऐकून घ्यावे.

अध्यक्षांचे भाषण पुन: सुरु झाले. त्यांनी धूळ किती आहे याचे वर्णन केल्यावर धुळीचे प्रकार व निरनिराळ्या प्रकारची धूळ अंगाला लागल्यामुळे होणाऱ्या निरनिराळ्या व्याधि, एकाच प्रकारची धूळ नाक, तोण्ड इत्यादि शरीराच्या निरनिराळ्या भागात गेल्यामुळे होणारे निरनिराळे दुष्परिणाम यांचे





काटेकोर वर्णन केले. हे वर्णन ऐकतांना त्या सर्व व्याधि व दुष्परिणाम आपल्याला आत्ताच ग्रासू लागल्याचा प्रत्यय सदस्यांना आला. दोन तास असे वर्णन चालल्यावर अध्यक्ष म्हणाले—

"या अशा धुळीच्या विरुद्ध उपाय काढण्यासाठी आमच्या प्रयोगशाळेत गेली तीन वर्षे प्रयोग सुरु आहेत. या प्रयोगान्ती आमचे हवामानतज्ज्ञ डॉ. ज्ञानभाण्डार यांनी एक उपकरण शोधून काढले आहे. ते आता सादर करतील."

डॉ ज्ञानभांडार आपली पोतडी सरसावून पुढे आले तेव्हा सगळ्या सभेचे लक्ष आतुरतेने तिकडे लागले.

पण इतक्यात जोराने घंटा खणाणली. विज्ञानदेवतेच्या दुपारच्या प्रार्थनेची वेळ झाली होती. विज्ञानदेवतेची प्रार्थना सकाळ, दुपार व संध्याकाळ अशी तीन वेळा करण्याचा कारखान्याचा सक्त प्रघात होता.

डॉ. ज्ञानभण्डार यांनी धुळीच्या विरुद्ध काय यंत्र काढले आहे ते पाहण्याची काही विज्ञानदेवतेच्या द्वेष्टया पुराणमतवादी लोकांना इतकी उत्सुकता वाटत होती की ते म्हणाले—

"प्रार्थनेला थोडा उशीर झाला तरी काही बिघडत नाही. डॉ. ज्ञानभांडार यांनी आपले यंत्र दाखवावे, मग प्रार्थना मागून सावकाश करता येईल."

तो पुराणमतवाद ऐकताच मॅनेजर खवळले. "विज्ञानदेवतेच्या प्रार्थनेबाबत अशी अपवित्रवृत्ति अजूनही या देशात आहे हे पाहून मला अत्यंत खेद होतो. यंत्र काय, प्रार्थनेनंतरही पाहता येईल, पण विज्ञानदेवतेबद्दल भावनाशून्यवृत्ति बळावली तर अशी यंत्रे करणे या देशात कुणालाच शक्य होणार नाही. चला सारे प्रार्थनेला."

सारे लोक विज्ञानमंदिरात प्रार्थनेला गेले. विज्ञानमंदिर हे चांगले संगमरवरी दगडाचे व प्रशस्त होते. वस्तुत: त्याला मंदिर म्हणण्यास मॅनेजर व इतर अनेक विज्ञाननिष्ठांचा विरोध होता. त्याला विज्ञानचर्च म्हणावे अशी एक सेक्युलर सूचना आली होती. पण जेथे ख्रिस्ती धर्मानुसार पूजा होत नाही अशा

स्थानाला चर्च म्हटल्याने चर्चचा अपमान होतो असे ख्रिस्ती पुढाऱ्यांनी खडसावून सांगितल्यामुळे तो विचार मागे पडून त्याला विज्ञानमस्जिद म्हणावे अशी दुसरी सेक्युलर सूचना पुढे आली. पण " जेथे मूर्तिपूजा होते त्या स्थानाला मस्जिद म्हणाल तर याद राखा" असे मुस्लिम पुढाऱ्यांनी बजावल्यामुळे तीही विचार रद्द करावा लागला.

नावात मंदिर राहिले तरी रूपात कुठेही राहू नये म्हणून त्याचा आकार सैण्ट पॉल कॅथीड्रलसारखा करण्याचे ठरले. तो हुबेहुब यावा म्हणून कारखान्याने आपल्या वास्तुविदांना एक वर्ष सैण्ट पॉल कॅथीड्रलचे नकाशे काढून त्याच्या उभारणीतील खुब्यांचा अभ्यास करण्यास पाठविले होते. मंदिराच्या प्रवेशद्वारावर मंदिरात इंग्रजीशिवाय कोणतीही भाषा बोलण्यास मनाई आहे अशी-अर्थात् इंग्रजी-पाटी लावली होती. देव्हाऱ्यावर विज्ञानदेवतेची मूर्ति होती. देवतेची वेषभूषा अगदी "मॉडर्न" होती. पँट, त्यावर लांब सदरा, केस मोकळे सोडलेले, तोंडात सिगरेट व काखेत दारुची बाटली, असे "सुन्दर ते ध्यान" होते.

विज्ञानदेवतेची मूर्ति मडमेसारखी न करता सरस्वतीसारखी करावी असे एका सनातन्याने सुचविले तेव्हा विज्ञानदेवता ही साडीनेसणारी काकूबाई असती तर गॅलिलियो व न्यूटन यांनी हुजुरबागेत येऊन विज्ञानाचे धडे घेतले असते असे त्याला सुनविण्यात आले.

विज्ञानदेवतेपुढे मेणबत्त्यांच्या आकाराचे विजेचे दिवे दिवसाढवळ्या पेटविण्यात आले व प्रार्थना म्हणण्यात आली. प्रार्थनेचा मराठी तर्जुमा खाली देत आहे :—

जय देवी विज्ञानदेवी

तू जीझसची मेरी

तु ग्रेटा कार्बो

अनुग्रह कर आम्हा पामरावर

फेकून दिल्या आम्ही आमच्या भिक्कार भाषा





रात्रंदिवस आम्ही घेतला ध्यास

माउली इंग्रजीचा

तुझ्या नावे आम्ही करतो नित्य

इम्पोर्टेड सोमाचे पान

मग आता देरी कसली ?

प्रार्थना संपली. ती केव्हा एकदा संपते असेच सर्वांना होऊन गेले होते. डॉ. ज्ञानभांडार यांनी धुळीचे नियंत्रण करण्यासाठी कोणते यंत्र शोधून काढले आहे ते पाहण्याची सर्वांना उत्सुकता होती. पुन: सर्व सभागृहात जमले. डॉ. ज्ञानभांडार व्यासपीठावर आरूढ झाले. त्यांनी आपल्या पोतडीतून एक पांढरेसे कापड काढले. त्या कापडाला दोन टोकावर चष्म्याच्या कानासारखे आकडे होते. दोन्ही कानात अडकवून त्यांनी ते कापड आपल्या नाकातोंडावर बांधले व विजयी मुद्रेने ते म्हणाले.

"हा आमचा डस्ट मॉस्क घातला की धुळीचा एक कण देखील नाकातोंडात जाणार नाही."

तो प्रकार पाहून मॅनेजर एकदम उठून उभे राहिले व जोराने खेकसून म्हणाले. "मी देशाला विसाव्या शतकात आणण्याचा प्रयत्न करीत आहे. पण तुम्ही वैज्ञानिक म्हणविणारे अजून दहाव्या शतकात वावरत आहात. मी तुम्हाला धुळीवर वैज्ञानिक उपाय शोधून काढायला सांगितले अन् तुम्ही एक रुमाल घेऊन आलात."

हे ऐकून अध्यक्ष म्हणाले, "हा रुमाल दहाव्या शतकातला नाही. गेल्याच वर्षी विणला गेला आहे."

यावर मॅनेजर अधिकच चिडले व म्हणाले, "तुम्ही एवढे जगप्रसिद्ध वैज्ञानिक असून असे बोलता ही फार दु:खाची गोष्ट आहे. रुमाल केव्हा विणला हा प्रश्न नाही. धूळ वारण्यासाठी रुमाल वापरणं ही दहाव्या शतकातली रीत आहे. अमेरिकन लोकांनी धूळबंद घरे व मोटारी तयार केल्या आहेत. रशियाने शेते

सोडून बाकीचा देश सिमेंटने मढवून काढला आहे. त्यामुळे त्या देशात धुळीचा त्रास होत नाही, असे काही तरी विसाव्या शतकाला शोभण्यासारखे येथे करा."

"धूळबंद मोटारी व रस्ते तयार करणे उद्योगखाते व पी. डब्लू. डी.चे काम आहे. ते आमच्या कक्षेत येत नाही." वैज्ञानिक उत्तरले.

वाद अधिक वाढवण्यात अर्थ नाही असे पाहून मॅनेजरांनी घोषित केले की,

"चर्चा आता बंद. या कारखान्यात धूळ निवारण्यासाठी डस्ट मॉस्क उर्फ रुमाल यासारखे दहाव्या शतकातले अडाणी साधन वापरण्यास मनाई आहे." "अजेण्डयावरचा दुसरा आयटेम काय आहे ?" त्यांनी लगेच विचारले.

"मजुरांचा संप" सेक्रेटरीने उत्तर दिले.

कारखान्यात देशाचे कोटयावधि रुपये गुंतले होते. एक दिवस कारखाना बंद राहिला तर दहा कोटि रुपयांचे नुकसान होत असे. असे असून कामगारांच्या पुढाऱ्यांनी संपाची नोटिस दिली होती.

ते असे झाले. कारखान्यात पुष्कळ उंच इमारती होत्या. परिसरात उंच झाडे देखील होती. या सर्व उंच ठिकाणी, मधमाशांनी पोळी बांधली होती. मधमाशांची पोळी अनायासे आहेत तेव्हा कारखान्याने पोलादाबरोबर मधांचाही व्यापार करावा असे मॅनेजरांनी उद्योगखात्याला सुचविले तेव्हा उद्योगखात्याने ही सूचना विचारार्थ शेतकीखात्याकडे पाठविली. "मधाची पोळी शेतीच्या कक्षेत येत नाहीत, मधाचा व्यापार ही गोष्ट तर शेतीशी कोणत्याही दृष्टीने संबद्ध नाही" असे शेतीखात्याने उत्तर दिले. तेव्हा मधाची पोळी कोणत्या खात्याच्या अधिकारकक्षेत येतात हे ठरविण्यासाठी एक उच्चाधिकारसमिती नेमण्यात आली. सुधारलेल्या देशात यासंबंधी काय वस्तुस्थिती आहे हे पाहण्यासाठी ही समिती परदेशात दौरे करीत होती. हे दौरे संपण्यास वेळ होता. तोपर्यंत मधाची पोळी कारखान्यात फोफावत होती.

याप्रमाणे कोणत्याच खात्याला मध काढण्याची घाई नसली तरी गोमाजी नावाच्या एका मजुराला सारखे त्या पोळ्यांकडे पाहून तोंडाला पाणी सुटत असे.





तो एक दिवस काम संपले तरी इतर मजुरांसारखा कारखान्याच्या बाहेर गेला नाही. आंतच राहिला व सामसूम झाल्यावर एका पिंपळाच्या झाडावर पोळे होते त्यावर चढला. अंगाला मधमाशा चावू नयेत म्हणून त्याने आपले अंग गोणीने झाकून घेतले होते मधमाशांना उठविण्यासाठी त्याने एक मशाल घेतली होती. ती वर चढल्यावर पेटविली, व पोळ्याच्या खाली धरली, तितक्यात एक धुळीचा लोट आला व ती मशाल विझली. धुळीचा एक लोट सरळ मजुराच्या नाकातोंडाशी लगट करु लागला. तिचे निवारण करण्यासाठी तो आपल्या दुपट्टयाने तोंड झाकू लागला तोच त्याच्या अंगावरची गोणी घसरुन खाली पडली.

मशाल विझली तरी माशा डिवचल्या गेल्या होत्या. धुळीच्या लोटातून गोमाजी श्वास घेतो न घेतो तोच त्याच्यावर माशांनी हल्ला केला. त्याबरोबर त्याचा तोल गेला व तो झाडावरून खाली पडला.

त्या झाडाखाली कारखान्यातील विविध बांधकामात उकरून ठेवलेल्या मातीचा एक मोठा ढीग होता. त्यावरच तो मजूर पडल्यामुळे त्याला फारशी इजा झाली नाही. माशा देखील आपला बळी अचानक खाली पडल्यामुळे असो वा अंधार पडू लागल्यामुळे असो, त्याचा पिच्छा सोडून परत पोळ्यात जाऊन बसल्या.

पण झाडावर असताना जेव्हा माशा अंगावर धावून आल्या तेव्हा आता आपली धडगत नाही या कल्पनेने गोमाजी ओरडला होता. ते त्याचे ओरडणे ऐकून रखवालदार धावून गेले त्यांनी "कामानंतर तू कारखान्यातच कसा राहिलास?" "झाडावर का चढला होतास?" वगैरे गैरसोयीच्या चौकशा करू नयेत म्हणून गोमाजीने जोराने विव्हळायला सुरवात केली व तो सारखा माशांच्या पोळ्याकडे बोट दाखवू लागला. त्याच्या तोंडावर माशांच्या प्रणयलीलांची चिन्हे दिसत होतीच. तो प्रकार पाहून रखवालदारांनी त्याला इस्पितळात पोचविले.

एका मजूराला कारखान्यातल्या माशा चावल्या ही बातमी हां हां म्हणता सगळीकडे पसरली. सगळीकडे पसरली एवढेच नव्हे तर मजूर पुढारी बाप्पा कामत यांच्याकडेही ती पोचली. ते दहा पंधरा मजुरांना घेऊन इस्पितळात गेले. त्यांनी सरळ गोमाजीला उचलले व ते कारखान्याच्या पटांगणात आले. पटांगणात सभेचा नगारा बडवण्यात आला. शिवाय घरोघरी जाऊन मजूरांना सभेला बोलावण्यात आले. पुरेसे श्रोते जमल्यावर बाप्पा कामतांनी बोलायला सुरवात केली.

"मजूर बांधवहो, इन्किलाब जिंदाबाद. पहा या भांडवलदारांच्या कारवाया मजुरांना छळण्यासाठी यांनी आपल्या कारखान्यात मधाची पोळी लावली आहेत. त्यातल्या माशा मजुरासाठी व मध मात्र भांडवलवाल्यासाठी. भांडवलदार व मजूर दोघेही लठ्ठ होत आहेत. भांडवलदार मध खाऊन आणि बिचारे मजूर माशा चावून सूज आल्यामुळे. हे पहा गोमाजी. तुम्हाला कोणाला तरी ओळखू येत आहेत काय? दोन दिवसापूर्वी हे आताच्या अर्धे देखील नव्हते. गाल सुजल्यामुळे त्यांचे डोळे कुठे आहेत हे सुद्धा दिसत नाही.."

हे ऐकताच गोमाजीला शंका वाटून त्याने आपले गाल दाबले व डोळचा-च्या पापण्या चाचपून पाहिल्या. डोळ्यांना स्पर्श करण्यास फारसे उत्खनन करावे लागले नाही. तेव्हा कामत म्हणतात तितकी वाईट परिस्थिती नसावी असा त्यांना दिलासा मिळाला. इस्पितळात त्याला "डॉक्टर येईपर्यंत वाट पहा,पण इस्पितळात दाखल होण्याची जरुरत पडणार नाही" असे सांगितले होतेच. त्याचीही त्याला आठवण झाली व कामतांनी आपल्या परिस्थितीबद्दल काढलेले उद्गार ज्याअर्थी समजायचे त्याचे अर्थी तो समजला.

कामत बोलतच होते.

"गोमाजी हे एकटेच भांडवलदारांचे बळी नाहीत. आपल्या शेकडो मजुरांचे देह मधमाशा चावून फुगले आहेत. पण त्यांची दशा इतकी वाईट आहे की त्यांना सभेत आणणे अशक्य आहे. तेव्हा दुनियेतील मजुरांनो एक व्हा. हा प्रश्न माशांचा वा मधाचा नसून क्रांतीचा आहे. इन्किलाब जिंदाबाद, आपण असा ठराव करू की कारखान्यातून मधाची सारी पोळी काढून त्यातला मध मजुरांना व मजूर पुढा-ऱ्यांना जोपर्यंत पोचवला जात नाही तोपर्यंत सारे मजूर संपावर राहतील.."

याच संपाचा विचार सभेच्या अजेंड्यातील दुसऱ्या कलमानुसार व्हायचा होता. सभेत मजूर पुढाऱ्यांनाही पाचारण करण्यात आले होते. बाप्पा कामतांचे म्हणणे होते की मीच एकमात्र मजूर पुढारी आहे. पण असे एकमात्र मजूरपुढारी निदान अर्धा डझन तरी होते. त्या सर्वांनाच बोलावण्यात आले होते.

मॅनेजरांनी दुसऱ्या कलमाचा विचार सुरु केला –





मित्रहो . . .

यावर बाप्पा कामत चवताळून म्हणाले.

"मित्र हे संबोधन सरंजामशाही आहे. भाई म्हणा."

"भाई हे संबोधन कम्युनिस्ट आहे. साथी म्हणा." दुसरे एकमात्र मजूर पुढारी शेंडे गुरुजी ओरडले.

"शब्दासाठी भांडू नका" मॅनेजर अजीजीने म्हणाले. "भाई व साथी मित्रहो, आपल्यापुढ प्रश्न शब्दाचा नसून देशाच्या प्रगतीचा आहे."

"आमच्यापुढे देशाच्या प्रगतीचा प्रश्न नाही. प्रश्न क्रांतीचा आहे." बाप्पा कामत ओरडले.

"होय. क्रांतीचाच आहे. औद्यागिक क्रांतीचा. औद्योगिक क्रांतीशिवाय देशाची प्रगति होणार नाही. औद्यागिक क्रांतीसाठी मजूर व कारखाने या दोहोंचेही महत्व आहे. अर्थात मजूर तंदुरुस्त राहिले पाहिजेत. मजुरांना माशा चावत राहिल्या तर ते तंदुरुस्त राहणार नाहीत, मजुर तंदुरुस्त राहिले नाहीत तर कारखाना चालणार नाही. कारखाना चालला नाही तर तो बन्द राहील. कारखाना बन्द राहिला तर दिवसामागे दहा कोटि रुपयांचे नुकसान होईल. रशियात असे कधी होत नाही. म्हणून तो देश आघाडीवर आहे. बोल्शेविक क्रांती झाल्यापासून तेथे एकाही मजुराला एकही मधमाशी चावली नाही . . .

"रशियाने मधमाशांच्या मदतीशिवायच सरळ फुलातून मध काढायचे यंत्र शोधून काढले आहे" बाप्पा कामतांनी माहिती पुरविली.

"असं का? तर मग लवकरच रशियातून ते यंत्र मागविण्याचा मी प्रयत्न करीन." मॅनेजरानी आश्वासन दिले.

"आमचा याला सक्त विरोध आहे!" शेंडे गुरुजी म्हणाले, "असले यंत्र मागवल्याने मधमाशा बेकार होतील व मजुरांना चावण्याशिवाय त्यांना दुसरे काम उरणार नाही."

"हे म्हणणे प्रतिक्रियावादी आहे" बाप्पा कामत प्रत्युत्तरले. "रशियातल्या प्रमाणे आपण साऱ्या मधमाशा मारुन टाकू."

"काय ? मारुन टाकू ? म्हणजे चक्क हिंसा"? शेण्डे गुरुजी शहारून विचारते झाले.

"मॅनेजर म्हणाले" सदगृहस्थहो, नव्हे भाई व साथीहो, या फार पुढच्या गोष्टी आहेत. आपण रशियासारखी प्रगती करू तेव्हाच्या. तूर्त आपल्यासमोर मधमाशाची पोळी कशी काढावी हा प्रश्न आहे. तो कसा सोडवावा या बद्दल कुणाला काही सूचना करायची आहे काय ?"

यावर कारखान्याचे फायर ऑफिसर म्हणाले.

"उपाय सोपा आहे. आमचे आग विझवण्याचे यन्त्र वापरून माशावर पाण्याचा मारा करायचा, म्हणजे साऱ्या माशा पळून जातील."

"ठीक आहे.फार लवकर प्रश्न सुटला. करा तर कामास सुरवात."मॅनेजरांनी सुटकेचा नि:श्वास टाकला.

पण हा नि:श्वास अकाली होता हे त्यांच्या लवकरच लक्षात आले.

"कामास सुरवात करायला एक अडचण आहे." फायर ऑफिसरांनी मक्षिकापात केला.

"कोणती ?" मॅनेजरांची पृच्छा.

"आमचे पंप पंचवीस फुटावर पाणी मारतात. पण काही पोळी चाळीस फुटावर आहेत. त्यासाठी जास्त जोरदार पंप घ्यावे लागतील." इति फायर ऑफिसर.

एखादी नवीन वस्तु विकत घेण्यासाठी एक विधि आवश्यक असतो. जाहिरात देऊन निरनिराळ्या विक्रेत्याकडून टेण्डरे मागवायची. मग आलेल्या टेण्डरापैकी कोणते निवडायचे यावर विचार. जे टेण्डर निवडले असेल ते निवडण्याची सबळ कारणे देणे. सर्व करण्यासाठी दोन महिने तरी वेळ लागला





असता. पण कामगारांनी तर अवघी एका आठवड्याची मुदत दिली होती. म्हणून मॅनेजरांनी कारखान्याच्या अकाउण्टस् ऑफिसरला विचारले :-

"एखादी आपत्ती आली तर मॅनेजरला टेण्डरावाचून खरेदी करण्याचा अधिकार आहे की नाही ?"

"आहे. पण संपाला आपत्ति म्हणता येईल की नाही याबद्दल शंका आहे. आपत्ति क्वचितकाळी येणारी व अनपेक्षित असते. संप तर नेहमीचेच आहेत." फॅक्टरी अकाउण्टस् ऑफिसरकडून उत्तर मिळाले.

आता टेण्डरांचा प्रश्न कसा सोडवावा या विवंचनेत मॅनेजर असतांनाच फायर ऑफिसरांनी त्याच्यासाठी दुसरी एक समस्या उभी केली.

"नुसती टेण्डरे मागवून भागणार नाही. आमचे देशी पंप बेभरंवशाचे आहेत. मागे एकदा एका पंपाचे पाणी आगीवर पडण्याऐवजी पंप मारणाऱ्याच्या अंगावरच उडाले . . .

"अहो तुमच्या पंपवाल्याने पंप उलटा धरला असेल." देशी पंपाचे पाठिराखे शेण्डे म्हणाले.

"आमचे पंपवाले एवढे मूर्ख नाहीत. त्यांना आम्ही सहा महिने ट्रेनिंग देत असतो. शेंडे गुरुजींनी बदनामीकारक विधाने करू नयेत. नाहीतर आम्ही देखील संपावर जावू." फायर ऑफिसरांनी आपली नखे बाहेर काढली.

पर्सनल ऑफिसर म्हणाले :- 'फायर ऑफिसराचे म्हणणे बरोबर आहे. हे देशी पंप कुचकामाचे आहेत. एकदा तर पंपातून पाणी उडण्याऐवजी पंपच हवेत उडाला व माझ्या डोक्यावर येऊन आदळला. तेव्हा पंप परदेशातून मागविण्याची परवानगी मिळावी."

पर्सनल ऑफिसरांचे हे वाक्ये हवेत विरते न विरते तोच शेंडे गुरुजींच्या अनुयायांनी "विदेशी चमचे मुर्दाबाद, देशी पंप जिंदाबाद" असे नारे मारायला सुरवात केली. नारे संपल्यावर शेंडे गुरुजी म्हणाले,

"स्वदेशात पंप होत असताना विदेशी पंप मागवून देशी कामगारांची उपासमार करण्याचे व्यूह रचले जात आहेत. आम्ही हे चालू देणार नाही. विदेशी पंप मागविण्यात आले तर आम्ही निरनिराळया देशी कारखान्यात संप घडवून आणू."

एक संप थांबविण्याच्या प्रयत्नात दुसरा सुरु होण्याची लक्षणे दिसू लागली. तेव्हा मॅनेजर म्हणाले –

"पंपाने माशा उडविण्याच्या मार्गात बऱ्याच अडचणी आहेत. दुसरा काही मार्ग कुणाला सुचवता येईल काय?"

थोडा वेळ विचार करून कारखान्याचे इलेक्ट्रिसिटी ऑफिसर म्हणाले.

"सर्वच पोळयांच्या बाबतीत हा उपाय लागू होणार नाही. पण पुष्कळशा मोठया पोळयांच्या आसपास विजेच्या तारा आहेत. शॉर्ट सर्किट करून आग लावली तर माशा पळून जातील."

"दुसरा काही धोका नसेल तर तसे करा." मॅनेजरांनी मोकळीक दिली.

"छे छे, शक्य नाही. विजेच्या धंद्यातील लोकांनी बुद्धया शॉर्ट सर्किट करणे म्हणजे डॉक्टरने स्वत:च्या पेशंटला विष देण्यासारखे आहे. हे काम विजेच्या धंद्यात असलेला कोणीही करणार नाही." इलेक्ट्रीसिटी ऑफिसर उत्तरले.

"मग तुम्ही हा उपाय सुचविलाच कशाला?" मॅनेजरांनी रागावून विचारले.

यावर काय उत्तर द्यावे याबद्दल वीजप्रमुख गोंधळात पडले असताना शेंडे गुरुजी म्हणाले,

"वीजप्रमूखांसारखे आपल्या धंद्याची नीतिमत्ता पाळणारे लोक या देशात आहेत तेव्हा या देशाचे भवितव्य उज्वल आहे."

"पण कारखान्याच्या भवितव्याचे काय?" मॅनेजरांनी प्रश्न विचारला. शेंडे गुरुजींना वीजप्रमूखांबद्दल बराच आदर आहे, हे पाहून त्यांच्याकडे वळून ते म्हणाले,





"मी यूनियन प्रमुखांना विनंती करतो की आमच्या वीजप्रमूखांच्या आत्यंतिक तत्वनिष्ठेमुळे माशांचा बंदोबस्त करता येत नाही. तरी तत्वनिष्ठेचा मान म्हणून त्यांनी संपाचा बेत रद्द करावा."

मॅनेजरांनी आपल्यालाच यूनियनप्रमुख म्हटले म्हणून हुरळून जाऊन शेंडे गुरुजी संप मागे घेण्यास संमत्ति देतील अशी बाप्पा कामतांना भीती वाटली व ते लगेच म्हणाले.

"वीजप्रमूखांच्या तत्वनिष्ठेचा मान म्हणून आम्ही त्यांच्या गळयात कारखान्याच्या खर्चाने पुष्पमाळा घालू, पण संप मागे घेणे शक्य नाही. यूनियनने संप करायचा नाही तर काय माशा मारायच्या?"

आतापर्यंतच्या चर्चेत चार तास निघून गेले तरी मधाची पोळी काढण्याचा काही तोडगा निघत नाही, हे सभेत चहापाणी आणण्याचे काम करणारा चपराशी ऐकत होता. चपराशी असला तरी तो चांगला मॅट्रिक झालेला होता. तो मॅनेजरांच्या जवळ जाऊन उभा राहिला व त्याने अदबीने सलाम ठोकला.

"काय रे काय आहे?" मॅनेजरांनी विचारले.

तो म्हणाला "मघापासून आपली बोलणी ऐकतो आहे. कारखान्याची अडचण मी दूर करू शकतो. माझा गाव जवळच पंचवीस मैलावर आहे. तेथे माझा भाचा आहे. तो नेहमीच मधाची पोळी काढण्याचे काम करतो. आमच्या खेडयात खूप मधाची पोळी आहेत. ती ज्यांच्या मालकीची असतात ते त्याला पोळयामागे २५ पैसे देतात. तेवढेच तुम्ही द्या. भरीला येण्याजाण्याचा व येथे एक दिवस राहण्याचा खर्च, पोळी काढण्याची चांगली सोय होईल."

"ही सूचना कशी काय वाटते? मॅनेजरांनी सभेला प्रश्न विचारला.

"याच्या भाचाला जे काय दहा पंधरा रुपये द्यावे लागतील ते कोणत्या खात्यातून द्यायचे?" Additional Accounts Officer नी प्रश्न विचारला.

"मला एका दिवसासाठी तात्पुरता मजूर नेमण्याचा अधिकार नाही काय?" मॅनेजरांनी प्रश्न विचारला.

"मजूराची रोजी पांच रुपये आहे. आपल्या कारखान्यात शंभर तरी मधाची पोळी असतील. शंभर पोळी काढण्याचा खर्च पंचवीस रुपये होतो. शिवाय मजुराला कामावर येण्यासाठी प्रवासखर्च देण्याची तरतूद नाही." उत्तर मिळाले.

"पण अँडहॉक खर्चासाठी काही रक्कम मॅनेजरच्या अधिकारात आहे ना?" मॅनेजर.

"असते. पण अँडहॉक खर्च कशा स्वरुपाचे असावे हेही नियमात सांगितले आहे. माशा मारणे हे या नियमात कोठेही बसत नाही. अँडहॉक खर्चाचे एक उदाहरण पाहुणचार हे दिलेले आहे. माशा मारणे हा पाहुणचार नव्हे, दुसरी ॲडहॉक खर्चाची बाब दुर्घटना ही आहे. दुर्घटनेवरील खर्च म्हणून गोमाजींच्या औषधपाण्याचा खर्च करता येईल, पण माशा मारण्याचा खर्च करता येणार नाही. तिसरी बाब म्हणजे बाहेरील तज्ज्ञाचा सल्ला परदेशातील असा काही लोक अर्थ करतात. पण बाहेरील याचा अर्थ कारखान्याच्या बाहेरील असा केला तरी या कलमाखाली हा खर्च येत नाही. येथे चपराशाचा भाचा सल्ला देण्यासाठी येत नसून मजुरी करण्यासाठी येत आहे...

"कुणाला चावू न देता माशा पळविणे हे तज्ज्ञाचे काम आहे. मग या कलमाखाली हा खर्च का येऊ नये?" चपराशाने विचारले.

"नाही येऊ शकणार. खेडयात राहणाऱ्या एका अशिक्षिताला तज्ज्ञ म्हणता येणार नाही. तज्ज्ञाचे सारे व्यवहार इंग्रजीतून होत असले पाहिजेत. मागे एक तज्ज्ञ म्हणविणारा आपल्या चार वर्षाच्या मुलाशी मराठीतून बोलला असे उघडकीस आल्याबरोबर तज्ज्ञाच्या यादीतून त्याचे नाव कारखान्याने काढून टाकले अशी फायलीवर नोंद आहे. चपराशाच्या भाच्याचे तर सारेच व्यवहार मराठीतून होत असले पाहिजेत." इति एड् ए ऑ.

"बरे...मी स्वतःच्या खिशातूनच खर्च करतो." मॅनेजर उदार अन्तःकरणाने म्हणाले.

"हे कारखान्याला दान होईल. कारखान्याच्या जमाखर्चात दानाचे खाते





नाही." एड्.ए.ऑ.

"मग आपण हा खर्च कागदावर दाखवूच नये. या सभेच्या वृत्तांतात यूनियन पुढाऱ्यांनी सामोपचाराने संप मागे घेतला एवढेच फक्त लिहा"

"यावर शेंडे गुरुजींचा चेहरा जरा समाधान पावलेला दिसला व ते संप मागे घेण्यास कबुली देतील असे बाप्पा कामतांना वाटले म्हणून शेंडे गुरुजींकडे पाहत ते उसळून म्हणाले.

"सामोपचार वगैरे कल्पना बूर्झ्वा आहेत. संप मागे घेतील ते प्रतिक्रियावादी, भांडवलदारांचे हस्तक, उजवे, सरंजामशाही, फॅसिस्ट, आम्ही संप मागे घेतला नाही व तसे लिहू देणार नाही."

"बरे संप मागे घेतला असे लिहू नका. पण सरकारी पैसे खर्च होत नसतील तर खर्चाची गोष्ट कागदावर येण्याचे कारण नाही.

"असे केल्याने दडवादडवी करण्याचा आरोप माझ्या माथी येईल. तेव्हा सभेचा असा खोटा वृत्तांत लिहिण्याची जबाबदारी मी घेत नाही." सभेचे सेक्रेटरी म्हणाले.

मॅनेजर आतापर्यंत बरेच शांतपणे बोलत होते. पण सेक्रेटरीचे हे बोलणे ऐकताच त्यांची सारी शांतता नाहीशी झाली. ते सरळ बाहेर गेले व दगड वेचू लागले. आपले खिसे दगडांनी चांगले गच्च भरताच ते कारखान्यात सैरावैरा धावू लागले व जेथे मधाचे पोळे दिसेल तेथे त्यांनी दगड फेकायला सुरवात केली. पोळयातल्या माशा उडून सर्व वातावरणात घोंगावू लागल्या. त्यांना बऱ्याच माशा कडकडून चावल्या पण कारखान्याभर धाबून मधाच्या पोळयांना दगड मारणे त्यांनी सोडले नाही.

मॅनेजर एकदम उठून बाहेर कुठे गेले, पुन्हा येणार की नाही याचा इतर सदस्यांना काहीच बोध होईना. सर्व एकमेकांच्या तोण्डाकडे पाहू लागले.

पण थोडयाच वेळात त्यांना झालेला प्रकार भयंकर रीतीने कळून आला. माशांचे काही थवे सभागृहात शिरले व त्यांनी सदस्यांची शरीरे ही पक्वाबांनी

उच्च भरलेली भाण्डी समजून त्यातील पक्वान्न पळयांनी खोलातून उपसावे त्याप्रमाणे आपल्या दातांनी त्यांच्या मांसाचे लचके काढायला सुरवात केली. सारे सैरावैरा धावू लागले. कुणी कारखान्याच्या तळघात उडी घेतली, पण त्यात उडी मारुन सारे शरीर झाकता येईल इतके पाणीच नव्हते. कुणी नळाखाली बसून नळाचे पाणी अंगावर घेण्यासाठी तोटी उघडली. पण नळ सुट्टीवर होते.

यूनियनचे पुढारी हेच आपल्यावरील दगडफेकीचे मूळ कारण आहेत असे त्या माशांना माहित होते असे दिसले. माशांचा एक मोठा थवा त्या पुढाऱ्यांचा पिच्छा पुरवू लागला. तेव्हा ते ओरडले.

"भांडवलदार बच्यांनो आम्हा प्रोलेटारियटवर माशा सोडता काय?. पाहू आता तुमचा कारखाना कसा चालू राहतो ते, आता कायमचाच संप पुकारू. जगातील मजुरांनो एक व्हा . . . .

जगातील मजुरांच्या एकीची त्या माशांना काही पर्वा होती असे दिसले नाही. त्यांनी त्या पुढाऱ्यांना कडकडून चावे घ्यायला सुरवात केली. तेव्हा इतर बूर्झ्वा लोकांप्रमाणे तेही सैरावैरा पळू लागले.



# सन दोन हजारमधील एक विद्वान

ही सन दोन हजारची गोष्ट आहे.

एक विद्वान् होता. तो परदेशातून नुकताच परतला होता. तो इंग्रजीचा प्रकाण्ड पण्डित होता. ऑक्सफर्डमध्ये जाऊन त्याने इंग्रजीचा अभ्यास केला होता. त्याने इंग्रजी शिवाय दुसऱ्या भाषांचा वापर सोडून दिला होता. ही गोष्ट मराठीत असल्यामुळे पुष्कळसे संवाद मी मराठीत सांगितले आहेत, पण प्रत्यक्षात ते इंग्रजीत झाले होते.

इंग्रजीतर भाषांवर बहिष्कार घालण्यात त्या पण्डिताने विशेष काही केले होते असे नव्हे. साऱ्या भारतीय सुशिक्षितातच नव्हे तर अल्पशिक्षितात देखील हाच प्रकार दिसत होता. त्यामुळे तो विद्वान् जेथे जेथे जाई तेथेही इंग्रजीशिवाय दुसरी भाषा ऐकण्याचा प्रसंग त्यास येत नसे. एखाद्या वेळी "सण्डेला मी तुमच्याकडे डे स्पेण्ड करीन" असे अत्याधुनिक मराठीतले वाक्य त्याच्या कानी पडे तेव्हा तो विद्वान् चिडून म्हणे:— "इंग्रजीचा असा उपमर्द मला सहन होत नाही."

यावर त्याला उत्तर मिळे:— "आम्ही पुण्यपावन इंग्रजीचा उपमर्द करीत नसून मराठी सोपे व समृद्ध करीत आहोत."

हे ऐकून त्या विद्वानाचा पारा आणखीच चढून तो म्हणे, "मराठीला समृद्ध करण्याचा प्रयत्न म्हणजे प्रेताला टॉनिक देऊन जिवन्त करण्याचा प्रयत्न आहे." प्रेताचे दहन करा व इंग्रजीची कास धरा."

"तुमचे म्हणणे बरोबर आहे, पण आमच्या जन्माच्या संवयी कशा जाणार? आमची मुले तुमच्याप्रमाणेच चुकूनही इंग्रजीशिवाय कोणत्याच भाषेतील शब्द उच्चारीत नाहीत."

हे म्हणणे अक्षरशः खरे होते. भारतातील शिक्षणखाते बन्द करण्यात आले होते. भारतीय शिक्षणाची सर्व जबाबदारी इंग्लण्डमधील सेण्ट जीझस अॅण्ड मेरी मिशन या संस्थेवर सोपविण्यात आली होती. शिशुवर्गापासून तो पी.एच.डी. पर्यन्तचा सर्व अभ्यासक्रम ही संस्था ठरवीत असे. एवढेच नव्हे तर शिक्षकांच्या नेमणुका वगैरेबाबतचे सर्व अधिकार या संस्थेला होते. या संस्थे-व्यतिरिक्त कुणालाही एखादी शिक्षणसंस्था काढायला बन्दी होती विशेषतः मिशनच्या अभ्यासक्रमापेक्षा वेगळा अभ्यासक्रम शिकविणे हा कायद्याने गुन्हा ठरविण्यात आला होता. या गुन्हयाला दहा वर्षे सक्त मजुरीची शिक्षा होती. या गुन्हयावरील फिर्याद भारतीय न्यायालयात चालत नव्हती. "शिक्षणविषयक गुन्हे" निकालात काढण्यासाठी मिशनचीच न्यायलये होती. या न्यायालयांनी संस्कृत शिकविणारे, कथाकीर्तन करणारे, अशिक्षितांना सन्तवाङ्मय वाचून दाखविणारे वगैरे अनेक प्रकारचे "शिक्षणविषयक गुन्हे" करणाऱ्या लोकांना खडी फोडायला पुरवून देशाला मजूर पाठविले होते.

शिक्षणाबद्दल भारत सरकारचे कर्तव्य म्हणजे वर्षाकाठी, भारताला सुशिक्षित करण्याच्या कामगिरीसाठी मिशनने पाठविलेले कोटयावधि रुपयांचे बिल भरणे.

परिणामतः शाळेत गेलेल्या कोणत्याही व्यक्तीला इंग्रजीशिवाय कोणतीच भाषा येत नव्हती. पण शिक्षणाचे बिल कितीही फुगले तरी दहा टक्याच्या वर लोकांना सुशिक्षित करणे मिशनला शक्य झाले नव्हते. त्यामुळे देशी भाषांचे समूळ उच्चाटन करण्याचे महत्कार्य सिद्धीस गेले नव्हते. ज्याना शाळेचे दुरूनही दर्शन झाले नाही असे कोटयावधि लोक उरले होते. त्यांच्या तोण्डी देशी भाषा अजून रेंगाळत होत्या. पण त्यांचा देखील सुशिक्षितांशी सम्बन्ध येत असल्या





मुळे त्यांच्या तोण्डची भाषा देखील "सॅटरडेला फॉर्टी रुपीज पेमेण्ट मिळेल" अशासारखी समृद्ध होती.

पण ज्यांचा सुशिक्षितांशी सम्बन्ध क्वचित्च येतो असेही कोटयावधि लोक असतात. इंग्रजीने समृद्ध न केलेल्या दरिद्री देशी भाषा अशा लोकांच्या तोण्डी अजूनही उरल्या होत्या. तेव्हा मिशनला व इंग्रजी विद्वानाला भारतात अजून पुष्कळच काम करायचे उरले होते.

इंग्रजी विद्वान म्हणायचा, 'सर्व देशी भाषा नाहीशा करून इंग्रजी सार्वत्रिक केल्याशिवाय या देशाला काही भवितव्य नाही. अहो इंग्रजी ही एकच भाषा अशी आहे की जिच्यात फिजिक्सला फिजिक्स म्हणतात. शॉर्ट वेव्हला शॉर्ट वेव्ह म्हणतात. तुमच्या भाषेत फिजिक्सला भौतिकी व शॉर्ट वेव्हला लघुलहरी म्हणतात. अहो ज्याला तेच म्हटले पाहिजे. भलतेच शद्ब वापरल्याने फिजिक्स व शॉर्ट वेव्ह यांचे ज्ञान होणार आहे काय?"

इंग्रजी विद्वान घरी देखील कोथिम्बीर पाहिजे असली तर कोथिम्बीर हा लांबलचक, क्लिष्ट व जीभतोड शद्ब वापरण्याऐवजी कोरिॲंडर हा साधा सोपा व सुटसुटीत शब्द वापरीत असे. बायको इंग्रजीत निष्णात होतीच. तेव्हा तिला देखील "पिठलं," "पोळी" वगैरे कठिण शब्दाशिवाय अस्पृश्य मराठीला स्पर्श करायची जरूर नव्हती. इंग्रजी विद्वानाने "पिठलं" "पोळी" वगैरे खोटया शब्दांना खरे इंग्रजी शब्द काय आहेत याची ऑक्सफर्डमध्ये विचारणा केली. त्याचे उत्तर येईपर्यंत त्याने हे पदार्थ वर्ज्य केले होते.

Pithle & Polly हे शद्ब इंग्रजीच समजा असे ऑक्सफर्डहून लिहून आले तेव्हा त्यांच्या घरातील या पदार्थावरची बंदी उठली.

देशी भाषातून पुस्तके, कालिके वगैरे निघणे बंदच झाले होते. सत्तरीच्या खालील कोणत्याही व्यक्तीला देशी भाषा वाचताच येत नव्हत्या. सत्तरीच्या वरच्या लोकांची देखील देशी भाषा वाचण्याची सवय सुटतच चालली होती. कारण देशी भाषातून एका पिढीपासून नवीन लेखन अजिबात बंद झाले होते. ज्यांना जुने वाचण्याची हौस होती त्यांना एखाद्या जुनाट ग्रंथालयात पूर्वीच्या अज्ञानयुगात लिहिलेले मराठीसारख्या भाषेतील ग्रंथ सापडत. पण त्यांची कुठेही

नोंद नसे. ते अडगळीच्या खोलीत ढीग करून रचून ठेवलेले असत. त्यातून जे पुस्तक हाती लागेल तेच वाचावे लागे. पाहिजे ते पुस्तक शोधणे केवळ अशक्य होते.

"ही पुस्तके इतकी जीर्ण झाली आहेत की रद्दीवाले ती घेत नाहीत. ती जाळून टाकावी" अशी सूचना करणारे शिष्टमंडळ इंग्रजी विद्वान घेऊन गेला. या सूचनेला पुरातत्वविभागाने विरोध केला. अज्ञानयुगातला भारत कसा होता हे कळण्यास या पुस्तकांची मदत होईल तेव्हा ती जाळू नयेत असे या विभागाचे म्हणणे होते. म्हणून "प्रत्येक प्रांताच्या राजधानीत त्या प्रांतातले अशिक्षित जी भाषा बोलतात तिच्यातली पुस्तके एखाद्या गुदामात रचून ठेवावीं, बाकीच्या ग्रंथालयांनी ही अडगळ बाळगण्याची जरूर नाही" असा निर्णय घेण्यात आला.

इंग्रजी विद्वानाचे पूर्ण नाही तरी थोडेसे समाधान झाले.

देशी भाषा पुस्तकात वाचणे याप्रमाणे दुरापास्त झाले रस्त्यावर दिसणाऱ्या पाट्या साऱ्या इंग्रजीच असत. तरी एकदा एका घरावर वि. दा. करमरकर अशी एक पाटी दिसलीच. तत्काळ घरात शिरून अशी अशुद्ध पाटी लावल्याबद्दल इंग्रजी विद्वानाने करमरकरांनी कान उघाडणी केली व V.D. Carmarkar अशी सुधारून ती पाटी लावावी अशी सूचना केली. कारमार्कर हे सुधारलेले रूप सुचविल्याबद्दल करमरकरांनी इंग्रजी विद्वानाचे आभार मानले पण व्ही. डी. या आद्याक्षरांचा भलताच अर्थ होत असल्यामुळे आपल्याला वि. दा. असे लिहावे लागले व विदा अशी आद्याक्षरे नागरीत लिहिल्यावर पुढे करमरकर हे नावही नागरीतच लिहिण्याची आपत्ति ओढवली असा खुलासा केला. त्यावर "इंग्रजी अक्षरांचा भलता अर्थ होऊच शकत नाही. भलते अर्थ व्हायला इंग्रजी ही काय मराठी आहे?" असे विद्वानाने आवाज चढवून विचारले.

विद्वान नुकताच इंग्लण्ड व अमेरिकेतून इंग्रजीच्या उच्च पदव्या घेऊन आला होता. परतण्याचा वस्तुत: त्याचा इरादा नव्हता. पण भारतीय बुद्धिमंतांना दिवसेंदिवस मोठमोठ्या नोकऱ्या करून इंग्लण्ड/अमेरिकेत स्थायिक होणे कठिण होत चालले होते. आमच्या लोकांना सोडून तुम्हाला नोकऱ्या देणे शक्य नाही असे त्यांना सांगण्यात येऊ लागले. नोकरीशिवाय परदेशात फार काळ राहणे शक्य नव्हते. राहायचेच असले तर झाडलोटीची कामे करून राहणेच शक्य होते. पण उच्च पदव्या घेऊन इंग्लण्ड अमेरिकेसारख्या देवभूमीत असले तरी झाडलोटीत





आयुष्य घालविणे आमच्या विद्वानाला पसंत नव्हते. नाइलाजाने स्वर्गात झाडूवाला बनण्यापेक्षा नरकात साहेब बनणे बरे म्हणून भारतात परत यायचा त्याने निश्चय केला.

परदेशात वास्तव्य आठरहा वर्षे झाले होते. आप्तेष्टांचे वर्षाकाठी एखादे पत्र येई, एवढाच त्याचा भारताशी सम्बन्ध आला होता. भारतीय वर्तमानपत्रे सहजासहजी पाहायला मिळत नसत व मिळाली तरी ती वाचनाची त्याला इच्छा नसे. त्यामुळे भारतातील परिस्थितीबद्दल त्याला फारसे ज्ञान नव्हते. आपल्या शहराचे स्टेशन जवळ येत चालले तशी त्यांची मनोराज्ये सुरू झाली.

"आपण एवढे ज्ञानसम्पन्न होऊन परत आलो म्हणून आपले भव्य स्वागत होईल, लगेच बडी नोकरी मिळेल, नोकरी मिळाल्यावर सरकारी बंगला मिळेल. एखादी फक्कड कार मात्र स्वत:ची घ्यावी लागेल. पण स्वत:ची कशाला? कार मिळाल्याशिवाय मी नोकरी करणार नाही असे सरकारला चक्क सांगावे. स्टेशनवर नागरिक हारतुरे घेऊन येतील तेव्हा एखादे भाषण करावे लागेल. ते योजून ठेवले पाहिजे. फोटो काढण्यात येतील तेव्हा ठेवणीतला सूट घालूनच गाडीखाली उतरावे."

स्टेशन आले तेव्हा स्टेशनावर हारतुऱ्यांचे यत्किंचित्‌ही चिन्ह दिसेना. हमालाजवळ सामान देऊन उंची सुटात तो प्लॅटफार्मावर चालू लागला तरी त्यांच्याकडे कुणाचे लक्षही गेले नाही. बरेच वेळानंतर त्याचा हायस्कूलमधला एक वर्गमित्र भेटला. त्याने त्याला ओळखले व मोठ्या अगत्याने विचारले :–

"Going some where ?"

"एकूण इतके दिवस आपण या शहरात काय या देशात देखील नव्हतो हे सुद्धा याला माहीत नाही तर! आपल्या वर्गबंधूची जर ही कथा तर गावातले इतर कोणी आपण परदेशातून आलो म्हणून आपले स्वागत करायला येईल ही आशाच करायला नको."

"स्वागतकारांची वाट न पाहता विद्वानाने सामान टॅक्सीकडे न्यायला सांगितले तेव्हा हमाल म्हणाला :–

"नो टॅक्सी सर, ओन्ली टांगा, नो पेट्रोल सर"

हमाल देखील इंग्रजी बोलतो तेव्हा आता भारताचा उद्धार दूर नाही म्हणून विद्वानाची छाती भरून आली.

वाटेत टांगा, बैलगाड्या, मनुष्यचालित रीक्षा याशिवाय कोणतेही वाहन दिसले नाही. अरब दोस्तांनी पेट्रोलचे जे दर सांगितले होते ते भारताचे डोळे पांढरे करणारे होते. कोळशाचीही कमतरता होती, त्यामुळे कोळशावर चालणाऱ्या मोटारी देखील सरकारने बंद केल्या होत्या. आगगाड्या चालविण्यास पुरेसा कोळसा नाही म्हणून तीन चतुर्थांश आगगाड्या बंद करण्यात आल्या होत्या. वीज निर्माण करण्यासाठी कोळसा लागतो तो पुरावा म्हणून खाजगी जागांना वीज–पुरवठा पूर्णपणे बंद करण्यात आला होता. जे सार्वजनिक महत्वाचे उद्योग वीजे–शिवाय चालूच शकत नव्हते त्यांना फक्त वीज देण्यात येई. ती सुद्धा पूर्वीच्या मानाने तृतीयांश. जुन्या विजेच्या तारा व बल्ब उरले होते. पण त्यात वीज नव्हती. निष्प्राण देहासारखे ते वाटत होते. मातीच्या तेलाचे दिवे देखील सोन्या–सारखे दुर्मिळ होते. कारण मातीच्या तेलाची अत्यंत टंचाई होती. खाण्याच्या तेलाच्या समया, मेणबत्त्या वगैरेंच्या प्रकाशात फिरतांना प्रागैतिहासिक काळातल्या एखाद्या नगरात फिरल्यासारखे वाटत होते.

पण या सगळ्याचे काही चांगले परिणाम झाले होते. सूर्योदयाबरोबर उठून सूर्यास्ताला झोपी जाण्याची पद्धत रूढ होऊ लागली होती. सूर्यशक्तीचा असा अभिनव वापर करण्याची युक्ति काढल्याबद्दल विज्ञानविभागाच्या प्रमुखाला नोबेल प्राइझ देण्यात आले होते. हे नोबेल प्राइझ अर्थात् विदेशी नोबेल प्राइझ नसून भारत सरकारने दिलेले चक्क स्वदेशी नोबेल प्राइझ होते.

नाइट क्लबसारख्या संस्था बंद पडल्या होत्या.

विद्वान घरी आला तेव्हा आल्यावर एखाद्या महिन्यातच आपल्याला बडी नोकरी मिळेल असे त्याला वाटत होते. पण वर्ष निघून गेले तरी त्यांच्या एकाही अर्जाला उत्तर आले नाही. तेल, वीज, कोळसा यांचे दर्शन दुर्लभ झाल्यामुळे साऱ्या उद्योगांना मंदी आली होती. नोकरीवर असलेल्या लोकांना देखील पुरेसे काम नसल्यामुळे त्यांना कामावर ठेवणे उद्योगांना परवडत नव्हते. पण "कोणालाही कामावरून कमी करायचे नाही" असा सरकारने आदेश काढला होता. "कायदा केल्याने आणखी बेकार लोकांना पोसण्याची ऐपत वाढत नाही, आमचे सर्वस्व





घेऊन तुम्हीच हे उद्योग चालवा" असे उद्योगपतींनी निर्वाणीचे उत्तर दिले तेव्हा सरकारने उद्योगधंद्यांना बेकारी अनुदान – – – – एम्प्लॉयमेंट सब्सिडी – – – द्यायचे कबूल केले. या अनुदानातून निरुपयोगी कर्मचाऱ्यांचा पगार देण्यात येत असे. सरकार हे अनुदान अर्थात्च नोटा छापून देई. असल्या अनुत्पादक खर्चामुळे भाव बेसुमार वाढू लागले होते.

जेथे असलेले कर्मचारीच नकोसे झाले होते तेथे नव्या कर्मचाऱ्यांना नोकऱ्या कोण देणार?

आधीच नोकऱ्या कमी, त्यातून सरकारने कायदे केले होते की "चतुर्थांश नोकऱ्या अल्पसंख्यांसाठी, चतुर्थांश शारीरिक अपंगासाठी, चतुर्थांश बौद्धिक अपंगासाठी व चतुर्थांश दहशतवाद्यासाठी राखून ठेवण्यात याव्यात." म्हणजे शम्भर टक्के नोकऱ्या राखीव. राखीव वर्गात न मोडणारे उमेदवार न मिळाले तरच इतरांचा विचार करण्यात येई. पण नोकऱ्या एवढ्या थोड्या होत्या की राखीव वर्गाचे उमेदवार त्यांना पुरेसे होते.

यावर आमच्या विद्वानाने एक शक्कल लढविली. अर्जात धर्म कोणता या प्रश्नाचे उत्तर सेक्युलर व जात कोणती याचे उत्तर कास्टलेस असे लिहायला सुरवात केली.

पण अर्ज तपासणाऱ्यांनी या नोंदींचा पाहिजे तोच अर्थ करून विद्वानाचे अर्ज केराच्या टोपलीत फेकले.

आपल्या अर्जाचा विचार होत नाही. हे पाहून विद्वानाने आपल्यासारखाच बेकार अशा आणखी शम्भर विद्वानांच्या सहीने एक अर्ज सरकारकडे पाठविला, तो असा –

"आम्ही खाली सही करणारे सरकारच्या नजरेस आणू इच्छितो की आम्ही शिरगणतीच्या वेळी देखील आपला धर्म सेक्युलर व जात कास्टलेस असे लिहिले होते. तरी बरेच आम्हाला ब्राह्मण समजून नोकऱ्या देण्यात येत नाहीत. आम्हाला जबरदस्तीने हिंदू मानायचेच असेल तरी आमचा अंतर्भाव अल्पसंख्यातच होतो कारण हिंदू आता बहुसंख्य राहिलेले नाहीत. तेव्हा आम्हाला अल्पसंख्य मानून अल्पसंख्यासाठी राखून ठेवलेल्या जागांसाठी आमचा विचार करण्यात यावा."

यावर सरकारचे उत्तर आले ते असे :–

"तुमच्या अर्जाचा काळजीपूर्वक विचार करण्यात आला आहे. अर्जात वा शिरगणतीत धर्मापुढे सेक्यूलर व जातीपुढे कास्टलेस असे लिहिण्यात यापुढे बंदी करण्यात येत आहे. अशी उत्तरे दिल्याने सेक्युलॅरिझमला प्राणघातक धोका पोहोचतो व कास्टीझमला उत्तेजन मिळते. जो कोणी स्वत:चा धर्म सेक्युलर म्हणून लिहील तो हिंदू समजण्यात येईल व जो स्वत:ची जात कास्टलेस अशी लिहील तो ब्राह्मण समजण्यात येईल."

"सरकारने मानलेले अल्पसंख्य हे वर्गीकरण संख्येवर अवलम्बून नाही. सवर्ण हिन्दू हे बहुसंख्य, मग त्यांची संख्या काहीही असो, व बाकीचे अल्पसंख्य अशी सरकारी व्याख्या आहे."

ते उत्तर वाचून विद्वानांचा निरुपाय झाला.

पण आमचा विद्वान् जात्याच बुद्धिमान होता. त्याने परिस्थितीचा सांगोपांग विचार करून ख्रिस्ती होण्याचा निर्णय घेतला. पुढच्या अर्जाची वेळ येईपर्यन्त त्याचा बाप्तिस्मा देखील पूर्ण झाला. या अर्जात त्याने आपला धर्म ख्रिस्ती असा लिहिला. त्याने मिळविलेल्या उपाध्या दणदणीत होत्याच. त्याला लवकरच नोकरी मिळाली.

पण हाय, काही ख्रिस्ती लोकांनी फिर्याद केली :–

"केवळ नोकरी मिळविण्यासाठी धर्म बदलणाऱ्या लोकांना नोकऱ्या देण्यात आल्या तर अल्पसंख्यासाठी नोकऱ्या राखून ठेवण्याचा उद्देश विफल होईल. अल्पसंख्यांकांना संरक्षण हा नोकऱ्या राखून ठेवण्याचा हेतू आहे. बहुसंख्य लोक नोकऱ्या मिळविण्यासाठी एका रात्रीत अल्पसंख्य होऊ लागले तर अल्पसंख्यांचे त्यांच्यापासून संरक्षण कसे होणार? तेव्हा धर्माचा विचार करताना धर्म केव्हा बदलला याचाहि विचार झाला पाहिजे. ज्यांचे धर्मान्तर आधीचे होते, त्यांना नन्तर धर्मान्तर करणाऱ्यांवर अग्रक्रम मिळाला पाहिजे. तेव्हा केसचा निकाल लागेपर्यन्त झालेल्या नेमणुका स्थगित करण्यात याव्यात."

ही शेवटची विनन्ति मान्य करण्यात येऊन कामावर रुजू होण्याच्या आधीच नेमणूक स्थगित झाल्याचा आदेश इंग्रजी विद्वानाला मिळाला.





पण थोडेच दिवसात त्याला आशा देणारी अशी एक घटना घडली. सेण्ट जीझस अॅण्ड मेरी मिशनने इंग्रजी विद्वानाच्या बाजूने फिर्याद गुदरली. ती अशी :–

"इंग्रजी विद्वानाची नेमणूक रद्द करू नये व धर्मान्तराच्या तारखेचा नोकऱ्यांशी काही सम्बन्ध असू नये. असा सम्बन्ध जोडला तर नोकरीसाठी धर्मान्तर करण्याची प्रवृत्ति कमी होऊन शक्य तितक्या लवकर हिन्दु धर्मीयांच्या संख्या नगण्य करून भारताला पूर्णपणे सेक्युलर करण्याचे ध्येय साकार होण्याच्या मार्गात फारच अडचणी येतील."

न्यायालयाने मिशनची फिर्यादही विचारार्थ घेतली पण इंग्रजी विद्वानाची नेमणूक स्थगित करण्याचा आदेश मागे घेण्याचे नाकारले. त्यामुळे विद्वानाला केसचा निकाल लागेपर्यन्त बेकार राहण्याचा प्रसंग आला.

न्यायालयाचा निकाल लागायचा तेव्हा लागो, पण आपल्याला नोकऱ्या मिळण्याच्या मार्गात नवधर्मान्तरित हे एक विघ्न आहे असे समजून जुन्या ख्रिस्त्यांनी नव्या ख्रिस्त्यांवर हल्ले करायला सुरवात केली. हिन्दु/मुसलमान वगैरे जुने दंगे बन्द झाले नव्हतेच. आता त्यांच्या जोडीला ख्रिस्त्याख्रिस्त्यातले हे नवीन दंगे सुरू झाले.

हिन्दू जातीयतेमुळे हे दंगे होतात असे तत्काल निदान करून सरकारने काही हिन्दू संस्थावर बन्दी घातली.

नोकरी मिळत नाही तर आपण आपलाच एक कोचिंग क्लास काढावा, असा आता इंग्रजी विद्वानाने विचार केला. त्याच्या घरावर "प्रायव्हेट कोचिंग क्लास, इंग्लिश" अशी पाटी झळकली. नोकऱ्या देणारे जात पाहात असले तरी खाजगी वर्गात जाणारे विद्यार्थी शिक्षकाची जात पाहत नसत. त्यातून विद्वानाच्या पदव्या मोठ्या होत्या. त्यामुळे कोचिंग क्लासला विद्यार्थी बरे मिळतील अशी आशा होती.

पण ही आशा फलद्रूप झाली नाही. कोचिंग क्लासमध्ये सुरवातीला विद्यार्थी आले पण बहुतेकांना शाळेत शिकविण्यात येणारी पुस्तकेच कोचिंग क्लासमध्ये शिकायची होती. कोणी परीक्षेत विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांची उत्तरे विद्वानाकडून लिहून घेऊन ती घोकण्याच्या इराद्याने त्याच्याकडे येत. पण

विद्वान् म्हणायचा :– "मी ऑक्सफर्डहून शिकून आलो तो शाळा मास्तर होण्यासाठी नाही. यूनिव्हर्सिटी प्रोफेसर वा निदान लेक्चरर होण्याची माझी इच्छा आहे. मी आपल्या विषयावर फक्त व्याख्याने देईन. ती देखील देशी प्राध्यापकांप्रमाणे तोण्डी व्याख्याने देणार नाही, ऑक्सफर्डमधील व्याख्यात्याप्रमाणे माझ्या विषयावर संशोधन करून ती वाचून दाखवीन."

पण विद्यार्थ्यांना परीक्षा पास करायच्या होत्या, त्यांना विद्वानाने काय संशोधन केले आहे हे ऐकायचे नव्हते. ब्रॅडलेने शेक्सपीअरवर काय लिहले आहे वगैरे विषयावर नोटस हव्या होत्या. ही अपेक्षा विद्वानाकडून पुरी होत नाही असे दिसून आल्याबरोबर कोचिंग क्लासचा क्षयरोग सुरू झाला.

इंग्रजी विद्वानाकडे विद्यार्थी आले नाहीत तरी त्याची पुष्कळांना गरज होती. एकदा त्याच्याकडे Society for the Protection of English या संस्थेचे शिष्टमण्डळ आले. ते म्हणाले :

"या देशातून लवकरच इंग्रजीचे उच्चाटन व्हायची वेळ आली आहे. अनेक लोक म्हणू लागले आहेत की इंग्रजांची मालमत्ता नाही. ती भारतीय भाषा आहे. तेव्हा इंग्रज वापरतो तसेच इंग्रजी वापरले पाहिजे असे नाही. आपल्या महाराष्ट्रातले लोक म्हणू लागले आहेत की इंग्रजी ही महाराष्ट्राची भाषा आहे. तेव्हा आम्ही जे इंग्रजी वापरू त्यावर महाराष्ट्राची छाप असली पाहिजे. ते "आय् उखाडनाफइट एक झाड अॅण्ड लावनाफाइट दुसरे," आय एम नॉट ए धिस दॅट मॅन" अशी भाषा बोलू लागले आहेत. महाराष्ट्रीय वृत्तपत्रातून देखील" इन्दिरा फेल ए टॉकिंग वॉकिंग वूमन", "गरीबी नॉट हटिंग" अशी भाषा येऊ लागली आहे. या भाषेचाच सर्वांनी वापर करावा, अशाने महाराष्ट्राचे इथॉस राखले जाईल व इंग्रजी देखील समृद्ध होईल अशी या लोकांनी चळवळ सुरू केली आहे.

अशा महाराष्ट्रीय इंग्रजीप्रमाणेच तामिळ इंग्रजी, पंजाबी इंग्रजी वगैरे इंग्रजीचे वीस पंचवीस प्रकार निर्मान झाले आहेत. एका प्रान्ताचे इंग्रजी दुसऱ्या प्रान्तात समजत नाही. एवढेच नव्हे तर वऱ्हाडातले इंग्रजी पुण्यात समजत नाही." माय हॅण्ड वाझ नॉट वर्किंग फॉर फोर डेझ" असे एका वऱ्हाडी बाईने आपल्या पुणेरी डॉक्टर मैत्रिणीला सांगितले तेव्हा तिने तिचा हात तपासायला





सुरवात केली. अशा इंग्रजीविरुद्ध शुद्ध इंग्रजीसाठी चळवळ करण्याची वेळ येऊन ठेपली आहे तुम्हीच या चळवळीचे, निदान महाराष्ट्रापुरते तरी पुढारी होण्यास योग्य आहात."

इंग्रजी विद्वानाने सांगितले :– "अशा इंग्रजीविरुद्ध चळवळ झालीच पाहिजे. देशी भाषांनी इंग्रजीला समृद्ध करण्याचा आव आणणे म्हणजे भिकाऱ्याने कुबेराची गरिबी हटविण्यास सरसावणे होय. पण सध्या माझ्यापुढे पोटाचा प्रश्न आहे, तुमच्या चळवळीत सामील होऊन तो सुटणार नाही."

पोटाचा प्रश्न कसा सोडवावा याचा विचार करताकरता "इंग्रजीत बरीच नवीन पुस्तके निघत आहेत, आपण इंग्रजी भाषा व साहित्य यावर ग्रन्थ लिहून पैसे का मिळवू नयेत?" अशी एक अभिनव कल्पना विद्वानाला सुचली. तो एका प्रकाशकाकडे गेला व आपण अशा तऱ्हेचे ग्रन्थ लिहिण्यास तयार आहोत असें त्याने सांगितले, तेव्हा प्रकाशक म्हणाला :–

"तुम्हाला देशातल्या ग्रन्थनिर्मितीच्या परिस्थितीबद्दल काहीच कल्पना दिसत नाही. देशात वाचकांचे दोन वर्ग झालेले आहेत. एक वर्ग इंग्रजांच्या इंग्रजीच्या पुरस्कर्त्यांचा. हा वर्ग भारतीयांनी लिहिलेली इंग्रजी पुस्तके वाचत नाही, मग ती इंग्रजीच्या पुरस्कर्त्यांनी लिहिलेली का असेनात. खुद्द इंग्रजांनी लिहिलेली इंग्रजी पुस्तके सर्व विषयावर उपलब्ध आहेत. मग आम्ही भारतीयांनी लिहिलेली इंग्रजी पुस्तके का वाचावीत?" असा त्यांचा सवाल आहे. तेव्हा या वर्गासाठी तुम्ही पुस्तक लिहाल तर एकही प्रत खपणार नाही.

दुसरा वर्ग देशी इंग्रजीच्या पुरस्कर्त्यांचा आहे. भारतीयांनी लिहिलेले पुस्तक असेल तर ते देशी इंग्रजीत असल्याशिवाय आम्ही वाचणार नाही असा या वर्गाचा निर्धार आहे. पण देशी इंग्रजीचे जितक्या देशी भाषा तितके प्रकार असल्यामुळे आम्ही आपले कार्यक्षेत्र महाराष्ट्रीय इंग्रजीपुरते मर्यादित ठेवले आहे. महाराष्ट्रीय इंग्रजीत "ओतिफाय आग इन तेल" "डेझ हॅव्ह गॉन टु हर" वगैरे कादम्बऱ्या आम्ही प्रकाशित केल्या आहेत. तुम्हाला अशी एखादी कादम्बरी लिहायची असेल तर ती लिहून आमच्याकडे पाठवा. पसंत पडल्यास पुढे बोलणे करता येईल."

काही उत्तर न देता इंग्रजी विद्वान् ताडकन उठून बाहेर आला.

निराशेने आता काय करावे याचा विचार करीत असताना त्याला पुढील जाहिरातीची पाटी एका मोठ्या कार्यालयात टांगलेली दिसली.

Armed Forces Education Corps. No reserved jobs. Apply.

इंग्रजी विद्वानाचा आपल्या डोळ्यावर विश्वास बसेना. त्याने त्या कार्यालयात जाऊन चौकशी केली तेव्हा त्याला कळले की :–

"सैन्यामध्ये राखीव नोकऱ्या नाहीत. सरकारने शिक्षण जसे सेण्ट जीझस ॲण्ड मेरी या संस्थेवर सोपविले आहे तसाच देशाच्या रक्षणाचा भार रशियावर सोपविलेला आहे. त्यामुळे सैन्याचा कारभार रशियन सल्लागाराच्या "सल्ल्याने चालतो. सरकारात रक्षामंत्र्यांची जागा नाही. रशियन सल्लागार हाच रक्षामंत्री. हा सल्लागार भारतसरकारला जबाबदार नसून रशियन सरकारला जबाबदार आहे. सैन्य सल्लागाराने 'सैन्यात एकही जागा राखीव असू नये, रक्षाखात्यातल्या सर्व जागा केवळ गुणांच्या आधारावर भरण्यात येतील', असा आदेश काढला आहे.

"पण एज्युकेशन कोरमध्ये तुम्हाला घेता येणार नाही. या कोरमध्ये फक्त २७ वर्षाच्या खालील उमेदवारांचा विचार करण्यात येतो. इतक्या परदेशी पदव्या घेतलेल्या तुमच्यासारख्या उमेदवाराला मी असा सल्ला देईन की तुम्ही विदेश खात्यातील नोकऱ्यांसाठी अर्ज करावा. रक्षाखात्यांप्रमाणेच विदेशखात्यातल्या नोकऱ्या देखील मुक्त आहेत. त्यात एकही राखीव जागा नाही.कारण विदेशनीतीचा सल्लागार देखील रशियन आहे व तो देखील भारतसरकारला जबाबदार नसून रशियन सरकारला जबाबदार आहे. भारताच्या रक्षणाचा भार रशियाने उचलल्यावर, भारताची विदेशनीती देखील रशियाच्या तंत्राने चालणे अपरिहार्य आहे. नाहीतर भारताने आपल्या विदेशनीतीने चीन वा अमेरिका यांच्याशी कुरापत काढावी व त्यांनी स्वारी केल्यावर त्यांच्याशी लढण्याची जोखीम मात्र रशियाने घ्यावी हे कसे चालणार? म्हणून भारताची विदेशनीती देखील आम्हीच सांभाळतो. परदेशात असलेले भारताचे दूतावास आमच्याच अधिकाराखाली आहेत. तेव्हा तुम्ही परकीय दूतावासातील नोकरीसाठी अर्ज करा.





मात्र या सर्व नोकऱ्यासाठी रशियन, जर्मन, फ्रेंच, इटालियन, स्पॅनिश, चीनी वा जपानी यापैकी एखादी भाषा येणे आवश्यक आहे. शिवाय नोकरीसाठी निवड झाल्यावर तुमची नेमणूक ज्या देशात होईल तेथली भाषा वरील सात भाषापैकी नसल्यास तुम्हाला त्या देशाचीही भाषा शिकावी लागेल."

इंग्रजी विद्वानाचे डोळे गरगर फिरू लागले "पुरोगामी" भारतात आपण हे काय ऐकतो आहोत? इंग्रजीव्यतिरिक्त एखादी भाषा नोकरीसाठी आवश्यक आहे? तार रे येशू राया."

मोठ्या तोऱ्यात त्याने त्या रशियन अधिकाऱ्याला विचारले :–

"मला इंग्रजी येते. इंग्रजी आल्यावर आणखी एखादी भाषा येण्याची काय आवश्यकता आहे?"

रशियन अधिकाऱ्याने उत्तर दिले :– "या बाबतीत माझ्याशी वाद करून काय उपयोग? या अटी सरकारने घालून दिलेल्या आहेत. पण माझी एक सूचना आहे. तुम्हाला आणखी एखादी भाषा शिकणे हीच सर्वात मोठी अडचण वाटत असेल तर तुम्ही विद्यार्थी उमेदवार म्हणून अर्ज करा. अशाने निवड झाल्याबरोबर तुम्हाला तावडतोब नोकरी मिळाली नाही तरी पाच वर्षे शिष्यवृत्ति मिळेल. तेवढ्या अवधीत तुम्ही वरील सात भाषापैकी एकीचा अभ्यास केला म्हणजे पुरे."

यावर इंग्रजी विद्वान् म्हणाला :– "ज्याला इंग्रजी येते त्याला आणखी एखादी भाषा शिकायला सांगणे हा शुद्ध अत्याचार आहे. मी याविरुद्ध सरकारकडे दाद मागीन."

"रशियन सरकारकडे" रशियन अधिकाऱ्याकडे आठवण करून दिली.

रशियन सरकारकडे दाद मागण्यासाठी इंग्रजी विद्वानाने एक शंभर पानी अर्ज खरडला, त्या इंग्रजीमाहात्म्यावर आणखी आपल्यासारख्याच शंभर विद्वानांच्या सह्या घेतल्या व तो रशियन/भारतीय विदेशखात्यामार्फत रशियन सरकारकडे पाठवून दिला.

पण हा अर्ज वाटेत गहाळ झाला की योग्य पत्त्यावर पोहोचल्यावर केराच्या

टोपलीत गेला हे इंग्रजी विद्वानाला कधी कळलेच नाही. उलट त्याची बेकारीची समस्या सुटण्याच्या मार्गाने काहीच प्रगति न होता त्यांचे प्राण कंठाशी आले.

नवऱ्याची व आपलीही विद्या पोट भरण्याच्या कामी उपयोगी पडत नाही हे पाहून विद्वानाच्या पत्नीने जुन्यापुराण्या बायकांच्या पावलावर पाऊल टाकायचे ठरविले. तिने आपल्या पाककौशल्याचा आश्रय केला. घरी पापड/लोणच्यांचा कारखाना काढला.

या कामात विद्वानाला आपल्या पत्नीचे असिस्टंट म्हणून काम करावे लागे. एकदा "बाजारात जाऊन कर्ड व व्हेजिटेबल घेऊन या म्हणून पत्नीने हूकूम फर्मावला." तेव्हा विद्वान् आज्ञाधारकपणे बाजारात गेला.

भाजीबाजारातल्या पहिल्याच दुकानात त्यांने "कोरिअण्डर, ब्रिंजल व अनियन" मागितले भाजीवालीने क्षणभर त्यांच्या तोंडाकडे पाहिले तेव्हा या अडाणी बाईच्या दुकानात आपल्याला पाहिजे ते मिळणार नाही म्हणून ते पुढे झटकले.

पुढच्या दुकानदाराने उन्हाळ्याच्या दिवसात देखील कोट, टाय घातलेला त्यांचा अवतार पाहून त्यांना साद घातली :- "यस् सार"

त्याबरोबर विद्वानाची कळी खुलली, व त्याने "कोरिॲण्डर, ब्रिंजल व अनियन" मागितले. दुकानदाराने ब्रिंजल व अनियन दिले पण कोरिॲण्डर त्याच्या डोक्यावरून गेले कोरिॲण्डरचे भारे समोरच होते. पण विद्वानाने तिकडे बोट दाखवून ते मागितले नाही.

"कोरिॲण्डर हा मंत्र उच्चारल्याबरोबर जे उपस्थित होत नाही ते कोरिॲण्डर नव्हे, तें घेऊन काय उपयोग?"

अजून "कर्ड" घ्यायचे उरले होते. "कोरिॲण्डर" या गावात मिळेल अशी आशा त्यांने सोडली होती. थोडे इकडे तिकडे पाहतात तो त्यांना दहीवाली दिसली. "हाफ किलो' म्हणून त्यांनी भांडे तिच्यापुढे केले. दहीवालीने दही भांड्यात टाकून पैसे घेतले.





आता बाजार पुरे म्हणून विद्वान पुढे जायला निघाले. तोच "दही.." म्हणून दहीवालीने बांग दिली. त्याबरोबर आपण घेतलेले कर्ड नसून दही आहे हे विद्वानाच्या लक्षात आले. "बाईने पण आपल्याला फसविले," आता तिच्याशी हुज्जत घालण्यात काय अर्थ आहे? आपण तरी तिला कर्ड कुठे मागितले ? नुसते "हाफ किलो" म्हणून भांडे पुढे केले. "चूक आपलीच आहे ती आपणच निस्तरली पाहिजे."

म्हणून विद्वानाने त्याच्या भांड्यात दही नावाचा जो "क्लिष्ट व प्रतिगामी" पदार्थ गनिमी काव्याने शिरला होता तो भांड्यासकट फेकून दिला.

त्याच्या पिशवीत ब्रिंजल व अनियन होते. ते घेऊन तो पुढे सरला तोच :-

"गुड मॉर्निंग जेन्टलमन, फरॉम् व्हेअर ?"

त्यांच्या कानावर शब्द आदळले. बाजारात नवीन मनुष्य दिसतो. उकाड्यात देखील सुटाबुटात आहे म्हणून आदरबुद्धी जागृत होऊन एका माणसाने संभाषणास सुरवात केली होती. विद्वानाला उत्तर देण्याची संधी न देता त्यांने आपली टकळी सुरूच ठेवली होती. "ओ. आय. सी. वांगी, कांदे.."

वांगी, कांदे" शब्द ऐकल्याबरोबर विद्वानाचा चेहरा एकदा उतरला. त्या गृहस्थाचे त्याला पुढे काहीही ऐकावेसे वाटले नाही. आपण घेतले ते ब्रिंजल व अनियन नसून वांगी, कांदे वगैरे काही प्रतिगामी पदार्थ आहेत. दहीवालीला आपण कर्ड मागितले नाही म्हणून तिने भलतेच काहीतरी दिले. भाजीवाल्याने मात्र चक्क आपल्याला ब्रिंजल व अनियन देतो म्हणून वांगी, कांदेच दिले.

पण आता भाजीवाल्याशी हुज्जत घालायला कुठे जा? तो म्हणेल तुम्ही वांगी कांदेच मागितले होते. खरेदी होऊन आता बराच वेळ झाला आहे.

आपण फसलो ते फसलो. आता हे प्रतिगामी पदार्थ बरोबर नेण्याचे पाप तरी करू नये म्हणून त्यांनी ते वांगी कांदे पिशवीसकट रागाने फेकून दिले, व ताबडतोब बूट वाजवीत तो जाऊ लागला.

तो गृहस्थ विद्वानाकडे पाहतच राहिला. "आपण एवढे स्वागत केले. पण

आपल्याकडे ढुंकूनही न पाहता हा माणूस टोपलीसकट हे वांगी कांदे फेकून पळ काढतो आहे. आसपास पागलखाना नाही. तेव्हा तेथून हा पळून आला असेल असा सम्भव नाही. हा पागल नसून चोरच असावा. आपण पकडले गेलो या भीतीनेच त्याने ही टोपली फेकून दिली असावी. भाजीच्या या पिशवीप्रमाणेच त्याचा सूट देखील चोरलेलाच असावा. थोड्या अंतरावर जाऊन तो सूटही बहुधा तो फेकून देईल."

त्या गृहस्थाने चोरीची तक्रार करण्यासाठी चौकीकडे धाव घेतली.

इकडे इंग्रजी विद्‌वान पैसे खर्चून पण बरोबर कोणताही बाजार न घेता घरी परतला. त्याच्या तोंडावर आपण पदराला खार लावून देखील प्रतिगामी माल फेकून दिला याबद्दल समाधान झळकत होते.